नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.


अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे
कै. ग. त्र्यं. माडखोलकर स्मृती
वाङ्मय पारितोषिक
१९९०
प्रा. वामन पात्रीकर लिखित
'जगवुडी' या त्यांच्या कादंबरीकरिता
प्रदान करण्यात आले.



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

प्रबंध संपादक : केशव जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन–संवर्धन–संशोधन ॥

संपादक मंडळ : डॉ. वि. स. जोग / डॉ. मधुकर वाकोडे /डॉ. श्रीकांत तिडके / श्री. कमलाकर घारप / डॉ. जयंत परांजपे / डॉ. प्रकाश खरात/ प्रा. शा. वा. स्वान.

वर्ष शेहेचाळीसावे /अंक १-२-३

जाने.-फेब्रु.-मार्च/[illegible]

मूल्य– १० रु. /वार्षिक वर्गणी : ३९ रु.

त्रैवार्षिक वर्गणी : ९० रु.

संदर्भ ग्रंथालय

दाखल नोंद क्रमांक 30350

दिनांक 25.2.98

82.

अनुक्रम ■ ■ ■

■ संपादकीय / श्रीपाद भालचंद्र जोशी . . २ ■ आशीर्वाद [कविता] / श्रीधर शनवारे . . ५ ■ स्मृतीकण : विदर्भ साहित्य संघ आणि मी [लेख] / के. डॉ. य. खु. देशपांडे – संकलन – डॉ. सौ. विजया फडणीस . . ६ ■ कथाविश्व : मनोहर तल्हारांचे [लेख]/ डॉ. रवीन्द्र के. शोभणे . . १० ■ मराठीविषयक प्रबंधांची सूची (१९३९–१९८९) [प्रकल्प] / डॉ. वसंत विष्णु कुळकर्णी . . १९ ■ गझलचे छंदशास्त्र : एक अभ्यास [लेख] /आनंद आडे . . २८ ■ संवादप्रक्रिया : सैद्धांतिक संकल्पन [परिचय] /श्रीपाद भालचंद्र जोशी ३२ ■ पाच कविता / सिद्धार्थ मेश्राम . . ४० ■ एक कविता / मनोहर चिंतामणी वझे . . ४१ ■ दोन कविता / श्रीधर पांडे . . ४२ ■ दिवाळी अंकांच्या दुनियेत [टिपण]/ सौ. शोभा अरुण उबगडे ४३ ■ घुळपाटी : एक भाषिक अभ्यास [अध्ययन] / प्रा. वसंत पाटील . . ४६ ■ मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन [वृत्तांत लेख]/ डॉ. सुशीला पाटील . . ५४ ■ पुरस्कारार्थ परीक्षण : एक अनुभव [निरीक्षणे] / डॉ. विश्वेश्वर सावदेकर . . ५६ ■ साभार पोच . . ६१ ■ कै. उ. रा. गिरी : अर्थ आणि प्रतिमांचे अतूट नाते [टिपण] प्रा. मदन कुळकर्णी ६३ ■ जुन्या मराठी शब्दांच्या पुनरुज्जीवनाच्या निमित्ताने / ना. त्र्यं. देशपांडे . . ६६ ■ मराठी भाषा कशी लिहावी ? [समस्या] / भा. ब. निनावे . . ६९ ■ टिपणांचे विषय . . ७१ ■ ग्रांथिकी / डॉ. शांता कोठेकर . . ७२ / देवानंद गोरडे . . ७६ / शीला कोलटकर . . ७७ / टिपणांचे विषय . . ७७ ■ काव्य सोहळा [सूचना] / . . ७८ ■ वाचकीय . . ७९–८१ ■ कार्यवृत्त / मनोहर म्हैसाळकर . . ८२–९८

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संदर्भ सेवा : चंद्रकांत कुळकर्णी, आमंत्रक, श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय, वि. सा. संघ, नागपूर

आवरण पृष्ठ : प्रा. प्रकाश कामतीकर/ रेखाटने : भाऊ समर्थ

मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे /श्यामकांत कुळकर्णी

जाहिरातविषयक संपर्क : आमंत्रक, प्रकल्प विभाग, वि. सा. संघ, नागपूर

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ,

झाशी राणी चौक /नागपूर–४४० ०१२

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

* * * * * * * * * * * * * संपादकीय

अधोगत; विकृत; भ्रष्ट होण्याकडे झुकणाऱ्या मनाची अधोगतता ही उर्जेची असते. ती उर्जा निर्मितीस असमर्थ ठरणाऱ्या मेंदूच्या पेशीत दडलेली असते. मेंदूची स्वच्छता हाच या अवस्थेवरील जीवशास्त्रीय उपाय ठरतो, असे मागे म्हटले होते.

सांस्कृतिक, सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात तर ही उपाययोजना आज सर्वाधिक अग्रक्रमाची बाब म्हणून स्वीकारल्या जाणे आवश्यक झालेले आहे.

परिवर्तनाचे मूळ केंद्रस्थान 'समाज' नसून 'व्यक्ती' असते. 'समाज' ही अमूर्त संकल्पना असून ती व्यक्तींच्या योगेच मूर्त होत असल्याने कोणतेही परिवर्तन हे सामाजिक पातळीवर घडत नसून ते घडण्याचे केंद्र हे व्यक्तिगत आहे.

या व्यक्तिगत केंद्रस्थानी चालणाऱ्या घडामोडी परिवर्तन थोपवूही शकतात, घडवू देखील शकतात.

सांस्कृतिक-सामाजिक परिवर्तनाच्या या व्यक्तिगत केंद्रस्थानी चालणाऱ्या घडामोडींच्या मुळाशी व्यक्तिगत निर्णयक्षमता, निर्णय घेण्याची प्रक्रिया, स्वतःला चेतवणाऱ्या बाह्य विश्वातील असंख्य चेतकांमधून केल्या जाणारी व्यक्तिगत निवड, त्या चेतकांवरील व्यक्तीच्या अंतर्विश्वातील संस्कार-प्रक्रिया, यातून निर्माण होणारे 'स्व'चे अनुभवविश्व व त्याच अनुभवविश्वाद्वारे पुनः बाह्य विश्वातील चेतकांची होणारी निवड असे हे चक्र असते. ही अव्याहत सुरू असणारी प्रक्रियाच मानवी अस्तित्वाच्या संपूर्ण कालखंडभर व्यक्तीचे स्वतःशी असणारे नाते व त्याची बाह्य विश्वासोबतची आंतरक्रिया निश्चित करणारी महत्त्वाची बाब आहे.

यातच प्रत्येक 'व्यक्तिगत' असणाऱ्या निर्मितीक्षमतेचीही बीजे दडलेली आहेत.

या व्यक्तीगत केंद्रांची बाह्य विश्वाशी संपर्क प्रस्थापना करून बाह्य विश्वाचे रूपांतर अंतर्विश्वात करण्याची कामगिरी पार पाडण्याची जबाबदारी निसर्गतः इंद्रियसंवेदनांची आहे. त्यामुळे बाह्य विश्वाचा बोध नेहमीच या प्रत्येक व्यक्तिगत केंद्रस्थानी, व्यक्तीअंतर्गत विश्वात रूपांतरित होऊनच होतो. हे रूपांतरण प्रत्येकच व्यक्तीच्या पातळीवर स्वतंत्र व स्वायत्तपणे होत असते व वर म्हटल्याप्रमाणे अत्यंत जटिल व नाजूक स्वरूपाच्या अशा प्रक्रियेद्वारे हे होत असते; म्हणूनच प्रत्येकाचे अंतर्विश्व हे भिन्न, स्वतंत्र व स्वायत्त अशी स्वतःचीच निर्मिती असते.

अशा एका मूलभूत महत्त्वाच्या प्रक्रियेचा परिचय अधिक विस्ताराने घडविण्याचा प्रयत्न "संवादप्रक्रिया : सैद्धांतिक संकल्पन" या शीर्षकाच्या याच अंकातील एका लेखाद्वारे केलेला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या प्रक्रियेच्या शास्त्राप्रमाणे बाह्य विश्वातील कोणतेही 'परिवर्तन' व्यक्तिगत केंद्रस्थानीच्या अंतर्विश्वाचा भाग होईस्तोवर, पर्यायाने ते व्यक्तीची स्वतःचीच अशी निर्मिती असण्याच्या प्रक्रियेतून जाईस्तोवर कोणतेही परिवर्तन स्वीकृत होत नाही व ते व्यक्तीच्या स्वीकृत सामाजिक वर्तनाच्या पातळीवर प्रकट होत नाही. हे शास्त्रीय सत्य आहे.

ठोकळेबाज विचारवृत्ती, पारिभाषिक संदेशबाजी, आरोप-प्रत्यारोप, जुलुम-जबरदस्ती; व त्यातून प्रवृत्त होणारे वर्तनाच्या पातळीवरील नैराश्य, अवास्तवता, जातीय, धार्मिक विद्वेष, हिंसक आचार, विचार, कृती व परिणामतः परिवर्तनाचीच पीछेहाट या आज समकालीन दृश्य समस्या झालेल्या आहेत. त्यांची मुळे ही व्यक्तिगत केंद्रस्थानीच्या अंतर्विश्वातील बदल घडविण्याच्या उद्दिष्टां-वर आधारलेले शास्त्रीय असे सामाजिक, सांस्कृतिक धोरण, त्यानुसार आवश्यक ते औपचारिक अनौपचारिक शिक्षण, प्रशिक्षण व अशा प्रकारच्या परिवर्तनाच्या पद्धतींचा सार्वजनिक अभाव यात सर्वाधिक दडलेली आहेत.

सामाजिक न्यायाची प्राप्ती ही तद्नुरूप सामाजिक पुनर्रचनेशिवाय शक्य नाही व सामाजिक पुनर्रचना ही आज पुन: एकदा व्यक्तींच्या 'स्व'गत पुनर्रचनेशिवाय शक्य नाही.

व्यक्तींच्या 'स्व'गत पुनर्रचनेकरिता व ती वारंवार होत रहावी याकरता प्राचीन काळापासूनच धर्मशास्त्रज्ञांनी विचार मांडलेले आहेत. मात्र आज रूढार्थाने धर्म म्हणून असलेल्या संकल्पनेव्यतिरिक्तच्या धर्मनिरपेक्ष, धर्मातीत अशा शास्त्रीय ज्ञानाधारे ही पुनर्रचना करू शकणारी तंत्र मोठ्या लोकसंख्येला मोठ्या प्रमाणावर उपलब्ध व आत्मसात करवून देण्याची वेळ आलेली आहे.

सांस्कृतिक; सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी देखील म्हणूनच यानंतर निव्वळ परंपरागत पोथीनिष्ठा, ठोकळेबाज व घोषणाबाज पद्धतीने चालवून ईप्सित परिणाम साधल्या जाऊ शकत नाही अशा टप्प्यांवर येऊन पोहचलेल्या आहेत. त्याची कारणे बरीचशी वर म्हटल्याप्रमाणे बाह्यविश्व व व्यक्तिगत अंतर्विश्व यांच्या संबंधातील वाढत्या आंतरक्रियांच्या गुंतागुंतीत आहेत. तशीच ती गुंतागुंत जाणून घेण्याकरिता लागणाऱ्या मूलभूत प्रक्रियात्मक ज्ञान, जाण व त्यासंबंधांचे आवश्यक ते बोधन यांच्या अभावातही दडलेली आहेत.

व्यक्ती व विविध माध्यमे यांच्या परस्परसंबंधातून उद्भवणाऱ्या बाबी या परस्परांचा आशय व जीवनाकार निश्चित करणाऱ्या स्वरूपाच्या असल्याचे भान आज जनसंवाद-माध्यमांच्या युगात प्रकर्षाने येऊ लागले आहे. संवाद क्रिया-प्रक्रिया, प्रतिक्रिया, प्रतिसाद संवादकृती; संवादाचे संदर्भ, परिस्थिती यांच्याबाबतच्या विविध ज्ञान शाखातील उपलब्ध अध्ययनामुळे व्यवस्थापन, निर्मिती निर्णयशक्ती, वृत्ती, वृत्तीतील बदल, रूची, रूचीतील बदल, वर्तन; वर्तनातील बदल गुणवत्ता वृद्धी इ. बाबतची तंत्रे व कौशल्ये यामुळे व्यक्तिगत व सामाजिक जीवनाच्या स्वरूपात ईप्सित बदल घडविण्याची तंत्रज्ञाने विकसित झाली आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निर्मितीच्या व्यवहार देखील त्यामुळे या स्थितीच्या परिणामांपासून अलिप्त असणे शक्य नाही. त्यावरही अंतर्गत परिणाम झालेला आहेच.

विविध क्षेत्रातील विविध प्रकारचे बदल, घडामोडी, समस्या, इ. चे आकलन देखील पुरेसे स्पष्टपणे होत नाही असे अनेकदा जे जाणवते त्याची कारणे व्यक्तीच्या अंतर्विश्व व बाह्य विश्वासंबंधातील या प्रकारच्या प्रक्रियात्मक ज्ञानाच्या अभावात शोधून पहावी लागतील.

वाङ्मय, कलेच्या निर्मात्यांचे देखील समकालीन मानवी जीवनव्यवहारासंबंधांचे, ताणतणावांचे आकलन तोकडे पडत असल्याच्या होणाऱ्या जाणीवांच्या मुळाशी देखील अशा प्रकारची कारणे असणे पूर्णपणे नाकारता येईल काय ?

श्रीपाद भालचंद्र जोशी



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आशीर्वाद

मी लिहितो ज्या कागदावर
त्या कागदाच्या जन्मस्थानी
मला वांबूचे हिरवेकंच बन दिसते.

मी लिहितो ज्या शाईने
त्या शाईच्या प्रगल्भस्थानी
मला विस्तीर्ण निळे आभाळ दिसते.

मी लिहितो जेव्हा कविता
तेव्हा तिला
बांबूच्या बनातून दिसणारे आभाळ
आशीर्वाद देत आहे असे मला भासते

श्रीधर शनवारे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्मृतिकण १

विदर्भ साहित्य संघ आणि मी

[कै. डॉ. य. खु. देशपांडे]

संकलन / डॉ. सौ. विजया फडणीस

प्रख्यात इतिहास संशोधक, महानुभाव वाङ्मयाचे अभ्यासक आणि यवतमाळ येथील शारदाश्रम ह्या संस्थेचे संस्थापक कै. डॉ. य. खु. देशपांडे ह्यांचा आणि विदर्भ साहित्य संघाचा संस्थेच्या स्थापनाकालापासूनचाच संबंध आहे. 'य. खुं.'नी आपल्या काही कौटुंबिक, साहित्यिक आणि संशोधनात्मक आठवणी 'स्मृतिकण' ह्या नावाने लिहून ठेवलेल्या आहेत. अप्रकाशित असलेल्या ह्या आठवणींमधील एक लहानसे प्रकरण म्हणजे विदर्भ साहित्य संघाचा १९४५ सालपर्यंतचा इतिहासच होय. ह्यात वि. सा. संघाची स्थापना कशी झाली, त्यामागे कुणाची प्रेरणा होती, संघाची सुरवातीची वार्षिक अधिवेशने कुठे आणि कुणाच्या अध्यक्षतेखाली झाली ह्या महत्वपूर्ण माहितीबरोबरच काही गमतीदार घटनांचीही नोंद आढळते. विशेष म्हणजे य. खुं. नी हा मजकूर १४ जुलै १९६९ रोजी म्हणजे त्यांच्या ८७ व्या वाढदिवशी लिहून ठेवलेला आहे. त्यात त्यांनी 'वि. सा. संघ आणि मी' अशी लेखमाला लिहिण्याची योजना असल्याचे लिहिले आहे. पैकी हा एकच लेख जुन्या कागदपत्रातून उपलब्ध होऊ शकला. वि. सा. संघाच्या आणि शारदाश्रमाच्या स्थापनेचा इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने मात्र हा लेख महत्त्वाचा आहे.

१९२२ सालापासून य. खुं. चा विदर्भ साहित्य संघ ह्या संस्थेशी आलेला संबंध शेवटपर्यंत कसा जिव्हाळ्याचा होता हे त्यांनी लिहिलेल्या प्रास्ताविकातूनच लक्षात येते. ते लिहितात, 'वि. सा. संघाचा स्थापनकालापासूनचा सभासद आणि शारदाश्रमाच्या संस्थापकांपैकी एक आणि हल्ली एक विश्वस्त आणि अध्यक्ष ह्या नात्याने ह्या दोन्ही संस्थांशी माझा निकटचा संबंध आहे. साहित्य संघाची स्थापना होऊन आज ४७ वर्षे झाली, आणखी तीन वर्षांनी संघ स्थापनेला ५० वर्षे होतील. त्यावेळी संघ कार्यकर्ते अर्धशताब्दी महोत्सव अवश्य साजरा करतील. आज (ता. १४ जुलै १९६९) ८७ वर्षे पूर्ण होऊन वयाला ८८ वे वर्ष सुरू झाले तेव्हा जर मी विद्यमान असलो तर त्याप्रसंगी उपस्थित राहून संघाला आणि संघ कार्यकर्त्यांना अवश्य शुभाशीर्वाद देईन.' (य. खु. १९७० साली हे जग सोडून गेले त्यामुळे हा सोहळा बघण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही.)

य. खुं. नी हा सगळा इतिहास स्मृतींच्या आधारे सारांशाने लिहिलेला आहे. तो त्यांच्याच शब्दात बघणे योग्य ठरेल. ते लिहितात, "मी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यवतमाळ येथे सन १९२१ साली वकिली करीत असताना श्री. अण्णासाहेब खापर्डे यांचेकडून लोकनायक बापूजी अणे व मला पत्रे आली. त्यात त्यांनी आपली विदर्भ साहित्य संघाची कल्पना मांडली होती. महाराष्ट्र साहित्य परिषद अस्तित्वात असताना प्रांतीय स्तरावर विदर्भ साहित्य संघ स्थापन करण्याचा हेतु सवता-सुभा निर्माण करण्याचा नसून मराठी भाषेच्या अभिवृद्धीकरिता सहकार्य करण्याचाच होता हे निश्चित आहे. बापूजींनी व मीही वि. सा. संघ स्थापनेच्या कल्पनेस पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे श्री. कविभूषण खापर्डे यांनी अशीच पत्रे विदर्भातील नामवंत साहित्यिकांना लिहिली. त्यानंतर यासंबंधी विचार करण्याकरिता विदर्भातील साहित्यिकांचा मेळावा भरावा म्हणून १९२२ साली वैदर्भीय साहित्यिकांचे एक संमेलन उमरावतीस जोशी हॉलमध्ये भरविण्यात आले. त्याचे अध्यक्ष श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर हे होते. श्री. दादासाहेब खापर्डे हे स्वागताध्यक्ष आणि श्री. अण्णासाहेब खापर्डे हे चिटणीस होते. विदर्भातील बरीच मंडळी उपस्थित होती. नागपूरचे कवी आनंदराव टेकाडे आणि नारायणराव बेहरे हेही होते. श्री. उपाध्ये हे बेहरे यांची 'मोत्याची माळ' आणि आनंदरावांच्या काही कवितांचे विडंबन करून त्या म्हणत असत. रात्री दादासाहेब खापर्डे यांच्या माडीवर साहित्यिकांची सभा भरून तेथे साहित्य संघाची स्थापना झाली. त्यावेळची एक गमतीची गोष्ट आज ४७ वर्षे झाली तरी आठवते. श्री. नारायणराव बेहरे नवा बूट घालून सभेस आले होते. बूट बाहेर काढून आत बराच वेळ होते. सभा संपल्यानंतर बाहेर येऊन बघतात तर बूट गायब. बराच शोध केल्यावरही बूट सापडले नाही तेव्हा 'नव्या साहित्य संघाला माझा नवा बूट अर्पण केला.' असे म्हणून ते निघून गेले. मला वाटते त्याच सभेत अण्णासाहेब खापर्डे यांना संघाचे सरचिटणीस निवडले गेले. विशेष आठवण्यासारखी गोष्ट म्हणजे परिषद संपल्यावर श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनी आपले स्मृतीचे प्रयोग करून दाखविले.

पुढील दुसरी साहित्य संघ परिषद उमरावती येथेच १९२३ साली भरली. त्यावेळी श्री. यादव माधव काळे, इतिहासकार; हे अध्यक्ष होते. श्री. ओक हे स्वागताध्यक्ष होते. आणि श्री. अण्णासाहेब खापर्डे हे चिटणीस होते. त्यावेळी माझे जवळील दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शनात मांडले होते. आणि महानुभावांची जी जुनी सूत्रपाठांची पोथी उपलब्ध झाली होती त्यावर मी परिषदेत निबंध वाचला होता. जळगावचे वगैरे प्रसिद्ध कवी संमेलनाला उपस्थित होते. त्यांनी आपल्या कवितांचे गायन केले. त्याच संमेलनात आत्माराम रावजी देशपांडे हे (पुढे कवी अनिल म्हणून) प्रसिद्धीस आले. ते त्यावेळी कॉलेज विद्यार्थी होते. त्यांनी आपल्या कविता संमेलनात गाइल्या. त्या परिषदेतच पुढील संमेलन यवतमाळ येथे भरविण्याचे ठरले पण १९२४ साली यवतमाळात प्लेगची साथ आल्यामुळे १९२५ साली ते संमेलन भरविले. त्यावेळी श्री. नरसिंह चिंतामण केळकर हे संमेलनाध्यक्ष होते. लो. ना. बापूजी अणे हे स्वागताध्यक्ष व मी चिटणीस होतो. संमेलनास विदर्भातील निरनिराळ्या भागातील बरीच मंडळी होती. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे स्वागत मंडळाने संमेलनास उपस्थित असलेल्या प्रतिनिधींकडून आणि पाहुण्यांकडून काहीही शुल्क न घेता राहण्याची आणि खाण्यापिण्याची उत्तम सोय केली होती. या परिषदेत उपस्थित होण्याकरिता हैदराबादचे नामवंत हायकोर्ट जज्ज आणि साहित्यिक श्री. केशवराव कोरटकर हे आपल्या १७-१८ साहित्यिक मित्रांसह हैदराबाद ते थेट यवतमाळपर्यंत स्पेशल बसने उपस्थित झाले होते व त्याच पद्धतीने २-३ दिवसांनी परत गेले. त्यामध्ये पुढे हैदराबादचे चीफ मिनिस्टर झालेले श्री. पिंद्र हेही होते. केशवरावांचा पहिला आपुलकीचा संबंध असल्यामुळे हैदराबादकर पाहुण्यांना माझ्या निवासस्थानी एकदा जेवावयास बोलाविले होते.

आतापर्यंत महाराष्ट्र साहित्य संमेलन अथवा विदर्भ साहित्य संमेलनाच्या मेळाव्यात महानुभाव वाङ्मयाचे तज्ज्ञ, महंत वगैरे कधीही उपस्थित रहात नव्हते. अर्थातच महानुभाव वाङ्मयावर भाषणही करीत नसत. पण विशेष उल्लेखनीय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोष्ट म्हणजे यवतमाळच्या संमेलनांत मात्र महानुभाव वाङ्मयाचे तज्ज्ञ आणि माझे संशोधक मित्र महंत गोपीराज बाबा–पूर्वाश्रमीचे हरिराज करसाळकर–हे आमच्या निमंत्रणावरून उपस्थित होते. त्यांना व्यासपीठावर योग्य–स्थानी बसविले होते व त्यांनी महानुभाव वाङ्मयावर भाषणही केले होते. या संमेलनास श्री. गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे आणि श्री. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर हे विदर्भाचे साहित्यिक उपस्थित राहू शकले नाहीत. ह्या संदर्भातील त्यांनी मला व लो. ना. बापुजी अणेंना स्वत:च्या हातानी लिहिलेली पत्रे आजही ४४ वर्षे झाली तरी शारदाश्रमात संरक्षून ठेवली आहेत.

ह्यानंतर एक वर्षाचे आतच माझे महानुभाव मराठी वाङ्मयाचे संशोधनात्मक पुस्तक प्रसिद्ध झाले. ते विदर्भ साहित्य संघ मालेचे प्रथम पुष्प म्हणून प्रकाशित करण्यात आले. स्वीकृत असा हा महानुभावीय ग्रंथ संघाने प्रकाशित केल्यामुळे साहित्य संघाचा आणि महानुभावीय वाङ्मयाचा निकट संबंध आला.

यवतमाळ येथे झालेले तिसरे विदर्भ साहित्य संघाचे संमेलन यशस्वी रीतीने पार पडल्यावर एक दिवस बापुजी, डॉ. टेंबे आणि मी सहज बसलो असता बापुजी म्हणाले, यवतमाळला एक स्थायी स्वरुपाची साहित्य संस्था असणे अवश्य आहे. या संस्थेमार्फत इतिहास, वाङ्मय इत्यादी विविध विषयात ग्रंथ प्रकाशन करता येईल. त्या कल्पनेला दुजोरा देण्याकरिता मी म्हटले–माझे जे वैयक्तिक इतिहास वाङ्मय, पुरातत्व इत्यादि विषयात संशोधनकार्य सुरू आहे ते संस्थेचे कार्य होऊन हस्तलिखित ग्रंथ, महत्त्वाचे छापील ग्रंथ, एतिहासिक कागद पत्र, शिलालेख, ताम्रपट, नाणी इत्यादींचे संग्रह संरक्षणार्थ एक महत्त्वाचे स्थान होईल. या संबंधी विचारविनिमय होऊन एक संस्था स्थापन करण्याकरिता श्री. सदाशिव हणमंत बल्लाळ यांनी यवतमाळ येथील विद्वानांची सभा बोलाविली आणि त्या सभेत 'शारदाश्रम' या नावाची एक संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्या संस्थेचे लो. ना. बापुजी अणे हे अध्यक्ष, डॉ. भा. म. टेंबे हे उपाध्यक्ष आणि मी चिटणीस निवडण्यात आलो. या संस्थेला पुढे १९३२ साली रीतसर नियमावली निर्मिण्यात आली आणि शारदाश्रम ही संस्था सोसायटीज अॅक्ट खाली रीतसर नोंदण्यात आली.

विदर्भ साहित्य संघाचे यापुढील संमेलन हैदराबाद येथे श्री. चि. वि. वैद्य यांचे अध्यक्षतेखाली भरविण्यात आले. त्यावेळी श्री. केशवराव कोरटकर हे स्वागताध्यक्ष होते. त्यानंतरचे अधिवेशन जळगाव–खानदेश येथे श्री. केशवराव कोरटकर यांचे अध्यक्षतेखाली भरले. या दोन्ही संमेलनांना मी उपस्थित होतो.

बहुदा सन १९३५ साली वि. सा. संमेलनाचे अधिवेशन नागपूर येथे चिटणीस पार्कजवळ व्यंकटेश थिएटरात श्री. गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब 'खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली भरले होते. ते संमेलन भरण्यापूर्वी माझ्याशी संबंधित अशी एक उल्लेखनीय घटना घडली. कार्यकारी मंडळाचा विचार श्री. दादासाहेब यांना अध्यक्ष करावे असा होता. ही चर्चा ऐकून एका अनामिक गृहस्थाने वर्तमानपत्रात ह्यावर्षीचे अध्यक्ष मला करण्यात यावे अशी सूचना केली. ती माझ्या नजरेस पडताच मी स्वागत समितीस ताबडतोब पत्र लिहिले की या संमेलनाचे अध्यक्षपदी श्री. दादासाहेब खापर्डेच हे सर्वथैव योग्य आहेत. दुसरे, ते मला पितृतुल्य ज्येष्ठ व श्रेष्ठ आहेत. त्यांच्या विरुद्ध मी अध्यक्षपदासाठी उमेदवार म्हणून उभा राहणे हीन प्रवृत्तीचे समजतो. मला कोणीही अध्यक्षपदासाठी उमेदवार म्हणून सूचवू नये. इतके करून जर कोणी नाव सुचविले अथवा मी निवडून आलो तरी मी अध्यक्षपद स्वीकारणार नाही. हे मी आगावूच कळवून ठेवतो. समाधानाची गोष्ट ही की कोणीही माझे नाव सुचविले नाही व श्री. दादासाहेब अविरोध निवडून आले.

इ. स. १९३७ साली वि. सा. संघाचे अधिवेशन उमरावती येथे श्री. न. र. फाटक, मुंबई, यांचे अध्यक्षतेखाली क्यांपरोडवर एका सिनेमागृहात भरले. त्याचवेळी साहित्यविषयक प्रदर्शनही भरविण्यात आले होते. त्यावेळी मध्यप्रांत वऱ्हाडचे प्रमुख मंत्री असलेल्या डॉ. खरे यांनी संमेलनाचे उद्घाटन केले व मी प्रदर्शनाचा अध्यक्ष होतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यावेळचे माझे भाषण छापले होते. त्या भाषणात मी पुढील वर्षी म्हणजे सन १९३८ मध्ये निमंत्रणावरून युरोपमध्ये स्वित्झरलंड देशात झूरिच येथे जागतिक प्राच्य विद्या परिषदेच्या अधिवेशनास शारदाश्रम संस्थेतर्फे प्रतिनिधी म्हणून जावयाचे निश्चित केल्याचे जाहीर केले होते.

कविभूषण बळवंतराव खापर्डे, सरचिटणीस हे वि. सा. संघाचे प्राण होते परंतु काशी हिंदु विश्वविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्यामुळे त्यांना उमरावती सोडून काशीस जावे लागले. त्यामुळे दक्ष कार्यकर्त्यांच्या अभावी वि. सा. संघाचा कारभार विस्कळीत झाला. ५–७ वर्षे वार्षिक संमेलने भरली नाहीत. ज्यांना श्री. अण्णासाहेब खापर्डे यांच्या मागून सरचिटणीस नेमले त्यांचेही कालान्तराने स्थलांतर झाले आणि संघाचे कागदपत्र, प्रोसिडींग बुक, हिशोबाची पुस्तके आणि इतर महत्त्वाचे रेकॉर्ड यांचाही कोठे पत्ता लागेना, अशा स्थितीत संघाची अशी वाताहत झालेली पाहून उमरावतीच्या प्रमुख साहित्यिकांना फार उद्वेग वाटला. आणि वि. सा. संघाचे पुनरुज्जीवन करण्याचा त्यांनी चंग बांधला. त्यामध्ये प्रा. बनहट्टी, प्रा. कोलते, प्रा. मा. गो. देशमुख, श्री. काकासाहेब सहस्त्रबुद्धे, प्रा. दिवाणजी, श्री. फडके आदी प्रमुख मंडळी होती. त्यांनी संघाचे पुनरुज्जीवन केले. लो ना. बापुजी अणे यांना अध्यक्ष केले. श्री. दिवाणजी त्यांना सरचिटणीस निवडले. बापुजी अणे विदर्भा-बाहेर होते. त्यांनी आपल्यातर्फे संघाचे कार्यकारी प्रतिनिधी नेमले. मलाही संघ कार्यकारिणीत घेतले, संघ कार्याला थोडी सुस्थिती प्राप्त झाल्यावर मला संघाचे अध्यक्ष निवडण्यात आले. मी यवतमाळला असल्यामुळे प्रा. बनहट्टी यांना कार्याध्यक्ष बनवून त्यांचेकडे व्यवस्था देण्यात आली.

त्यानंतर सन १९४५ मध्ये अकोट येथे वि. सा. संघाचे अधिवेशन माझ्या अध्यक्षतेखाली भरविण्याचे ठरविले, त्यावेळी वाई प्राज्ञ पाठशाळा प्रमुख श्री. जोशी यांचे हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. त्याच संमेलनात संघाची घटना आणि नियम करण्याकरिता माझ्या अध्यक्षतेखाली एक कमिटी निर्माण करण्यात आली. व पुढे ती घटना व नियम रीतसर मंजूर करण्यात आले. अकोट संमेलनानंतर पुढच्या वर्षी प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या अध्यक्षतेखाली दर्यापूर येथे संमेलन भरविण्यात आले. त्यावेळी आरंभीच साहित्य संमेलनाची धुरा व्यासपीठावर प्रा. बनहट्टी यांच्या स्वाधीन केली."

य. खुं. चा हा लेख येथपर्यंतच उपलब्ध आहे. लेखमालेतील पुढील लेख त्यांनी लिहिले होते किंवा नाही हे कळायला मार्ग नाही. ■

डेक्कन शुगर इन्स्टिटय़ूट
मांजरी (बु) पुणे, ४१२३०७

वाचकांनो,

युगवाणीचा अंक वाचल्यानंतर त्यातल्या आपणास बऱ्या–वाईट वाटलेल्या बाबींवर निःसंकोचपणे आपल्या प्रतिक्रिया संपादकास कळव्या. संपादकास आपल्या प्रतिक्रिया तोंडी कळविण्याकरिता कृपया राखून ठेवू नका. त्या मुक्तपणे इतरांकरिताही वाटून द्या. युगवाणीस कळवा.
त्या प्रकाशित करणे युगवाणीस आवडेल. लक्षात ध्या की आपल्या या प्रतिक्रिया वर्तमान वाङ्मयीन संस्कृतीचे स्पंदन आहेत.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

कथाविश्व : मनोहर तल्हारांचे

डॉ. रवीन्द्र के. शोभणे

मनोहर तल्हारांच्या कथालेखनाला चाळीस वर्षे होत आलीत. १९५० साली कथालेखनास त्यांनी सुरवात केली. सुमारे दोन अडीचशे कथांचा हा निर्माता, 'माणूस' या १९६३ साली प्रकाशित व राज्यपुरस्कार प्राप्त केलेल्या कादंबरीपुरताच तेवढा ज्ञात असावा व सर्वस्पर्शी कथा लिहूनही कथाकार म्हणून दुर्दैवीच ठरावा याचे प्रस्तुत लेखकास वैषम्य वाटते आहे. त्यापोटीच त्यांच्या कथाविश्वाची एक चाचपणी डॉ. रविंद्र शोभणे यांनी सोबतच्या लेखात करून बघितली आहे.

मराठी नवकथेच्या बरोबरीनेच व्यंकटेश माडगूळकरांनी मराठी ग्रामीण कथाही रूढ केली. ही ग्रामीण कथा माडगूळकर–द. मा. मिरासदार–शंकर पाटील या वाटेने अधिकाधिक सूक्ष्म, तरल, भावस्पर्शी, प्रतिकात्मक होत गेली. याच पिढीच्या आगेमागे वऱ्हाडी जीवनाचे दर्शन घडविणारे मनोहर तल्हार आणि उद्धव ज. शेळके हे विदर्भाचे दोन दमदार कथाकार पुढे आलेत. आनंद यादव व रा. रं. बोराडे त्यानंतरचे. यांच्या ग्रामीण कथा लक्ष्यवेधी ठरल्यात.

'माणूस' ही तल्हारांची कादंबरी गाजली. या कादंबरीने त्यांना कादंबरीकार म्हणून नाव दिले. आज पाव शतकानंतरही 'माणूस' आपल्या जागेवर खंबीरपणे पाय रोवून उभी आहे. तल्हार कादंबरीकार म्हणून जरी प्रामुख्याने ओळखले जात असले तरी त्यांचा पिंड खऱ्या अर्थाने कथाकाराचा आहे. मानवी जीवनातील व्यामिश्रतेचा वेध घेत असताना कथेत न मावणारा एखादा विस्तृत जीवनपट 'माणूस'च्या निमित्ताने सुंदर शिल्प म्हणून जाणता–अजाणता उभा राहतो. प्रत्येक कलावंताच्या निर्मितीप्रवासातील एखादे वळण, असा एखादा टप्पा सृजनशील लेखनाच्या संदर्भात अर्थपूर्ण ठरतो.

तल्हारांच्या कथालेखनाचा प्रवास १९५० पासून सुरू होतो. म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षापासून तल्हारांनी कथालेखनाला प्रारंभ केला आहे. मध्यंतरी कथालेखनासोबतच त्यांनी विस्तृत व विपुल असे चित्रपट समीक्षा लेखनसुद्धा केले आहे. आजतागायत म्हणजे गेली सदतीस–अडतीस वर्षे तल्हार सातत्याने कथालेखन करीत आहेत. 'वुढीचं खाटलं', 'तोलरेघ', 'गोरीमोरी' व 'निःसंग' हे त्यांचे चार कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. याव्यतिरिक्त त्यांचे एकदोन भरगच्च कथासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. आजपर्यंत तल्हारांनी किमान अडीचशे तरी कथा लिहिल्या असाव्यात.

त्यांचे कथावाङ्मय साधारणतः तीन टप्प्यांमध्ये विभागता येतात. पहिला टप्पा पूर्वसूरींच्या वाटेने जाणारा, दुसरा टप्पा जीवनाभिमुखतेचा वास्तवदर्शी कथांचा आणि तिसरा टप्पा कलात्मकतेच्या अंगाने जाणीवपूर्वक लिहिल्या गेलेली कथा. या विभाजनामध्ये मग ग्रामीण कथा आणि नागरी कथा हा भेद काहीसा अप्रस्तुत वाटू लागतो.

तल्हारांनी १९५० मध्ये 'न खुपसणारा खंजीर' ('माणिक', जुलै १९५०) ही कथा लिहून आपल्या कथालेखनाला प्रारंभ केला. १९५० ते १९५५ पर्यंतच्या कथा या 'कथा' म्हणून कच्च्या वाटू लागतात. रहस्यात्मकतेच्या वाटेने, किंवा खोट्या तकलादू जीवनदर्शनाने ही कथा उभी राहते. साधारणतः या कथांवर बाबुराव अर्नाळकर, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके इत्यादींचा परिणाम जाणवतो. १९५५ मध्ये 'बयनाबाई' ('प्रतिष्ठान', मे ५५) ही कथा लिहून तल्हार आपली कथा जीवनादर्शी व वास्तवाभिमुख करताना जाणवतात. 'बयनाबाई' ही व्यक्तिचित्रणाला अधिक जवळचे नाते सांगणारी कथा आहे. 'बयनाबाई' ही कथा दोन अर्थाने महत्त्वपूर्ण ठरते. एक म्हणजे ही कथा तल्हारांच्या कथाप्रवासातील महत्त्वाचे वळण ठरते आणि दुसरे म्हणजे ती वऱ्हाडी कथांची मुहूर्तमेढ रोवते. साधारणतः १९५५ ते १९६८ या कालखंडात तल्हारांनी विपुल व वैविध्यपूर्ण कथा लिहिल्यात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यानंतर ६८ ते ७४ हा कालखंड तल्हारांकरिता लेखनदृष्टया अज्ञातवासाचा गेला. या दरम्यान त्यांचे लेखन बंदच होते. १९७४ पासून तल्हारांची कथा आणखी वेगळे वळण घेते. ही कथा जेवढे महत्त्व जीवनदर्शनाला देते तेवढेच महत्त्व कलात्मकतेला, आविष्करणालासुद्धा जाणीवपूर्वक देते. कदाचित मधल्या सहा–सात वर्षांत त्यांनी आपल्या लेखनाकडे तटस्थपणे पाहिले असावे. घाटासंबंधीचा अधिक जाणीवपूर्वक विचार केला असावा; पण हे वळण मात्र निश्चितच अर्थपूर्ण ठरले आहे.

त्यांच्या दुसऱ्या टप्प्यातील 'पातळी', 'मुखवटा', 'व्यवहार', 'एक आँख का पंछी' या काही कथा घाटाच्या दृष्टीने अतिशय नेटकेपणाने उतरलेल्या आहेत. अनुभवाचे पोत आणि अनुभवाला आकार देताना सजगपणे या कथांना प्राप्त होणारा घाट विशेषत्वाने नजरेत भरल्यावाचून राहत नाही. तल्हारांच्या कथानुभवाचा पोत हा सामान्यतः एकपदरी असतो. जे मांडायचे तेच या कथेत फक्त असते. कदाचित या पोताची वीण ते अनेकपदरीही करू शकले असते; परंतु त्यांची लघुकथेसंबंधीची संकल्पना हीच मुळात काहीशी घाटाला कथानुभवाच्या गोळीबंद आकाराला प्राधान्य देत असल्यामुळे ही कथा अंतिमतः या स्वरूपाची ठरते.

तल्हारांची कथा जीवनाची समग्रता शोधताना दिसते. दारिद्र्य, उच्चवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, श्रीमंत अशा विविध स्तरातील जीवनाचा वेध ती सारख्याच मनःपूर्वकतेने घेताना दिसते. कथाविषयाकरिता किंवा कथेतील जीवनदर्शनाकरिता ती स्वत:वर कुठलीही बंधने लादून घेत नाही. तशीच ही कथा स्वतःवर कुठलाही तत्त्वविचार, मतप्रणाली लादून घेत नाही. जीवनदर्शनाची ही निकोपता विरळाच म्हणता येईल. 'बयनाबाई', 'येरल्ला–डावंदा', 'पेंटर बधराम', 'अडगळ'; 'अहित', 'दिशाहीन' या कथा जशा ग्रामीण जीवनाचे अनेक पैलू उलगडताना दिसतात तशाच 'वांझ', 'गोरीमोरी', 'तोल', 'तडा' या कथांमधून ते उच्चभ्रू समाजव्यवस्थेतील अनेक पदर दृग्गोचर करतात. या दोन्ही विश्वांना सांधणाऱ्या मध्यमवर्गीय–निम्नमध्यमवर्गीय समाजजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या म्हणून 'निःसंग', 'मुखवटा', 'व्यवहार', 'चक्रव्यूह', 'लाथाखाऊ' य कथांकडे अंगुलीनिर्देश करावा लागतो.

सर्जनात्मक पातळीवरील अनुभव घेण्याची तल्हारांची प्रकृती ही त्यांची खास 'ढब' म्हणता येईल. हा कथात्म अनुभव निवेदकापासून वेगळा करताच येत नाही. निवेदक आणि कथानुभव यांचे अद्वैत त्यांच्या कथांमधून सातत्याने जाणवत राहते. यातील निवेदक मग कथानायक असला काय, नसला काय, या कथानुभवात निवेदकाचे स्थान ठरलेले असते. 'सभाव', 'उमाळा'; 'चक्रव्यूह', 'तुटलेला' या कथा यापद्धतीने लिहिल्या गेल्या आहेत. पात्रमुखी निवेदन पद्धतीत निवेदक हा त्या कथानुभवाचा केंद्रबिंदू असावा लागतो; पण तल्हारांच्या पात्रमुखी निवेदन असलेल्या कथांमधील या निवेदकाचे नाते कथा बीजाशी असतेच असे नाही. कथात्म अनुभव आविष्कृत करताना, त्या अनुभवाचे अनेक पदर उलगडताना लेखक स्वतःच या अनुभवाशी नाते जोडतो. थोडक्यात, लेखक या अनुभवाशी झोंबी घेतो. वाचकाला थेट त्या अनुभवाशी भिडू देत नाही. परिणामी कथानुभव आणि वाचक यांच्यामध्ये लेखक पारदर्शी पडद्याप्रमाणे उभा राहतो. आणि मग ती कथा बरेचदा प्रत्ययकारी होण्यापेक्षा धूसर होत जाते. कथानुभवाशी लेखकाचे हे नाते शोधणे, सांगणे उपरे वाटू लागते. लेखक या अनुभवाकडे त्रयस्थपणे, तटस्थपणे, क्वचितच पाहतो. अर्थात तल्हारांच्या दुसऱ्या टप्प्यातील कथाविषयीच हे विधान करता येईल.

या टप्प्यातील त्यांच्या कथांचा 'कॅनव्हास' प्रचंड आहे. जीवनाकडे पाहण्याची त्यांची मनःपूर्वकता, अनुभवाची विविध क्षेत्रे धुंडाळण्याची त्यांची क्षमता, कोणत्याच कथाविषयाचे सुतक नसलेली त्यांची जीवनदृष्टी आणि कुठल्याही जीवनविषयक भाष्याच्या मर्यादित वर्तुळात अडकून न पडता समग्र जीवनाचे आकलन करणारी, मानवी जीवनाचा समग्रपणे अर्थ शोधणारी, जीवनातील सुख–दुःखाच्या अनेकांगी-

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पदरांचे स्तर नितळपणे तपासणारी तल्हारांची प्रतिभा ही नि:संशय अव्वल दर्जाची आहे. तल्हारांचे कथाविश्व अनेक अर्थांचे घुमारे घेऊन समोर येतात. मग हा कथाविषय केवळ कथेपुरता मर्यादित राहत नाही. खालील आलेखावरून हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येईल.

'सभाव' + 'उमाळा' व काही ग्रामीण कथा = 'माणूस'

चित्रपट विश्वावर आधारीत काही कथा = 'अप्रिया'

'वांझ' = 'शुक्रथब'

'नि:संग' = 'अफलातून'

'तोल' व त्या 'मूड'च्या इतर कथा = 'अशरीरी'

वरील कथा आणि त्या कथाविषयांवर नंतर लिहिलेल्या कादंबऱ्यांचा विचार केला तर प्रत्येक कथेत हे जीवनानुभवाचे अनेक पदर अध्याहृत असल्याचे दिसून येतात. कथालेखनाच्या प्रक्रियेतच कथाकार त्या कथेचे अंत:सूत्रे तपासतात आणि त्याचे पर्यवसान कधीतरी दीर्घलेखनात होताना दिसते. कथाकार म्हणून तल्हारांच्या व्यक्तिमत्वातील एक महत्त्वाचा पैलू या प्रक्रियेद्वारा समोर येतो आणि तो म्हणजे 'कथा' म्हणून तल्हारांची कथा जिथे संपते, तिथूनच ती कथा खऱ्या अर्थाने चिंतनाच्या पातळीवर वावरू लागते. ती कथा कथाकाराचा सतत पाठलाग करीत असते, आणि मग त्यावर एखादी कादंबरी लिहिल्या जाते. तल्हारांच्या कथा वाचताना त्या कथांचे शेवट कधीकधी अपूर्ण वाटतात, त्याचे मूळ इथे सापडते.

या दुसऱ्या टप्प्यातील तल्हारांच्या कथा सर्वस्पर्शी आहेत. तल्हारांचे कथाकार म्हणून स्थान निश्चित करण्यात या कथांचा फार महत्त्वाचा वाटा आहे. या कथांचे ग्रामीण कथा, संसारकथा, प्रेमकथा, विनोदीकथा, चित्रपटसृष्टीवर आधारित कथा इत्यादीप्रकारे वर्गीकरण करता येईल. तल्हारांच्या प्रेमकथा या फक्त शहरी वातावरणावरच आधारित आहेत आणि ग्रामीण वातावरणावर आधारित आहेत त्या संसारकथा. (कौटुंबिक या अर्थाने नव्हे) एखादी 'शांतिक' किंवा 'रात्र चांदणी' सारखीच कथा याला अपवाद ठरते.

संपूर्ण मराठी ग्रामीण वाङ्मयाचा विचार केला तर एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती ही की, ग्रामीण प्रेमकथा या खोट्या, कृतक, नाटकी वाटू लागतात. ग्रामीण समाजव्यवस्थेत स्त्री–पुरुषांचे नाते, आई–मुलगा, बहीण–भाऊ, वहिनी–दीर, पती–पत्नी या तऱ्हेचेच असतात. प्रियकर–प्रेयसीचे नाते आपल्या ग्रामीण समाजव्यवस्थेत अपचनीय आहे. आणि याला महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण स्त्रीवरील परंपरागत बंधने. ग्रामीण मुलीचं लग्न ती वयात आली की, लागलीच केल्या जाते. अशातही एखादी मुलगी अविवाहित असेल तर मर्यादित लोकसंख्येमुळे, गावातील ओळखीमुळे, नात्यामुळे ती प्रेमाच्या पातळीवर स्वत:च्या स्पंदनांना साकारू शकतच नाही. तसेच शारीरिक भूक शमविण्याकरिता 'पुरुषा'शिवाय अन्य साधनेही अशक्य असतात आणि म्हणून हे संबंध भावनिक पातळीवर न राहता, शारीरिक पातळीवर स्थिरावतात. (आणि तेही छुपेपणे) परिणामी ग्रामीण वातावरणात या शारीरिक संबंधांमुळे वा तत्संबंधित व्यवस्थेमुळे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनसुद्धा शारीरिक पातळीच्या पलीकडे जात नाही. आणि म्हणूनच ग्रामीण वातावरणावरील प्रेमकथा खऱ्या अर्थाने ग्रामीण राहत नाही. 'गारंबीचा बापू', 'शितू' किंवा र. वा. दिघ्यांच्या कादंबऱ्या यातील प्रेमप्रकरणे तकलादू, रोमँटिक आणि कृतक वाटतात, ती यामुळेच. शहरी मन जेव्हा ग्रामीण जीवनाकडे सृजनाच्या पातळीवर पाहते, तेव्हा त्याला ग्रामीण जीवनातील खरी व्यथा, दुःख, परंपरा–संस्कृतीतून होरपळून निघालेले ग्रामीण जीवन या गोष्टी दिसतच नाही. आणि याचमुळे तल्हारांच्या प्रेमकथा शहरी वातावरणावर अधिक प्रामाणिक वाटू लागतात.

तल्हारांनी आपल्या कथांमध्ये जाणीवपूर्वक (की नेणीवपूर्वक ?) शहरी वातावरण घेऊन फार मोठे औचित्य साधले आहे. त्यांनी खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवन पाहिले आहे. हे ग्रामीण जीवन पाहताना तल्हारांना त्यातील वेदना, व्यथा;

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ताणतणाव याच गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. तल्हारांच्या ग्रामीण कथेतील माणसे ही शेतीत काम करणारी, शेतीनिष्ठ जीवन जगणारी फार कमी आहेत. बलुतेदारी व्यवस्थेतील शेती हा भाग त्यांच्या कथात फार कमी येतो. शिपी, दुकानदार, गावात भटकणारी उनाड पोरे, बस ड्रायव्हर, मोलकरीण, भिकारीण, ग्रामीण मुसलमान, गरिबीने नागवलेली माणसे, पेंटर, आंधळे अशीच माणसे त्यांच्या कथांमध्ये अधिक दिसतात. या माणसांच्या पायातळी असलेली जमीन ही पूर्णपणे ग्रामीण नाही, पूर्णपणे शहरीही नाही तर शहर आणि खेडे यांच्या सीमारेषेवर असलेले गाव आहे (उदा. तारखेडा, जुनी अमरावती, खामगाव इ.). बदलत जाणारे, ग्रामीणत्वाची कात टाकणारे गाव या कथेत प्रामुख्याने येते. म्हणजेच शेतीनिष्ठ अर्थव्यवस्थेऐवजी ती सर्वंकष ग्रामीण समाजव्यवस्थेतून प्रस्फुटित होणारी कथा आहे. शेतीनिष्ठ अर्थव्यवस्था ही एखाद्यावेळी मूलभूत कारण ठरू शकते (उदा. दुपार). पण नंतर ही कथा अधिक विस्तृत अर्थ शोधू पाहते. या तुलनेत त्यांच्या शहरीकथांना बऱ्याच मर्यादा पडतात. स्त्री-पुरुष प्रेम, सहवास, आकर्षण, हुरहूर यातच ही कथा अधिक रमते. एखाद्यावेळी मुलीच्या ओढीने तिच्या भेटीसाठी जाणारा बाप ('उन्मळ' 'शोध'), प्रियकराची आतुरतेने वाट पाहणारी व त्याच्यासाठी सामाजिक बंधनांना अव्हेरणारी तरुणी ('धीट') किंवा भावस्पंदनांच्या वेगवेगळ्या छटा टिपणाऱ्या त्यांच्या इतर प्रेमकथा या एका विशिष्ट धाटणीमुळे काहीशा एकसुरी वाटू लागतात. एकमेकांची दृष्टादृष्ट, कधी हुरहूर, कधी वाढता परिचय, कधी परस्परांविषयीचे समज-अपसमज, कधी घटस्फोटित पति-पत्नीची भेट, झालेल्या चुकांचा पश्चात्ताप, यातून कधी येणे तर कधी आपल्या भिन्न भिन्न वाटांनी निघून जाणे या गोष्टी या प्रेमकथात प्रधान आहेत. मानवी जीवनातील प्रेमाचे एकांगी चित्रण या कथांमधून होताना जाणवते. प्रेमाची विविध रूपे; प्रेमाच्या स्पंदनांशी निगडीत असलेली सामाजिकता इकडे ही कथा क्वचित वळते. त्यामुळे प्रेमाच्या अवस्थेनंतरची गुंतागुंत, जीवनातील अर्थानर्थता या स्वरूपाची गंभीरता या प्रेमकथेत क्वचित, फार क्वचित व्यक्त होते. परिणामी ही कथा वाचकाला बरेचदा चटका लावून जाण्यापेक्षा केवळ सुखावून जाते. 'असार्थक'सारखी एखादी कथा मात्र वाचकांसमोर खरोखरच जगण्याची गोळाबेरीजच मांडून जाते.

एका संदर्भात या कथेचं बलस्थान आणि मर्यादा मांडायची झाल्यास ही कथा जितक्या तन्मयतेने, मनःपूर्वकतेने मानवी मनात खोलवर शिरते, मनाची नानाविध स्पंदनं टिपते, तितक्याच त्रयस्थपणे ती सामाजिक प्रश्नांकडे पाहते. याचा अर्थ या कथेला सामाजिक प्रश्नांचं वावडं आहे, असा काढला तर या कथेची गुणवत्ताच नाकारल्यासारखे होईल; पण जेव्हा जेव्हा ही कथा सामाजिक प्रश्नांचा वेध घेऊ पाहते तेव्हा तेव्हा ती कथा सामाजिक प्रश्नांपेक्षा मानवी मनाकडे अधिक झुकत असल्याचे जाणवते. आयुष्यभर एका विवाहित पुरुषावर प्रेम करणारी विमल, ('मुखवटा'), बेकारीच्या गर्तेत सापडलेला सुशिक्षित तरुण ('व्यवहार'), एक डोळा गमावलेला दिलेला दिनकर ('एक आँख का पंछी'), पतीपासून मूल होत नाही म्हणून दुसऱ्या पुरुषाचा गर्भ वाढविणारी कमल ('वांझ') या सारख्या व्यक्ती मुळात सामाजिक प्रश्नातूनच समोर येतात; पण या कथांमध्ये सुद्धा अखेरपर्यंत सामाजिक प्रश्न प्रधान राहत नाहीत, तर सामाजिक प्रश्न बाजूला केव्हा पडतात आणि ती कथा व्यक्तीच्या अंतर्मनाची कधी होते, हेच कळत नाही. या कथेनं दोन्ही बाजू समर्थपण सांभाळल्या असत्या तर ही कथा फार मोठी महत्ता मिळवू शकली असती.

तल्हारांच्या बहुतेक प्रेमकथांची पार्श्वभूमी मुंबईची आहे. आणि या प्रेमकथांमधील व्यक्ती या उच्चभ्रू समाजातील आहेत. या प्रेमकथांकरिता मुंबईचीच पार्श्वभूमी घेणे आवश्यक होते का ? याचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा 'तोल'; 'बांध', 'भरतीच्या लाटा', 'चित्रा देसाई', 'रीता', 'गोरीमोरी' इत्यादी कथांच्या तुलनेत 'पातळी', 'मुखवटा' या कथा अधिक समृद्ध व सच्च्या वाटू लागतात. आपल्या बहुतेक प्रेमकथांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंबईची पार्श्वभूमी देणे हा कदाचित पूर्वसूरींच्या लेखनाचा प्रभाव असू शकतो.

या कथांमधील प्रदेश ठराविक आहेत. अमरावती, नागपूर, अकोला व मुंबई या चार स्थळांपेक्षा वेगळे स्थळ क्वचितच येते. तल्हारांच्या मध्यमवर्गीय जीवनदर्शन घडविणाऱ्या कथांना अमरावती, नागपूर व अकोला या भूप्रदेशाची पार्श्वभूमी मिळाली आहे तर ग्रामीण कथांना अमरावती व त्याच्या आजूबाजूचा ग्रामीण परिसर लाभलेला आहे.

मध्यमवर्गीय, निम्नस्तरीय मध्यमवर्गीय समाजाचे जीवनदर्शन घडविणाऱ्या तल्हारांच्या कथा अधिक पीळदार, अधिक चटका लावणाऱ्या आहेत. आणि या त्यांच्या तिसऱ्या टप्प्यातील कथा आहेत. दुसऱ्या टप्प्यातही 'एक आँख का पंछी', 'कोलमडलेला'; 'गोळा, 'शाप'; 'गोलसाडी', 'मुखवटा', 'व्यवहार', 'उद्योग' इत्यादी कथा येतात; पण १९७४ नंतर लिहिल्या गेलेल्या कथा यादृष्टीने अधिक समृद्ध, अधिक परिपक्व आहेत. 'निःसंग', 'चक्र', 'पेंटर मूलचंद वंग', 'मरे एक त्याचा', 'तुटलेला'; 'चक्रव्यूह', 'लाथाखाऊ' इत्यादी कथांचा निर्देश यामध्ये करता येईल. जीवनाकडे पाहण्याची प्रगल्भ दृष्टी, शैलीची परिपक्वता, वाङ्मयीन सजगता ही वैशिष्ट्ये या कथांची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. या कथांना वैचारिक सूत्रही कळत न कळत प्राप्त होते. कदाचित कथालेखक जाणीवपूर्वक हे सूत्र कथेत गोवत असेल. 'निःसंग', 'मरे एक त्याचा' या कथांमध्ये तल्हार वैराग्य, जीवन-मृत्यूच्या पातळीवर जीवनदर्शन घडवतात. परिणामी ही कथा जीवनाच्या कक्षा अधिक विस्तारते. एकूणच या दरम्यानच्या कथा अनेकार्थाने निःसंशय श्रेष्ठ ठरतात. 'मायलेकी'; 'दिशाहीन', 'कॅन्सल', 'धास्ती'; 'उबाऱ्या', 'थतूट', 'उमाळा', 'दुपवा' या याच दरम्यानच्या ग्रामीण जीवनदर्शन घडविणाऱ्या कथा 'माणूस' च्या महत्तेची बरोबरी करणाऱ्या कथा ठरतात.

तल्हारांची 'माणूस' ही कादंबरी १९६३ मध्ये प्रकाशित झाली. वर्तुळाच्या केंद्रबिंदूत जशा अनेक त्रिज्या येऊन मिळतात तशाचप्रकारे शंकरच्या कथेत अनेक व्यक्तिरेखा येऊन मिळतात. या व्यक्तिरेखा समाजाच्या सर्वच थरातील आहेत. आणि तल्हारांनी या सगळ्या व्यक्तिरेखांची घट्ट आणि अर्थपूर्ण अशी वीण करून शंकरच्या भावविश्वाशी अतिशय कौशल्याने व समर्थपणे जोडलेली आहे. या कौशल्याचे सुटे भाग म्हणजे त्यांच्या या कथा ठरतात. तात्पर्य, तल्हारांच्या कथालेखनात ही वाङ्मयीन सजगता व कलात्मकता 'माणूस'-पासूनच आली असे म्हणता येते; पण तिचा खरा आविष्कार अधिक अर्थपूर्णतेने प्रस्तुत कथांमधून झालेला जाणवतो.

कथाकार म्हणून तल्हारांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना एक महत्त्वाची बाब समोर येते ती म्हणजे तल्हार मानवी जीवनाकडे जेवढ्या तन्मयतेने पाहतात, तेवढ्याच तिरकस, व्यंगात्मक दृष्टीनेही पाहू शकतात. जीवनातील निरर्थकता, विसंगती ते या कथांमध्ये अचूकपणे टिपतात. जणू ते जीवनाचे विडंबनच करताना दिसतात; पण अशाप्रकारे तिरकस दृष्टीने जीवनाकडे पाहताना एखाद्या लहान मुलाने वाकुल्या दाखवाव्या त्याप्रमाणे जीवदर्शन घडवताना तल्हारांची कथा ही सतत वैचारिक, चिंतनशील पातळीवर वावरत असते. वाचकाला अंतर्मुख करण्याची, जीवनाचा अर्थ शोधण्याची, हुरहुर लावण्याची ताकद या कथेत आहे. 'शिकारी', 'गॉडफादर', 'एक शून्य आणि एक दोन तीन', 'विदूषक', 'गजर', 'मिठ्ठू' या कथांमधून ही वैशिष्ट्ये प्रतीत होतात. या कथांच्या निमित्ताने तल्हारांना मानवी जीवनाची वेगळी नस गवसली असेही म्हणता येईल.

जीवनाकडे तिरकसपणे पाहणाऱ्या तल्हारांच्या या कथांचे मूल्यमापन करताना या कथांमागची प्रेरणा चॅर्ली चॅप्लीन→राजकपूर अशी शोधता येते. या दोघांच्या चित्रपटांचा सखोल परिणाम तल्हारांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला आहे. या दृष्टीने तल्हारांच्या कथांमधील (आणि कादंबऱ्यांमधील सुद्धा) संवाद पाहण्याजोगे आहेत. कथेचा विकास करताना निवेदनापेक्षा तल्हारांचे संवादच महत्त्वपूर्ण ठरताना दिसतात. आणि मग कथेतील भावविभ्रम, अंतर्मनातील मनोव्यापार;

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बदलणारे अनेकानेक 'मूड्'स या सगळ्या गोष्टी चित्रमय होत जातात. ती कथा मग एखाद्या चित्रपटासारखी दृश्य व बोलकी होत जाते. एखादी गंभीर सूर असलेली जरी कथा घेतली तरीही त्या कथेतील संवाद खुसखुशीत, विनोदाच्या अंगाने फुलत जातात. संवादातून निर्माण होणारा विनोदाचा थर हलकेच बाजूला पडतो आणि मग त्याखाली दडलेल्या दु:खाचा अथांग डोह मनाला अंतर्मुख करतो, व्यथित करतो. या कथेत वरवर जाणवणारे वातावरण प्रसन्न, मोहक वाटते. वाचक गालातल्या गालात हसत अंतर्मुख होत जातो, गंभीर होत जातो, ही तल्हारांच्या कथेची फार मोठी जमेची बाजू आहे. 'अतूट', 'मायलेकी', 'लाथाखाऊ', 'चक्रव्यूह' या कथांमधील संवाद याच जातकुळीचे आहेत.

तल्हारांच्या ग्रामीण कथा व नागर कथांमध्ये एक महत्त्वाचा भेद जाणवतो आणि तो म्हणजे तल्हारांचे नागर कथांमधील निवेदन संज्ञाप्रवाहाला अतिशय जवळचे आहे तर ग्रामीण कथांमधील निवेदन हे जीवनदर्शनातील बारकावे टिपणारे, सूक्ष्मतेच्या वाटेने जाणारे आहे. तल्हारांच्या ग्रामीण कथांचे निवेदन हे नागरी, प्रमाणभाषेतील आहे व संवाद ग्रामीण भाषेतील आहेत. या पद्धतीने लिहिल्या जाणाऱ्या कथेत जर निवेदनाच्या प्रमाणभाषेत संज्ञाप्रवाह आणला तर लेखकाची त्रयस्थाची भूमिका अबाधित राहत नाही. कथाकाराने कथा लिहिताना नेहमीच त्रयस्थाची भूमिका घ्यावी, अनुभवाला तटस्थपणे जोखूनच कथात्म वाङ्मय निर्माण करावे, असा याचा अर्थ नाही. किंबहुना तल्हारांनीही त्रयस्थपणे निवेदनात्मक पातळीवर कथा लिहिल्यात असं म्हणता येणार नाही; पण निवेदनाच्या पातळीवर तल्हारांच्या ग्रामीण कथा आणि नागर कथा यांच्यामध्ये एक महत्त्वाचा भेद स्पष्टपणे जाणवतो. आणि तो म्हणजे त्यांची नागरकथा प्रथमपुरुषी निवेदनात्मक असते तर ग्रामीण कथा ही नेहमीच तृतीयपुरुषी निवेदनात्मक असते. कलात्मक ताटस्थ्य म्हणून ही भूमिका काही एका मर्यादेपर्यंत ठीक आहे; पण एकाच प्रकारच्या निवेदनाने एकसुरीपणाचा दोष तर येतोच. शिवाय कलावंताची कलात्मकदृष्टचा आपल्या भावस्पंदनांकडे पाहण्याची मर्यादाही तेवढीच तीव्रपणे जाणवते. यामुळेच तल्हारांची कथा घडत जाण्यापेक्षा निवेदिल्या जाते. कथानकातील अनेक घटक निवेदनाच्या ओघातच मांडल्या जातात. परिणामी कथानकातील व्यक्तींचा, कथानकाचा पूर्णपणे विकास व्हायला कळत न कळत मर्यादा पडत जातात. 'वैर' 'उद्रेक' या कथांच्या विषयाकडे एक कटाक्ष टाकला तरीही हे विषय कादंबरीचे वा दीर्घकथेचे आहेत हे जाणवते. थोडक्यात तल्हारांची ग्रामीण कथा ही कलात्मकतेचा फारसा विचार करीत नाही. अनुभवांच्या; भावस्पंदनांच्या अनेक परी अनेकार्थाने रंगविण्यापेक्षा चित्रमयपद्धतीने, सच्चेपणाने आणि सरळपणे तल्हार ही कथा लिहितात. कदाचित इथे अनुभवाचं झपाटलेपण यासंदर्भात आड येत असावं. अनुभवाशी सरळपणे वडक घ्यायची कथाकाराची धारणाच इथ प्रामुख्याने समोर येते. आणि म्हणून ही कथा आविष्काराच्या दृष्टीने आनंद यादव किंवा रा. रं. बोराडे यांच्या कथेप्रमाणे प्रयोगशील, प्रतिकात्मक होत नाही (प्रतिकात्मक कथेच्या मुळाशी लेखकाची त्या कथेतून व्यक्त होणारी कुठलीतरी तात्त्विक, जीवनविषयक भूमिका जीवनदर्शनापेक्षा प्रधान ठरते. कथाकार म्हणून तल्हारांची भूमिका ही निखालसपणे प्रांजळ जीवनदर्शनाची आहे.)

ओ'हेन्री या अमेरिकन कथाकाराच्या कथांचे शेवट अनपेक्षित, धक्कादक, स्तिमित करणारे असतात. मोपासांच्या 'टू लिटिल सोल्जर्स' या कथेचा शेवटही अनपेक्षित, पण अतिशय अर्थपूर्ण असा आहे. तल्हारांच्या कथांचे शेवट असेच अनपेक्षित, धक्कादायक व विलक्षण अर्थपूर्ण असे असतात. शेवटाच्या संदर्भात तल्हारांवर ओ'हेन्रीचा प्रभाव आहे असे म्हटले तर ते फारसे अप्रस्तुत ठरू नये तल्हारांची प्रत्येक कथा शेवटाच्या दृष्टीने पाहिली तर धक्का देणारी, स्तिमित करणारी, अनपेक्षित तसेच विचार करायला लावणारी आहे. जी. एं. ची कथा वाचताना साधारणतः वाचकाला कथेच्या शेवटाविषयीचा अंदाज येऊ लागतो. त्यांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'प्रदक्षिणा', 'कैरी', 'यान्त्रिक' यासारख्या कथांचे शेवट उत्क्रांत होत गेलेले आणि अपेक्षित असे आहेत; पण तल्हारांच्या कथांचे शेवट अनपेक्षित असतात. 'कथांचे शेवट अनपेक्षितच करायचे' हा कथाकाराचा अट्टाहास आहे, असाही वाचकांचा गैरसमज होऊ लागतो. पण सूक्ष्मपणे या शेवटाचा विचार केला तर एक महत्त्वाचा धागा हाती गवसतो. आणि तो म्हणजे कथा लिहिण्यापूर्वीच कथेचा शेवट ठरलेला असतो. शेवटापासून सुरू होणारी ही कथा प्रारंभापर्यंत उलटया अंगाने उलगडत जाते. हे उलगडणे कधी कधी संदिग्ध असते. सगळेच धागे हाती गवसतात असे नाही आणि मग एखाद्या वळणावर ही कथा आली की ती एकदम शेवटाकडे झेपावते. तल्हारांच्या 'असार्थक'; 'उद्रेक', 'तुटलेला', 'उद्याच्या', 'अतूट' यासारख्या कथांचे शेवट पाहिले तर प्रस्तुत मुद्दा अधिक स्पष्टपणे उलगडतो.

तल्हारांच्या संपूर्ण कथा वाचताना या कथेमध्ये स्त्रीचित्रणात जी विविधता आणि प्रगल्भता आली आहे ती निःसंशय दाद देण्याजोगी आहे. आदिमातेपासून तर अत्याधुनिक युवतीपर्यंत हे स्त्रीचित्रण सहजतया आलेले आहे. अशिक्षित, सुशिक्षित, अर्धशिक्षित, पतिव्रता, परित्यक्ता, परिस्थितीची शिकार झालेल्या बेवारस, इंग्रजी आचारविचारांच्या अंधानुकरणाने झपाटलेल्या अशा स्त्रीत्वाच्या विविधांगी छटा दर्शविणाऱ्या या स्त्रिया आहेत. ही स्त्री पतिनिष्ठ आहे, परंपराप्रिय आहे. वेशभूषेनं ती जरी अत्याधुनिक वाटत असली तरीही तिचं मन मात्र भारतीय आहे, 'तोल'मधील कमल, 'वांझ'-मधील कमल, या स्त्रिया याला अपवाद ठरतात. पण एकूणच या स्त्रिया अस्सल भारतीय आहेत. यात मग हॉलिवूडची नायिका जॉनी ('सप्रेम भेट') ल्यूसी ('ल्यूसी') लिझा ('लिझा') या स्त्रिया केवळ खोटया वाटू लागतात. इंग्रजी वातावरणाचे आकर्षण यापलीकडे या कथांना फारसे महत्त्व उरत नाही. एखादी स्त्री जेव्हा बळजवरीने परक्या माणसाच्या वासनेची शिकार होते तेव्हा ती घटना, जीवनातील तो भाग अंगावर उठलेल्या कोडाप्रमाणे तिला वाटतो. पतिनिष्ठेला गेलेला हा तडा तिलाही दुभंगत जातो. आणि म्हणून अत्याधुनिक वाटणारी स्त्रीसुद्धा याबाबतीत परपुरुष संबंध मान्य करू शकत नाही.

यादृष्टीने विचार केला तर तल्हारांच्या कथाविश्वाची एक मर्यादा आणखी स्पष्ट होते. आणि ती म्हणजे वासनेच्या विविधावस्थांचे चित्रण. मानवी जीवनातील वासनेचे स्थान, तांडव, भेसूरता इत्यादी गोष्टींपासून त्यांची कथा दूरच राहिली. 'अजगर' व 'जनावर' या दोन कथा सोडल्या तर तल्हारांची कथा मानवी जीवनातील मांगल्य, शुचिता, परंपरा, श्रद्धा याच गोष्टींना अधिक महत्त्व देते. 'अजगर' आणि 'जनावर'मध्येसुद्धा लेखक भीतभीतच या विषयाला हात घालतात. मानवी जीवनातील वासनाचक्राची विविधता ज्या प्रभावीपणे खानोलकरांनी, जी. ए. कुलकर्णी यांनी रेखाटली, ती विविधता तल्हारांच्या कथांमध्ये नाही. हाच मुद्दा उलट बाजूने मांडावयाचा झाल्यास खानोलकर आणि जी. ए. यांनी मुद्दाम जे दुर्लक्षित केलं, तेच तल्हारांनी पकडलं, असंही म्हणता येईल. सत्यं, शिवं, सुदरं ही जीवनमूल्ये प्रधान मानून तल्हारांनी साहित्यात येणारी अश्लीलता कटाक्षाने टाळली आहे.

तल्हारांची कथा ही (बहुशः ग्रामीण कथा) भारतीय आणि त्यातही मराठी समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि धर्मव्यवस्था यांची परिणती ठरते. सामाजिक अभिसरणातील महत्त्वपूर्ण मुखवटे ही कथा आपल्याकरिता स्वीकारते. तल्हारांच्या ग्रामीण कथांतील माणसे ही इथल्या अर्थव्यवस्थेच्या चरकात चिरडून, भरडून निघालेली असतात. 'एक आँख का पंछी'मधील दिनकर इथल्या अर्थव्यवस्थेचा बळी आहे; 'मुखवटा'मधील विमल इथल्या समाजव्यवस्थेतील एक पारध ठरते. किंवा 'निःसंग'मधील प्रकाश खोत या व्यवस्थेच्या सुळावर सतत बळी गेलेला आहे. त्याचे बळी जाणे ही इथल्या सवंध व्यवस्थाचक्राची मूलभूत गरज ठरते. समाजव्यवस्था > अर्थव्यवस्था > धर्मव्यवस्था या वाटेने प्रकाशचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बळी जाणे अव्याहत सुरू असते. 'उद्रेक' ही कथा इथल्या धर्मव्यवस्थेच्या प्रचंड फळीवरच उभारली गेली आहे. 'तुटलेला', 'चक्रव्यूह', 'गॉडफादर', 'कॅन्सल', 'एक शून्य आणि एक दोन तीन', 'उबाऱ्या' इत्यादी कथांच्या पार्श्वभागी मुळात भक्कमपणे उभी आहे ती इथली अर्थव्यवस्था. या कथेत इथल्या अर्थव्यवस्थेची विदारकता; भीषणता, तकलादूपण समर्थपणे व्यक्त होते. 'मायलेकी'तील गिरिजाच्या नशिबी मुळात हे असे जगणे येते ते का? तर त्याचे कारण इथली अर्थव्यवस्था असेच म्हणावे लागेल.

पण ही धर्मव्यवस्थेची, अर्थव्यवस्थेची, समाजव्यवस्थेची परिमाणे या कथेला न कळत, सहजतया प्राप्त होतात, ही या कथेची मोठी गुणवत्ता म्हणावी लागेल. 'माणूस'ची उभारणीच आर्थिक दुष्टचक्रावर आधारित आहे, नेमका तोच धागा तल्हारांच्या कथांमध्ये पुन्हा पुन्हा पकडल्या जातो; आणि याच्यामुळाशी लेखकाने जगलेले जीवन महत्त्वाचे आहे. शरच्चंद्र मुक्तिबोधांचा विशू या आर्थिक विषमतेकडे ज्या जाणतेपणे, ज्या कडवटपणे 'क्षिप्रा', 'सरहद्द' आणि 'जन हे वोळतु जेथे'मध्ये पाहतो, त्याच जाणतेपणे, कडवटपणे तल्हारांचा एखादा मानसपुत्र या व्यवस्थेकडे पाहता, तर ही कथा आहे त्यापेक्षा मोठी झाली असती.

तल्हारांची कथा बरीचशी परंपरावादी आहे. ही कथा परंपरेच्या वाटा नाकारू शकत नाही. परंपरेला आव्हान देऊ शकत नाही. तल्हारांनी आपल्या कथेच्या संदर्भात वा समग्र वाङ्मयाच्या संदर्भात जीवनदर्शनाच्या पातळीवर जी सत्यं, शिवं आणि सुंदरं ही मूल्यात्मकता स्वीकारली, तिचाच हा परिणाम म्हणावा लागेल. कारण प्रस्तुत मूल्यं ही आपल्या परंपरेची महत्त्वाची आधारभूत अशी मूल्ये आहेत. जीवनावर निष्ठा ठेवणे, जीवनाला होकारात्मक पातळीवर स्वीकारणे, जीवनातील कोणतेही बदल परंपरेच्या चौकटीत स्वीकारणे, ही या मूल्यांची 'आयडेंटिटी' म्हणता येईल, या मूल्यांना आपण दुसरा पर्यायी शब्द जीवननिष्ठा हा सुद्धा वापरू शकतो. जीवनावर सकारात्मक पातळीवर निष्ठा ठेवणे यालाच ही जीवननिष्ठा म्हणता येईल. तात्पर्य, तल्हारांच्या कथांची मूल्यात्मकता तपासून पाहिली तर जीवननिष्ठा हाच या कथेचा प्रमुख आधार आहे, असे म्हणता येईल.

Generalization ची प्रक्रिया तल्हारांच्या कथांमध्ये फार महत्त्वाची आहे. निमित्तानेच व्यक्त होणारा त्यांचा अनुभव प्रातिनिधिक पातळीवर अवतरतो. तल्हारांची कथा सुरू होते तीच मुळी 'तो आला...ती आली.' या तृतीय-पुरुषी निवेदकाने. या कथेतील 'तो' किंवा 'ती'चे नाव, त्याची Identity कथेच्या प्रारंभीच व्यक्त करायची गरज कथाकार म्हणून तल्हारांना वाटत नाही. निवेदनाच्या ओघात कधीतरी मग 'तो' किंवा 'ती' कोण आहे, हे सांगितल्या जाते. कथेतील ही व्यक्ती मग प्रातिनिधिक पातळीवर वावरू लागते.

तल्हारांच्या कथा वाचताना चेकॉव्हच्या काही कथांची आठवण येते. बरेचदा चेकॉव्ह आणि तल्हारांच्या कथा सारख्याच जातकुळीच्या वाटू लागतात. उदा. तल्हारांची 'बंड्या' वाचल्यावर न कळत चेकॉव्हच्या 'वान्का'ची आठवण येते. किंवा चेकॉव्हच्या 'कारकुनाचा मृत्यू', 'सरडा', 'बंद सज्जाचे घर' इत्यादी कथांची आठवण वेगवेगळ्या संदर्भात तल्हारांच्या कथा वाचून येते. याचा अर्थ जीवनाकडे पाहण्याच्या चेकॉव्हच्या आणि तल्हारांच्या दृष्टीमध्ये बरेचसे साम्य आहे. (याचा अर्थ समीक्षक चेकॉव्ह व तल्हार यांच्यात तुलना करीत आहे, असा गैरसमज करून घेऊ नये.) जीवनाकडे पाहण्याच्या चेकॉव्हच्या दृष्टीत फार मोठी झेप आहे, आणि तल्हार या जीवनदृष्टीने प्रभावित झालेले आहेत, असेच आहे, असेच म्हणता येईल.

आतापर्यंतच्या विवेचनावरून एक महत्त्वाचा मुद्दा स्पष्ट होतो आणि तो म्हणजे, त्यांच्या अनुभवाची झेप मोठी आहे. तल्हारांच्या कथांची गुणवत्ताही फार मोठी आहे. त्यांची कथाही सर्वस्पर्शी कथा आहे. आणि तरीही तल्हार कथाकार म्हणून दुर्दैवी ठरतात. मराठी समीक्षकांनी तल्हारांच्या कथांकडे सतत पाठच फिरविली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे का ? आपले हितसंबंध आणि धंद्यावर डोळा ठेवून कथाकार म्हणून तल्हारांची खरी निष्ठा कथेवर आहे, आणि तरीही कथाकार म्हणून त्यांना जे मिळावं ते मिळू शकलं नाही, हे निर्विवाद ! की मराठी समीक्षकांना 'माणूस'च्या पार्श्वभूमीवर त्यांचे इतर साहित्य जाणवावे इतक्या स्पष्टपणे जाणवलेच नाही ? तल्हारांच्या कथाविश्वात खोलवर शिरून त्याचा सर्वांगाने अभ्यास करणे हे खऱ्या अभ्यासकाला आव्हान ठरू शकेल. त्यादृष्टीने केलेला हा एक छोटासा प्रयत्न. ■

२७६, छत्रपती नगर, नागपूर.

'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या तीन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, प्रथम आपल्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा—लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी, शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा, संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या यादीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

|| प्रकल्प ||

मराठीविषयक प्रबंधांची सूची
(१९३९-१९८९)

डॉ. वसंत विष्णु कुलकर्णी

मराठी या विषयातील विद्यापीठीय प्रबंध लेखनास यंदा पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत.

१९३९ या वर्षी नागपूर विद्यापीठाने डॉ. शं. दा. पेंडसे यांचा प्रबंध तर पुणे विद्यापीठाने डा. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांचा प्रबंध त्याचवर्षी आचार्य (पीएच. डी.) पदवीकरता स्वीकृत केला.

मराठी या विषयातील प्रबंधाचे ते दोघे पहिले मानकरी.

या पन्नास वर्षातील मराठीविषयक प्रबंधांच्या सूचीचे संकलन करण्याचा डॉ. वसंत वि. कुळकर्णी यांनी हाती घेतलेला प्रकल्प पूर्ण केलेला असून तो प्रकाशित स्वरूपातही उपलब्ध व्हावा असे प्रयत्न देखील व्हावयाचे आहेत.

मराठीचे अभ्यासक, संशोधक, व्यासंगी, विद्यार्थी, शिक्षक इ. संबंधितांची गरज भागविणाऱ्या या प्रकल्पाची ही संक्षिप्त माहिती.

विद्यापीठ स्तरावरील मराठीविषयक संशोधनाच्या कार्याचा शुभारंभ होऊन आता अर्धशतक पूर्ण झाले आहे. इ. स. १९३८ मध्ये मुंबई विद्यापीठाने कविवर्य डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन तथा माधव जूलियन यांच्या 'छंदोरचना' या प्रबंधावर त्यांना डि. लिट्. पदवी दिली. पीएच्. डी. पदवीसाठीही याचवर्षी म्हणजे १९३८ मध्ये दोन प्रबंध सादर केले गेले, मात्र ते दोन्हीही प्रबंध १९३९ मध्ये स्वीकृत झाले. पीएच्. डी. पदवीसाठी प्रबंध स्वीकृत होण्याचा सर्वप्रथम बहुमान डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे यांनी मिळविला आहे. 'स्वभाव लेखन' या नावाचा प्रबंध मुद्रित स्वरूपात त्यांनी मुंबई विद्यापीठाला दि. २० डिसेंबर १९३८ रोजी सादर केला व दि. २९ जून १९३९ रोजी त्यांना पीएच्. डी. पदवी मिळाली. त्याच वर्षी डॉ. शंकर दामोदर पेंडसे यांनी नागपूर विद्यापीठाला 'श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान' हा प्रबंध कार्तिक शुद्ध १ शके १८६० (२४ ऑक्टोबर १९३८) रोजी सादर केला आणि दि. ९ डिसेंबर १९३९ रोजी पीएच्. डी. पदवी त्यांना मिळाली. १९३९ या आरंभ वर्षाचे हे दोघेजण मानकरी मानणे उचित वाटते. पीएच्. डी. चा पहिला प्रबंध स्वीकारला गेला त्याला १९८९ मध्ये ५० वर्षे पूर्ण झाली. विद्यापीठ स्तरावर १९८८-८९ हे मराठी संशोधनाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष मानता येईल. या निमित्ताने डी. लिट्. व पीएच्. डी. या दोनही स्तरावरील मराठीविषयक प्रबंधांची सूची करण्याचा प्रकल्प प्रस्तुत लेखकाने हाती घेऊन तो पूर्ण केला आहे. ही सूची लौकरच प्रकाशित होणार आहे. या सूचीचा परिचय या लेखात करून दिला आहे. पीएच. डी. या पदवीसाठी 'आचार्य' हा प्रतिशब्द वापरला आहे.

मराठी प्रबंध लेखनाचा प्रारंभ

सर्वप्रथम स्वीकारला गेलेला आचार्य पदवीचा प्रबंध 'स्वभावलेखन' हा होय. या विषयाचे महत्त्व विशद करताना डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहितात की; "स्वभावलेखन ही ललित वाङ्मयाची परमोच्च कला होय. कथानक, रसाविष्कार, सृष्टिवर्णने यांना आपल्यापरीने महत्त्व- आहे पण स्वभाव लेखन नसेल तर ही सर्व अंगे असूनही कोणतीही कलाकृती अमर होणार नाही." या प्रबंधाच्या विषयांची व्याप्ती ते अशी देतात की "कादंबरी, नाटक व लघुकथा या गद्य ललित वाङ्मयाच्या तीन प्रमुख शाखा होत. सुमारे १८६१ सालापासून थेट आज सन १९३८ सालापर्यंत या तिन्ही प्रकारचे मराठीत जेवढे वाङ्मय निर्माण झाले, त्यात पायरी पायरीने स्वभावलेखनकलेचा कसकसा विकास होत गेला, ही कला कोणत्या लेखकांना पूर्ण वश झाली, त्यांच्या वाङ्मयात तिचा विलास कसा दृष्टीस पडतो; तसेच तिच्या अभावाने वाङ्मय कसे हिणकस ठरते, मराठीतील कला इंग्रजी वाङ्मयाची कितपत ऋणी आहे, ते ऋण कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे, इत्यादि प्रश्नांचा या प्रबंधात सांगोपांग विचार केला आहे...स्वभावलेखनाची मूलतत्त्वे सांगणे व त्या अन्वये मराठी वाङ्मयाचे संशोधन करणे असे प्रस्तुत प्रबंधाचे दुहेरी कार्य आहे."

डॉ. शं. दा. पेंडसे यांचा "श्रीज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान" हा प्रबंध स्वीकृत झाला तो देखील १९३८ मध्येच! श्री. पांडुरंग शर्मा यांनी 'ज्ञानेश्वर महाराज आणि इतर तत्त्ववेत्ते' या लेखमालेत चित्रमय जगत्मध्ये इ. स. १९२१ ते २३ मध्ये ११-१२ लेख लिहिले. "त्यांच्या मताचे परीक्षण करून त्यांनी उत्पन्न केलेल्या सर्व प्रश्नांना तुलनात्मक अभ्यासाने अद्यापपर्यंत कोणी उत्तर दिलेले नसल्यामुळे या प्रबंधात ते कार्य करून पंडित पांडुरंग शर्मा यांनी केलेले अपसिद्धांत निदर्शनास आणून तुलनेने ज्ञानेशांच्या तत्त्वज्ञानाचे यथार्थ स्वरूप स्पष्ट केले आहे.' प्रस्तुत प्रबंधाचे दोन खंड केले आहेत. पहिल्या ज्ञानेश्वरी खंडात पाच प्रकरणे आहेत. दुसऱ्या अमृतानुभव खंडात प्रथमतः अमृतानुभवाविषयी विचार करून रामानुज आणि पंचरात्र यांचा अमृतानुभवावर परिणाम झाल्याचे आक्षेपकाचे म्हणणे कसे खरे नाही व योगवासिष्ठ आणि शैवाद्वैत यांचा विशेषतः अमृतानुभवांवर व ज्ञानेशांच्या तत्त्वज्ञानावर कसा परिणाम झाला आहे ते नमूद केले आहे. नंतर चांगदेवपासष्टी, अभंगातील तत्त्वज्ञान, अमृतानुभव ज्ञानेश्वरीप्रमाणेच कसे आहे ते दाखविले आहे. पुढे ज्ञानेश्वरांच्या नावावर असलेल्या इतर ग्रंथांविषयी विचार करून आणि नाथपंथाच्या व इतर आचार्यांच्या तत्त्वज्ञानाशी ज्ञानेशांच्या तत्त्वज्ञानाशी तुलना करून उपसंहार केला आहे.

डॉ. पेंडसे यांच्या प्रबंधाच्या प्रस्तावनेत एक उल्लेख प्रकर्षाने जाणवला तो असा की "या विषयावर मराठीत प्रबंध लिहिण्यास परवानगी मागितली ती मिळाली याविषयी मी विद्यापीठाचा आभारी आहे." आणि "ज्ञानेशांचे ग्रंथ मराठीत असल्यामुळे प्रबंध मराठीत लिहिला." यावरून इंग्रजी भाषेचा प्रभाव बराच असावा असे वाटते.

मराठीची पहिली महिला संशोधक

महिलांमध्ये सर्वप्रथम प्रबंध स्वीकृत होण्याचा मान नागपूर विद्यापीठातून पीएच्. डी. पदवी मिळविणाऱ्या कुमारी तारा गणेश केळकर यांना द्यावा लागेल. १९४९ मध्ये स्वीकृत झालेला हा प्रबंध "स्त्रीजीवन, काळ : महानुभाव ते रामदास" या विषयावर आहे. प्रबंधात पहिल्या पृष्ठावर (टायटल पेजवर) स्वहस्ताक्षरात प्रबंधाचे व व स्वतःचे नाव लेखिकेने नमूद केले आहे व डाव्या बाजूला वरच्या कोपऱ्यात वेलबुट्टी काढून सजावट केली आहे. "स्त्रियांच्या जीवनक्रमासंबंधाने सांगोपांग चर्चा करणारा ग्रंथ आजतागायत लिहिण्याचा कोणी प्रयत्न केलेला नाही म्हणून मी प्रबंधाकरिता संशोधनासाठी महानुभावांपासून रामदास अखेरपर्यंतचा काळ म्हणजे १०८० ते १६०३ याची निवड केली आहे." असे नमूद करून त्या पुढे लिहितात की, "जे जे म्हणून मराठी वाङ्मयात मुद्रित स्वरूपात उपलब्ध झालेले आहे, त्यामधून येणारे स्त्रियांच्या जीवनासंबंधी असलेले उल्लेख गोळा करून महानुभाव ते रामदास या काळातील स्त्रीजीवन कसे होते ते दाखविण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे. या काळातील असा कोणताही ग्रंथकार अगर कवी नाही की ज्याच्या लिखाणाचा उपयोग केलेला नाही.' प्रबंधाकरिता माहिती जमविताना, कवीच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विधानावरून अनुमान काढताना मूळ संस्कृतशी त्या भागाचे साम्य नसून तो अगदी स्वतंत्र आहे अशी छाननी करून तो स्वतंत्र असेल तरच त्याचा उपयोग प्रबंधातील विधानाकरिता केला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. ह्याप्रमाणे स्त्रियांच्या जीवनक्रमासंबंधाने माहिती जमवून ती (१) बाल्यावस्था, (२) विवाह, (३) वैवाहिक जीवन, (४) वैधव्य, (५) वेश्या, (६) सामाजिक जीवन आणि अर्थोत्पादन, (७) कला, हुन्नर, खेळ, पाकनैपुण्य, (८) वेशभूषा, (९) काही प्रचलित समजुती, (१०) धर्म आणि धार्मिक समजुती व (११) स्त्रीजीवन असे विभाग पाडून संकलित केली आहे. लेखननिर्मिती करणाऱ्या स्त्रिया स्वकाळात घडणाऱ्या घडामोडींना पारख्या नव्हत्या व पुरुषांच्या ग्रंथाशी तुलना केल्यास त्या कमी प्रतीच्या ठरत नाहीत असाही अभिप्राय निःसंदिग्ध शब्दात त्या व्यक्त करतात.

या तीनही प्रबंधात मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र आढळत नाही. या तिघांपैकी आता सुवर्णमहोत्सवी वर्षात गौरव स्वीकारण्यास कोणीही हयात नाहीत.

सूचीची व्याप्ती

मराठीविषयक सर्वांगीण संशोधनाच्या व्याप्तीची कल्पना यावी यादृष्टीने मराठी वाङ्मय तौलनिक साहित्याभ्यास व भाषाशास्त्र यावरील प्रबंध यात आहेतच. याशिवाय मराठी संतांनी हिंदी साहित्यात घातलेली भर, त्यांचे हिंदी साहित्याला योगदान यावरील आणि मराठीच्या संबंधातील शिक्षणविचार यावरील प्रबंधांचाही या सूचीत अंतर्भाव केलेला आहे. प्रबंध कोणत्याही विद्याशाखेतील असो, या व्याप्तीत बसत असेल तर तो नमूद केला आहे. मात्र भारतीय विद्यापीठातीलच व इ. स. १९३९ ते १९८९ या कालखंडातील प्रबंध नमूद केले आहेत. यासाठी ३१ डिसेंबर १९८९ पर्यंत स्वीकारले गेलेले प्रबंध नोंदवले आहेत.

प्रबंधविषयक दिलेला तपशील

प्रत्येक प्रबंधाबाबत खालील बाबींवर माहिती दिली आहे. मात्र काही तपशील प्रयत्न करूनही मिळाला नाही अशा नोंदी अल्प आहेत : लेखकाचे पूर्ण नाव, प्रबंधाचा विषय (नाव), विद्यापीठ, सादर केल्याचे/स्वीकृतीचे वर्ष, मार्गदर्शक (असल्यास अन्यथा स्वतंत्रपणे असे दिले आहे); प्रकाशित असल्यास ग्रंथनाम, प्रकाशक, प्रकाशन-वर्ष व प्रबंधास पारितोषिक/पुरस्कार मिळाला असल्यास त्याचा तपशील.

सूचीवरून मिळणारी माहिती

(१) एकूण प्रबंध किती झाले व मराठी वाङ्मय तौलनिक साहित्याभ्यास इत्यादी प्रत्येक क्षेत्रात किती प्रबंध झाले.

(२) भारतातील कोणकोणत्या विद्यापीठांमधून हे प्रबंध झाले.

(३) यापैकी प्रत्येक विद्यापीठात पहिला प्रबंध कोणत्या वर्षी स्वीकृत झाला.

(४) प्रत्येक विद्यापीठात कालानुसारी किती प्रबंधांची निर्मिती झाली; मराठी वाङ्मय, भाषाशास्त्र अशा प्रत्येक क्षेत्रात दरवर्षी एकेका विद्यापीठात किती प्रबंध झाले.

(५) प्रबंधांच्या संख्येत कालानुसार घट होत आहे की वाढ होत आहे व तिचे प्रमाण किती आहे.

(६) प्रबंधलेखकांमध्ये पुरुषांचे प्रबंध किती व महिलांचे प्रबंध किती ?

(७) प्रत्येक विद्यापीठात सर्वप्रथम प्रबंध स्वीकृतीचा मान मिळविणारे पुरुष व महिला पदवीधर कोणते.

(८) कोणकोणत्या मार्गदर्शकांच्या हाताखाली हे प्रबंध झाले व एकेकाच्या मार्गदर्शनाखाली किती प्रबंध झाले ?

(९) कोणकोणते प्रबंध प्रकाशित झाले आहेत ? त्यांची संख्या किती व ते कोणी प्रकाशित केले आहेत.

(१०) कोणकोणत्या प्रबंधांना पारितोषिक/पुरस्कार मिळाला आहे.

(११) मराठी वाङ्मय व तौलनिक साहित्याभ्यास यांमध्ये महाकाव्य, नाटक, कथा, लोकसाहित्य, दलित वाङ्मय अशा एकेका प्रकारावर एकेका विद्यापीठात किती प्रबंध झाले आहेत व यावरून प्रत्येक विद्यापीठातून कोणत्या विशिष्ट प्रकारांवरील प्रबंधनिर्मितीकडे कल आढळतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा अनेकविध प्रश्नांची उत्तरे या सूचीच्या आधारे मिळू शकतील. प्रबंधांचे विषय कळल्याने कोणकोणत्या क्षेत्रात प्रबंधनिर्मितीचे प्रमाण कमी आहे, कोणत्या क्षेत्रात ते जास्त आहे. आणि महत्त्वाची बाब म्हणजे कोणकोणती क्षेत्रे दुर्लक्षित राहिलीत वा कोठे वाव आहे, प्रबंधाचे जे विषय घेतले गेलेत ते संशोधनाला पुरेसा वाव असणारे आहेत काय, अशा दृष्टीने एकेका प्रकारातील प्रबंधांवरून त्यामध्ये झालेल्या संशोधनाचे समालोचन करता येईल.

प्रबंधाच्या उपलब्ध असलेल्या सूची :

भारतीय विद्यापीठांमधील स्वीकृत प्रबंधांची सूची प्रसिद्ध करण्याचे कार्य सर्वप्रथम असोसिएशन ऑफ इंडियन युनिवर्सिटीज, दिल्ली (या संस्थेचे अगोदरचे नाव इंटर-युनिवर्सिटी बोर्ड ऑफ इंडिया) या संस्थेने हाती घेतले. या संस्थेतर्फे निघणाऱ्या सूचीचे नाव आहे. 'Bibliography of Doctoral Dissertations accepted in Indian Universities'. भारतात आरंभी इ. स. १८५७ मध्ये मुंबई, कलकत्ता व मद्रास ही विद्यापीठे स्थापन झाली. त्यावेळेपासून आरंभ करून इ. स. १८५७-१९७० / १९७१-१९७५ असे संचयित वर्षाचे खंड व १९७६-७० पासून दरवर्षी एकेक खंड प्रकाशित होतो. एक खंड मानव्य शास्त्रांवरील प्रबंधाचा व दुसरा भौतिक शास्त्रांवरचा असतो. असा हा वार्षिक खंड निघेपर्यंत वाट पहावी लागत नाही. त्या संस्थेचे 'युनिवर्सिटी न्यूज' या नावाचे पाक्षिक निघते. त्यामध्ये 'थीसिस ऑफ दी मन्थ' या शीर्षकाखाली विषयावर स्वीकृत प्रबंधांची यादी असते. ही रोमन लिपीत असते. याशिवाय ज्यांनी आचार्य पदवीसाठी नव्याने नोंदणी केलेली असते त्यांनी घेतलेल्या प्रबंधांच्या विषयांची यादीही पाक्षिकात 'रिसर्च इन् प्रोग्रेस' या शीर्षकाखाली दिली जाते. नियमितपणे व सातत्याने भारतातील प्रबंधांची माहिती पुरविणारे हे एकमेव साधन आहे.

आता मराठीपुरताच विचार करावयाचा झाला, तर आरंभी मुंबईच्या 'मराठी संशोधन पत्रिके'त १९६४, १९६५, १९६७, १९६८, १९७१ व १९८१ या वर्षीच्या खंडांमध्ये 'पीएच्. डी. चे मराठी संशोधन' या शीर्षकाखाली प्रबंधांची यादी दिलेली आहे. मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक १९७४ (पृ. २७४-२९६) यामध्ये "विद्यापीठाच्या सुरवातीपासून १९७४ अखेर मराठी विषयांवरील मान्य झालेल्या प्रबंधांची सूची' दिली आहे. ती डॉ. मधुसूदन पेठे व सौ. शांता येरवडेकर यांनी संकलित केली आहे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेने प्रकाशित केलेल्या व डॉ. वसंत जोशी यांनी संपादित केलेल्या 'भाषा व साहित्य संशोधन : खंड १ (१९८१) पृ. ५२१-५८३, खंड २ (१९८५) पृ. ३९७-४१० व खंड ३ (१९८९) पृ. ३१५-३३३ यामध्ये डॉ. म. प. पेठे यांनी संकलित केलेली सूची 'विद्यापीठ स्तरावरील मराठी संशोधन' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेली आहे.

नव्याने सूची करण्याची निकड

वरील सूची उपलब्ध असताना त्यातील नोंदी एकत्रित करून पुनर्रचना केली की मराठी प्रबंधांची सूची तयार होईल असा समज होणे स्वाभाविक आहे. परंतु हे काम इतके सुलभ नाही. या सूचींमध्ये काही उणीवा आहेत. असोसिएशन ऑफ इंडियन युनिवर्सिटीजच्या (अ. इं. यु.) सूचीत प्रबंधलेखकाचे पूर्ण नाव दिलेले नाही, आद्याक्षरे व आडनाव नमूद केले आहे. यावरून पुरुषांचे प्रबंध कोणते व महिलांचे प्रबंध कोणते हे समजू शकत नाही. आडनावांच्या स्पेलिंगमध्ये कितीतरी चुका आहेत, उदा. वाकोडे'चे Vokorey; 'फडके'चे Pharke; नोंदी चूक आहेत, उदा. प्रभाकर धोंडो गुमास्ते ही नोंद 'धोंडो' खाली, 'अनंत रामचंद्र तोरो' ही नोंद 'अनंत' खाली आहे. प्रबंधांची नावे कधी लिप्यंतरण करून तर कधी भाषांतर करून दिली आहेत. यामुळे 'बखर'चे Bhakor 'वाङ्मय'चे सरसकट चुकीचे स्पेलिंग Vaundmay अशा चुका आहेत, काहींची भाषांतरित प्रबंधनावे बरोबर नाहीत. काही खंडांमध्ये प्रबंधांच्या मार्गदर्शकांची नावेच नमूद केलेली नाहीत. त्यामुळे प्रत्येक मार्गदर्शकाशी संपर्क साधायचा प्रयत्न करता येत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुसरी उल्लेखनीय सूची डॉ. पेठे यांची होय. (पहा, भाषा व साहित्य संशोधन, खंड १, २, ३) यामध्ये काही प्रबंधांच्या मार्गदर्शकांची नावे दिलेलीच नाहीत, काही चुकीची आहेत. गंभीर स्वरूपाची बाब म्हणजे काही प्रबंध स्वीकृत नसलेले यात आले आहेत. उदा. श्री. नागनाथ उपासराव मोरे : दलितांची मराठीतील नियतकालिके, शिवाजी विद्यापीठ (खंड २/पृ. ४०८) हा ग्रंथ विद्यापीठाला सादर केला नसल्याचे डॉ. नसिरावादकर (मार्गदर्शक) यांनी कळविले आहे. श्री. सुभाष गढीकर (खंड २/पृ. ४०१) यांची अद्याप नावाची नोंदणी व्हावयाची आहे ! श्री. गजानन लालजी वैद्य–ए डिस्क्रिप्टिव्ह स्टडी ऑफ शॉर्ट एसेज इन् मराठी लिटरेचर (खंड १/पृ. ५१६) अशी नोंद आहे. बडोदा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुखांच्या पत्रानुसार श्री. वैद्य हे 'चिं. वि. जोशी यांच्या विनोदाचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर स्वतंत्रपणे संशोधन करीत आहेत. श्री. ग. कृ. अग्निहोत्री (हा देखील बडोदा विद्यापीठाने स्वीकृत केल्याचे दिले आहे) "शेक्सपीयरचा मराठी नाटकांवरील परिणाम" (खंड १/पृ. ५२२) पण त्यांनी तो पुरा केला नसल्याचे मराठी विभागप्रमुखांनी कळविले आहे. श्रीमती नलिनी आत्माराम पडोळे, 'श्री. रामदास स्वामीकृत करुणाष्टके' (खंड २, पृ. ४०६). हा एम् फिल्. चा लघुप्रबंध असल्याचे डॉ. म. रा. जोशी (मार्गदर्शक) यांनी सांगितले. याशिवाय प्रबंधांची नावे चुकीची आहेत. उदा. डॉ. वा. के. लेले (बनारस) यांच्या प्रबंधाचे नाव 'भारतीय काव्य शास्त्राची उत्क्रान्ती : प्रथम युग' असे दिले आहे ते बरोबर नाही. हे त्यांच्या प्रकाशित प्रबंधाचे नाव आहे व मूळ प्रबंधाचे नाव 'संस्कृत साहित्यशास्त्राचा मराठी अवतार' असे आहे. ही उदाहरणे तपशीलात देण्याचे कारण प्रस्तुत लेखकाला या सूचींचा आधार घेताना आलेल्या अडचणींची कल्पना यावी व वर जे विधान केले आहे की परिपूर्ण व, विश्वसनीय व अचूक सूचीची गरज आहे त्याची खात्री व्हावी. हे सूचींचे काम करणे अवघड आहे.

पुणे, शिवाजी, कर्नाटक, बनारस या विद्यापीठाच्या प्रबंधांच्या सूची प्रकाशित झाल्या आहेत. त्या अत्यंत उपयुक्त आहेत व याचे श्रेय त्या विद्यापीठांच्या ग्रंथपालांना द्यावे लागेल.

कोणकोणते प्रबंध प्रकाशित झाले आहेत त्यांचा तपशील व पारितोषिक कोणत्या प्रबंधांना मिळाले आहे अशी माहिती मात्र वरील कोणत्याच सूचीत आलेली नाही.

प्रस्तुत लेखकाने विषयवार सूची केली आहे आणि अनेक परिशिष्टे जोडून विवरण दिले आहे. या सूचीत एकूण विद्यापीठांमधील ७५० प्रबंधांची नोंद आली आहे.

डी. लिट्. पदवीचे प्रबंध

मुंबई विद्यापीठातून डॉ. मा. त्र्यं. पटवर्धन (१९३९), रांची विद्यापीठातून डॉ. यू. म. पठाण (१९७७), पुणे विद्यापीठातून डॉ. रा. चिं. ढेरे (१९८०), शिवाजी विद्यापीठातून, डॉ. दु. का. संत (१९८५) व तौलानिक साहित्याभ्यासावर लखनौ विद्यापीठातून डॉ. वेंकटेश्वर रेड्डी (१९६१) व मीरत विद्यापीठातून डॉ. लक्ष्मीनारायण भारद्वाज (१९७९) हे डी.लिट.चे मानकरी आहेत.

प्रबंध : मराठी वाङ्मयावरील

मराठी वाङ्मयावर (ऑक्टोबर १९८९ पर्यंत) ५२१ प्रबंध झाल्याची माहिती मिळाली आहे. पहिल्या २५ वर्षांत म्हणजे इ. स. १९३९ ते १९६४ या कालखंडात फक्त ४७ प्रबंध झाले व त्यात महिलांचे प्रबंध ७ आहेत. पुढल्या २५ वर्षात म्हणजे १९६५ ते १९८९ या कालावधीत एकूण ४७४ प्रबंध झाले व त्यात २०८ प्रबंध महिलांचे आहेत, महिलांमध्ये सर्वप्रथम डॉ. तारा गणेश केळकर यांचा प्रबंध नागपूर विद्यापीठातून इ. स. १९४९ मध्ये स्वीकृत झाला. महाराष्ट्रात सर्वाधिक प्रबंध पुणे विद्यापीठातून १४० तर मुंबई विद्यापीठातून ७६ प्रबंध झाले, नागपूर १०६, मराठवाडा ५१, शिवाजी ५७, श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ २५ व अमरावती ७. महाराष्ट्रातील या विद्यापीठांनी ४६४ प्रबंधांची भर घातली तर महाराष्ट्राबाहेरील इंदूर, उस्मानिया, कर्नाटक, जबलपूर, जिवाजी, बडोदा,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बनारस व विक्रम या विद्यापीठांनी ५७ प्रबंधांची भर घातली.

मराठी वाङ्मयावरील प्रबंधाचे काळानसार पहिले पाच मानकरी

पुरुष

१९३९ डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे (मुंबई)
डॉ. शं. दा. पेंडसे (नागपूर)
१९५२ डॉ. द. न. गोखले (पुणे)
१९५६ डॉ. श्री. रं. कुळकर्णी (उस्मानिया)
१९६३ डॉ. द. ना. आवळीकर (कर्नाटक)

महिला

१९४९ डॉ. तारा गणेश केळकर (नागपूर)
१९५३ डॉ. सरोजिनी बाबर (मुंबई)
१९५४ डॉ. सरस्वती पुरंदरे (पुणे)
१९६५ डॉ. सुशीला मुन्शी (बडोदे)
१९६८ डॉ. सुहासिनी इर्लेकर (मराठवाडा)

कोणकोणत्या विषय क्षेत्रात प्रबंध झाले. हे पाहिल्यास आरंभीच्या २५ वर्षात धर्मसंप्रदाय व तत्त्वज्ञान, साहित्यशास्त्र, महाकाव्य, प्राचीन काव्य व बखर वाङ्मय, वाङ्मयेतिहास, व्यक्ती आणि वाङ्मय (अर्वाचीन); कादंबरी, नाटक, मराठी वाङ्मय व स्त्री विषयांवर प्रबंधनिर्मिती झाली आहे असे दिसते. १९६५ ते १९७४ या दशकात प्रामुख्याने चरित्रे, लोकसाहित्य, शाहिरी वाङ्मय, लघुकथा; दलित वाङ्मय, अनुवादित साहित्य, भारुडे–प्रहसने, निबंध, ग्रंथप्रकाशन अशा विषयांवर प्रबंध होऊ लागले. १९७५ ते १९८४ या कालखंडात बालवाङ्मय, नियतकालिक वाङ्मय विनोदी वाङ्मय, कोशवाङ्मय, कीर्तन साहित्य, ग्रंथनिर्मिती, नाटयछटा, अशा विषयांनी कक्षा रुंदावल्या. त्यानंतर १९८५ ते १९८९ या कालावधीत व्यक्तिचित्र, वाचकाभिरुची व म्हणी यांवरील प्रबंधनिर्मिती सुरू झाली, तरी यावरील प्रबंधांची संख्या नगण्यच आहे. या सूचीवरून आणखी एक बाब लक्षात येते ती अशी की काही विषयांवरील प्रबंधांची संख्या मोठी आहे. अवघ्या सात विषयक्षेत्रात ६० टक्क्यांहून अधिक प्रबंध झाले आहेत, व्यक्ती आणि वाङ्मय (अर्वाचीन) ८०, नाटक ५८; अर्वाचीन काव्य ४६, प्राचीन काव्य ४३, कादंबरी ३५, व्यक्ती आणि वाङ्मय (प्राचीन) ३४ व धर्मसंप्रदाय व तत्त्वज्ञान ३२ असे या मोजक्या विषयक्षेत्रात ३२८ प्रबंध (५२१ पैकी) झाले आहेत. प्राचीन व्यक्ती आणि वाङ्मय यामध्ये तौलनिक साहित्याभ्यास धरून, एकनाथ २४, रामदास १८, तुकाराम १३; नामदेव १३ असे प्रबंध झालेत तर आधुनिक लेखकांवर अत्रे ७, केशवसुत ६, चि. त्र्यं. खानोलकर ५, वि. स. खांडेकर ५, विष्णूशास्त्री चिपळूणकर ५ तर कुसुमाग्रज ३ असे प्रबंध आहेत, दलित साहित्यावर १३ प्रबंध आहेत आणि ते विविध पैलूवर आहेत हे विशेष होय. यावरून मराठी वाङ्मयावरील सूचीवरून किती बाजूंनी प्रबंधनिर्मितीच्या अभ्यासासाठी आधारभूत माहिती मिळू शकते याची कल्पना येईल.

प्रबंध : मराठीचे हिंदीला योगदानविषयक

या विषयक्षेत्रावर २० प्रबंध आहेत. यामध्ये महाराष्ट्रीय संत, नाथपंथीय कवी, वारकरी संत आणि विशेषत्वाने नामदेव यांच्या, हिंदी रचना यांचा अभ्यास आढळतो. महाराष्ट्रीय संतांची व उत्तर भारतातील संतांची हिंदी कविता यांचा तुलनात्मक अभ्यास झालेला आढळतो. स्वातंत्र्योत्तर हिंदीच्या संवर्धनात महाराष्ट्राची भूमिका (दिल्ली १९७६), Contribution of Hindi to Tambe's poetry (कर्नाटक) असेही उल्लेखनीय विषय आहेत.

तौलनिक साहित्याभ्यासावरील प्रबंध

एकाच भाषेतील दोन साहित्यिकांच्या साहित्याचा अभ्यास यांना तौलनिक साहित्याभ्यासाच्या सीमेवरील प्रबंध म्हणणे योग्य वाटते. संत तुकडोजी व तुकाराम (विक्रम १९७२); वसंत कानेटकर व विजय तेंडुलकर (इंदूर, १९८८); ना. सी. फडके व वि. स. खांडेकर (इंदूर, १९७८) अशा विषयावर प्रबंध आहेत. त्याचबरोबर दोन भाषांमधील साहित्याच्या तौलनिक अभ्यासावर ११० प्रबंध झाल्याचे आढळले. एकूण २९ विद्यापीठांमधून प्रबंध झाले आहेत. यावरून अनेक विद्यापीठांमध्ये या क्षेत्रातील विषयांवर प्रबंध होत असतील अशा निष्कर्षाप्रत येणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. यापैकी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१४ विद्यापीठांमधून गेल्या १५–२० वर्षांत एखादाच प्रबंध झालेला आढळतो, मात्र पुणे, मराठवाडा, शिवाजी, दिल्ली व आग्रा या विद्यापीठांमधून याकडे विशेष लक्ष पुरविले जात असावे असे मानता येईल. यामध्ये संस्कृत–मराठी, इंग्रजी–मराठी, हिंदी–मराठी, मराठी–गुजराती. बंगला–मराठी, कानडी–मराठी अशा भाषांमधील लेखकांच्या साहित्याचा अभ्यास झालेला आढळतो, मात्र हे प्रबंध मर्यादित विषयक्षेत्रातले आहेत, ते म्हणजे महाकाव्य, लोकसाहित्य धर्मसंप्रदाय व तत्त्वज्ञान, साहित्यशास्त्र, नाटक, उपन्यास व कथा ही होत. व्यक्ती आणि वाङ्मय यामध्ये कबीर व तुलसीदास या प्रत्येकाच्या साहित्याची तुकाराम, रामदास, नामदेव व ज्ञानदेव यांच्या साहित्याशी तुलना असलेले प्रबंध तुलनेत संख्येने अधिक आहेत. या संबंधात डॉ. गो. मा. पवार यांनी भाषा व साहित्य संशोधन, खंड २ पृ. ३१२ वर असे मत व्यक्त केले आहे की "तौलनिक अभ्यास' बऱ्याच प्रमाणात झालेला आढळतो...परंतु या तौलनिक अभ्यासाचे श्रेय मराठी अभ्यासकांना मात्र नाही कारण हिंदी अभ्यासकांनीच हा तुलनात्मक अभ्यास केला आहे." प्रस्तुत सूचीतील या क्षेत्रातील ११० प्रबंधांपैकी ७५ हून अधिक प्रबंध मराठी अभ्यासकांचे असल्याचे आढळते. सूचीमुळे अशा बाबतीत अनुमान वस्तुस्थितीला धरून होऊ शकते.

'भाषाशास्त्रा' वरील प्रबंध

भाषाशास्त्रावरील प्रबंधांची संख्या फक्त ८२ आहे. आणि एकूण १३ विद्यापीठांमधून हे प्रबंध आहेत. यापैकी निम्मे प्रबंध एकट्या पुणे विद्यापीठातून झालेले आहेत. मुंबई विद्यापीठातून १३; नागपूर १० व मराठवाडा ३ याप्रमाणे बहुसंख्य प्रबंध महाराष्ट्रातील विद्यापीठातले आहेत. इंदूर, उदयपूर, कोचीन. ज. नेहरू, जोधपूर; दिल्ली, बडोदा, मगध व सागर या विद्यापीठातून प्रत्येकी एकेक तर आंध्र, आग्रा व कर्नाटक यातून प्रत्येकी २ आहेत. सर्वाधिक म्हणजे सुमारे ७० प्रबंध बोलीच्या अभ्यासावर आहेत. व्याकरणावर १३ आहेत.

शिक्षणविचारावरील प्रबंध

यावर फक्त २१ प्रबंध आहेत. नागपूर ६; पुणे १०, मुंबई ४ व शिवाजी विद्यापीठ १ अशी विभागणी आहे. विद्यार्थ्यांच्या वाचनसवयी; वाचनाभिरुची, शब्दावली, मराठीचे अध्यापन यावर हे प्रबंध आहेत.

प्रबंधांचे मार्गदर्शक

ज्यांनी प्रबंध लिहून आचार्य पदवी प्राप्त केली नाही परंतु साहित्यक्षेत्रात ज्यांचा नावलौकिक आहे अशांच्या मार्गदर्शनाखालीही प्रबंध झाले आहेत. दिवंगत साहित्यिकात साहित्यसम्राट न. चिं. केळकर; प्रा. रा. श्री. जोग, प्रा. अ. का. प्रियोळकर, प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. म. श्री. पंडित यांचा समावेश आहे. विद्यमान मार्गदर्शकात प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. म. ना. अदवंत, प्रा. गो. म. कुलकर्णी, प्रा. श्री. मा. कुलकर्णी, प्रा. स. गं. मालशे अशा विद्वान प्राध्यापकांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. सर्वात अधिक प्रबंध मार्गदर्शनाखाली होण्याचा मान डॉ. यू. म. पठाण यांच्याकडे जातो. सध्या २३ जणांना आचार्य पदवी मिळाली आहे व दोघांची मौखिक परीक्षा होऊन निकाल अपेक्षित आहे. प्रबंधनिर्मितीच्या अर्धशतकात यांचे २५ प्रबंध होत आहेत. यंदा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान त्यांना मिळाला हा सुयोग आहे. वीस किंवा त्याहून अधिक प्रबंध आणखी दोघांच्या मार्गदर्शनाखाली झाले आहेत. कै. डॉ. रा. शं. वाळिंबे (२१) व डॉ. मु. श्री. कानडे (२०) हे ते मार्गदर्शक होत. दहा किंवा अधिक प्रबंध ज्यांच्या मार्गदर्शनाखाली झाले आहेत त्यांची संख्या १४ असून ५२१ पैकी २१८ प्रबंध यांच्या मार्गदर्शनाखाली (म्हणजे ४० टक्के) झालेले आहेत.

प्रबंधलेखकांविषयी

पतिपत्नी दोघांनीही आचार्य पदवी मराठी वाङ्मयावरील प्रबंधावर मिळवली आहे असे सहाजण आहेत. प्रबंधलेखकात सर्वात अधिक म्हणजे ३४ प्रबंध 'कुळकर्णी' या आडनावाच्या लेखकांचे आहेत. याच आडनावाचे मार्गदर्शक १६ आहेत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली ९२ प्रबंध झालेले आहेत. कुलकर्णी ३४, जोशी ३०, देशपांडे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२१ व पाटील १४ मिळून (९९) या चार आडनावांच्या प्रबंध लेखकांनी प्रबंधाचे एक शतक पूर्ण करीत आणले आहे.

प्रबंधांची प्रकाशनविषयक माहिती :

प्रस्तुत सूचीमध्ये प्रबंध प्रकाशित असल्यास ग्रंथनाम, प्रकाशक व प्रकाशनवर्ष नमूद करण्याचा प्रयत्न केला आहे. ही माहिती सहजासहजी मिळत नाही. प्रकाशित झालेले काही प्रबंध पाहिले तर त्यामध्ये ग्रंथनाम पृष्ठावर तसा स्पष्ट उल्लेख क्वचितच आढळतो. तसे केल्यास ग्रंथसूचींमध्ये तसे नमूद करणे सुलभ जाईल. एकूण ७५० प्रबंधांपैकी १४० प्रबंध प्रकाशित असल्याची माहिती मिळाली आहे. नियतकालिकांमधून नुकतेच प्रबंधलेखकांना ही माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे. मराठी वाङ्मयावरील ५२१ पैकी १०७ प्रबंध प्रकाशित आहेत व त्यांच्या प्रकाशकांची संख्या ८७ आहे. पुणे, मुंबई, मराठवाडा व नागपूर या विद्यापीठांनी एकेक व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळानेही एक प्रबंध प्रकाशित केला आहे. प्रकाशकांमधून व्हीनस प्रकाशन, पुणे यांनी आचार्य पदवीचे ८ व वाङ्मयपंडित (डि. लिट्.) पदवीचे २ असे एकूण १० व कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे यांनी ८ प्रबंध प्रकाशित केले आहेत.

प्रबंध प्रकाशित होत नाहीत याचे काही अत्यंत अनिष्ट परिणाम होतात. एकतर प्रत गहाळ झाली तर पर्यायी प्रत मिळणे शक्य नसते. विद्यापीठ ग्रंथालयांनी कितीही कडक नियम केले तरी अधिकारी मंडळी मार्ग काढून प्रबंध नेतात. प्रबंध गहाळ होतात. दुसरा परिणाम म्हणजे प्रबंधातील वाटेल तेवढा मजकूर त्याचा संदर्भही न देता वापरला जातो. येथील एका प्राध्यापकांना ज्ञानकोशात कोशवाङ्मयावर लेख लिहायचा होता. त्यांनी चपराशाकरवी प्रबंध विभाग उघडून घेतला, काही मजकूर लिहून घेतला आणि साराशाची पृष्ठेच काढता येतात काय या प्रयत्नात ते होते. नेवढ्यात प्रस्तुत लेखक ग्रंथपाल असल्याने तेथे पोहचले. त्यांना वाचनकक्षात वाचायची सोय करतो असे म्हटले. ते प्रबंध टाकून निघून गेले. काही दिवसांनी भेटले तेव्हा म्हणाले की मराठी विभागातून तुमचा प्रबंध मला मिळाला व लेखही पाठवला. पूर्ण प्रबंध झेरॉक्स करून घेणारेही आढळतात.

प्रबंध प्रकाशित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाची एक योजना महाविद्यालयीन व विद्यापीठीय प्राध्यापकांसाठी आहे. त्यामधे दोन तज्ज्ञांकडे प्रबंध पाठवून प्रकाशनासाठी योग्य आहे काय याबाबत मत मागवले जाते. व अनुदान दिले जाते. यातही प्रबंध जसाचा तसा प्रकाशित करण्यास योग्य आहे असा अनुकूल अभिप्रायही थोडचा प्रयत्नानिशी मिळविता येतो, असे प्रस्तुत लेखकाने प्रकाशन अधिकाऱ्याचे काम करताना अनुभव घेतलेत. या योजनेत प्रबंधाला ७५०० रु. ची अनुदानास मर्यादा आहे व हे फार तोटके पडते. वाङ्मयावरील प्रबंध सामान्यत: पृष्ठसंख्येने बाळसेदार असल्याने आजच्या काळात असा प्रबंध मर्यादित पृष्ठांचा करणे भाग पडते. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडूनही प्रबंधाच्या प्रकाशनाला अनुदान मिळू शकते. यासाठी वेगळी तरतूद नाही. प्रबंध ग्रंथाच्या स्वरूपात लिहून सादर करावा लागतो व अन्य ग्रंथांना अनुदान देताना जे नियम लावतात ते त्याबाबतीत लागू होतात. या योजनांच्या अंतर्गत प्रकाशित झालेल्या प्रबंधाबाबत स्वतंत्र लेख होईल इतकी माहिती देता येण्यासारखी आहे.

प्रबंधासंबंधीची माहिती मिळण्याची सोय

कोणकोणत्या विषयांवर कोणते प्रबंध स्वीकृत होत आहेत ही माहिती 'युनिव्हर्सिटी न्यूज' या पाक्षिकातून मिळू शकते. जे प्रबंध प्रकाशित झालेत, ते पहायला मिळू शकतात. पण अमुक प्रबंध प्रकाशित झाला आहे काय हे कसे समजू शकणार हा प्रश्नच आहे. काही विद्यापीठ ग्रंथपाल त्यांच्या ग्रंथालयातील प्रबंध अन्य विद्यापीठ ग्रंथलयाला आंतर–ग्रंथालयीन–देवघेव योजनेत पाठवतात; काही ग्रंथालये प्रबंधाच्या दोन प्रती असल्या तरच एक प्रत पाठवतात. अगदी निकड असेल तर अवलंब करावा असा हा उपाय ठरतो. इतक्या प्रबंधांतील किमान आशय तरी कळायला हवा. यासाठी प्रबंधांचे सार देणारे नियतकालिक हवे. गेल्या ५० वर्षातील प्रबंधांचे सार देणारा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ तयार केला जायला हवा. विद्यापीठाला प्रबंध सादर करताना लेखकाकडून प्रबंधाचे सार (अॅबस्ट्रॅक्ट) मिळवावे. यासंबंधी ग्रंथालयशास्त्रात सार कशा पद्धतीने द्यावे याबाबत तंत्र निश्चित झाले आहे, त्याचा उपयोग करावा. विद्यापीठ अनुदान मंडळाची, अशा प्रकारे प्रबंधांचे सार काढणारे नियतकालिक विद्यापीठाने काढल्यास अनुदान देण्याची योजना काही वर्षांपूर्वी होती; ती आता चालू आहे की नाही कल्पना नाही. सामाजिक शास्त्रांमध्ये सारलेखन केले जाते. आता वाङ्मय-क्षेत्रात त्याची नितांत आवश्यकता आहे.

या लेखात सूचीच्या निमित्ताने प्रबंधांच्या संबंधातील विविध बाबींवर ओझरते विचार व्यक्त केले आहेत. यातील काही बाबींचा सखोल अभ्यास करून व तपशीलात जाऊन शोध घेतल्यास प्रबंधांची माहिती नियमितपणे मिळण्यात, प्रबंध प्रकाशित करण्यासाठी साह्य मिळण्यास, प्रबंधांचे सार उपलब्ध करून देण्यास अशा बाबतीत अधिक विचारविनिमयाची गरज आहे व योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. हे विचार विद्यापीठ ग्रंथालयाच्या पदावर काम करणाराच्या अनुभवातून असल्याने त्यामध्ये प्रबंधांचा दर्जा, गुणवत्ता याबाबतीत चर्चा नाही. परंतु त्याही बाबतीत मराठीच्या संशोधनाकरिता लागणाऱ्या ग्रंथांच्या सूची, नियतकालिकांतील लेखांच्या सूची, वाङ्मयकोशासारखे अन्य-संदर्भ-साहित्य व अन्य कोश किती प्रमाणात उपलब्ध आहेत, काय उपलब्ध नाही व ते मिळण्यासाठी कोशनिर्मिती कशी व्हावी याबाबतीत विचार होणे अगत्याचे आहे. अपुऱ्या व तोटक्या साधन-सामग्रीच्या आधाराने संशोधन करावे लागले तर ज्यांना अभ्यासाचा सराव नाही, चिकाटी नाही, साधना माहीत नाही पण पदवीचा हव्यास आहे त्यांच्याकडून दर्जा राखावा ही अपेक्षा करणे उचित आहे काय याचाही विचार व्हावा असे आवर्जून सांगावेसे वाटते. ■

व्यासंग, ११ / विद्याविहार
राणा प्रतापनगर, नागपूर ४४००२२

हरी नरके यांच्या ग्रंथास पुरोगामी विचारमंच पुरस्कार

हरि नरके यांच्या "महात्मा फुले यांची बदनामी : एक सत्यशोधन" या बहुचर्चित ग्रंथाची मराठी भाषेतील ८९ सालातील सर्वोत्कृष्ट ग्रंथ या पुरस्कारासाठी रत्नागिरीच्या पुरोगामी विचार मंच या संस्थेने निवड केली आहे. रु. ५५१ /– आणि प्रशस्तिपत्रक या स्वरूपात देण्यात येणारा हा पुरस्कार १० फेब्रुवारी १९९० रोजी होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यात प्रख्यात विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल.

महात्मा फुले यांच्यावरील टीकात्मक लेखनाचा वैचारिक-संशोधनातून प्रतिवाद करणारा हा ग्रंथ पुण्याच्या सुगावा प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. सदर ग्रंथास यापूर्वीही धारवाड (कर्नाटक) आणि मुंबई येथील दोन पुरस्कार मिळालेले आहेत.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ 'गझल'चे छंदशास्त्र : एक अभ्यास ॥

आनंद आडे

गझल या काव्यप्रकाराने मराठीत अद्यापही मूळ धरलेले नाही. मात्र या काव्य-प्रकाराने लौकिक प्राप्त करून मोठ्या प्रमाणावरील मराठी जनमानसास काही काळ खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य प्राप्त केले आहे. 'महाराष्ट्राचे लाडके कवी' असे संबोधन मराठीत या काव्यप्रकाराचे मूळ नसताना देखील मराठी गझलकाराला लाभावे हा योगायोग नसून हा काव्यप्रकार परिश्रमपूर्वक, निष्ठापूर्वक, जगवण्याचा, जोपासण्याचा व तो अभिवृद्ध करण्याचा व्रतस्थ प्रयत्न त्या मागे उभा आहे.

या प्रयत्नाच्या लौकिक यशाने मराठीत मोठ्या प्रमाणावर गझल लेखनास चालना मिळाली खरी. परंतु गझलच्या व्याकरणाची अनुपलब्धता मात्र कायमच राहिली. ही उणीव दूर सारण्याचा आधुनिक काळातील मराठीतील बहुधा हा पहिलाच आणि एकमेव प्रयत्न श्री. आनंदकुमार आडे या वैदर्भीय अभ्यासकाने केलेला असून गझलच्या छंदशास्त्रासंबंधाने त्यांनी परिश्रमपूर्वक गोळा केलेली माहिती दोन भागात उपलब्ध करून देत आहोत. त्यापैकी हा पहिला भाग :

गझल अक्षर वृत्तात आहे आणि मात्रा वृत्तात सुद्धा आहे. अरबी छंदशास्त्र पहिल्यांदा अरबस्थानात लिहिल्या गेले. त्यात अनुप्रास म्हणजे रदीफचा समावेश करण्यात आलेला नव्हता. परंतु फारशी कवींनी अनुप्रास योजावयास सुरुवात केली. तसेच नवीन छंद तयार करून त्यात भर टाकली.

अरबी छंदशास्त्र लिहिणारा खलील अहमद बसरी हा बसराचा राहणारा होता. ग्रीक छंदाचा सुद्धा तो जाणकार होता. त्याला संस्कृत भाषेचा सुद्धा परिचय होता. हे वयोवृद्ध विद्वान एकदा मक्का शरीफ येथे धोबीघाटाजवळून जात असताना एक धोबी दगडावर कपडे आपटत होता. एक-सारखे खलील त्याकडे पाहत राहिले. कपडे आपटतांना होणारा आवाज, दोन आवाजातील अंतर, ध्वनी आणि लय या सर्वांचा व्यवस्थित समन्वय आणि क्रिया या बाबत कितीतरी वेळ सानंदाश्चर्याने ते पाहात, ऐकत राहिले. त्यांचे अंतःकरण आनंदाने उचंबळून आले आणि ते म्हणाले देवकृपेने हा ध्वनी एका विद्येच्या उत्पत्तीसाठी गूढ प्रेरणारूप आहे. आणि त्याच्या डोळ्यात 'फअल' 'फअल' 'फऊल'च्या लहरी तरंगू लागल्या. अशाने 'फऊल' शब्दध्वनी गझलच्या छंदशास्त्राच्या उत्पत्तीचे कारणरुप घडले. ज्याप्रमाणे 'तुन'स्वर, स्वरशास्त्राच्या उत्पत्तीचे मूळ आहे. त्याच प्रमाणे 'फऊल' गझलच्या छंद शास्त्राचा आद्यगण समजण्यात येतो.

वाल्मिकी ऋषींना अनुष्टुभ छंदाची प्रेरणा क्रौंचवधाच्या प्रसंगावरून मिळाली होती. तशीच प्रेरणा उपरोक्त प्रसंगावरून हजरत खलील अहमद बसरी यांना मिळाली, असे म्हणता येईल.

या छंदशास्त्राला 'अरुझ' का म्हणतात याला सुद्धा एक कारण आहे. मक्का शरीफ येथ या शास्त्रासाठी प्रेरणा मिळाली, आणि मक्का शरीफचे एक नाव 'अरुझ' आहे. या अरुझ शब्दाचा अर्थ 'उत्पत्ती' असा होतो.

छंदशास्त्र आणि त्याचे शुद्ध गण बिम्ब

'फऊल' या आद्यगणाच्या आधारे हझरत खलील अहमद बसरी यांनी दहा गण बिम्ब म्हणजे वृत्त तयार केले. हजरत खलील नंतर इतर विद्वानांनी उपछंदांची निर्मिती केली. तसेच काही मूळ छंदांची त्यात भर टाकली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्कृत छंदशास्त्रात आठ गण आहेत तर अरबी छंदशास्त्रात आठ श्रुती आहेत. संस्कृत मध्ये तीन अक्षरी गण आहेत तर 'बहर' मधील गण आणि श्रुती पांच आणि सात अक्षरी आहेत, आणि काही नवीन छंदामुळे त्यात भर पडली.

शुद्ध गण बिंब

अनु.	गणाचे नाव	मात्रा किंवा वजन. (ल = १ मात्रा व गा = २ मात्रा)	कोणत्या छंदातील शुद्धगण आहे
१	फ ऊ लु न्	ल गा, गा	मुतकारिब छंद
२	फा अ लु न्	गा, ल गा	मुतदारिक छंद
३	म फा ई लु न्	ल गा, गा गा	हझज छंद
४	मु स त फ इ लु न्	गा गा, ल गा	रजझ छंद
५	म फा इ ल तु न्	ल गा, ल ल, गा	वाफिर छंद
६	मु त फा इ लु न्	ल ल, गा, ल गा	कामिल छंद
७	फा इ ला तु न्	गा, ल गा, गा	रमल छंद
८	म फ ऊ ला तु	गा, गा, गाल	मनसरिह छंद
९	मु स त फ अ लु न्	गा, गा, ल गा	खफीफ मुक्तझब छंद
१०	फा अ ला तु न्	गा ल, गा गा	मुझारिअ छंद

४ था गण व ९ वा गण मात्रा व वजनाच्या दृष्टीने जरी सारखे असले, तरी ते वेगळे आहेत (मनफसल – मतसल)

गणविभाग (Syllables)

अ, इ, उ, क, कि, कु लघु आहे तर आ, ई, उ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः, का, की, कू, के, कै, को, कौ. आणि कं प्रमाणे इतर मूळाक्षरे गुरु आहेत. ऋ लघु आहे. अकार व्यंजने लघु असून लघु अक्षराची एक मात्रा व 'गुरु'च्या दोन मात्रा मोजायच्या असतात. छंद शास्त्राचा उच्चारावर भर असून 'गुरु' अक्षराला बोलतांना जर 'लघु' शब्दाइतकाच वेळ लागत असेल तर त्याला लघु समजायचे. मराठी छंदशास्त्रात दोन लघु अक्षराचा एक गुरु होत नाही तर गझल छंदशास्त्रात दोन 'लघु' मिळुन एक गुरु होतो. असे असले तरी सुद्धा 'गुरु' शब्द योग्य असेल तेथे 'गुरु'च योजावयास पाहिजे. कारण मु त फा इ लु न = ल ल गा, ल, गा या सारख्या गणात सुरवातीला दोन 'लघु'च आले पाहिजेत. या नियमा विरुद्ध तेथे 'गुरु' वापरू नये. तेथे दोन लघुच योजावयास पाहिजे अन्यथा ते मु स त फ अ लु न = गा, गा, ल गा होईल म्हणून दक्षता घ्यावयास पाहिजे.

(१) **सबब** : शब्दकोषाप्रमाणे 'सबब'चा अर्थ 'कारण' असा होतो परंतु छंदशास्त्रात 'सबब' दोन मात्रांचा उच्चार समजण्यात आला आहे. दोन लघु किंवा एक गुरु म्हणजे 'सबब' आहे.

(२) **वतद** : 'वतद'चा अर्थ तसा तर लाकडी खुंटी असा आहे. पण फारसी छंदशास्त्रात 'वतद'ला तीन मात्रांचा गण समजण्यात आला आहे.

(३) **फासला** : शब्दकोशाप्रमाणे 'फासला'चा अर्थ लांबचे अंतर असा आहे. परंतु छंदशास्त्रात तो चार मात्रांचा सूचक आहे. तर आपण पाहिले की 'गा' अथवा 'ल ल' 'सबब' आहे. 'गाल' अथवा लगा वतद आहे. ललगा अथवा गालल 'फासला' आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आता आपण 'सबब'चे प्रकार पाहू. सबबचे दोन प्रकार आहेत.

(१) सबब-ए-खफीफ (२) सबब-ए-सकील

दोन अक्षरं लघु किंवा एक गुरु किंवा एक लघु नंतरचा दुसरा हलंत म्हणजे लंगडा अशा व्यंजन-शब्द विभागाला सबबे खफीफ म्हणतात. जसे – 'गा', गल, सद. इत्यादी.

जर दोन लघु येत असतील व इझाफत लागत असेल तर त्याला सबबे सकील म्हणतात. खफीफ चा अर्थ होतो हळूपणे व सकीलचा अर्थ होतो भार देऊन म्हणजे लघु व गुरु.

वतदचे दोन प्रकार

तीन अक्षराच्या श्रुतीच्या 'वतद'चे दोन प्रकार आहेत.

(१) वतद मजमूअ (२) वतद मफरुक.

दोन लघु आणि एक हलंत् अक्षर असल्यास किंवा एक लघु व एक गुरू मिळून शब्द बनतो. त्याला वतद मजमूअ म्हणतात. जसे–असद्, जगत्, अता, तदा इत्यादी. तसेच पहिला अथवा तो शेवटी लघु–गुरु असेल किंवा पहिला गुरु व नंतर लघु असलेल्या शब्दाला 'वतद मफरुक' म्हणजे फरक केलेला म्हणतात. जसे– धर्म, कर्म, जांळ, कृत्य, माल. इत्यादी.

फासलाचे दोन प्रकार

चार अक्षर किंवा मात्रांच्या 'फासला'चे दोन प्रकार आहेत.

(१) फासला सुग्रा (२) फासला कुब्रा

ज्या गणात पहिल्या तीन लघु अक्षरानंतर ४ थे हलंत अक्षर किंवा दोन लघु आणि एक गुरु असेल तेव्हा त्याला 'फासलासुग्रा' म्हणतात. सुग्राचा अर्थ होतो जवळचा. जसे– जडवत्, भगवत्, कविता, सविता. आणि जेंव्हा चार लघु नंतर पाचवा हलंत् असेल किंवा प्रथम तीन लघु आणि चौथा गुरु असेल तर त्याला 'फासला कुब्रा' म्हणतात. कुब्रा म्हणजे दूरचा : जसे हरिणवत, सजवणे, करवणे, मिरवणे इत्यादी. फा इ लु न = (गा, ल गा) या गणात 'फा' हे सबब आहे व इलुन हे 'वतद' आहे.

गझलचे छंद (बहर) : आपण ज्याला छंद किंवा वृत्त म्हणतो त्याला फारसीमध्ये 'बहर' असे म्हणतात. बहर चा अर्थ होतो सागर. अरबी छंद शास्त्रकार हजरत खलील अहमद बसरी यांनी दहा गणांच्या परस्पर संबंधातून खाली दर्शविल्याप्रमाणे १५ छंदांची मांडणी केली आहे. १५ बहर मध्ये पुन्हा ४ बहरींचा समावेश झालेला असल्याने त्या एकूण १९ झाल्या आहेत. अबू–अल हसन अख्फरा याने सोळावी बहर 'मुतदारिक' तयार केली व या नंतर इराणच्या तीन कवींनी तीन बहरींचा त्यात नव्याने समावेश केला. 'करीब', 'जदीद', मुशाकिल म्हणजे एकूण संख्या १९ झाली.

छंदाचे नाव, गण, वजन व मात्रा

(१) 'तवील' मुसम्मन सालिम – १४ अक्षर ; २४ मात्रा

गणः फ ऊ लु न, – म फा ई लु न् फ ऊ लु न, – म फा ई लु न,

वजन : ल गा गा – ल गा गा गा – ल गा गा – ल गा गा गा

मात्रा : १ २ २; १ २ २ २, १ २ २ १ २ २ २

(२) 'मदीद' मुसम्मन सालिम – १४ अक्षर ; २४ मात्रा

गण : फा अ ला तु न्, – फा इ लु न्, – फा अ ला तु न्; – फा इ लु न

वजन : गा ल गा गा, – गा ल गा, – गा ल गा गा, – गा ल गा

मात्रा : २ १ २ २, २ १ २, – २ १ २ २, – २ १ २

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(३) 'बसीत' मुसम्मन सालिम – १४ अक्षर : २४ मात्रा

गण : मु स् त फ् अ लु न्, – फा इ लु न, – मु स् त फ् अ लु न् – फा इ लु न

वजन : गा गा ल गा, – गा ल गा, – गा गा ल गा, – गा ल गा

मात्रा २ २ १ २, २ १ २, २ २ १ २, २ १ २

(४) 'वाफिर' मुसम्मन सालिम २० वर्ण : २८ मात्रा

गण : मुफा–इल–तुन् – ४ वेळा

वजन : लगा ललगा – ४ वेळा

मात्रा : १ २ १ १ २

(५) 'कामिल' मुसम्मन सालिम २० वर्ण : २८ मात्रा

गण : मु त फा इ लु न् – ४ वेळा

वजन : लल–गा–लगा – ४ वेळा

(६) 'हझज' मुसम्मन सालिम – १६ वर्ण : २८ मात्रा

गण : मफा–ई–लुन्– ४ वेळा

वजन : लगा–गा–गा– ४ वेळा

मात्रा : १ २ २ २

उदा.– इथे मी सोसला माझा अशा साठीच बोभाटा
कळयांची काळजी होती फुलांचा मामला होता (सुरेश भट)

(७) 'रझझ' मुसम्मन सालिम १६ वर्ण : २८ मात्रा

गण : मुस + तफ + इलुन् – ४ वेळा

वजन : गा – गा – ल गा – ४ वेळा

मात्रा : २ २ १ २

उदा.– (१) आता जगायाचे असे माझे किती क्षण* राहिले
माझ्या धुळीचे शेवटी येथे किती कण* राहिले

(* क्षण तसेच कण साठी दोन लघु मिळून एक गुरु) (सुरेश भट)

(८) 'रमल' मुसम्मन सालिम १६ वर्ण २८ मात्रा

गण: फा + इला + तुन् – ४ वेळा

वजन : गा + लगा + गा – ४ वेळा

मात्रा : २ १ २ २

उदा. (१) ही इमानाची दलाली हे यशाचे कोंडवाडे
पावणी जागी असू द्या हा यमाचा घाट आहे (मंगेश पाडगावकर)

(९) 'मुक्तझब' मुसम्मन सालिम १६ वर्ण : २८ मात्रा

गण : मफऊलातु, मुस्त्फइलुन्, – मफऊलातु, मुस्त्फइलुन्

वजन : गा गा गा ल, गा गा ल गा, – गा गा गा ल, गा गा ल गा

मात्रा : २ २ २ १ – २ २ १ २, २ २ २ १ – २ २ १ २

(१०) 'मनसरिह' मुसम्मन सालिम १६ वर्ण २८ मात्रा

गण : मुस्त् – फ इ लु न, मफऊलातु – मुस् त् फ इ लु न – म फ ऊ ला तु

वजन : गा गा ल गा, गा गा गा ल – गा गा ल गा, – गा गा गा ल

मात्रा : २ २ १ २ – २ २ २ १ – २ २ १ २, – २ २ २ १

(पुढील भाग पुढील अंकात)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

|| परिचय ||

संवादप्रक्रिया : सैद्धांतिक संकल्पन

श्रीपाद भालचंद्र जोशी

जनमाध्यमांनी मानवी बोधन प्रभावित करण्याचे युग सुरू होऊन बराच काळ लोटला असला तरी जगातील सारीच राष्ट्रे व मानवी समूह अद्यापही या माध्यमांच्या परिघात संपूर्णपणे आलेले आहेतच असे नव्हे. तरीही जवळजवळ सारे जग आज जनमाध्यमांनी प्रभावित झालेल्या युगात वावरते आहे. ही माध्यमे, त्यांचे व्यक्ती व समाजाशी असणारे नाते, त्यात निहित क्रिया-प्रक्रिया, त्यांचा व्यक्तींवरील परिणाम याबाबत माध्यमांशी संबंधित असणाऱ्या फार मोठ्या लोकसंख्येस मोठ्या प्रमाणावर शिक्षित न करण्याचेच धोरण जगभरच कायम टिकविण्यात सर्वच राष्ट्रात थोड्याफार फरकाने समानताच आढळते.

या धोरणाचे परिणामी, संवादप्रक्रिया व स्वतःची संवादशक्ती यांच्या साधन म्हणून केलेल्या सुनियोजित वापराने साध्य करता येणाऱ्या यशस्वी जीवनापासून जगातील माध्यमांशी संबंधित असणारी फार मोठी लोकसंख्या अद्यापही वंचित आहे. संवाद-शक्तीच्या वापरातून समृद्ध होण्याऐवजी ही मोठी लोकसंख्या माध्यमांद्वारे वापरल्या जाणाऱ्या या शक्तींनी नियंत्रितच अधिक असून माध्यमशक्तीचा ती बळीच तेवढी अधिक ठरली आहे. माध्यमांच्या शक्तीचा त्यामुळेच व्ययापेक्षा अपव्ययच अधिक झालेला आहे. अशा या माध्यमातील मूलभूत अशा संवाद प्रक्रियेच्या सैद्धांतिक बाबींचा हा एक ओझरता परिचय. विशेषतः लेखन, कला व निर्मिती व्यवहारात असणाऱ्यांकरिता प्रकर्षाने आवश्यक असलेला.

चिन्हव्यवस्थेद्वारा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे (अथवा समूहाकडून समूहाकडे किंवा व्यक्तीकडून समूहाकडे) होणारे माहिती विचार; कल्पना; भावना, वृत्ती इ चे वहनाची प्रक्रिया ही संवादप्रक्रिया समजल्या जाते. ही प्रक्रिया सर्वसाधारणपणे माहिती, विचार, भावना इ. चे वहन करणारे माध्यम व ती पाठविणारा, स्वीकारणारा तसेच ज्या द्वारे पाठविले जावयाचे आहे ती चिन्हव्यवस्था या घटकांची मिळून बनलेली आहे. ज्याचे वहन केले जाते त्या संदेशांची ही यंत्रणा आहे. या संदेशांद्वारा होणारी क्रिया, सामाजिक आंतरक्रिया, आदानप्रदान हीच संवादप्रक्रिया.

या प्रक्रियेत प्रेषक, माध्यम, संदेश, स्वीकारक, प्रेषक व स्वीकारकांतील परस्परसंबंध, परिणाम-कारकता व परिणाम, बाह्य परिस्थिती व तिचे संदर्भ, व संदेशात निहित बाबी या साऱ्यांचाच समावेश गृहीतच आहे. त्यात अनेकदा प्रेषक, स्वीकारकांचे हेतु देखील समाविष्ट असतातच संवाद ही इतरांवर प्रभाव पाडण्याकरताची क्रिया इतरांसोबतच्या व्यवहाराकरता अथवा इतरांच्या संवादावरील प्रतिक्रिया स्वरूपातील कृती असलेली अशी प्रक्रिया आहे.

महत्त्वाच्या प्रक्रिया : संकेतीकरण आणि विसंकेतीकरण

या प्रक्रियेत दोन महत्त्वाच्या संकल्पना समाविष्ट असतात त्या म्हणजे संकेतीकरण आणि विसंकेतीकरण. त्यातील संकेतीकरण ही प्रेषकाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाजूची अथवा प्रेषण संबंधित तर विसंकेतीकरण ही स्वीकारकाच्या बाजूची अथवा स्वीकारकाशी संबंधित असलेल्या बाबी होत.

संकेतीकरण ही संवाद प्रक्रियेतील एक अतिशय महत्वाची घटक असलेली बाब असून तितकीच तरल अशी देखील ही बाब आहे. याचे कारण अमूर्त संदेशांचे चिन्हात रूपांतरण येथे गृहीत आहे.

ज्या स्वीकारकांकडे संदेश प्रेषित करावयाचे आहेत त्याचेकडे अनुरूप अशा माध्यमांद्वारा त्याचे वहन होईल अशा रीतीने केलेले हे रूपांतरण असते. ते भाषिक चिन्हात अंकित केलेले असल्यास तो भाषिक स्वरूपाचा संवाद. हेच शब्दांकन. हेच रूपांतरण भाषिक चिन्हव्यवस्थेव्यतिरिक्त, भाषेतर चिन्हव्यवस्थेद्वारा झाल्यास हा भाषेतर संवाद.

हे अंकन संकेतांचे असल्याने हे संकेत ज्या स्वीकारकाकडे पाठविले गेले आहेत त्याचेकडे होणारी या संकेताची उकल करण्याची जो प्रक्रिया ती विसंकेतीकरण. संकेतातून आलेला अर्थ, आशय उकलून, उलगडून ग्रहण करण्याची ही प्रक्रिया आहे.

दोन व्यक्तींच्या संभाषणात संकेतीकरणाची ही प्रक्रिया भाषिक यंत्रणेद्वारा तसेच भाषेतर हावभाव, हालचाली, हातवारे अशा शरीर-माध्यमाद्वारा देखील होत असतेच. भाषेव्यतिरिक्त या इतर बाबींद्वारा जे संकेतीकरण संवादार्थ वापरल्या जाते त्याची उकल दृश्य–श्राव्य संवेदना करीत असतात.

जनसंवादात हेच संकेतीकरण रेखांची, चित्रांची, शब्दांची योग्य निवड, व त्यांचे यांत्रिक साधनां-नुरूप रूपांतरण स्वरूपात होत असते.

जे काही विचार, माहिती, कल्पना इ. चे प्रेषण केल्या गेले आहे त्याचा स्वीकार कसा झालेला आहे याची स्वीकारकाकडून मिळणारी पावती म्हणजे 'फीड बॅक' ही सुद्धा संवादप्रक्रिये-तील पुढील संवादाकरिता आधार ठरणारी अशी महत्त्वाची घटक बाब होय.

समोरासमोरील परिस्थितीत ही पावती प्रश्नांचे, काय म्हटले आहे त्याचा पुनरुच्चार करावयास लावण्याचे अथवा हावभाव, हातवारे, इतर शारीरिक हालचाली इ. द्वारा प्राप्त होण्याची सोय असते. तर जनसंवादात जनमाध्यमांच्या (श्रोत्यांच्या, प्रेषकांच्या) स्वीकारकांच्या संदर्भा-तील घेतलेला शोध, खपाचे अथवा माध्यम ग्राहकांचे आकडेवारी, वाचकांचा – ग्राहकांचा पत्रव्यवहार इ. स्वरूपात ती प्राप्त होऊ शकते.

संस्थात्मकता व तंत्राचाही समावेश

संवाद ही अर्थवाही अशा संकेतांचे, चिन्हाचे वहनाची प्रक्रिया तर जनसंवाद ही निव्वळ अशी प्रक्रिया नसून त्यात संस्थात्मकता व तंत्रांचाही समावेश असणारी संकल्पना आहे.

मोठ्या प्रमाणावरील, विविध स्वरुपी व दूर-दूरवर पसरलेल्यांपर्यंत अर्थ वाहून नेण्याचा विशेषज्ञांकडून तांत्रिक साधनांद्वारा केला जाणारा हा संवादव्यवहार आहे. (जानोविट्झ् १९६८)

मूळसंवाद प्रक्रियेतील प्रेषक व्यक्ती व जन-संवादातील प्रेषक व्यक्ती यांच्यातही मूलभूत फरक आहे. जनसंवादातील 'प्रेषक' हा निव्वळ संवादप्रक्रियेकरता असणारा प्रेषक नसून तो कोणत्या तरी संघटित अशा विशिष्ट गटाचा भाग व संवादापेक्षाही वेगळ्या हेतूने कार्यरत असणाऱ्या संस्थात्मक यंत्रणांचाही भाग असतो.

मात्र यातही 'स्वीकारक' हा 'व्यक्ती' असतो तरीही 'प्रेषक' मात्र स्वीकारकास सर्वसाधारणपणे प्रातिनिधिक स्वरूपातच बघत असतो.

येथे संवादाची माध्यमे देखील केवळ भाषा वा भाषेतर, शारीरिक हावभाव, हालचाली, हातवारे, अंगविक्षेप अथवा सामाजिक संबंध, नाते इ. च तेवढे न उरता माहितीचे, विचारांचे, उत्पन्नांचे इ. चे मोठ्या प्रमाणावरील तंत्रशास्त्रावर आधारलेल्या उपकरणे व पद्धती द्वारा वितरण करणारी माध्यमे होतात. तरीही ती प्रचलित कायदा, चालीरिती व अपेक्षांच्या बंधनातच वावरत असल्याने त्यात सामाजिकतेचा घटक समाविष्ट असतोच.

यातील संदेशाचे, आशयाचे स्वरूप देखील विशाल अशा जनतेकरिता निर्मिलेले व वारंवार उपयोगात येऊ शकेल अशा रचनेचे असते.

जनसंवादाचे सार्वजनिक व मोकळे, मुक्त; खुले असे स्वरूप; प्रेषणाचे ठिकाणी असणारी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मर्यादित व नियंत्रित अशी पोहोच, प्रेषक व स्वीकारक यांच्यात नात्याचा नसलेली व्यक्तिगतता, त्यांच्या परस्पर नात्यातील असमानता तसेच विविध समाजातील विविध घटकांचे संभवणारे कोणत्याही प्रकारचे हस्तक्षेप या बाबी येथे दुर्लक्षून चालत नाहीत. नव्हे, याच बाबींमुळे जनसंवादाची विविध पद्धतींची वेगवेगळी अशी व्यवस्था वेगवेगळ्या समाजात आकारास आलेली आढळते.

संशोधनाचा उद्‌गम

वृत्तपत्रांच्या परिणामकारकतेमुळे व पुढे रेडिओ, सिनेमा यांच्या सामाजिक, सांस्कृतिक प्रभावामुळे व परिणामांमुळे जनसंवादाबाबतच्या संशोधनास प्रेरणा मिळाली. या प्रकारच्या संशोधनाची सुरवात त्यामुळे या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडात झालेली आहे.

मुळात संवादविषयक संशोधनाचा उद्‌गम हा शिक्षण प्रचार, दूरसंचार, जाहिराती व जनसंपर्क तसेच मानवीसंबंध यातील प्रभाव आणि परिणामकारकतेची वृद्धी करण्याच्या इच्छेतून व गरजेतून झालेला आहे. यातील संशोधन हे प्रत्यक्ष गरजेपोटी झालेले आहे व तद्‌नंतर मानसशास्त्र, समाजशास्त्र तसेच संशोधनाच्या पद्धती प्रयोग, इ. बाबी या संशोधनात मदतीला घेतल्या गेल्या आहेत.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत संवाद, जनसंवाद, माध्यम या बाबतची जाणीवच आजच्या एवढी अशी प्रगत झालेली नव्हती.

संवादशास्त्राच्या शक्यतेबाबतचा विचार अमेरिकेत युद्धोत्तर काळात सुरू झालेला विचार आहे. सुमारे १९५० च्या पुढील दशकात संवाद प्रक्रियेचे सैद्धांतिक संकल्पनेविषयक विचार प्रगत होत गेला.

प्रक्रियाविषयक सिद्धांत

क्लाऊड शॅननच्या संवादाच्या गणितीय पद्धतीच्या सिद्धांताने प्रथमच संवादप्रक्रियेला आकृतीबद्ध करण्याचा प्रयत्न करून समाजशास्त्रज्ञांना प्रेरणा दिली.

त्यातच जनसंवादप्रक्रियेच्या स्वरूप व आकलनावर भर असणाऱ्या सिद्धांतांची वाढ होत गेली. शॅननच्या सरळसोट गणिती सिद्धांतापेक्षा या प्रक्रियेतील प्रेषक व स्वीकारकाचे सामूहिक पातळीवरील मन व संदेशग्राहकांचे सामाजिक स्वरूप विचारात घेऊन ही प्रक्रिया अधिक स्पष्ट करण्याचा विलबर श्रम या जनसंवादतज्ञाने प्रयत्न केला. संदेश प्रेषक व संदेश ग्राहक यांचे परस्पर संबंधांवर प्रभाव पाडणारा, या संबधाची स्वरूप निश्चिती करणारा असा सामाजिक संदर्भातील औपचारिक आणि अनौपचारिक वातावरणातील भेदावर भर देणारा रिले व रिले यांच्या सिद्धांतातून मूलभूत अशा संवादप्रक्रियेपासून जनसंवाद प्रक्रियेचे असलेले वेगळेपण प्रकर्षाने जाणवण्यास अधिकच मदत होत गेली.

या सर्व बाबींचा तसेच वेगवेगळ्या संवादमाध्यमांचे असलेले आपआपले वेगवेगळेपण, त्यातील आशयाचे वैविध्य, तसेच संदेश प्रेषक असणारे व संदेश ग्राहक असणारे यांची एकमेकांबाबतची परस्परांना जाणवणारी प्रतिमा, या बाबी समाविष्ट असलेला विचार मॅलेत्झ्की (Maletzke) याने पुढे आणला. तर जनमाध्यमांच्या या माध्यमयंत्रणांच्या, माध्यम नियंत्रित करणारी व जनसंवादक आणि विविध माध्यमांद्वारा संदेश ग्रहण करणारी सर्वसाधारण जनता यांच्यातील, मध्यस्थाच्या व नियंत्रकाच्या अशा स्वरूपाच्या भूमिकेवर वेस्टलें व मॅक्लिन यांनी भर दिला. नेमक्या व विशिष्ट उद्देशाने साधला गेलेला संवाद व सर्वसाधारण उद्दिष्ट समोर ठेवून साधला जाणारा, नेमक्या व्यक्तींना संबोधून नसलेला व सतत सुरू रहाणारा आणि त्यामुळे वरकरणी उद्देशहीन वाटू शकणारजनसंवाद यावरही त्यांनी विचार मांडले.

त्यांच्या सिद्धांतात जनसंवादक, जनमाध्यमाद्वारा संवाद साधणारा, हा स्वीकारकाचा प्रतिनिधी म्हणून मानला गेला आहे. तोच गरजा व आवडीनिवडी ठरविणारा घटक ठरतो.

पुढील प्रगती

जनसंवादाच्या प्रभावाबाबतच्या विचारातील एक महत्त्वाचा विचार 'टू स्टेप फ्लो' सिद्धांताचा होता.

या सिद्धांताने लोकांवर जनसंवादाचा परिणाम प्रत्यक्ष व सरसकट असल्याच्या विचारांना आव्हान दिले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जनमाध्यमांद्वारा प्रसृत माहिती, विचार, कल्पना इ. चा प्रभाव हा व्यक्तींवर सरळ साधला जात नसून मध्यस्थ अशा व्यक्तिगत संपर्कातूनच तो साधला जातो असा सिद्धांत यात प्रतिपादन करण्यात आला.

प्रत्येक समाजातील उच्चभ्रू अथवा तत्सम वर्गाचा त्यामुळे पगडा वाढला.

प्रत्यक्ष अल्पकालीन परिणामांपेक्षा अप्रत्यक्ष व दीर्घकालीन प्रभावाची चर्चा ही देखील एक पुढची पायरी गाठणारा विचारही मांडण्यात आला.

जनमाध्यमांच्या यंत्रणेच्या स्वरूपांवर भर देणारा व व्यक्तिगत संवादक व स्वीकारकांकडे फारसे लक्ष न पुरविणारा विचारही मांडला जाऊ लागला.

संवादविषयक सिद्धांतांनी सुरुवातीच्या काळातील हेतुनिष्ठ जनसंवादावर भर दिलेला होता.

पुढे संवाद ही संकल्पना दुतर्फा समजली जाऊन स्वीकारक हा महत्त्वाचा मानला गेला.

जनसंवादाच्या प्रभावापेक्षा उगमास महत्त्व प्राप्त झाले.

काही मूलभूत सिद्धांत

"कोण ?

काय ?

कोणत्या माध्यमाद्वारे ? कोणास ?

कोणत्या परिणामांसहित ? म्हणाला" या लॉस्वेलच्या 'सिंगल फ्रेज फार्म्युला' पद्धतीने–

कोण	काय	कोणत्या माध्यमाद्वारे	कोणास	किती परिणामकारकरित्या
संवादक	संदेश	माध्यम	स्वीकारक	प्रभाव/परिणाम

अशी घटकांची मांडणी करून बघितल्यास संपूर्ण संवादप्रक्रियेचा एका वाक्यात, तिच्या महत्त्वाच्या घटकांसहित परिचय घडविता येतो.

– संवादक
– संदेश
– माध्यम
– स्वीकारक
व
– परिणाम / प्रभाव

अशी या प्रक्रियेचे महत्त्वाच्या घटकांची भूमिका-संबद्धताही ध्यानात येण्यास मदत होते.

संकेतीकरणाची क्रिया या प्रक्रियेत संवादकाचे पातळीवर तर विसंकेतीकरणाची क्रिया स्वीकारकाचे पातळीवर गृहीत आहे. संवादक जेथे व्यक्तिशः संवाद प्रक्रियेत सहभागी असेल तेथे तोच प्रेषक, प्रेषण करणारा, तर जेथे संप्रेषणाकरिता यांत्रिक सामुग्रीची गरज भासते अशा जनसंवाद प्रक्रियेत संकेतीकरण हे संप्रेषकाचे पातळीवर गृहीत आहे.

लॉस्वेल हा मुळात अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ व त्याचे सिद्धांतन मुळातच राजकीय वातावरणातील संवादप्रक्रियेने प्रभावित असल्यास नवल नाही.

ब्रॅडडॉक या संवादशास्त्र्याने लॉस्वेलच्या या संकल्पनेत दोन अधिकच्या घटकांची भर सुचविली. त्याच्या मते कोणतीही संवादकृती–

– कोणत्या वातावरणात संदेशाचे संप्रेषण होत आहे.

व – कोणत्या हेतूकरता

या दोन बाबी संवाद प्रक्रियेपासून वेगळ्या करता येत नसल्याने या प्रक्रियेचाच त्या भाग आहेत.

या सिद्धांतात मुळातच हे गृहीत धरलेले आहे की प्रत्येक संदेश पाठविण्याचा व्यवहार करणारी व्यक्ती, संवादक, ही नेहमीच स्वीकारकावर प्रभाव पाडण्याच्या हेतूनेच ते करीत असते व त्यामुळे प्रत्येक संवादकृती ही प्रभावी संवाद साधण्याची कृती ठरते. तसेच प्रत्येकच संदेश (Message) हा परिणाम करीत असतो हे देखील लॉस्वेलने गृहीत धरलेले आहे.

लॉस्वेलच्या या संकल्पनेत स्वीकारकांकडून येणाऱ्या प्रतिसादाच्या घटकाचा समावेश नसल्याने हे प्रक्रियेचे परिपूर्ण संकल्पन मानण्यात येत नाही. मात्र संवादशास्त्रीय प्रक्रियेचे एवढे सुटसुटीत व सोप्या पद्धतीने आकलन करवून देणारे संकल्पन

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणून संवादशास्त्रात लॉस्वेलच्या या सूत्राचा वापर केला जातो.


शॅनन-विव्हर सूत्र

संवादशास्त्रीय अध्ययनात जवळ जवळ सर्व-मान्य असे स्वरूप लाभलेले व संवादप्रक्रियेचे म्हणून स्वीकारल्या गेलेले संकल्पन हे शॅनन-विव्हर यांचे आहे.

शॅनन या गणितज्ञाने १९५० च्या सुमारास बेल टेलिफोन लॅबोरेटरीतील आपल्या कार्याचा भाग म्हणून मांडलेल्या संकल्पनेतून हे सूत्र उदयाला आले आहे

संवादशास्त्रात पुढे झालेले प्रक्रियेसंबंधीचे चिंतन शॅनन-विव्हर संकल्पनेने फार मोठ्या प्रमाणावर प्रभावित झालेले आहे.

या संकल्पनेत संवाद ही एकतर्फी, सरळरेषेत चालणारी अशी प्रक्रिया संकल्पिली गेलेली आहे.



संप्रेषक व स्वीकारकाबद्दल श्रम-ऑसगूड काहीही सांगत नसले तरी त्यांचे कार्य मात्र या क्रियेतही सारखेच गृहीत आहे.

संवादप्रक्रिया ही कुठेतरी सुरू होऊन कुठेतरी संपते असे शॅनन यांच्या संकल्पनेतून प्रतीत होते व असे प्रतीत होण्याने दिशाभूल होते अशी टीका श्रम या जनसंवाद शास्त्रज्ञाने केलेली होती. त्याच्या मते ही अंतहीन प्रक्रिया आहे. आपण माहितीच्या या अंतहीन प्रवाहातील ही माहिती हाताळणारे व ती पुन: वळती करणारे छोटे छोटे 'स्विच बोर्डस्' तेवढे आहोत असे त्याचे म्हणणे होते. वरील आकृतीतून त्याने ते मांडलेले आहे.

माहितीचा स्त्रोत→ संदेश→ संप्रेषक→ चिन्ह □→ स्वीकारक→ (संदेश)→ स्वीकारस्थळ
↑
अडथळा

कोणत्याही माहितीच्या स्रोतापासून जाणारा संदेश अथवा त्यांचा प्रवाह संप्रेषकामार्फत संदेश-वहनाच्या माध्यमास अनुकूल अशा चिन्हामध्ये रूपांतरित होऊन स्वीकारकाकडे जात असतो. या संदेशवहनात विविध प्रकारचे अडथळे उद्भवू शकतात. ते नेमके कुठे व कशा प्रकारचे आहेत हे जाणून घेतल्यानेच दूर सारता येणेही शक्य होते. असे या संकल्पनेत विशद केल्या गेलेले आहे.

ऑसगुड-श्रम यांचे संकल्पन

शॅनन याचे संकल्पन एकतर्फी, सरळरेषेत चालणाऱ्या प्रक्रियेचे तर सी. ई. ऑसगुड व विल्बर श्रम यांचे संयुक्त संकल्पन हे वर्तुळाकारी प्रक्रियेचे आहे.

शॅननचे लक्ष प्रेषक व स्वीकारक यांच्या दरम्यान असणाऱ्या माध्यमांवर केंद्रित होते तर ऑसगुड-श्रम यांनी संवादप्रक्रियेतील मानवी वर्तनावर अधिक भर दिलेला आहे. त्यांचे संकल्पन असे—

डी फ्लेऊर यांची भर

डी फ्लेऊर या अभ्यासकाने शॅनन-विव्हर यांच्या संकल्पनेचा विस्तार करून, निर्मित संदेश व स्वीकृत संदेश यांच्या अर्थातील फरकावर, संबंधांवर अधिक भर दिला.

त्याच्या मते संवादप्रक्रियेत 'अर्थ' संदेशांमधे रूपांतरित होतो व संप्रेषक या संदेशाचे माहितीत रुपांतर करतो. स्वीकारक या माहितीचे पुनः संदेश स्वरूपात विसंकेतीकरण करतो व स्वीकारस्थानी त्यांचे पुन: 'अर्थात' रूपांतरण होते.

या दोन्ही ठिकाणचा, प्रेषकस्थानच्या व स्वीकृतीच्या स्थानकावरचा अर्थ परस्पर संबद्ध असल्यास त्याचा परिणाम म्हणजे संवाद होय. मात्र ही संबद्धता फारच कमी वेळा परिपूर्ण आढळते असे तो म्हणतो.

डी फ्लेऊरने शॅनन-विव्हर यांच्या संकल्पनेत मूळ स्रोताकडे परत येणाऱ्या स्वीकारकाच्या 'प्रति-

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साद' या घटकाची भर घालून त्यामुळे प्रेषकास अधिक सुसंगत व प्रभावी पद्धतीने संवाद साधण्याची शक्यता असणाऱ्या संकल्पनेची भर घातली.

विल्बर श्रमचे जनसंवाद प्रक्रियेचे संकल्पन

जनमाध्यमांच्या संदर्भातील जनसंवाद प्रक्रियेच्या आकलनार्थ उपयोगी पडणारे असे संकल्पन विल्बर श्रमच्या सूत्रातून गवसलेले आहे. येथे श्रमच्या विचाराचा गाभा हा माध्यमयंत्रणा हा आहे.

वृत्तपत्राकडे कितीतरी प्रकारची माहिती, वृत्त इ. रोज येत असते. त्यातील वाचकांपर्यंत काय पोहचवायचे या बाबतचे निर्णय, मजकूर वाचून व त्याचे त्या त्या वृत्तपत्राच्या संदर्भात मूल्यमापन करूनच घेतले जातात. या पद्धतीत मजकुरातील सुधारणा, पुनर्लेखन, किंवा नकार हे या माध्यम यंत्रणेतील काम करणाऱ्यांनी करावयाचे काम आहे. हीच स्थिती सर्वच जनमाध्यमांचे बाबत असते.

जनमाध्यमांतील संदेशांचा स्वीकारक असणारा वाचक, श्रोता अथवा प्रेषक हा एकएकटा ते स्वीकारत असला तरी या संवादातील संदेश हा सर्वसाधारण समूह मनाला उद्देशून निर्मित केलेला असतो व जनमाध्यमातील संदेशांचा परिणाम देखील एखाद्या व्यक्तीमार्फत त्याच्या भोवतीच्या लोकांवर या पद्धतीने होत असतो.

या संकल्पनेत मुख्यत: विसंकेतीकरण, विश्लेषण, संकेतीकरण, या प्रक्रियेन्तर्गत वारंवार होणाऱ्या क्रिया–प्रक्रियांकडे, त्या प्रक्रियांच्या गुंतागुंतीकडे फारसे लक्ष पुरविण्यात आलेले नाही. मात्र सर्वसाधारण संवाद प्रक्रियेच्या संकल्पनापासून जनसंवादाच्या प्रक्रियेकडे व जनसंवाद हा समाजाचा एकात्म भाग असल्याच्या सैद्धांतिक चिंतनाकडे श्रमच्या संकल्पनेमुळे वाटचाल सुरू झाली होती.

रिले अँड रिले यांचे संकल्पन

आजूबाजूच्या सामाजिक वातावरणाची संवाद-प्रक्रियेत घटक म्हणून दखल घेण्याची गरज न मानलेल्या संवाद प्रक्रियेच्या परंपरागत विचारांच्या पलीकडे जॉन रिले आणि मॅथिल्डा रिले यांनी 'मास कम्युनिकेशन अँड द सोशल सिस्टिम्' या त्यांच्या लेखातून (१९५९) मांडलेले संकल्पन हे जनसंवादप्रक्रियेचा विचार इतर सामाजिक यंत्रणांप्रमाणेच एक सामाजिक यंत्रणा म्हणून करते. संवादप्रक्रियेच्या पारंपारिक विचारात जनमाध्यमांतील संदेश (माहिती, विचार, कल्पना इ.) व्यवहार ज्यांना उद्देशून चालतो त्या 'व्यक्तीं'ची अंतर्गत मानसिक प्रक्रिया दुर्लक्षून चालणारा हा व्यवहार असल्याने त्यातील संवाद-प्रक्रियेत मानसशास्त्रीय प्रक्रियांना स्थानच प्राप्त झालेले नव्हते.

रिले अँड रिले यांनी संवादप्रक्रियेत असणारे माणसांचे प्राथमिक स्वरुपाचे समूह व संदर्भ स्वरुपाचे समूह असे वर्गीकरण करून त्यांची या प्रक्रियेतील भूमिका प्रथमच विशद केली.

परस्परांच्या घनिष्ठ संबंधात असलेले कुटुंबा-सारखे इतरही मानवी समूह प्राथमिक समूह मानलेले आहेत. संदर्भ समूह म्हणजे ज्या आधारे व्यक्ती आपल्या वृत्ती, मूल्य व वर्तन घेतते अशा मानवी समूहाचे मार्गदर्शनपर असणारे अस्तित्व. व्यक्ती अशा समूहाची प्रत्यक्ष घटकच असावयास हवी किंवा असते असे नव्हे तर त्या समूहाचे निकष मार्गदर्शनपर म्हणून वापरीत जाते.

संवादप्रक्रियेअंतर्गत प्रेषक व स्वीकारक हे आपआपल्या समाजव्यवस्थेअंतर्गत अशा प्राथमिक समूहाचे घटक असल्याने व्यक्ती ही त्या समूहाची व समाज व्यवस्थेचीही भाग असते. वेगवेगळे प्राथमिक समूह विशिष्ट समाज-व्यवस्थेन्तर्गत एकमेकांवर परिणाम साधत असतात. तसेच त्यांचेवर, ज्या समाजव्यवस्थेत ते वावरतात त्यांचाही परिणाम होत असतोच. याचा त्या समूहांतर्गत व्यक्तीवरही प्रत्यक्ष परिणाम पडतोच. यात राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, कामगार संघटना असे काही व्यवहार ठरविणारे व मार्ग-दर्शनपर ठरणारे उपसमूहदेखील समाविष्ट असतात.

मानसशास्त्रीय घटकांचा जनमाध्यमांच्या संबंधातील व्यक्ती व समूहावरील प्रभावाचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महत्त्व प्रथमच विशद करणाऱ्या रिलेच्या या विचारांना जनसंवादशास्त्रात फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

सामाजिक वातावरण प्रभावित करणारी व सामाजिक वातावरणाने प्रभावित होणारी अशी प्रक्रिया म्हणून जनसंवाद प्रक्रियेकडे बघण्याची दृष्टी या विचारांनी प्रगत केली.

मॅलेत्झ्की : वेगळा विचार

मॅलेत्झ्की (१९६३) या जर्मन अभ्यासकाने अधिकच वेगळा विचार मांडलेला आहे.

संवादप्रक्रियेच्या पारंपारिक सर्वमान्य अशा घटकातील 'माध्यम' व 'स्वीकारक' यां घटकांच्यामधे दोन महत्त्वाचे अधिकचे घटक त्याने कल्पिलेले आहेत.

माध्यमांच्या संदर्भातील निर्बंध व माध्यम संदेश स्वीकारकाची माध्यमाबाबतची प्रतिमा हे ते दोन महत्त्वाचे घटक होत.

या व्यतिरिक्त काही इतर घटकही या प्रक्रियेवर प्रभाव पाडतात, ते असे–

– स्वीकारकाची स्वतःबद्दलची स्वतःची प्रतिमा. मत

– स्वीकारकांचे व्यक्तिमत्व

– स्वीकारकांचे सामाजिक संदर्भ.

जनमाध्यमांशी निगडीत असणाऱ्या जनसंवाद प्रक्रियेच्या विविध घटकांचे सामाजिक–मानस शास्त्रीय असे अत्यंत सूक्ष्म अध्ययन मॅलेत्झ्कीने केलेले असून आजच्या माध्यमयुगात ते मुळापासूनच जाणून घेणे फारच आवश्यक झालेले आहे.

जनमाध्यमांच्या परिणामांबाबत, प्रभावाबाबतच अधिक कर्तव्य असणाऱ्यांकरिता 'स्टिम्युलस–रिस्पॉन्स' सिद्धांत फार महत्त्वाचा ठरतो. या सिद्धांताप्रमाणे परिणाम म्हणजे ठराविक चेतकांना लाभलेल्या ठराविक प्रतिक्रिया होत.

डी फ्लेऊरने यात काही सुधारणा सूचवून, व्यक्तीच्या अंतर्गत मानसिक संघटनेत, रचनेत ईप्सित बदल घडवून आणणे यातच पुढे हवे ते परिणाम प्राप्त करण्याचे रहस्य दडलेले असल्याचे सांगितले.

इतर महत्त्वाचे सिद्धांत

दूरदर्शनचा व्यक्तींच्या वर्तनावर होणाऱ्या परिणामांबाबतचा कॉमस्टाकचा सिद्धांत, कॉट्स व लाझर्सफेल्ड यांचा जनमाध्यमांच्या व्यक्तींवरील परिणामांबाबतचा 'टू स्टेप फ्लो' सिद्धांत, रॉजर्स व शूमेकर यांचा 'इनोव्हेशन–डिफ्युजन' सिद्धांत; केनेडी खूनाच्या वृत्त प्रसारणाच्या अध्ययनातून उगम पावलेला ग्रीनबर्गचा वृत्त प्रसारणाचा 'जे–कर्व्ह' सिद्धांत, हे इतर महत्त्वाचे सिद्धांत जनमाध्यमांचा व्यक्तींवरील परिणाम, संदेशांचे प्रसारण व व्यक्तिगत प्रभाव आणि जनमाध्यमे या संदर्भातील मूलभूत महत्त्वाचे अध्ययन–संशोधनाधारित निष्कर्ष मांडतात.

तर जनसंवादाचे अप्रत्यक्ष व दूरगामी असे सांस्कृतिक–सामाजिक परिणाम मॅकडोंब्स व डोनाल्ड शॉ यांचा 'अजेंडा सेटिंग', बॉल–राकिएच व डी फ्लेऊर यांचे 'डिपेंडंसी मॉडेल', नोबॅक, यनवर्ग यांचा 'इनफर्मेशन गॅप' या सिद्धांतांनी विशद् केलेले आहेत.

माध्यमांच्या प्रेक्षक, वाचक, श्रोत्यांच्या बाजूचे अध्ययन करून बरेच महत्त्वाचे निष्कर्ष उपलब्ध झालेले आहेत.

माध्यमांचे उपयोग, उपयुक्तता व संतोषदायित्व यावर होस्ट, हरझोग, शूचमन, बेटेलसन यांनी फार मोलाचे संशोधन केलेले असून येझेनग्रेन याने देखील या संदर्भात महत्त्वाचे कार्य केलेले आहे.

जनमाध्यमांचे उपयोग व परिणाम या संबंधात विंड्‌दाहल यांचे संकल्पन तर माहिती प्राप्ती, त्यावरील बंधने व संस्कार या संबंधांतील डोनोह्यू व टिपटन यांचे संकल्पन महत्त्वाचे मानले जाते.

जनमाध्यम यंत्रणांच्या संबंधातील डी फ्लेऊर यांचे अमेरिकन जनमाध्यम यंत्रणा सिद्धांतन, बर्नस्‌चे प्रेषक–स्वीकारक संबंधाबाबतचे चिंतन; गिएबर व जॉनसन यांचे माहितीचा स्रोत व वार्ताहर यांच्या संबंधांबाबतचे संकल्पन, व्हाईटचा 'गेटकीपर' सिद्धांत, मॅकनेल्लीचा 'वृत्त प्रवाह'चा सिद्धांत, बासचे 'अंतर्गत वृत्त प्रवाहाच्या दुहेरी कार्याचा' सिद्धांत व गॉलटंग व रुज यांचा 'सिलेक्टीव्ह गेटकीपिंग' सिद्धांत ही गेल्या दशकापर्यंतची जनसंवाद प्रक्रिया संबंधातील

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संवादशास्त्राचा सैद्धांतिक संकल्पनांचा विकास दर्शविणारी चिंतने असून बदलत्या माध्यमतंत्रज्ञानासोबतच माध्यमविषयक सिद्धांतातही नवनवी भर पडत आहे.

प्रस्तुत लेखकाच्या मते संवादप्रक्रियेच्या चिंतनाच्या विचाराची व त्याच्या विकासाची प्रगती ही जनसंवादाकडून मूळ संवादप्रक्रियेकडे अशी होत आलेली आहे. माध्यमाचे विकसित होत गेलेल्या तंत्रज्ञानाचा त्याच्या मूलतः माध्यमाच्या राजकीय, सामाजिक, व्यावसायिक हेतूंनी करावयाच्या प्रभावी वापराकरिता; अशा वापरातून उद्‌भवणाऱ्या परिणामांच्या अध्ययनाकरिता, त्या अध्ययनावर आधारित असे उपयोजन साधण्याकरिता व ते अधिकाधिक प्रभावी करण्याकरिता झालेल्या प्रयत्नातून संवादशास्त्रातील 'संशोधन' जन्माला आलेले असून त्यामुळेच ते किती 'शुद्ध' (Pure Research) आहे या बाबतचे बरेच वाद–प्रवाद उद्‌भवून गेलेले आहेत.

संवादाचे आधुनिक तंत्रज्ञान व ते उपयोजिणाऱ्या संवाद व माध्यम यंत्रणा हे पाश्चात्य राष्ट्रात जन्मास येऊन जगभर त्याचा प्रसार, वितरण व स्वीकार झाल्याने त्या सोबतच संवादाचे, जनसंवादाचे पाश्चात्य तत्त्वज्ञान, सिद्धांत व त्यायोगे मूलभूत असे या संबंधातील तात्विक बोधनही जगभर सर्वमान्य असे सैद्धांतिक संकल्पन म्हणून स्वीकारल्या गेले.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी राजकीय स्वातंत्र्य प्राप्त केलेल्या नव स्वतंत्र अशा समाजातील संवाद, जनसंवाद व्यवहारानुसार माध्यमतंत्रज्ञानाचे संशोधित उपयोजन, वापर होण्याऐवजी जनसंवादाच्या उपलब्ध झालेल्या नवतंत्रसामुग्रीनुसार संवाद व जनसंवादव्यवहारास आकार येऊ दिल्या गेलेला आहे. परिणामी उपस्थित सर्वच स्वरूपाच्या समस्यांवरील तोडगा देखील त्या त्या समाजातील गरज जाणून, त्या परिस्थितीतून उद्‌भवण्याऐवजी या संवाद–जनसंवाद व्यवहाराने निर्मिलेल्या व त्या त्या समाजातील प्रत्यक्षतेशी, वास्तवाशी नाळ जुळलेली नसणाऱ्या 'भ्रामक' परिस्थितीतून जन्म घेऊ लागला आहे. सर्वांनाच अनाकलनीय वाटणाऱ्या सामाजिक–सांस्कृतिक प्रश्नांचे स्वरूप मुळात या संवाद–जनसंवाद व्यवहाराने आकारास आणलेले आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे.

या प्रकारचे हे संवाद माध्यम व जनसंवादविषयक 'भान' मात्र नुकतेच कुठे या समाजांना येऊ लागलेले आहे.

आधुनिक काळात पौर्वात्यात संवाद, जनसंवाद, विचारविषयक मूलभूत स्वरूपाचे चिंतन झालेले नसले तरीही संवाद, जनसंवादविषयक चिंतनच पौर्वात्य तत्त्वज्ञानात उपलब्ध नव्हते असे नव्हे. संवादाचे तंत्रज्ञान म्हणजे देखील केवळ आधुनिक तंत्रज्ञानच तेवढे नव्हे हेही लक्षात घेतले पाहिजे. वसुधैव कुटुंबकम ही पौर्वात्यांची केवळ पोकळ सांस्कृतिक घोषणा अथवा राजकीय साम्राज्यवाद नसून ते मुळातच संवाद–जनसंवादाचे अंतिम सामाजिक–सांस्कृतिक उद्दिष्ट होते. व्यक्तिगत व सामूहिक जीवनाची तात्विक वैचारिक बांधणी ही अंमलबजावणीच्या पातळीवर त्या उद्दिष्टानुरूप करण्यात यावी अशी अपेक्षा होती.

मार्शल मॅकलुहन या जगविख्यात माध्यम शास्त्रज्ञाने आधुनिक 'इलेक्ट्रॉनिक' संपर्क माध्यमांच्या परिणामांमुळे जग हे एक 'वैश्विक खेडे' होण्याइतपत परस्परांच्या जवळ आपण आलेलो असल्याचा मांडलेला सिद्धांत हा केवळ तंत्रशास्त्रीय उत्क्रांतीनंतरचे त्याचे 'भावन', 'बोधन' आहे. त्याला पूरक अशा, जीवनाच्या सर्वच क्षेत्रास आकार देऊ इच्छिणाऱ्या तत्वविचाराची प्रेरणा मॅकलुहनच्या सिद्धांताच्या मुळाशी नाही.

पौर्वात्य संवाद; जनसंवाद, माध्यम व माहितीविषयक तत्त्वचिंतन हे मुळातच सर्व परस्परसंबद्ध घटकांचा विचार न वगळणारे असे, ज्याला जे. कृष्णमूर्ती wholistic (समग्र) म्हणतात अशा स्वरूपाचे तत्त्वचिंतन आहे.

आंतरसांस्कृतिक संवादशास्त्रावरील ताज्या पाश्चात्य संशोधनांनी देखील पौर्वात्यांच्या या समग्र विचारकारिकतेच्या बाबींवर बरेच संशोधन केलेले असून त्यामुळेच पौर्वात्यांची 'संवादशक्ती' व 'संवादक्षमता' ही अधिक प्रगत, उन्नत व 'वाजवी' असल्याचे नमूद केलेले आहे.

■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फाटलेल्या शहराच्या पाच कविता

१

फाटलेल्या शहराच्या सीमारेषा
आक्रोश करीत असतात
माणसं जाळणाऱ्यांचे हिशेब मांडण्यासाठी
पुढं पुढं सरकत जाणारा दरेक जत्था
आता त्यांच्या परिचयाचा झाला आहे
रेषेच्या बिंदुबिंदूत
मुरलेला आहे रक्त थेंब
मेंदुमेंदूचं नातं जोडणाऱ्या गर्भाचा
विचारांचे गर्भपात झालेल्या
दरेक हुंदक्यांचे शिलालेख
आणि सीमारेषांचे संवाद
फाटलेल्या शहाराच्या मुक्तिगाथा गातात
तेव्हा प्रत्येक आक्रोशाचं झालेलं असतं
एक महाकाव्य
भडभडत्या शब्दांचं / झिरपत्या जखमांचं.

२

फाटलेलं हे शहर
आता पुन्हा फाटण्याच्या लायकीचं
राहिलेलं नाही
शहराच्या गल्लीगल्लीतले अवशेष
आपण नाही ठेवणार जपून
एखाद्या म्युझियममध्ये
इथला प्रत्येक माणूस सुखावत असतो.
ताजी मरणयात्रा पाहून
वांझोट्या उत्सवप्रियतेची नखरेल गीतं
गाडली गेलीत
पान खाऊन थुंकलेल्या मातीआड
फाटलेल्या शहराची माती न् माती
झाली आहे कबर, दिवा नसलेली
आणि आमचं सूर्याच स्वप्न
अधिक प्रखर झालेल.

३

ह्या शहरात पाय ठेवण्यापूर्वी
मन कधी झंकारलं नाही
आनंदानं हुंकारलं नाही
हे शहर मागच्या शहरासारखं नसेल
हा प्रचंड आत्मविश्वास
आत्मघातकी निघाला
कुठल्या शहरावर ठेवावा विश्वास !
शहरातल्या पावला पावलांवरचे सुरुंग
खरंच साले इमानदार निघालेत
त्यांच्या प्रत्येक स्फोटानं
दिला जन्म नकाराला
निकराच्या नकाराला
दोस्तांच्या पत्रांवरचाही
उडून गेला विश्वास
त्यांचंही शहर असं नसेल कशावरून ?

४

हे शहर कुणाचंच नाही
हे शहर स्वतःचंही नाही
शहराच्या चौकाचौकातले सिग्नल्स
गंजलेले
रक्ताचे थर साचलेले
दरेक आर्त रात्र
वळवळत सुटते
तिसऱ्या प्रहरापासून
पुढल्या पहिल्या प्रहराकडे
तेव्हाची पहाट
सोबत सूर्य घेऊन येईल की नाहीची
जखम दिली या शहरानं
माणसानं मारलं शहराला
की शहरानं माणसाला
हा प्रश्न आता निरर्थक आहे
शहरही फाटलेले / मेलेले
माणूसही फाटलेला / मेलेला
एवढं मात्र खरं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

५

या काहीबाही घरांच्या समूहाला
शहर म्हणतांना
कहर उठतो पेशीपेशीत
नि वाटतं
आपण सूर्यावर वस्ती करुया
तुकडे तुकडे झालेलं हे शहर
कोणत्या विचारानं शिवायचं ?
या शहराची कातडीच
दाद देईनाशी झाली आहे
आता हे शहर
बेचिराख होणं क्रमप्राप्त झालं आहे
आपण तर जाणार आहोत
सूर्यावर वस्तीला !

सिद्धार्थ मेश्राम

अलगुज

अंधाराचा उंबरठा ओलांडून
मी पुन्हा प्रकाशात आलो आहे
पंचावन्न वसंतांचे पराग ओंजळीत घेऊन
मी पुन्हा एकदा आलो आहे.
चिंता भय कंटाळा संशय निराशा
ह्यांची विटलेली वाकळ झुगारून
मी पुन्हा किरणात नाहत आहे
अष्टदळ कमळे रवतात फुलवीत
पुन्हा प्रकाशाचे गीत माझ्या ओठांवर आहे
चूरचुर झालेली सर्व सुंदर स्वप्ने पचवून मी
पुन्हा एकदा अनंताच्या यात्रेला निघालो आहे
मी आज सूर्याचे अलगुज वाजविणार आहे

मनोहर चिंतामणि वझे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तू सावध रहा

थांबा दिसले की थांबतो
चला पाहून चालतो
आखलेल्या पट्ट्यामधूनच पांढऱ्या,
रस्ता ओलांडतो
नियंत्रणात वाहतुकीच्या आम्ही
आमची चाल बसवलेली
सावळलेले वाजत नाही
की अंधत्वावर प्रकाश पडत नाही
रहदारी डावी-उजवी चालू असते
हॉटेलात
काटेरी चमच्यांनी गरम दोसा खातांना
रबरी जीभ नसते सर्व्ह केलेली
चटकारोधक
म्हणून आम्ही खिन्न होतो
शर्टाचे माप देताना मात्र
अनंत उपकार मानतो तुझे हे ईश्वरा
अंगावरील कातडीचा शर्ट शिवून वाहिला
तरी फिटणार नाहीत इतके
कारण तू आम्हाला हात दिले
अन्यथा आम्ही बाहीत काय घातले असते ?

●

इथे नवख्यांना चुकल्याचुकल्यासारखे
वाटेल कदाचित
मात्र आम्हाला आता सवय झाली आहे.
आम्ही रांग मोडत नाही की
शरीराचा कोणताही भाग खिडकीबाहेर
काढत नाही
आम्ही आमच्या फ्रिज मधे दक्ष असतो.
सखे, ओळखीची सखी पाहून
तू नक्कीच तिला साद घालशील,
आधाशी गावरान
आणि ही बधीर चेहऱ्याची माणसे
तुला हसतील
किंचीत अगदी किंचीत नियमबद्ध
तंतोतंत सुताच्या हालचालीतून
ओठांच्या उपहासात्मक
वतसले ! तू सावध रहा

तसा रस्त्याचा महिमा अगाध आहे

ह्याला स्वप्न पडत
पंख फुटल्याची
उंच उडाल्याची
सूर्य गिळल्याची.
ह्याने स्कॉलर्स, ज्या वाटेला जात नाहीत
कटाक्षाने कधी
त्या वाटेशी छेडखानी केली.

ज्यांच्या डोळ्यासमोर केवळ
चमकत असतो टॉपरूमचा कंदिल
त्यांचा मनोरथ भिंतींच्या झापडीत
पायरी पायरीने चढत जातो जिना
मग प्रश्नच कुठे येतो
भिंती पल्याड अफाट दृष्याने
चमकून उठण्याचा ?

मात्र हा झापडीतच आला नाही
कधी रस्त्याच्या
हा थुंकला येथील स्मारकावर भर चौकात
ह्याने झिडकारले येथील सर्व
चिकने चोपडें कॉंक्रीट रस्ते
ह्याने जवळ केलेत काटे आणि
हा फुलत गेला आपल्याच तंद्रीत

तसा रस्त्याचा महिमा अगाध आहे
लोक रस्त्याची चलती पाहून रस्त्यावर येतात.
आणि सनसनाटी वाटा गमावून
बसतात बिचारे.

श्रीधर पांडे
भोसला वेदशाळेमागे
महाल, नागपूर-४४०००२

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिवाळी अंकांच्या दुनियेत

सौ. शोभा अरुण उवगडे

दिवाळी अंक हे मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे एक वैशिष्ट्यच आहे. शेकडोंनी निघणाऱ्या दिवाळी अंकापैकी विदर्भ साहित्य संघाकडे आपले दिवाळी अंक दरवर्षीच अनेक प्रकाशक पाठवीत असतात. यंदापासून अशा प्राप्त झालेल्या दिवाळी अंकांच्या संबंधाने माहितीवजा टिपण प्रकाशित करून युगवाणीच्या वाचकांना या प्राप्त होणाऱ्या अंकाबाबतची माहिती उपलब्ध करून देण्याचे ठरवीत आहोत. त्या दृष्टीने १९८९ च्या प्राप्त अंकांवरील हे माहितीवजा टिपण प्रकाशित करीत आहोत.

/ श्रीवत्स /

दिवाळी अंकाच्या दुनियेत १९८८ यावर्षी आपल्या प्रथम पदार्पणातच सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाची दोन दोन प्रथम पारितोषिके पटकाविणाऱ्या 'श्रीवत्स'बद्दलच्या वाचकांच्या असलेल्या अपेक्षा उंचावलेल्या होत्या. त्यामुळे दिवाळी अंकांचा गठ्ठा हाती येताच प्रथम उत्सुकता होती ती श्रीवत्स बघण्याची. अंक हाती आला आणि अपेक्षा-पूर्तीचे समाधान लाभले. एका दृष्टिक्षेपातच या वर्षी देखील गेल्या वर्षीच्या पावला-वर पाऊल टाकणारी 'श्रीवत्स'ची समृद्धी नजरेत भरली. चरित्रात्मक लेख, वैचारिक लेख, ललितलेख, परिसंवाद, मुलाखत, एकांकिका, कथा, कविता; बाल–साहित्य इ. साहित्याच्या समग्र अंगांनी मोहरलेल्या श्रीवत्सचे स्वरूप यंदा देखील गेल्या वर्षाप्रमाणेच देखणे आहे. नामवंतांच्या लिखाणाची मेजवानी दिवाळीच्या आनंदात यंदाही भर घालणारीच आहे.

स्वकर्तृत्वाने समाजात आपले वैशिष्टयपूर्ण स्थान प्रस्थापित करणाऱ्या विविध क्षेत्रातील तीर्थरूपांच्या व्यक्तिमत्व परिचयासह त्या काळच्या राजकीय, सामाजिक, साहित्यिक, औद्योगिक परिस्थिती आणि त्याचे सामाजिकाच्या व्यक्तिमत्वावर घडणारे परिणाम आदीचा आलेख वाचकासमोर मांडला गेला आहे.

विशेषतः ना. ग. गोरे यांच्या लिखाणातील जाणतेपणाचा आदर्श आजच्या 'जनरेशन-गॅप'च्या दडपणाने धास्तावलेल्या तीर्थरूपांना अधिकच पथप्रदर्शक वाटावा.

डॉ. ना. य. डोळे, माधव मनोहर, डॉ. द. भि. कुळकर्णी. डॉ. यशवंत मनोहर, यदुनाथ थत्ते, डॉ. लीना मोहाडीकर, डॉ. सौ. उषा गडकरी; मा. गो. वैद्य, दिलीप देवधर इ. यांचे लेख श्रीवत्सचे यंदाचे बलस्थान. गुरुवर्य डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा 'महाकवीची कादंबरी, काळ पाणी' व डॉ. सौ. उषा गडकरी यांचा 'भारतीय तत्वज्ञान आणि अस्तित्ववाद' हे दोन्ही लेख अभ्यासकांना मार्गदर्शक आहेत. अस्तित्ववादाची संकल्पना स्पष्ट होण्यास डॉ. उषाताई गडकरी यांचा लेख सहायक ठरेल.

डॉ. वि. भि. कोलते यांचा 'हीरक महोत्सव आणि सुरादेवी' हा आगळा ललित लेख, वसुंधरा पटवर्धन यांच्या सायंकाळच्या गमती विचार-प्रवृत्त करणाऱ्या हृदयस्पर्शी गमती व व्यंकटेश माडगूळकर, रवींद्र पिंगे, डॉ. अनिल महाबळ यांचे उद्बोधक ललित लेख यात आहेत. तर आपल्या राष्ट्रीय नेतृत्वाची झालेली पडझड, भारतासारख्या प्रचंड देशाचा कारभार करायला आवश्यक समर्थ नेतृत्व, त्या नेतृत्वाला आवश्यक असणारे पैलू, घराणेशाही, सरंजाम-शाहीने राष्ट्राला पोहोचलेली हानी या सर्वांचा मार्मिक परामर्श घेऊन रा. कृ. पाटील, ठाकुरदास बंग, ए. बी. बर्धन व डॉ. भा. ल. भोळे आदी समाजधुरिणांनी या अंकातील परिसंवादाची रंगत वाढविली आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. महेश एलकुंचवार यांची प्रदीर्घ मुलाखत रोचक झाली आहे. त्यांच्या मनमोकळ्या मुलाखतीतून त्यांच्या लेखनामागील विचारसरणी स्पष्ट झाली आहे.

नवोदित कवी व कथाकारांसाठी श्रीवत्सने आयोजिलेल्या पु. भा. भावे, प्र. शा. मांजरेकर पुरस्कार प्राप्त कथा आणि कविवर्य 'अनिल' व कविवर्य उ. रा. गिरी पारितोषिक प्राप्त कथा–कविताही लक्षणीय आहेत.

या अंकातील कथाप्रांत तर नामवंतांच्या लेखणीने बहरलेला आहे. 'प्युअर मराठीच्या शोधात शास्त्रीबोवा' ही अरुण साधु यांची कथा मनोरंजनाबरोबरच आजच्या वास्तवावर प्रकाश टाकणारी आहे. यशवंत कवींच्या श्रीवत्समधील कविता आस्वाद्य आहेत, कवी कुसुमाग्रजांची 'पराक्रम', विठ्ठल वाघांची 'माय'; नारायण कुलकर्णी कवठेकर यांची 'दिवे', श्रीपाद भालचंद्र जोशी यांची 'आपले हृदय, आपल्या पंखांसाठी जळते' ह्या कविता विशेष लक्षात राहतात. सुशीला पगारियांची 'प्रभा अत्रे' ही कविता प्रभा अत्रेंच्या स्वरांप्रमाणेच दाद घेऊन जाते.

श्रीवत्सने यंदा बालरसिकांचेही मनोरंजन केलेले आहे. राजा मंगळवेढेकरांचा 'ससुल्या' बालरसिकांना आवडेल असाच आहे. नाकपुडीएवढ्या राज्यातील चिमटीएवढी माणसे छोट्यांना चेंगटपुरीत रमविणारी आहेत.

मनोहर सप्रे, प्रभाकर ठोकळ, रवींद्र बाळापुरे व एस्. एन्. मुलाणी यांच्या व्यंगचित्रांनी व सुभाष अवचट यांच्या सुंदर मुखपृष्ठाने अंकाची खुमारी वाढविली आहे.

/ योगराज /

२१ व्या शतकाकडे धाव घेणाऱ्या गतीशील मानवाची मन:शांती खरोखरच विस्कटत चालल्याचा प्रत्यय प्रकर्षाने येत असताना मानवाच्या जीवनातील योगाचे महत्त्व विशद करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'योगराज' करीत आहे. गतिमान जीवनात शरीर संपदा, मनःस्वास्थ्य कसे राखावे, शरीराला पोषक–पूरक अन्नसेवन कशाप्रकारचे असावे याबद्दल सामान्य माणसाला सतर्क करण्यास 'योगराज'चा दिवाळी अंक समर्थ आहे.

वासुदेव चोरघडे यांच्या 'व्यापकाशी नाते' या लेखातील उद्बोधन सुखाच्या हव्यासापोटी रात्रंदिवस धावपळ करणाऱ्या माणसाला दिशा दाखविणारे आहे. डॉ. भैय्यासाहेब निम्बकर, यांचा 'आपणालाही शतायुषी होता येईल !' हा लेख मननीय आहे. श्री. सदाशिव निंबाळकर यांचा 'नवीन शैक्षणिक आकृतिबंधातील योग प्रवेश' हा लेख मार्गदर्शक आहे. परंतु पाठ्यक्रमाव्यतिरिक्त विषय जेव्हा लादले जातात तेव्हा अनेक योजनांची काय दुर्दशा होते ते सांगणे नलगे ! त्यापेक्षा परमपूज्य जनार्दन स्वामींचा वसा घेऊन कार्य केल्यास योग समाजात अधिक चांगल्या प्रकारे दृढमूल होऊ शकेल असे वाटते.

योगाच्या माध्यमातून आदर्श नागरिक निर्माण होऊ शकतील असा विश्वास असणाऱ्या 'योगराज' चा दिवाळी अंक लक्षणीय असून प्रशस्तीपात्र आहे.

/ प्रज्वलंत /

प्रतिवर्षाप्रमाणेच यंदाचाही 'प्रज्वलंत'चा दिवाळी अंक तोला–मोलाचा आहे. कथा, दीर्घकथा, मुलाखत, एकांकिका, विचार–परिप्लुत विशेष लेख, ग्रंथपरीक्षणासह अन्य विविध लेखनाने समृद्ध असा प्रज्वलंतचा दिवाळी अंक आहे, विक्रम सावरकरांचे संपादकीय नेहमीच्याच आक्रमक पद्धतीने लिहिलेले आहे. मुखपृष्ठ स्वा. सावरकरांच्या प्रेरणेला पोषक असेच आहे.

विशेष लेखांमध्ये डॉ. वि. स. जोग यांचा 'पु. भा. भावे : एक आकलन' हा लेख व्यासंगपूर्ण असून भाव्यांच्या अभ्यासकांना उत्तम मार्गदर्शन करणारा आहे.

माधुरी आठवले यांची 'गोंदण' ही दीर्घकथा, 'वासनाकांडाचे बळी' ही जयंत रानडे यांची अपराधकथा उल्लेखनीय. विशेषत्वाने नजरेत भरते ती गिरीश दावके यांनी लिहिलेली जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेची रूपांतरित एकांकिका 'विदुषक'. जी. ए. च्या कथा सामान्यांपर्यंत पोहचविण्यास नाटकाचे माध्यम निश्चितच सक्षम ठरेल असा विश्वास वाटतो. आनंदोल्लासाबरोबरच

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राष्ट्रनिष्ठेची जाणीव जागृत ठेवणारा असा हा अंक झालेला आहे.

/ अक्षरवैदर्भी /

आनंद अभंग यांच्या कलात्मक मुखपृष्ठाने नटलेला अक्षरवैदर्भीचा दिवाळी अंक अंतरंगीही शब्दसौष्ठवाने बहरलेला आहे. वर्षा रेगे यांची 'निर्धार' आणि शैलजा काळे यांची 'दुबळे प्रेम' या दोन्ही कथा स्त्रीमनाचे पापुद्रे उलगडणाऱ्या वाचकप्रिय कथांसह आनंद पाटील, भास्कर चंदनशिव, शंकर इनामदार, अशोक मस्के, वसंत चिंचाळकर यांच्या कथांनी रंगत वाढविली आहे.

ज्ञानेश्वर सप्तशताब्दीच्या पर्वावर लिहिलेला 'ज्ञानेश्वरीतील जनजागर' हा डॉ. उषाताई देशमुखांचा लेख मननीय आहे. डॉ. भास्कर भोळे, प्रा. गर्गे, डॉ. सदा कऱ्हाडे, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. जयंतकुमार बंड, प्रा. वसंत आबाजी डहाके आदींचे लेखही विद्वत्ताप्रचुर आहेत.

लोकगीत आणि नाट्याच्या सुंदर मिश्रणातून साकारलेली 'आमी लेकी कष्टकऱ्यांच्या' ही बोराडे यांची संगीत नाटिका कष्टकऱ्यांच्या लेकींची कथा-व्यथा सहजगत्या अभिव्यक्त करते.

'आमी मनाच्या मुखत्यार...
आमी कोयत्याची धार !' हा त्या लेकींचा निर्धार जागृतीची साक्ष पटविणारा आहे. वैदर्भीय लेखक-लेखिकांच्या 'अक्षर वाङ्मयाने' अक्षर वैदर्भीचा दिवाळी अंक वाचनीय झाला आहे.

/ शब्दवेध /

शब्दवेधचा हा चवथा अंक शब्दवेधच्या भूमिकेला न्याय देणारा असा आहे, दर्जेदार साहित्य रसिकापावेतो पोहोचविण्याचे कार्य करणारे मराठी वाङ्मयीन चळवळीत महत्त्वपूर्ण अनियतकालिक म्हणून योगदान देणारा 'शब्दवेध'चा हा अंक आहे. त्याला साजेल असाच डॉ. निशिकांत मिरजकर यांचा 'नीळकंठ महाजन यांची कविता' हा समीक्षात्मक लेख आहे. कवीच्या फँटसी अथवा अतिशयोक्त कल्पनाविस्तारातून नाट्याच्या द्वारे महत्त्वाच्या जाणिवांचे परिणामकारक दर्शन कसे घडते हे मिरजकरांनी सप्रमाण विशद केले आहे. दिनकर दाभाडे, शैलेश महाजन, सुभाष डाके आदी वगळता अन्य काव्य विषयात नाविन्य, विषय वैविध्यांचा अभाव दिसतो.

अन्यभाषेतील उत्कृष्ट साहित्याचा अनुवाद-स्वरूपात परिचय करून देण्याचा शब्दवेधचा उपक्रम स्तुत्य आहे. अनियतकालिकांच्या दयनीय स्थितीचे शब्दांकन संपादकीयात कळकळीने अभिव्यक्त झाले आहे. 'शब्दवेध' समर्थ व्हावा ही सदिच्छा.

/ उद्‌घोष /

अभिनंदन ! अभिनंदन ! त्रिवार अभिनंदन !

कवी कुलगुरू कालिदास. मराठीचे आद्य कवी मुकुंदराज, संस्कृत नाटककार भवभूती, सर्वज्ञ, स्वामी चक्रधर आदी महनीयांची परंपरा लाभलेल्या भूभागातील साहित्यिक, सांस्कृतिक परंपरा अक्षुण्ण राखण्याचा वसा घेतलेल्या भंडाऱ्याच्या प्रथम अंकाचे अंतःकरणपूर्वक स्वागत, 'झाडीपट्टी' नावाने संबोधिल्या जाणाऱ्या भूभागातील उपेक्षितांचे हुंकार, त्यांच्या अस्मितेची जाण, विद्रोहाच्या अभिव्यक्तीच्या 'उद्‌घोषा'च्या या स्तुत्य प्रयत्नाबद्दल संपादकांचे हार्दिक अभिनंदन.

'उद्‌घोषा'तील चौधरी यांची 'कोंड', एस्. के. बांते यांची 'लाचारी', श्री. कटरे यांची 'नीती' या कविता अस्मितेची जाणीव अभिव्यक्त करण्यास समर्थ आहेत. अन्य कथा, लेख सामाजिक जाणीवेतून लिहिले गेल्याचे जाणवते. रूपेशन रोटके यांची 'भक्ष' ही कथा उल्लेखनीय आहे.

/ क का क /

मनोरंजनाचे ब्रीद घेतलेला सुरेशचंद म्हात्रे यांचा क का क हा दिवाळी अंक मात्र सुमार वाटला. दिवाळी अंक प्रसिद्ध करण्यामागे केवळ व्यावसायिक हेतू नसून ज्यांच्या साहित्याची दखल घेतली जात नाही अशांना प्रसिद्धी देऊन त्यांच्या प्रगतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने प्रकाशित झालेला 'क का क'चा दिवाळी अंक वाचकाला प्रभावित करण्यास असमर्थ वाटला. साहित्याची जमवाजमव हा संपादकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असावा असे संपादकीयावरून जाणवते. असे असले तरी याचाही वाचक आहेच. ■

'अरुण-शोभा', धरमपेठ विस्तार, नागपूर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

|| अध्ययन ||

धुळपाटी : एक भाषिक अभ्यास

प्रा. वसंत पाटील

'आठवणींचे पक्षी' नंतर मराठवाडी बोलीचा अस्सल अविष्कार करणारे पुस्तक म्हणजे 'धुळपाटी' होय. 'धुळपाटी' हे श्रीरंग तलवारे यांचे आत्मकथन असून या आत्मकथनाने मराठी भाषेच्या (बोली) दृष्टीने एक मोलाचा आविष्कार केला आहे.

अहमदपूर तालुक्यातील बोली भाषेचा अविष्कार 'आठवणींचे पक्षी' प्रमाणेच 'धुळपाटी'ने केला आहे. हे आत्मकथन कलात्मक, उत्कट, सौंदर्यपूर्ण जरी नसले किंवा पुनरावृत्तीचा, अनुकरणात्मकतेचा वास येत असला तरी या पुस्तकाचे भाषिक मूल्य लक्षणीय आहे.

या आत्मनिवेदनात श्रीरंग तलवारेंनी जगलेले, भोगलेले, अनुभवलेले विश्व साकार झाले आहे. त्यात त्यांच्या सुखदुःखाबरोबर त्या प्रादेशिक, भौगोलिक विशेषांवर अधिक लक्ष केंद्रित झालेले दिसते. त्या भौगोलिक परिसरातील वेगवेगळे रीतीरिवाज, सांस्कृतिकतेचा (सण, जत्रा, उत्सव इ) अविष्कार झालेला आहे. लोकमनाचा, लोक व्यवहाराचा, लोक भाषेचा वाङ्मयीन अविष्कार झाला आहे.

या आत्मकथनातील भावविश्व जसे आगळे वेगळे आणि संमिश्र स्वरूपाचे आहे त्याचप्रमाणे या आत्मकथनाची भाषाही आगळीवेगळी आणि संमिश्र स्वरूपाची आहे. तिच्यात खास मराठवाडीपणा सामावलेला असून तिच्यात सामाजिक, राजकीय स्थित्यंतराचो चिन्हे, पिढयानुपिढयांचा भाषिक वारसा, भाषेचा आदिरूपात्मक अविष्कार, नव्याजुन्याची संस्कारिकता विशेषत्वाने जाणवते. या आत्मकथनातील भाषेवर राजकीय स्थित्यंतराचा बराचसा परिणाम झालेला दिसतो. त्या स्थित्यंतरामुळे समाजातील रूढी-रिवाजात, आचार-विचारात, सामाजिक संकेतात आणि भाषिक रूपात बदल झाला. त्यामुळे या भाषेत इतर प्रदेशातील (राज्यातील) भाषेची, परभाषेतील शब्दरूपे वारंवार आढळतात. पण तीही मराठवाडी साज चढवूनच.

या भाषेत संस्कृत, अरबी, फार्सी, कानडी; दे. प्राकृत शब्दांचा भरपूर भरणा आहे. हे शब्द आता एतद्देशीय बनून वावरत आहेत. (बनले आहेत.) येथील प्रत्यय घटितांनी त्यांना स्वीकारले आहे, आपलेसे केले आहे.

या भाषेत लवचिकता आहे, प्रवाहीपणा आहे, नवे शब्द आणि नव्या अर्थच्छटा निर्माण करण्याची शक्ती आहे. उच्चारसौकर्याकडे तिची ओढ आहे. त्यामुळे या भाषेच्या उच्चारप्रकिया, वर्णप्रक्रिया (रूप प्रक्रिया) शब्दसिद्धी, वेधक अर्थ प्रक्रिया, विविध रंगाढगाचा शब्दसंग्रह इ. अंगामुळे ही भाषा अभ्यसनीय ठरते.

उच्चारप्रक्रिया

ही भाषा प्रमाणभाषेपेक्षा थोडीशी आगळीवेगळी दिसते. ती जनसामान्यांची बोली असल्यामुळे प्रमाणभाषेपेक्षा नकळत वेगळी वाटते पण ती दुरावा निर्माण करीत नाही. प्रमाणभाषेतील सर्वच स्वन तिच्यात (या बोलीत) आढळतात. पण त्यात सारखेपणा नाही. या बोलीत एकाच वेळी स्वर – व्यंजनाच्या 'श्रुति' आगमाची आणि लोपाची, वियोजनाची अनेक प्रक्रिया घडत असलेल्या दिसतात याचे कारण म्हणजे ही बोली

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुलभीकरणाकडे जात आहे, ती उच्चारणातील कठीणपणा नाहीसा करण्याचा प्रयत्न करीत आहे.

स्वर भक्तीची प्रक्रिया

अ श्रुति

अर्ज > अरजं (६)
कार्यक्रम > कारेकरम (३७)
खत > खात (६)
जित्रप > जितराप (२५)
पराक्रमी > पराकरमी (७७)
प्रकरण > परकरण (११)
प्रतिसाद > परतिसाद (८१)
प्रयत्न > परेत्न (५१)
प्रवेश > परवेश (५१, ३१)
प्रेमाने > परमानं (३८)
फार्म > फारम (३८)
विश्वास > विसवास (७४)
शब्द > सबद (९४)

आ श्रुति

अंधार > आंदार (५२)
खत > खात (२७)

'इ' श्रुति

अज्ञान > अडानी (६)
अंधार > अंदारी (८६)
औषध > आवसिद (९)
सहल > सहिल (१२)

'उ श्रुति,'

आंथरुण > आतुरण (९)
फोटो > फोटू (५१)
मिरची > मिरचु (१२)
पावसाळा > पावसुळा (६)

'ए 'श्रुति

नहारी / न्याहरी > नेहरी (८७)
उपयोग > उपेग (१९)

ओ श्रुति

आठवड्यातून > आटोड्यातून (९०)

स्वरलोप

'अ 'लोप

अभ्यास > अभ्येस (८, ४६)
आतेभाऊ > अतेभाऊ (९)
आक्रमक > अकरमक
मायाळू > मयाळू (११)

'ओ' लोप

उपयोग > उपेग (१९)
कोमल > कवळे (६)

'इ' लोप

परीक्षा > परक्षा (८)
पहिलीत > पयलीत (७)

अशाप्रकारे स्वरांच्या बाबतीत एकाच वेळी स्वरभक्तीची आणि स्वर लोपाची प्रक्रिया चालू असलेली दिसते.

वर्णागम

स्वरांप्रमाणेच व्यंजनांच्या बाबतीतही एक व्यंजन जाऊन दुसरा व्यंजन येणे, किंवा पूर्णपणे नाहीसा होणे किंवा अल्पप्राणत्व, महाप्राणत्व प्राप्त होणे, अनुनासिकत्व येणे किंवा लोप पावणे, एकेरीकरणाची किंवा द्वित्तीकरणाची प्रक्रिया घडणे, 'व' श्रुति, 'य' श्रुति लोप, विसर्ग लोप इ. प्रक्रिया सातत्याने या भाषेत असल्याच्या जाणवतात.

क > ख

कमीस > खमीस (३८)
स्कंद > खांदा (५२)
कंदील > खंजेल (७३)
बक्कल > बखल (१९)

ख > क

आखाड्यात > आकाड्यात (३७)
काख > काक (९६)
दुःख > दुक (५)
दिमाख > दिमाक (७५)
दाखिला > दाकला (५०)
तारीख > तारीक (३८)
सुखी > सुकी (७४)

क > ग

रक्त > रगत (११)
हकीकत > हकीगत (९)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घ > ग
अवघड > अवगड (९,१०)
घरीब > गरीब (१२)
घर्क > गरक (१४)
पांघरणे > पांगरणे (१७)
बघणे > बगणे (४३)

भ > ब
अभिमान > अबिमान (४५)
उभा > उबा (२६, १३)

न > ण
अनेक > अणिक (९)
रान > राण (७४)

ण > न
खुण > खून (५२)
पुण्य > पुन (१९)
म्हण > मन (५२)

थ > त
आंथरुण > आतुरण (९)
अस्थि > अस्ति (४३)
अस्वस्थ > अस्वत (८०)
लाथ > लात (४१)
साथीदार > सातीदार (४३)

ध > द
अंधार > अंदार (८६)
आधार > आदार (४३)
उधळून > उदळून (५)
औषध > आवसिद (९)
दुध > दुद (२०)
पंधरा > पंदरा (४१)
बुधवार > बुदवार (७)
बांधली > बांदली (८)
विरुद्ध > इरुद (४६)
साधणे > सादणे (११)

द > ज
कंदील > खंजेल (७३)

ल > ळ
काल > काळू (१३)
कोमल > कवळे (६)
ज्वाला > जाळ (१७)

पलाश > पळस (९०)
शृंखला > साखळी (२२)

ष > स, श > स, स > श
औषध > आवसिद (९)
भाषण > भासण (४७)
पौष > पूस (१३)
विषयी > इसई (४७)

श > स
खुश > खुस (६०)
श्मशान > मसन (२३, ७१)
शैतान > सैतान (२२)
शृंखला > साकळी (२२)
मुश्किल > मुसकील (५३)
शाळा > साळा (५)
मुसाफिर > मुशाफरी (५१)
सिनेमा > शनिमा (३६)

'य' श्रुति
एक > एक्या (३१)
पहिलीत > पयलीत (७)

'य' श्रुति
नाही > नाह्यी (७)
सामान > सामायिन (५६)
ज्ञान > ग्यान (५७)

'य' लोप
उपयोग > उपेग (१९)
प्रयत्न > परेत्न (६, ५१)
बनियन > बनेल (७२)
व्यापार > बेपार (४८)

'व' श्रुति
ओलेचिक > वलंचिक (१७)
ओळ > वळ (१३)
ओळख > वळख (५९)
ओत > ओवूत, आवत (८६)
कोमल > कवळे (६)
चतुर्थी > चवती (६)
डोह > ढव (९, १७)

व > इ
विकत > इकत (२३)
विटीदांडू > इटीदांडू (८)

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विस्तव > इस्तु (३५)
विरुद्ध > इरुद (४६)
विचार > इच्चार (८५)

यी > ई

विषयी > इसई (४७)

झ > ज

अर्झ (अर.) > अरजं (६५)
इझा (अर.) > इजा (८६)
नझर (अर.) > नजर > नदर (८, ५४)
मर्झी (अर.) > मर्जी (७८)
राझी (फा.) > राजी (७१)

(फार्सी व अरबीतून आलेल्या शब्दांच्या बाबतीतच झ > ज होण्याची प्रक्रिया अधिकाधिक जाणवते)

याशिवाय ड > ढ, ज्ञ > ग, क्ष > क, र > ड इ. प्रक्रिया पण दिसतात. त्या अत्यल्प आहेत.

ड > ढ

डुंग > ढुंगण (२०)
डोह > ढव (९, १७)

ज्ञ > ग

ज्ञान > ग्यान (७१)

क्ष > क

राक्षस > राकीस (७६)
शिक्षण > शिकशान (९)
शिक्षा > शिकशा (४४)

र > ड

कुर्ता > कुडतं (२४)

न > ल

जन्म > जलम (३६)
निजाम > लिजाम (३५)
बनियन > बनेल (७२)

ल > न

लिहून > निहून (२३)

याबरोबरच वर्णविपर्ययाची उदाहरणे अत्यल्प दिसतात. उदा. केतकी > केकताड (४२)

डोक्स > डोस्क, दोस्क (७५)

महाप्राणत्व

डोह > ढव (९, १७)
मागे > महागे (१९)

एकेरीकरणाची प्रक्रिया

अडकित्ता > अडकत्ता (९)
उच्चनिच > उचनिच (२५)
चल्लण > चोळणा (५१, ५८)
चड्डी > चडी (६)
जिद्द > जिद (८४)
पल्लव > पालव (१९)

द्वित्तीकरणाची प्रक्रिया

कारटे > कार्टं, कार्टे (१२)

अनुस्वरागम

कधी > कंदी (१३)
गचा > गचांड्या (१४)

वर्णलोपाची प्रक्रियाही विविध रूपांत आढळते.

'व'लोप

आठवड्यातून > आटोड्यातून (९०)
ज्वाला > जाळ (१७)
स्वस्थ > सस्त (६५)
स्वतः > सोता (६)
व्याजानं > याजानं (१८)
विहीर > हिरा (६८)
स्वप्न > सपन (१२)

ष, स लोप

स्टेशन > ठेसन (५४)

र लोप

शृंखला > साकळी (२२)

अनुस्वार लोप

चिंच > चीच (६४)

विसर्ग लोप

दुःख > दुक (५)
स्वतः > सोता (६)

शब्द संकोच

अडीचशे > अडिशे (५१)
लोहखंड > लोखंड (२१)
आठआण्याचे > आटाण्याचे (२५)

महाप्राणत्व लोप

उन्हाळा > उनाळा (८, १०)
जिव्हाळा > जीवाळा (६०)
तहशील > तसील (५)
तारीख > तारीक (३८)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दाखिल > दाकला (५०)
पहाट > पाट (५)
म्हैस > मैस (२५)

रूपप्रक्रिया

धुळपाटीतील भाषेचा रूपविचार पाहताना प्रत्ययप्रक्रिया, वचनप्रक्रिया, लिंगप्रक्रिया; सर्वनामे, विशेषणे, क्रियापदे, शब्दयोगी अव्यये साधित, सामासिक शब्द इ. चा विचार करावा लागतो. तो पुढीलप्रमाणे दिसतो.

प्रत्ययप्रक्रिया

प्रमाणभाषेतील विभक्तीप्रत्यय या बोलीत दिसतात. द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी; सप्तमीची एकवचनी, अनेक वचनी रूपे आढळतात. प्रमाणभाषेप्रमाणे जरी त्याची प्रक्रिया घडत असली तरी प्रत्ययांच्या प्रमाणात कमी अधिकपणा आढळतो. तृतीया–ए.व. पळीनं; भादरानं, वाटयानं (अव).

काटयानं, रटृयानं, वळीनं, लेकरानं, चतुर्थी एव, सुटीला, दुकाला, पांगरायला, झावळीला चतुर्थी अव. कावळयाला, पळसाला, जितरापाला; लेकराबाळाला. इ. पंचमी. भावाकून, महागून; वैतागून, जाग्यावून, सकाळपासून, गवसल्यापासून इ. षष्ठी. घंटीचा, नरडयाचा, कालेऱ्याची, कणगीच्या, षष्ठी अव. काडयाची, केकताडांच्या, खांबांच्या, बिनतिकीटाचे, बायांच्या, सरत्याच्या, सप्तमी–आविसात, आगीत, कारेकरमात, आकाडयात, पावसुळचात, सतरंजीत इ. अशा प्रकारची प्रत्यय प्रक्रिया आढळते. यात प्रामुख्याने नं (तृ.) ला. (च.) ऊन (पं.), चा ची च्या चे (ष) आत (स.) याचे प्राबल्य किंवा प्रमाण अधिक आढळते.

वचनप्रक्रिया

'धुळपाटी'त एकवचनी आणि अनेकवचनी अनेकविध रूपे आढळतात. आंबा–आंबे, कुत्रा–कुतरे, खड्डा–खड्डे, गोवरी–गोवऱ्या, चादर–चादरी, डाल–डाला, पाळी–पाळया, बाई–बाया, जितरापं, तमाटे, पिले, डोळा–डोळे, शेळी–शेळया, कावळे, काटक्या, वासरू–वासरं इ. यात अकारान्त, आकारान्त, इकारान्त, ऊकारान्त अशी एकवचनी रूपे आढळत असून त्यांची अनेकवचनी रूपे बनताना ती आकारान्त, एकारान्त, याकारान्त, इकारान्त बनलेली दिसतात. म्हणजे आ, इ., या, ए इ. प्रत्यय लागून ही रूपे बनलेली दिसतात तर काही एकवचनासाठी आणि अनेकवचनासाठी सारखीच आलेली दिसतात. उदा. पळस, तर अनेकवचनी रूपे दाखविताना डोक्यावर टिंब देऊन अनेकवचनी रूपे दाखविली आहेत.

सामान्यरूप प्रक्रिया

अ > आ, आ > ई, आ > या, इ > या, उ > आ इ. प्रक्रिया आढळतात. उदा. जित्रप > जितरापाला, झावळ > झावळीला; आकाडयात, काडी > काडयांची, वासरू > वासराचे, नरडे > नरडयाचा, इ. तून, आकारान्त, इकारान्त, याकारान्त, इ.

लिंग प्रक्रिया

लिंग प्रक्रियेत पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुंसकलिंगी शब्दरूपे आढळतात.

पुल्लिंगी – आंबा, इरूळा, विस्तव, खंजेल, गोरा, चोळणा, नांगर, तांब्या, तंबु.

स्त्रीलिंगी – गार, चिंच, शाळा, काडी, खिचडी, जवारी, सतरंजी, माडी, बायकु.

नपुसकलिंगी – कुडतं, कोंडाग, भगुन, खमीस, वासरू इ.

यात अकारान्त; आकारान्त, उकारान्त, याकारांत. पुल्लिंगीरूपे दिसतात. तसेच आकारान्त, इकारान्त, उकारान्त, अशी स्त्रीलिंगीरूपे वर अकारान्त आणि उकारान्त अशी नपुंसकलिंगीरूपे आढळतात.

पुल्लिंगीरूपाचे स्त्रीलिंगीरूप होताना 'इ' सारखे प्रत्यय लागून ती बनतात. उदा. म्हातारा–म्हातारी, तर कधी म्हैस > हालगट अशी स्वतंत्ररूपेही आढळतात.

धुळपाटीत आढळणारी नामांची विविधता

धुळपाटीत आढळणारी ही नामे विविधप्रकारची असून त्यांची संख्याही विपुल आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(विस्तारभयास्तव सर्व देता येत नाही.) त्यात प्राणीविशेष, संसारोपयोगी, शैक्षणिक/कृषी-विषयक, धान्यविशेषात्मक, वस्त्रादि, शरीरावय दर्शक इ. प्रकारचे शब्द आढळतात.

प्राणी विशेषनामे – कावळे, इसळा, गोरा, घोडा, कुतरे, जितराप, पिले, माकडे, वासरे, शेळ्या, इ.

संसारोपयोगी–काटक्या, गोवऱ्या, डाला' खंजेल, खत, विस्तव, बायकु, भमून, मोगरी, माडी, मुसळ, तांब्या, घागरी, दगड, दवाखान, इ.

शालोपयोगी–शाळा, पुस्तक, घंटी, इ.

कृषीविषयक–कोंडाण, खत, कुळव, नांगर, सावड, सरते, सरत्याच्या वाटया, इ.

धान्यविशेष–पिवळा, कांडे, खिचडी, पुरणपोळी, दूध, दाणा, शेवचिवडा, मिरचू, तमाटे

वस्त्रविषयक–खमीस, कुडतं, चिरगूट, चिंध्या; पटका, चोळणा, सतरंजी, चादरी.

अवयवदर्शक–नरडं, हात, पाय, छाताड, इ.

भाववाचक नामे–अडाणपण, परमानिकपणा, लुकडेपण, मुर्खपणा, इ. याशिवाय दगडावणी, बेवारसावनी, माजल्यावणी, मसुब्रावणी, मोगरी-वणी, महागल्यावणी, माकडावणी, सशावनी इ सारखे शब्दही आढळतात.

सर्वनामे

ए. व.–मी, म्या, मला, मजा, सोता, त्ये, ते, त्येनं, त्येला, त्येची, त्येंना

अ. व. आम्ही, आमी, आमाला, आमच्या, तुमचा, तुमीच

दर्शक सर्वनामे–त्या, ह्या, ह्ये

विशेषण–या ग्रंथात विशेषणांची विविधता आढळते. अरकट, इकारी, घाग, साहू, सैतान, घडधाकट, काटकुळा, तरणाबांड, वसाड, काळी भाकर, काळा बाजार, पांढरा फेक, तांबडा, लाल भडक, लालबुंद अरदी, एक, घमकून इ.

अशा प्रकारे गुणवाचक, संख्यावाचक इ. विशेषणांची संख्या ठायीठायी आढळते.

क्रियापदे–एक वचन, अनेकवचन, संयुक्त, संकर्मक, अकर्मक इत्यादी क्रियापदांची रूपे आढळतात. त्यात भूत, वर्तमान, भविष्यकाळी रूपेही आढळतात. व्हतो, बोलविला, लागली; केल्ली, नाहयी, गेलता, केलता, नव्हता, झालतं, निगाला, धरली, व्हती,व खवाया फायजे, मनलाले, बगला व्हताय, दिलता, घेतलया, राहुलाल्या, बसलाव, झाल्ती, झालता, लागतात, बसले व्हते, बसविली, गाउ देणार व्हते, भिरकावला.

शब्दयोगी अव्यये–वर, जवळ, मागे, पुडी, पायी, कडे, दार, शेवटी यासारखी शब्दयोगी अव्यये सापडतात. घोडयावर, सिटावर, हाटलावर, सालावर, चडावर, दुरढीजवळ, घोडामागे, टरकमवती, भासणापायी, खळगीपायी, दाह्यवणाकडं, हुडण्याकडं, इनामदार, राखणदार, सालदार, सायीदार, डोळयांपुडी, सरऱ्याशेवटी, इत्यादी.

सामासिक शब्द–आतेमाऊ, इटीदांडू, उचनिच, काटेकुटे, काळाबाजार, खरच्यापाणी, गोर-गरीब, घासकुटका, जाळभाज, ढोरकाम, दमकोंडी, घडधाकट, पैसापाणी, पुरणपोळी, बापजलमात, भलादांडगा, मीठमिरचू, मागमूस, मोलमजूरी, लेकरूबाळ, सदासर्वकाळ द.

उपसर्गघटित शब्द–यात, अ, इनी, ना पेक्षा बे, बिन, इ. उपसर्ग लागून तयार झालेले शब्द बऱ्याच प्रमाणात आढळतात.

अस्वस्त, अडाणी, इनाकारण, नाइलाज, बेधडक, बेवारसावानी, बिनघोरी, विनातिकीट; इ. याशिवाय महाबेरकी, महामुनकील, वनवास असेही शब्दरूपे आढळतात.

नादानुकारी शब्द – घंटी, चिरकापक्षी, च्याव-च्याव, झिमझिम, फटदिसी, बदडणे, भडभड इ.

तत्सम शब्दरूपे–या भाषेत तत्समशब्द, तद्-भवरूपे आढळतात, विश्वास, उपयोग, दंड, जीव; देव, जित्रप, परीक्षा, मति, रक्त इ.

तद्भवरूपे–कांदा, काठी, पालव, भांडे, मिरचू, सरण, सिव्या, साकळी इ.

शब्दसंग्रह फार्सी शब्द कुडने (२४), खुस (६७), गराडा (५५), गुत्ते, चादरी (४२), जागा (११), तंबू (१४), तैयारी (५०), दवाखाना (३०), नेहरी (८७), बन्द (बंदाच्या), (३६);

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धडक (३८), बिनतिकिटाइ, भादर (बहादर) (९५), शाल (४४), सवलत (फा+इ. ६०) (सोहलत) (३५), सामायिन (सामान) ५६, सालदाऱ्या (५५),

अरबी शब्दांपासून मराठीत आलेले आणि रूढ झालेले शब्द-अरजं (अर्स) ६५, आदालत (अदल) ५२, इंकार (इनकार) ४१, इनामात (इन + आम) १४, ईजा (इझा) ८६, करामत (करामत) ३१, कदर (कद्र) ७६, करारी (करार) ३५, खारीतल्या (खारीज) ८, खमीज (कमीस) ३८, खतम (खतम) ४४, गुलामी (६), गरक (गर्क), जिद (जिद्द), ८४, झुंबड (झुमरा) १५,२३, तमाशा (३७), तकरार (तकरार) ३२, दाकला (दाखिला) ५२, दिमाक (दिमाघ) ७५, नदर (नझर) ५४, मरजी (मर्झी) ७, मापी (मुआप) १२ मुशाफरी (मुसाफिर) ५१, वक्त (५) सैतान (शैतान) सिकार (अस्करी) ४९, हकीगत (हकीकत) (९), हाल (हाल) ६९.

कानडी शब्द – कोंडाण (कोण्ड) २५, कुळव (कुळ) २७, कनिंग (कण) २७, गार (गारी) ८८, घाबरगुंडी (गाबु), चडी (चड्डी) ६, टोपले (टोप्प) ४५, ढुंगण (डुंग), २०, तरमळ (तळ) ८६, पोट (पोट्ट) (४३), शिळ (सिल्ल) ५, हुडवा (हुडा) इ.

देशीप्राकृत शब्द – ढोरकाम (ढेर) ७, २५, ोबलत ९, वंगळ (वंग + ५), गच्चांडचा (गचा) १४ इ.

वरील शब्दांचे आगमन राजकीय स्थित्यंतरामुळे झालेले दिसते. हा (अहमदपूर जि. लातूर) भौगोलिक भाग सातत्याने अस्थिर राजवटीत येत असल्यामुळे आणि सीमाप्रदेशाशी जवळ असल्यामुळे त्या त्या प्रदेशातील त्या त्या भाषांचा संस्कार आणि उसनवारी झालेली दिसते. ही उसनवारी प्रत्ययापेक्षा धातूंची आणि उपपदाची झालेली दिसते. दे. प्रा. शब्द ही असेच कालाच्या ओघात त्या भागात निर्माण होऊन रूढ झालेले दिसतात.

ज्याप्रमाणे संस्कृत हा तत्सम/तद्भव रूपे मराठीत येऊन सामासिक शब्द बनतात त्याचप्रमाणे वरील भाषांच्या संदर्भातही झालेले दिसते. फार्सी, अरबी आणि कानडी इ. शब्द मराठीत येऊन त्यापासून सामासिक शब्द बनलेले दिसतात. ही सामासिक शब्दांची प्रक्रिया व्यामिश्र स्वरूपाची दिसते. उदा. आतेमाऊ (का + स.) अडकत्ता (का + का.), दमकोंडी (स × का.), दवाखान्यात (दवा × खाना, फा + का .), काटकुळ (सं + का.), चिरगुट (सं. + का.) सालदाऱ्या (फा + फा.), मुखपाठ (सं + सं) इ. यातून कानडी + संस्कृत, सं + का. का + का., फा. + फा. इ. प्रक्रिया होऊन सामासिक शब्द बनलेले दिसतात.

प्रादेशिकता जाणवू देणारी शब्द रचना— मायीच, भोंगळा, खुलवर, गंगमोहरी राकीस-मोहरी, गुत्ते, चोळणा, चोकोबा, झुंजुरक, झुंबड, झावळ, पाळचा, बला, बांड, मरका, घसकट, मोहरत, वहुवतीनं, सुगावा, सावड, संदान, शिराळ, काकरी, डाल वाहयवन इ.

इंग्रजी शब्द डागदर, कालेज, मॅट्रिक, गेस, स्टेजवर, लेट (लाईट), हाटेल, हाटल, इंड्रीन, शनिमा, टेम (टाईम) बुकं, डायरेक, ठेसन, रेलवाई, आफिसात, फारम, राशन, डेअरिंग, मिटींग, इस्टाक, डिग्री, ड्रेस, गॅग, गरामर, हिस्टरी कॅपिटल, स्काऊडंफड, बील सलाइन इ.

वाक्प्रचार आणि म्हणी

वाक्प्रचार आणि म्हणी हे खऱ्या अर्थाने भाषा वैभव असते. मोजक्या शब्दात विविध आणि सघन अर्थ सामावलेला असतो त्यातून विविध आशयाच्या छटा व्यक्त होतात. व्यक्तीस्वभाव, समाजदर्शन, विविध प्रवृत्ती इ. चे दिग्दर्श होते. उदा. इंगा दाखविणे, मातीला जाणे, अंग गळणे, दावे लावणे, आभाळ फाटणे, काळजाला चिर पडणे, बयान घणे, गोंडा घोळणे, तोंडाला पाणी येणे, जीव नकोसा होणे, हवेतच असणे, काटचानं काटा काढणे, राजी होणे, धंद्याला जुंपणे, झोपीत घोंडा घालणे, पोटाला चिमटा घेणे, जीव गहाण ठेवणे डोळा ठेवणे, डोळा ठेवणे, जाळभाज होणे, नांगर मोडणे, डोळे फोडणे, भोंगा पसरणे, दळणातला खडा असणे, जीवाचं रान करणे, समदं मुसळ केरात, डोस्क्यात किडे पडणे इ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणी

सिदा बी गेला अन् पंगत बी गेली,
जे शिकले ते हुकले
बारा घरचे बारा अन् बारका सुद्धा तेरा
कांद्याला बिस्मिल्ला
गळचाला गाडगं अन् ढुंगणाला कुराटी
आडल्याला नारायण गाढवाचे पाय धरतवा
घोडयामागं शिंगरू
खऱ्याची माय वनवासाला जातिया
पळसाला पान तीनच
चोराला मेसाई धारजीन
दुध पोळलं म्हणून ताक फुकून पिणे
उघडयापाशी नागवे गेलं अन् सारी रात हिवानं मेलं.
आन् लोकाचं झालं म्हणून पोटं काई लोकाचं नव्हं

वाक्यरचना – धुळपाटीतील वाक्यरचना ही बोली रूपातील असल्यामुळे तिला व्याकरणिक नियम लावता येत नाहीत. कर्ता, कर्म, क्रियापद अशी रचना सापडेलच असे नाही. केवळ भाव व्यक्त करण्यासाठी, आशय प्रगट करण्यासाठी अवतरलेली असल्यामुळे वरील क्रम दिसत नाही. कधी कर्ता नसतो तर कधी कर्म अध्याहृत असते. तर कधी त्यांच्या क्रमांत अदलाबदल झालेला दिसतो. कधी क्रियापद वंध प्रथम येतो तर नंतर साधी वाक्ये, संयुक्त वाक्य किंवा कधी मिश्ररूपाची वाक्य रचनाही आढळते. उदा. त्यो माणूस लई रागीट हाय. पर त्ये दिसी धाडस करून त्येयच्याकडे तसा बगीतला तर त्यो माणूस धुतल्याल्या तांदळा-सारखा हाय दुसमान बी असला तर खऱ्यासाठी खऱ्याचीच बाजू घेऊ या...

आली एकदाची जतरा...जतराचा रंग लई न्याराच व्हता. किंवा पदचला बाप कोपऱ्यात (गावाचे नाव) तसं मावशीनं घेतलं बसवून. केलं च्यापाणी, जेवाया बी घातलं. पर बापाला जेवण कायी गोड लागना इ. किंवा हिंदीची शब्दरचना पुढील प्रमाणे आढळते. उदा. क्यो गे हम क्या वळकी के नही क्या ? याशिवाय अर्थ प्रक्रियेच्या विविध छटा व्यक्त करणारे शब्दही या ग्रंथात विपुल प्रमाणात सापडतात. या विविध अंगांनी मराठवाडी बोलीचा सुंदर असा आविष्कार झालेला आढळतो. ■

मराठी विभाग,
कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय
चाळीसगाव, (जि. जळगाव) ४२४१०१

प्रासचा जी. ए. पुरस्कार

नागपूर येथील प्रास या संस्थेने ११ डिसेंबर ८९ रोजी जी. ए. स्मृतिदिन औचित्यपूर्ण पद्धतीने साजरा केला. त्यात दिल्लीपासून हैद्राबादपर्यंतचे आणि कोल्हापूरपासून नागपूरपर्यंतचे अनेक विद्वान सहभागी झाले. आता प्रासने जी. ए. पुरस्कार योजना जाहीर केली आहे. आजवर मराठीत जी ए. आणि जी. ए. यांची कथा यावर अनेक ग्रंथ व प्रबंध लिहिले गेले आहेत. त्यापैकी सर्वोत्तम ग्रंथास (प्रबंधास) प्रस्तुत पुरस्कार देण्यात येईल. पुरस्काराची रक्कम ५०१ रु. (पांचशे एक रुपये) असून प्रासच्या वर्धापन समारंभात म्हणजे जुलै महिन्यात संबंधित लेखकास सन्मानाने प्रदान करण्यात येईल.

सदर पुरस्कार समितीचे अध्यक्ष ख्यातनाम समीक्षक डॉ. द. भि. कुळकर्णी असून, सदस्य श्री. शरद शंगरपवार (प्रायोजक) आणि डॉ. वीणा मुळे (संशोधक) हे आहेत. प्रा. सदाशिव कुल्ली सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. सदर समिती उचित ग्रंथाचा शोध घेईलच. परंतु कुठलाही वाचक अथवा लेखक या संदर्भातील आपली शिफारस उजागिरीने कळवू शकतो. पत्रव्यवहाराचा पत्ता/ प्रा. सदाशिव कुल्ली ५२/अ, कर्नाटक संघासमोर, हील रोड, गोकुलपेठ, नागपूर ४४००१०

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुक्काम / कारंजा लाड :

मराठीच्या प्राध्यापकांना अंतर्मुख करणारे
मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन

डॉ. सुशीला पाटील

अलीकडे साहित्यिक मेळावे अन् संमेलने सर्वत्र अन् नेहमीच होतात. साहित्यिकांना परस्पर भेटीचा आनंद त्यात लाभतो. मेळाव्याला सोहळ्याचे, एखाद्या स्नेहसंमेलनाचे रूप येते. पण ज्या साहित्याच्या नावाखाली एका छत्राखाली यायचे त्या साहित्याचीच नेमकी आबाळ होताना जाणवते. यासारख्या समारंभात साहित्यप्रेम कुठेतरी अंग चोरून कसेबसे बसलेले क्षणभर दिसते न दिसते तोच लुप्त होते. उत्सवी रूप मात्र भरभरून ओसंडत राहते. प्राध्यापकांच्या परिषदांमध्येही प्राध्यापकांच्या समस्यांची क्वचितच गंभीरपणाने चर्चा होताना आढळते. या नेहमीच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर कारंज्याची अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद् साहित्यानंदाच्या दृष्टीने, वैचारिक-वाङ्मयीन आदान प्रदानाच्या दृष्टीने, मराठीच्या प्रचलित अध्ययन-अध्यापनातील गुणदोष शोधण्याच्या व त्यावर उपाययोजना सांगण्याच्या दृष्टीने अविस्मरणीय ठरली.

कि. न. महाविद्यालयाच्या परिसरात ज्या-ठिकाणी साहित्यचर्वणा होणार त्या दालनाला 'टीकाविवेक' हे नाव, त्याच्या बाजूला 'साद-पडसाद', तर भोजन कक्षाचे 'रसपरिपोष' आणि चहापान गृहाचे 'रसास्वाद' असे नामकरण झालेले होते. पुस्तक प्रदर्शनाकडे जाणारा जिना 'साहित्यसोपान', स्त्री प्राध्यापकांचा निवास म्हणजे साक्षात् 'प्रतिभा!' तर दुसऱ्या बाजूला 'अभिनवगुप्त' आणि 'आनंदवर्धन' महाविद्यालयाचा सारा आसमंत असा साहित्यिक जाणिवेनें अन् वाङ्मयीय स्मृतिगुणांनी शृंगारला गेला होता.

अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के. जी. देशमुख यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात मराठीच्या प्राध्यापकांच्या दायित्वावर समयोचित अन् मार्मिक भाष्य केले.

प्राध्यापक वर्गच अभ्यासक्रम तयार करतो आणि तोच प्राध्यापकवर्ग 'गाईडस्' काढतो. विद्याक्षेत्रातील या अपप्रवृत्तीवर त्यांनी आपला तीव्र निषेध नोंदवला. या गाईडस्च्या पांगुळगाड्यावर विद्यार्थी उत्तीर्ण होतो. वरच्या वरच्या परीक्षेकडे मार्गदर्शिकांच्या कुबड्यांच्या आधारे सरकत जातो. पण त्याची वैचारिक क्षमता मात्र वाढत नाही. त्याच्या पावलात स्वतंत्रपणाने चालण्याची शक्ती येत नाही. विद्यार्थ्यांच्या या पांगळेपणाचा दोष मार्गदर्शिकाकारांकडे जातो. विद्यार्थ्यांची वैचारिक आदान प्रदानाची शक्ती खच्ची करणाऱ्या या 'गाईडस्'ची सामूहिक होळी करावी या शब्दात कुलगुरूंनी आपला सात्विक संताप व्यक्त केला. उद्घाटनपर भाषणात मराठीच्या प्राध्यापकांची कर्तव्ये आणि जबाबदारी अशाप्रकारे अधोरेखित झाली.

अभ्यासक्रमाच्या निमित्ताने आयोजिलेले तीनही परिसंवाद अधिकाधिक रंगत गेले. अभ्यासक्रमातील त्रुटींची, उणिवांची नोंद केली गेली. त्यांची कारणमीमांसा शोधली गेली. उपाययोजना सुचवली गेली. साधक-बाधक विचारांचे मंथन झाले. परिषदेच्या चौथ्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी केलेला प्रत्येक परिसंवादाचा समारोप अप्रतिम होता. स्नातक-परीक्षेपर्यंतच्या वाङ्मयेतिहासाचे स्वरूप आणि स्नातकोत्तर अभ्यासक्रमातील वाङ्मयेतिहासाचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वरूप यावर त्यांनी मूलगामी मार्गदर्शन केले. सर्वांगीण आणि परिपूर्ण वाङ्मयेतिहासाची संकल्पना एम्. फिल्. च्या विद्यार्थ्यांच्या शोध निबंधाकरता विशिष्ट दृष्टीने विषय देऊन कशी सिद्धीस नेता येईल ते त्यांनी सांगितले.

१०+२+३ या अभ्यासक्रमाच्या संदर्भात महाविद्यालयीन स्तरावर मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचा दर्जा, विद्यार्थ्यांचा दर्जा, विषयांच्या तासिका, गुणांचे वाटप अशा अनेक अंगांनी चर्चा झाली. या परिसंवादाच्या अखेरीस डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी मराठीची दुरवस्था नि अनास्था याबद्दल हळहळ व्यक्त केली. मराठीच्या या अवस्थेला मराठीचा प्राध्यापकवर्गच जबाबदार असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी भाषेचे नि वाङ्मयाचे सामर्थ्य, सौंदर्य अन् क्षमता विद्यार्थ्यांप्रत संक्रमित करण्यात आजचा प्राध्यापकच कमी पडत असल्याचे सांगून त्यांनी प्राध्यापकवर्गाला अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करावयास लावले.

काव्याच्या अध्यापनात शृंगारिक कविता शिकवताना विद्यार्थ्यांचे कोवळेपण नि शृंगारिक अनुभूतीची प्रगल्भता यांची सांगड घालणे जड जाते. या परिसंवादात व्यक्त झालेल्या मुद्याच्या अनुषंगाने रसवत्ता सूचकतेने किती प्रभावीपणे शिकवता येते ते त्यांनी अनेक उदाहरणे देऊन विशद केले. अभ्यासक्रम हा निमित्तमात्र असतो. त्यामुळे त्याविषयी कुरकुरण्यापेक्षा अभ्यासक्रमाच्या आधाराने वाङ्मयाची जाण, आकलन, आस्वादन याकरता विद्यार्थ्यांना सक्षम करणे हे प्राध्यापकांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वाङ्मयीन शब्दांना अनेक परिमाणे असतात. विविध आयाम असतात. ज्ञानदेवांच्या विराण्यांना शब्दार्थाबरोबरच एक नादाचे परिमाण आहे. तालासुरातून ही शब्दरचना अधिक उलगडली जाते. त्यामुळे शाब्दिक उकल केल्यावर त्यांचे संगीतमूल्य विद्यार्थ्यांना आकळावे याकरता सुप्रसिद्ध गायकांच्या सुरेल गळयातून पाझरणारे ते शब्द विद्यार्थ्यांना ऐकवणेही तेवढेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत स्वतः केलेल्या प्रयोगाची यशस्विता त्यांनी कथन केली. वाङ्मयाच्या— काव्याच्या अध्यापनाची अतितरल रीत पेश करताना त्यांनी स्वतःचे अनुभवभांडार मोकळे केले. ■

'ज्ञानदीप' राठीनगर
अमरावती ४४४६०३

'युगवाणी' संबंधी माहिती

प्रकाशनस्थळ : विदर्भ साहित्य संघ, राणी झाशी चौक, सीताबर्डी नागपूर ४४० ०१२; प्रसिद्धीचा नियतकाल : त्रैमासिक. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, भारतीय, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर ४४० ०१२. प्रकाशकाचे नाव, मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, सीताबर्डी, नागपूर–४४००१२. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : श्रीपाद भालचंद्र जोशी, 'कृष्णकुंज'; खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर–४४० ०१०. वृत्तपत्राची मालकी : विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

मी, मनोहर म्हैसाळकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

नागपूर दि. ३० मार्च ९० मनोहर म्हैसाळकर, प्रकाशक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

|| कै. ग. त्र्यं. माडखोलकर पुरस्कार ||

पुरस्कारार्थ परीक्षण : एक अनुभव

डॉ. विश्वेश्वर सावदेकर

विदर्भ साहित्य संघातर्फे वाङ्मय पुरस्कार देण्याची योजना यंदापासून कार्यान्वित झाली. या योजनेतील पहिला पुरस्कार संयुक्त महाराष्ट्राचे आद्य प्रवर्तक, वि. सा. संघाचे माजी अध्यक्ष व मराठीतील एक महत्त्वाचे कादंबरीकार, पत्रकार कै. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या स्मरणार्थ 'जगबुडी' या प्रा. वामन पात्रीकर यांच्या कादंबरीस देण्यात आला.

या पुरस्कारार्थ ज्या अनेक वैदर्भीय कादंबरीकारांच्या लेखनाचा विचार झाला व ज्या मंथनातून जगबुडीस पारितोषक लाभले त्या प्रक्रियेबाबत परीक्षण मंडळातील एक परीक्षक डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांची ही निरीक्षणे :

विदर्भातील लेखकांच्या सर्वोत्कृष्ट वाङ्मय-कृतीला पुरस्कार देण्याची योजना विदर्भ साहित्य संघाने आखली. या योजने अंतर्गत या वर्षी पहिला पुरस्कार 'कादंबरी' या वाङ्मय-प्रकाराला देण्याचे ठरलेले होते. विदर्भ साहित्य संघाच्या वाटचालीत महत्त्वाचा हातभार लावणारे सुप्रसिद्ध कादंबरीकार व वि. सा. संघाचेच माजी अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या नावाने 'कादंबरी' या प्रकाराला हा पुरस्कार ठरविला गेला. या सर्व योजनेत माझा काही सहभाग राहू शकेल असे मला चुकूनही वाटले नाही. अनपेक्षितपणे माझ्यावर वेगळी जबाबदारी टाकण्यात आली. 'वेगळी' यासाठी, की माझ्या नावाला कळत-नकळत 'विज्ञानसाहित्य' जोडले गेले आहे. माझे वाचनही विज्ञानसाहित्याच्या प्रांतापलिकडे फारसे नाही. या पार्श्वभूमीवर वैदर्भीय लेखकांच्या कादंबरीची निवड करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या समितीत सहभागी होण्याबद्दल मला सांगण्यात आले. तेव्हा मी माझ्या वाचनाबद्दल साशंक होतो. परंतु या निमित्ताने विज्ञानसाहित्या-पलिकडे वाचन करता येईल, या मोहात पडून मी होकार दिला. विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाने तत्परतेने वैदर्भीय लेखकांच्या कादंबऱ्या पुरविण्यास सुरुवात केली. आणि या निमित्ताने मला एक वेगळा वाचनानंद मनमुराद लुटता आला.

या विशेष निवड समितीतील अन्य सदस्य हे मान्यवर समीक्षक, अभ्यासक असल्यामुळे माझी भूमिका एका वाचकाची होती. आणि ती पार पाडण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न केला. एकूण बत्तीस कादंबऱ्या या निमित्ताने वाचायच्या होत्या. यावर्षीच्या माडखोलकर पुरस्कारासाठी १९८४ ते १९८९ ह्या पाच वर्षांच्या कालावधीत प्रकाशित झालेल्या कादंबऱ्या अशी मर्यादा होती. त्यामुळे 'जगावेगळं वचन' ही सुरेश शंकर बल्लाळ यांची माझ्याकडे आलेली कादंबरी केवळ कालमर्यादेमुळे बाजूला सारावी लागली.

यानिमित्तानं विविध कादंबऱ्या वाचणं हा एक विलक्षण अनुभव होता. यात विविधता तरी किती सांगावी ? पुरुषोत्तम बोरकरांची 'मेड ईन इंडिया', बाबाराव मुसळे यांची 'हल्या हल्या दुधू दे' या वऱ्हाडी बोलीतल्या कादंबऱ्या होत्या, द्वादशीवारांच्या 'हाकूमी'त मधूनच आदिवासी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोकांची (माडिया) बोली होती. तर मधुकर वाकोडे यांच्या 'झेलझपाट' मध्ये कोरकू भाषेतली संवादात्मक वाक्ये होती अर्थात वाचकांच्या सोयीसाठी कंसात मायबोली मराठीही होती, हा भाग वेगळा.

मध्यमवर्गीय वातावरणात घडणाऱ्या 'अलकनंदा' (सुरेश द्वादशीवार), जगन्नुडी (वामन पात्रीकर), अफलातून (मनोहर तल्हार); 'पिंपळपान' (सुनीति आफळे). जय–पराजय (जयश्री रूईकर) या सारख्या कादंबऱ्या होत्या. तशाच पौराणिक वातावरणातल्या 'महाभारत' (भास्कर नंदनवार), पद्मगंधा भाग १ व २ (शुभांगी भडभडे) अशा कादंबऱ्याही होत्या. कृतार्थ (शुभांगी भडभडे), युगावतार (प्र. ग. सहस्त्रबुद्धे), खंजिरीचे बेल (उद्धव ज. शेळके) यासारख्या महान पुरुषांच्या जीवनावर आधारित कादंबऱ्या होत्या, त्याचप्रमाणे एखाद्या रहस्यकथेप्रमाणे उलगडत जाणाऱ्या 'पाताळयंत्र' (शिरीष गोपाळ देशपांडे), 'तांदळा' (सुरेश द्वादशीवार) या कादंबऱ्याही होत्या. याशिवाय 'फिपुली' (सुगंधा शेंडे), महापूर, (जयवंत काकडे), अवसेचा चंद्र (सुरेश शंकर बल्लाळ), वैकल्य (शिरीष गोपाळ देशपांडे), 'उडून जा पाखरा', 'वेगळ्या वाटा' (छबूताई कविश्वर वैद्य) यासारख्या विविध कादंबऱ्या होत्या.

माडखोलकर पुरस्कार समितीने नजरेखालून घातलेल्या कादंबऱ्यांची जंत्री येथे संपत नाही. नुसती जंत्री देण्याचा या लेखाचा उद्देशही नाही. वाचलेल्या सर्व कादंबऱ्यांची समीक्षा किंवा टीका–टीप्पणी करण्याचेही प्रयोजन नाही. या सर्वातून जे अनुभवता आले ते सांगण्याचा आणि समानधर्मी वाचकांशी हितगूज साधण्याचा हा प्रयत्न आहे.

या कादंबऱ्या वाचताना मी गुरफटून गेलो, ते अलकनंदेच्या व्यक्तिमत्वात सुरेश द्वादशीवार यांच्या 'अलकनंदा'ची ही नायिका, व्यवसायानं डॉक्टर असली, तरी तिचं मन हे कलावंताचं मन आहे. लेखक आपल्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्तानं गेलेले असताना त्यांची तिच्याशी ओळख झाली आहे. डॉ. शरयू या नावाने वावरणारी ही पूर्वाश्रमीची अलकनंदा आता एका सुप्रतिष्ठित, समाजसेवक अशा थोर स्वातंत्र्यसैनिकाची सून म्हणून वावरते आहे. दादासाहेबांच्या कर्तृत्वामुळे आणि त्यांच्या प्रसिद्धीमुळे घरातल्या सर्वांचीच व्यक्तिमत्त्वे खुरटली आहेत. दादासाहेबांचा शब्द प्रमाण असलेल्या या वातावरणात कलावंत 'अलकनंदा' संपून 'शरयू'च्या जीवनाची सुरुवात झाली आहे. परंतु 'अलकनंदा' आणि 'शरयू' यांच्यातला संघर्ष सुरूच आहे. अशा परिस्थितीत लेखक शरयूशी मैत्री करून तिला 'अलकनंदा' म्हणून जगण्यासाठी प्रोत्साहन देतो आहे, आणि या प्रयत्नात तो यशस्वीही झाला आहे. कर्तृत्वसंपन्न कुटुंब प्रमुखाच्या घरातील व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचा संघर्ष द्वादशीवारांनी फार प्रभावी आणि परिणामकारक टिपला आहे. ही कादंबरी वाचताना 'हिमालयाची सावली' या नाटकाची सहज आठवण येते.

सुरेश द्वादशीवारांची 'हाकूमी' ही नुकतीच प्रसिद्ध झालेली कादंबरी मात्र अगदी वेगळ्या प्रकारची आहे. चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड, कांदोडी या परिसरातले माडिया आदिवासी हा या कादंबरीचा विषय. कन्ना मडावी हा माडियांमधला पहिला डॉक्टर या कथानकाचा नायक. आदिवासींच्या संस्कृतीचे सामान्यत: अपरिचित जग, त्यांच्या चाली–रीती यांचे सविस्तर वर्णन प्रस्तुत कथानकात येते. महाराष्ट्र शासनाला जाचक ठरू पाहणारे नक्षलवादीही या कथानकात आहेत. परंतु लेखकाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण उदारमतवादी आहे.

'झेलझपाट' ही मधुकर वाकोडे यांची साहित्यपरिषदेचा पुरस्कार मिळालेली कादंबरी वरकरणी ही केरू आणि फुलय या आदिवासी नायक नायिकांची प्रेमकहाणी वाटत असली, तरी या कथानकाला अनेक सामाजिक, आर्थिक आयाम आहेत. 'झडप' या अर्थाने 'झेलझपाट' हा शब्दप्रयोग आहे, आणि गरीब आदिवासी कोरकूंवर झडप घालण्यासाठी अनेक गिधाडे या समाजात टपलेली आहेत. 'एस.' या टोपणनावाने लिहिलेली छोटीशी प्रस्तावना 'झेलझपाट'ला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक उल्लेखनीय प्रस्तावना म्हणून 'हल्या हल्या दुधू दे' या बाबाराव मुसळे यांच्या कादंबरीला लाभलेल्या प्रस्तावनेचा उल्लेख करता येईल. डॉ. दत्तात्रय पुंडे यांची ही प्रस्तावना एकूणच आजच्या जीवनावर लिहिल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांच्या स्वरूपावर प्रकाश टाकणारी आहे. या संदर्भात डॉ. पुंडे लिहितात, 'ग्रामीण जीवनावर कादंबरी लिहायची म्हणजे निवडणुकांचे गलिच्छ राजकारण, फंडगुंड पाटील व त्याचे कावेबाज हस्तक, सद्‌विचारी–ध्येयवादी माणसाची होणारी फरफट आणि रासवट शृंगार व बलात्कार यांची रेलचेल करणारे प्रसंग इत्यादींची वर्णने लिहायची अशी एक समजूत या लेखकांनी करून घेतलेली दिसते... ग्रामीण जीवन म्हणजे पाटील हवाच. तो सत्तांध तसाच कामांध हवा. त्याच्या नजरेस महाराची नाही तर चांभाराची मुलगी पडायला हवी. तीही पुन्हा उफाडयाची; न्हाती–धुती पोर हवी, शिवाय सद्वर्तनीही. तिला गटवण्यासाठी पाटलाच्या साथीदाराने डाव टाकणे, मग काही तरी अतिप्रसंग घडणे, कुणीतरी चिडून उठणे व शेवटी खून वा आत्महत्या होणे इत्यादि गोष्टी यायलाच हव्यात. ग्रामीण कादंबरी लिहिण्यासाठी हे व एवढेच जीवन या लेखकांना पुरेसे वाटते. बदलते, अनेकांगी जीवन कवेत घेणारे खेडे त्यांच्या नजरेसमोरही येत नाही, याची खंत वाटते.' प्रस्तावनेत व्यक्त झालेली ही खंत पुरेशी बोलकी आहे. बाबाराव मुसळे यांची 'हल्या हल्या दुधू दे' ही ग्रामीण कादंबरी मात्र वेगळ्या प्रकारची आणि वाचनीय आहे.

'माझं गाव कुठाय'? या योगेंद्र मेश्राम यांच्या कादंबरीचं कथानक आमगाव या एका इलाख्याच्या गावात घडणारे आहे. गावाच्या पूर्वेला एका कुशीत सुमारे चार–पाचशे घरांची वस्ती 'भीमनगर' या नावाने परिचित आहे. या भीमनगरातील दलित, त्यांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, या अत्याचारांविरुद्ध लढणाऱ्या सुशिक्षित दलित नायकाला प्रस्थापितांकडून होणारा विरोध यांची वर्णने या कथानकात आहेत.

'मेड इन इंडिया' या पुरुषोत्तम बोरकरांच्या वऱ्हाडी बोलीतील कादंबरीचा बाज वेगळ्या प्रकारचा आहे. 'पंज्याब' हा नायक प्रथमपुरुषी एकवचनी निवेदन–शैलीतून राजकीय, सामाजिक परिस्थिती, ग्रामीण चालीरिती यावर भाष्य करतो आहे. इथलं भ्रष्टाचारी समाजमन, दुसऱ्याचा गळा कापून आपला खिसा तर्र करणारी वृत्ती कधी बदलेल ? गिऱ्हाईक नाही म्हणून गावातलं देशी दारूचं दुकान, खाटकाचा धंदा, वरलीमटका कधी बंद होईल ? मिनिस्टर सायकलवर फिरताना कधी दिसतील ? हे लेखकाचे प्रश्न आहेत. शेवटच्या परिशिष्टात दिलेले वऱ्हाडी बोलीतील काही शब्दांचे अर्थ अभ्यासकांना उपयुक्त आहेत.

रविंद्र शोभणे यांच्या 'रक्तध्रुव'मधली सर्व पात्रे मुस्लिम आहेत. काबाडकष्ट करून उपजीविका करणारी सईदा, याकुब, सलमा, सुलेमान, शेरू ही यातली पात्रे आहेत. सुलेमानला कैद झाल्यावर त्याच्या पश्चात मुलीचा सांभाळ करणारी सईदा, तिला भेडवसावणाऱ्या समस्या, लोकांची तिच्याकडे पाहण्याची दृष्टी याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत आहे.

'आंगणवाडी' ही नवनीत देशमुखांची छोटेखानी कादंबरी अंगणवाडी सेविकांना समर्पित केली आहे. सातपुड्याच्या कुशीत असलेल्या वारणी या तहसिलीच्या गावी गेलेला प्रामाणिक, ध्येयवादी, एम. जी. घारस्कर हा अधिकारी, त्याच्या सचोटीने प्रभावित झालेले त्याच्या कार्यालयातील ढिमरेकर कारकून, लुटे ड्रायव्हर, अंगणवाडी सेविका आणि गावाच्या राजकारणात लुडबूड करणारे आमदार भैय्यासाहेब, सभापती, वानखेडे यांच्यातील हा संघर्ष आहे.

माझ्या वाचनात आलेल्या कादंबऱ्यांमध्ये उल्लेखनीय म्हणून वामन पात्रीकर यांच्या 'जगवुडी' या कादंबरीची नोंद घेणे आवश्यक आहे. प्रसिद्ध समीक्षक द. भि. कुळकर्णी यांची एकपानी प्रस्तावना या कादंबरीला आहे. 'वाचकाला तन्मय करणारी आणि समीक्षकाला अस्वस्थ करणारी, मराठी कादंबरीच्या ललाटावरची नवी भाग्यरेखा शोभणारी' असा अभिप्राय प्रस्तावनेत आहे. या तन्मयतेचा प्रत्यय देणारी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'जगत्रुडी' खरोखरच वाचनीय आहे. महाराष्ट्र–मध्यप्रदेश यांच्या सीमेवरील, बैतूल, मुलतापी, नागपूर, देऊळगाव या परिसरात घडणारे कादंबरीचे कथानक आहे. परिवर्तनाचे आवर्तन आणि या परिवर्तनामुळे होणारी उलथापालथ, बदलणारी माणसं, बदलणारे कौटुम्बिक जीवन यांचे प्रभावी चित्रण या कथानकात आहे. भुलीआत्या, झनकू, बापू यासारख्या व्यक्ती आपल्याला वेगळ्या विश्वात घेऊन जातात. व्यंकटेश माडगुळकर यांच्या 'तू वेडा कुंभार' या नाटकात गावात येणाऱ्या बसमुळे लोखंडी पायाच्या अवदसेमुळे – घडून येणाऱ्या परिवर्तनाचे अतिशय प्रभावी चित्रण आहे. या नाटकाची आठवण प्रस्तुत कादंबरी वाचताना येते.

जुनगाव – जनकपूर या परिसरात घडणारी सुरेश द्वादशीवार यांची 'तांदळा' एखाद्या रहस्यकथेप्रमाणे उत्कंठावर्धक आहे. जनकपूर हे पन्नास झोपड्या, तुटकी मशिद आणि एक चौरस्ता असलेलं गाव, वस्तीच्या विरुद्ध बाजूला, हिरव्या दाटीआड असलेली प्रचंड पुराणवास्तू, 'उत्तरेचा महाल' या महालासंबंधीचे कथानक रहस्यमयरित्या उलगडत जाते. बालेश्वराच्या देवळात जाताना लेखकाला भेटलेली प्रौढ स्त्री, त्या सौंदर्यवती स्त्रीने अचानक नाहीसे होणे, हळदीने काढलेली रेखीव पावलं, लेखकाने घेतलेला नायिकेचा शोध यातून कथानक खुलते. नवाबसाहेब; लक्ष्मी, दिगंबरकाका, जुई यासारखी पात्रे कथानकात रंग भरतात.

प्रस्तुत कादंबरीची नायिका ही देवीचा अवतार मानली गेलेली एक सौंदर्यसंपन्न स्त्री आहे. या 'अवतारी'पणामुळे तिच्या स्त्री–सुलभ भावना मन आदी मारले गेले आहेत. 'तांदळा' म्हणजे देवीचा मुखवटा (दगड), या दगडावर (मुखवटयावर) शेंदराची खोळ जमा झाली, की त्याला देवत्व प्राप्त होऊन त्या खोळीआड दगडाचं मूळ रूप झाकलं जातं. प्रस्तुत कथानकातील नायिकेच्या व्यक्तिमत्वाचाही असाच 'तांदळा' झाला आहे. तिच्या मनाविरुद्ध तिला देवत्व मिळाले आहे.

'महाभारत' ही भास्कर नंदनवारांची दोन भागात प्रसिद्ध कादंबरी, या कादंबरीचा पूर्वार्ध एप्रिल '८९ मध्ये प्रकाशित झाला. 'महाभारत' या महाकाव्याची कथा सर्वपरिचित आहे. दूरदर्शन प्रसारणामुळे अनेक बारकाव्यांसह ती समोर आली आहे. हीच महाभारताची कथा लेखकाने ललित शैलीत मांडली आहे. 'लेखनाच्या तयारीसाठी महाभारत आणि विविध भाषांमधील तत्संबंधीचे संदर्भग्रंथ वाचण्यात मी गेली तीन वर्षे घालविली' असे लेखक म्हणतात. याचा प्रत्यय 'महाभारतापूर्वीचे महाभारत' ही लेखकाची प्रस्तावना वाचताना येतो.

शुभांगी भडभडे यांची 'पद्मगंधा' ही कादंबरीही दोन भागात प्रसिद्ध झाली आहे. दुष्यन्त आणि शकुन्तला यांचे सहजीवन हा या कादंबरीचा विषय. अगदी पौराणिक काळापासून स्त्री ही परावलंबी राहिली आहे. केवळ शकुंतलाच अगतिक आणि दैवाधीन नाही. अशा अनेक शकुन्तला आज समाजात आहेत. परंतु यापुढे ही स्थिती बदलायला हवी. स्त्रीने स्वावलंबी, स्वयंपूर्ण व्हायला हवे या विचाराला पुष्टी देणारी कथानकाची मांडणी आहे. एखाद्या स्त्रीला पतीने नाकारले तर तिच्या जीवनातला अर्थ का संपतो? ती स्वतः कुठे कमी पडते? शारीरिक दुर्बलता तिला बाधक होते का, या प्रश्नांची उत्तरे कमी अधिक प्रमाणात या कादंबरीत आहेत. लेखिकेची प्रस्तावना वाचनीय आहे. प्रस्तावनेच्या सुरवातीलाच,

'भवती कमलनेत्रा, नासिका क्षुद्ररंध्रा,
अविरलकुचयुग्मा, दीर्घकेषे कृषांगी।
मृदुवचन सुशीला नृत्यगीतानुरक्ता,
सकल तनु सुवेशा पद्मिनी पद्मगंधा ॥"

हा शकुंतलेच्या अनुपम लावण्याचे वर्णन करणारा अप्रतिम श्लोक आहे.

स्त्रीमुक्तीचा विचार करणारी सुगंधा शेंडे यांची 'फिपुली' ही छोटेखानी कादंबरी, 'फिपुली' या नायिकेचीच कादंबरी आहे. दुर्दैवाशी आणि दुःखाशी दोन हात करण्याची जिद्द बाळगणारी, प्रतिष्ठेचं जीवन जगण्याची इच्छा असलेली नायिका 'फिपुली', आपल्या सभोवतालच्या, गुलामीचं जीवन जगणाऱ्या उमा,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रमा, लक्ष्मी यांच्यासारख्या स्त्रिया पाहून अस्वस्थ झाली आहे. 'आपुला जल्मच दलिंदर ! आपण सुद्धा परावलंबीच. ज्या घरी घाडलं, त्या घरच्या खुट्याला दावे बांधलेलं !' ही या फिपुलीची व्यथा आहे. या वातावरणात राहणारी फिपुली, निःस्वार्थ सेवा करणाऱ्या मिशनरी लोकांपासून प्रेरणा घेते, आणि सेवाभावाने समाजासाठी कामे करायला लागते चंद्रपूरच्या परिसरातील ही 'फिपुली' एक वेगळी नायिका आपल्यापुढे उभी करते.

'पिवळपान' या सुनीती आफळे यांच्या १९८५ साली प्रकाशित झालेल्या कादंबरीत कथानकाच्या ओघात अनेक ताजे संदर्भ येतात. चांदणीचौकात झोपडपट्टीवरून फिरलेला बुलडोझर, केंद्रात आलेले जनता सरकार, अतिरेक्यांच्या कारवाया, भिंद्रानवालेचा उगम, अतिरेक्यांनी प्रवाशांची हत्या करून बस लुटणे यासारख्या घटना कथानकात आहेत एका सामान्य, मध्यमवर्गीय, गरीब कुटुंबातल्या, व्यंग असलेल्या मुलीने लग्नानंतर फरिदाबादला जाणे, तिथे मेंदीचा व्यवसाय करणाऱ्या नवऱ्याबरोबर, घरातल्या अन्य व्यक्तींबरोबर मिळून-मिसळून राहणे, मोठ्या जावेचे वर्चस्व, कौटुंबिक वाद वगैरे प्रसंगांनी भरलेली एक सावेबंद कौटुंबिक अशी ही कादंबरी आहे. 'रमा' ही या कथानकाची नायिका. अतिरेकी नवऱ्याचा खून करून पोलिसांच्या स्वाधीन होणारी तडफदार पत्रकार 'कल्पना' या कथानकात एक वेगळे व्यक्तिचित्र उभे करते.

जयश्री रुईकरांच्या डॉ. प्रियाची व्यथा वेगळीच आहे. 'जय पराजय' या त्यांच्या कादंबरीची नायिका डॉ. प्रिया ही एक कोड असलेली तरुणी आहे. समाजात कोड असलेल्या व्यक्तीकडे पाहण्याचा कसा दृष्टिकोण असतो, त्यातही स्त्रीला किती सहन करावे लागते, याचे वर्णन प्रस्तुत कादंबरीत आहे. हा विषय तसा नवा नाही. परंतु या कथानकात डॉ. कुणाल रॉय आपल्याच बायकोकडे-डॉ. प्रियाकडे एक 'प्रयोग्य वस्तू' म्हणून पाहतो आहे. लेखिकेच्याच पूर्वप्रकाशित कथेचे 'जय-पराजय' हे कादंबरी रूपांतर आहे.

मनोहर तल्हार यांच्या 'अफलातून' मधला नायक प्रकाश खोत उर्फ 'प्रकाश झोत' एक मनमोकळं, स्वैर व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर उभे करीत असला, तरी कादंबरीचे कथानक अतिसामान्य आहे. 'माणूस' मुळे वाढलेल्या अपेक्षा तल्हारांची 'अफलातून' पूर्ण करू शकत नाही.

माडखोलकर पुरस्कारासाठी ग्रामीण, दलित, वऱ्हाडी, सामाजिक, कौटुंबिक, आदिवासी अशा प्रकारच्या कादंबऱ्यांबरोबरच महापुरुषांच्या जीवनावर आधारित कादंबऱ्यांचाही विचार झाला. यापैकी 'कृतार्थ' ही शुभांगी भडभडे यांची कादंबरी. रा. स्व. संघाचे आद्य संस्थापक डॉ. हेडगेवार यांच्या जीवनावरील ही ललित कादंबरी. श्री. भा. वर्णेकर यांची दीर्घ प्रस्तावना हे या कादंबरीचे वैशिष्टच. शुभांगी भडभडे यांची 'स्वयंभू' आणि प्र. ग. सहस्रबुद्धे यांची 'युगावतार' या दोन्ही कादंबऱ्या रामकृष्ण परमहंस यांच्या जीवनावर आधारलेल्या आहेत. शुभांगी भडभडे यांच्या 'कृतार्थ' या कादंबरीच्या प्रस्तावनेत डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी या संदर्भात महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. 'एखाद्याचे जीवन ललित कलाकृतीचा विषय होण्याला काही कालमर्यादेची आवश्यकता असते, असे मी समजतो' असे म्हणून वर्णेकर प्रस्तावनेत पुढे म्हणतात, 'हा कालाचा निर्बंध कादंबरीसारख्या वाङ्मयीन कलाकृतीलाही लागू पडतो. एखाद्या थोर व्यक्तीच्या निधनानंतर, समकालीन अनेक लोक जिवंत असताना ती व्यक्ती किंवा तिच्या जीवनचरित्रातील घटना हा कादंबरीचा विषय होऊ शकतो काय ?'—हा प्रश्न मला महत्त्वपूर्ण वाटतो.

रामायणाची कथा सर्वांच्या चांगल्या परिचयाची आहे, रामायणाचा नायक श्रीराम याला समांतर अशी लक्ष्मणाची व्यक्तिरेखा श्यामकान्त कुळकर्णी यांनी 'सौमित्र' या कादंबरीत रेखाटली आहे. या कादंबरीतील लक्ष्मण आणि ऊर्मिला यांचे संवाद प्रभावी आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिरीष गोपाळ देशपांडे यांच्या 'वैकल्य' या छोटेखानी कादंबरीचा उल्लेख आवश्यक वाटतो. कुष्ठरोग्यांशी संबंधित या कादंबरीच्या कथानकात दोन महान पुरुषांचा संघर्ष चित्रित केला आहे. कुष्ठरोगाबद्दल प्रचारकी थाटाचे या कादंबरीचे स्वरूप नाही. आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणारे त्यासाठी पंतप्रधानांशीही संघर्ष करणारे डॉक्टर वामन देवदत्त रावेरकर यांचा कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनावर अधिक भर आहे. अशा रोग्यांना समाजाने जवळ केले पाहिजे, त्यांच्यासाठी वेगळ्या वसाहती उभारण्याची आवश्यकता नाही, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. या उलट वर्ध्याच्या जवळ कुष्ठरोग्यांचा आश्रम चालविणारे अप्पा मार्जने यांचे व्यक्तिमत्व आहे. अप्पा मार्जने यांच्या या आश्रमावर सरकारी मदतीची कृपादृष्टी आहे. एक वेगळ्या प्रकारचा संघर्ष लेखकाने प्रस्तुत कादंबरीत चित्रित केला आहे. या कादंबरीच्या तुलनेत याच लेखकाची 'पाताळयंत्र' ही हेर–कादंबरी सामान्य वाटते.

उपरोल्लेखित कादंबऱ्यांच्या व्यतिरिक्त 'ढगाळलेलं आभाळ' (नाना ढाकुलकर), 'अवसेचा चंद्र' (सुरेश शंकर वल्लाळ), 'घरकुल', 'उडून जा पाखरा', वेगळ्या वाटा (छत्रुताई कविश्वर वैद्य) यासारख्या कादंबऱ्याही वाचनात आल्या. या सर्वच पुस्तकांनी वेगवेगळी विश्वे दाखविली. 'विज्ञानसाहित्य' या माझ्या अभ्यास-विषयापेक्षा वेगळ्या साहित्यविश्वाचं दर्शन घडविलं. माझ्या दृष्टीने माझा सगळ्यात मोठा लाभ हाच. यासाठी विदर्भ साहित्य संघाचा मी आभारी आहे. ■

२९, 'भालचंद्र', स्वावलंबी नगर,
नागपूर २२

साभार पोच

हुंकार वादळांचा : भाऊ पंचभाई / समित प्रकाशन, नागपूर / रु. ४० [पृष्ठ ८८]
साहसी विजय : श्याम माने / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रु. १६ [पृष्ठ १०२]
प्रतिक्षा : रघुविरसिंह राजपूत / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रु. ३६ [पृष्ठ १०१]
विनम्र अभिवादन : अ. मा. सगणे / सौ. मालिनी सगणे, यवतमाळ / खाजगी वितरण
मटवर्य कै. दिनायक दत्तात्रय बेहेरे यांचा अल्पपरिचय : डी. व्ही. बेहरे / खाजगी वितरण
स्वप्नवृंद : डॉ. वि. गो. म्हेत्रस / विनिदा / समीर प्रकाशन, नागपूर / रु. २५ [पृष्ठ ७१
स्वगत स्वागत : मधुकर वेदांते / सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर / रु. २० [पृष्ठ १३८]
अण्णासाहेब लठ्ठे : य. दि. फडके / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ७५ [पृष्ठ ३०८]
परामर्श : स्त्रीमुक्ती समस्या व दिशा / खंड ११, अंक १ / सुरेंद्र बार्लिंगे / पुणे विद्यापीठ प्रकाशन / रु. १५ [पृष्ठ १४७]
विज्ञान, मानव आणि मानवविज्ञान : कुमुदिनी दांडेकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६० [पृ. १८७]
सांजक्षितिज : व्यंकटेश ववसंगकर / मराठी साहित्य मंडळ गुलबर्गा / रु. १५ [पृष्ठ ४०]
बहुगुणीवृक्ष : डॉ. बी. पी. वांगीकर / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४० [पृष्ठ १३६]
महार वेटाळ : श्रीरंग रोडगे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ७० [पृष्ठ १९८]
पोत आणि पदर : प्र. ई. सोनकांबळे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ५० [पृष्ठ १४६]
जगबुडी : वामन पात्रीकर / पॉप्युलर प्रकाशन मुंबई / रु. ८० [पृष्ठ १८०]
महाराणी पद्मिनी : रघुवीरसिंह राजपूत / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ५५ [पृष्ठ १५४]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अग्निपुष्प : रेखा बैजल / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४० [पृष्ठ १३१]
पाच ग्रामीण नाटिका : रा. रं. बोराडे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. २० [पृष्ठ ७७]
रानखळगी : भीमराव वाघचौरे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ७० [पृष्ठ १८०]
आमदार सौभाग्यवती : रा. रं. बोराडे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ३५ [पृष्ठ १११]
कायापालट : बाबा भांड / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. १५ [पृष्ठ १०५]
चौफेर : माधव गडकरी / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ८५ [पृष्ठ ३१७]
अलकनंदा सुरेश द्वादशीवार / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ३५ [पृ. ९०]
तिमिरभेद : संपादक डॉ. अंजली सोमण / मनोविकास प्रकाशन, मुंबई / रु. २२ [पृ. ११३]
एक अविस्मरणीय माया : गंगाधर महांबरे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ३५ [पृ. ७२]
सदेव लग्नं सुदिनं तदेव / जयवन्त काकडे / सुचित्रा जयन्त काकडे, वरोरा / रु. २५ [पृ. ११५]
मराठी साहित्यातील ययाती / मा. व्यं. गिरिधारी / विभा प्रकाशन, नाशिक / रु. ४० [पृ. ११७]
वैनेचे वारे / हिरामण लांजे / विवेक प्रकाशन, बुधेवाडा / रु. २० [पृ. ९३]
हा घोडा हे मैदान / नीलकंठ महाजन / शिल्प प्रकाशन, जळगाव / रु. ४५ [पृ. १३७]
नाटककार अत्रे / वसुंधरा देवस्थळी / वसुंधरा देवस्थळी, मुंबई / रु. ८० [पृ. २४५]
कुसुमाग्रज—शिरवाडकर एक शोध / डॉ. दत्तात्रय पुंडे / मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे / रु ६० [पृ. १९६]
दीप उजळे आमुच्या घरी : मूळ कन्नड लेखक डॉ. हा. मा. नायक, अनुवाद—एस. जी. पाटील / मुंबई विद्यापीठ, कन्नड विभाग / रु. ३२ [पृ. ७९]
शिवाजी-मल्लमाजी समरोत्सव एक मध्ययुगीत हस्तप्रत : शेषोनिवास / संपा. डॉ. के. न. चिटणीस / मुंबई विद्यापीठ कन्नड विभाग / रु. ३२ [पृ. ७७]
अलिबाबाची गुहा : दिलिप वि. चित्रे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. २५ [पृ. ५६]
कुसुमाग्रज गौरव : माधव गडकरी / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. २५ [पृ. ४६]
गुलाल : श्रीकृष्ण राऊत / शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर / रु. १० [पृ. ५०]
अंतरीच्या कळा : ज्ञानेश्वर साधु / र. मो. जयस्वाल / वि. सा. संघ, शाखा, वणी / रु. २५ [पृ. ७६]
पुन्हा यावे ज्ञानेश्वरा : रा. सो. सराफ / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. २७–५० [पृ. १९२]
इस्पितळ, पतंग उडविणारा माणूस : सुकन्या आगाशे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. २७–६० [पृ. १९२]
मी एक न्यायाधीश : प्र. ना. बेहरे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६० [पृ. १७८]
आम्ही डिंका : कल्पना गोसावी–देसाई / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ७० [पृ. १७८]
विसाव्या शतकातील महाराष्ट्र—खंड २ रा : य. दि. फडके / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ९० [पृ. ३४४]
संक्रमण एकांकिका संग्रह : राज काझी / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. १८–४५ [पृ. ११३]
रॅंडरेस : पंकज कुरूळकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. ६० [पृ. १५५]
हुंदका : प्रा. बाबुराव गायकवाड / स्वयंदीप प्रकाशन, मुंबई / रु. १५ [पृ. ५९]

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. उ. रा. गिरी : अर्थ आणि प्रतिमांचे अतूट नाते

: प्रा. मदन कुलकर्णी

कविवर्य उ. रा. गिरींना जाऊन तीन वर्षे होत आहेत. कविवर्य गिरींचा पहिला कविता संग्रह 'मी एकटा निघालो' १९८३ यावर्षी, तर 'चांद्रायणी' हा दुसरा कवितासंग्रह १९८४ मधे प्रसिद्ध झाला. 'कल्पना' हा त्यांचा आगामी कवितासंग्रह होता. गिरींची कविता तशी सौंदर्य-वादी कविता आहे. तांबे बोरकर, पाडगावकरांच्या वाटेवरून प्रवास करणारी ही कविता आहे. निसर्ग आणि प्रेम याबरोबरच सभोवतीच्या जीवनाचाही क्वचित ती वेध घेताना आढळते. म्हणूनच एकीकडे–

रात धुंदीसह सरे
सरे उन्मादवैभव
आता पहाट वाऱ्यात
लागे दर्वळू मार्दव...(रात धुंदीसह सरे)

अशी भावावस्था असलेला हा कवी दुसरीकडे

साऱ्याच चौकटी ह्या, आल्या तुटावयाला
सारेच फोड आता, आले फुटावयाला...
(साऱ्याच चौकटी ह्या)

अशी सामाजिक जाणिवही व्यक्त करताना आढळतो. त्याचबरोबर हे लक्षात येते की 'ते आपल्या मार्गावरून एकटेच निघालेत' असे म्हणत असले तरी रसिकांचा थवा त्यांच्या काव्यप्रवासात नेहमीच त्यांच्या बरोबर राहिला आहे आणि जरी आज गिरी या जगातून एकटेच निघून गेले असले तरी त्यांच्या कवितेला त्यांच्या रसिकांची सोबत नेहमीच राहणार आहे.

त्यांच्या 'मी एकटा निघालो' या कवितासंग्रहाचा जरी विचार केला तरी त्यांच्या काव्याचे वैशिष्टय रसिकांच्या सहज नजरेला यावे असे आहे. गिरींच्या कवितेत प्रेम आणि निसर्ग यांचे सायुज्य आढळते असे विधान केले तर चूक ठरू नये. त्यांची निसर्गासह अवतरणारी कविता प्रेमभावनेने ओथंबलेली असते. त्यापैकी काही कवितांचा येथे उल्लेख करणे योग्य ठरेल.

स्नातकुंतला रात ठिबकती
कनक काजव्यांची तू चमचम
जलवंतीची स्वप्ने फेनिल
तू अमृतधारांची रुमझुम
(कोरडाच मी ओठ परंतु)

किंवा

कर सैल हे गळयातील
करपाश रेशमांचे
ओतुन गीत जा तू
ओठात अमृताचे (कर सैल तू गळयातील)

किंवा

आज तुझ्या नजरेत दाटले धुंद चांदणे निळे
अन् माझ्याही मनात केले चंद्राने गऽ खळे !!
(खळे)

किंवा

रात्री शहारणारी
रानात रत्न गुंफा
दिवसा प्रकाशणारा
वेडाच चंद्र होता...(या जीवनास केव्हा)

किंवा

अजुन काप-या जळात–प्रतिबिंबित आठवणी
अजुन विराणी तळात – गात कुणी जलराणी
एक कहाणी विझली – मूक नदीकाठावर !
मज कळले 'तू माझी' – पण सगळे घडल्यावर !
(पण सगळे घडल्यावर)

या कवितांमधील भावमाधुर्य लक्षणीय आहे. या प्रेमकवितांना वासनेचा स्पर्श नाही.

निसर्ग हा गिरींच्या कवितेतून वारंवार आपले अस्तित्व जाणवून देत असतो. 'शरदामधली पहाट ये', 'पहाट', 'चांदणे चैत्रातले', 'शिशिर', 'आली लाजत संध्याकाळ', 'बाधा'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा कितीतरी कवितांमधून हा निसर्ग स्वतंत्रपणे येतो आणि आपल्या व्यक्तित्वाचा ठसा रसिक-मनावर उमटवून जातो.

त्यांच्या निसर्ग कवितामधून 'चंद्र' आणि 'श्रावण' या निसर्गघटकांवर त्यांचे फार प्रेम असल्याचे सतत जाणवत राहते. 'श्रावण' कवितेतील– 'नुकतीच ओसरली

आहे श्रावणाची सर
गीत ओतुन सुगंधी
हिर्व्या ओल्या शेल्यावर.' या ओळींनी

सुरू होणारी कविता जेव्हा –

'नुकताच ओसरला
आहे रेशमी शिखा
आता पिवळ्या उन्हात
उभा श्रावण हिरवा !' या ओळींनी संपते

तेव्हा चित्रकाराने एक निसर्ग प्रतिमा चित्रबद्ध करावी, तसा हा गिरींचा 'श्रावण'– रसिकमनातील 'श्रावणा'ला अधिक सुंदर करतो. 'लाडक्या श्रावणसरी', 'श्रावणातल्या कविता' गिरींचे श्रावणप्रेम व्यक्त करतात. त्यांना शरदाबद्दल जसे प्रेम आहे तसे शिशिराबद्दलही आहे.

पण प्रेम आणि निसर्गामध्येच हा कवी गुरफटलेला नाही. त्याचे सामाजिक भानही जागे आहे. शिवाय या सामाजिकतेला भावनेचा स्पर्श आहे. 'वाढा भाकर बाई', 'मुत्सद्दी' 'श्रीमंत सूर्य अमुचे', 'चौकटी' या कविता वाचकांचे लक्ष वेधतात.

गिरींच्या कवितेत परतत्त्वाचाही स्पर्श झालेला आहे. 'वावटळ'; 'मी एकटा निघालो', 'दु:खोपनिषदाचा आततायी अध्याय.' 'शोध' या अशा काही कविता आहेत. त्यांच्या 'वावटळ' मधील–

'उधळून इथे – तिथे
सोनपाचोळा पिवळा
गेला क्षितीज भेदून
झोत चैतन्याचा भोळा !!'
या ओळींमधून

किंवा

'अरे शोधू जाता तुला
मीच मला सापडलो
तुझ्या कृपा–काळोखात
स्वयं प्रकाशाने न्हालो'

या 'शोध' कवितेतील ओळींवरून याची साक्ष पटते.

गिरींच्या कवितांचे अजून एक वैशिष्टय म्हणजे त्यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी होय. त्यांच्या काव्यात जशी निसर्गविषयक प्रतिमांची लयलूट आढळते तशीच सांगितिक प्रतिमांची समृद्धताही आढळते. ह्या प्रतिमा केवळ यमक; अनुप्रासाच्या सहकार्यासाठी आलेल्या नाहीत तर त्यांना असलेल्या संगीत–विषयक ज्ञानातून संगीत विषयक अनुभूतीतून आलेल्या आहेत. काव्यानुभूती आणि संगीतानुभूतीचे सायुज्य कवीच्या मन:कोषात घडून नंतर त्यांचा काव्याविष्कार झालेला असल्याने त्यांना अर्थवत्ता प्राप्त झाली आहे. तसे घडले नसते तर त्या प्रतिमा कृतक प्रतिमा ठरल्या असत्या. त्यांचे उपरेपण रसिकांना जाणवले असते. पण असे गिरींच्या बाबतीत घडत नाही. कारण काव्यातून अभिव्यक्त होणारी भाववृत्ती आणि तत्संबद्ध अभिव्यक्त होऊ पहाणारी संगीतविषयक प्रतिमेची अनुभूती यांचे मन:कोषातील रसायन त्यांच्या कवितेतून शब्द-रूप घेताना आढळते. कवितेतील भावना आणि संगीत प्रतिमांमागील कल्पनाव्यूह यांच्यातील मानसशास्त्रीय अनुबंधही गिरी फार सुंदरतेने साधतात. त्यामुळे अर्थ आणि प्रतिमा यांचे अतूट नाते सतत जाणवत राहते.

त्यांच्या कवितेतून जयजयवंती, मल्हार, चंद्रकंस, मारवा, गांधार, जोगिया, केदार, वसंत–बहार, मारूबिहाग, कजरी इत्यादी गानप्रकारांचे संदर्भ येतात आणि मूळ काव्यानुभूतीची रंगत वाढवतात. याबरोबरच तराणा दादरा, दीपचंदी, इत्यादी 'ताल' तार, मंद्र सप्तक, खर्ज, षड्ज, वर्ज्य इत्यादी स्वर, तसेच अन्य संगीत-विषयक संज्ञाही येतात. त्यामुळे या शब्दाची जाण असेल तरच गिरींच्या काव्याचा आनंदास्वाद घेणे अधिक चांगल्याप्रकारे शक्य होते.

गिरींची कविता अशी वेगळ्या भावविश्वात घेऊन जाणारी कविता आहे. जरी उ. रा. गिरींनी–

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नच वाचवे तयांना – गाथा कफल्लकाची
माझ्याहि अक्षरांना–मरता कधी न आले...
(कधी न आले)

किंवा आपल्या काव्यपुष्पांना–
'स्पर्धेत हारलेली – माझी फुले बिचारी...'

असे म्हटले असले तरी हे त्यांचे अभिप्राय दशकापूर्वीचे म्हणजे १९८० मधील आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. खरे तर त्यांनीच आपल्या कवितेचे वैशिष्टय अधिक सुंदर शब्दांत वर्णिलेले आहे.

माझी कविता इवले
एक निळे तृणफूल...
माझी कविता तयाचा
चमकता रत्नयेंव...
माझी कविता देखणे
लाजलेले ओले ऊन
तुजऐसे हे कुलीन....
(माझी कविता)

'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या तीन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, प्रथम आपल्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा–लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्यात झालेला बदल; कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी, शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा; संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या यादीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिपण

" जुन्या मराठी शब्दांच्या पुनरुज्जीवना "च्या निमित्ताने-

: ना. व्यं. देशपांडे

'युगवाणी'च्या जाने-मार्च १९८९ च्या अंकात श्री. वा. के. लेले, मराठी विभाग, बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी यांनी 'जुन्या मराठी शब्दांचे पुनरुज्जीवन' या शीर्षकाखाली जे टिपण लिहिले आहे त्यामुळे त्यांनी एका महत्त्वाच्या पण उपेक्षित प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. 'लिखाणात एक प्रकारचा भरडपणा येत चालला आहे' ही त्यांची तक्रार खरीच आहे. आपल्याला जे व्यक्त करावयाचे आहे, ते अचूक, अर्थवाही आणि निःसंदिग्ध शब्दात मांडण्यासाठी शब्दांचा अभ्यास पाहिजे. व्यासंग आणि परिश्रम या वाचून शब्दांवरील प्रभुत्व हस्तगत होणे कठीण. सध्याच्या धावपळीच्या आणि झटपट सार्थात्मिक जगात अभ्यास आणि व्यासंगाला फुरसत आहे कोठे ? तशात, मराठी भाषेबद्दलची उदासीनता सर्वत्र भरून राहिली आहे. खुद्द मराठी लेखक मराठीच्या भवितव्याबद्दल शंकेचे आणि निराशेचे सूर काढू लागले आहेत. इंग्रजी भाषेचे महत्त्व आणि आक्रमण याबाबत वास्तव दृष्टिकोन वाळगूनही मराठी भाषेच्या संवर्धनार्थ बरेच काहीसे करता येण्यासारखे आहे. त्यासंबंधी माझ्या काही कल्पना मांडू इच्छितो.

श्री. लेले म्हणतात की जुन्या व एके काळी रूढ झालेल्या शब्दांवरचा " धुरळा झटकून व त्यांच्यावर साचलेली काजळी निपटून त्यांना पुनः एकदा 'चलनी नाण्या'चे स्वरूप दिले की ते भाषेला जिवंत व रसरशीत बनवतात. जुन्या मराठीतील असे कित्येक शब्द सध्या जणू अडगळीत पडल्यासारखे असून ते पुनः प्रचलनाची आतुरतेने वाट बघत आहेत." हे त्यांचे विधान निर्विवादपणे मान्य करणे कठीण. 'जुने शब्द' म्हणजे कोणत्या काळातील व महाराष्ट्राच्या कोणत्या प्रदेशातील ? महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, कोकण, मध्य महाराष्ट्र, खानदेश, दक्षिण महाराष्ट्र या प्रदेशात नानाप्रकारचे वेगळेवेगळे शब्द, वाक्यसंप्रदाय प्रचलित आहेत. विदर्भातील 'कानकोंडेपणा' पश्चिम महाराष्ट्रातला 'संकोच' व दक्षिण महाराष्ट्रातला 'भिडस्तपणा' हे तीन्ही शब्द स्थूलमानाने एकाच अर्थाचे असले तरी विदर्भाशी फारसे दळणवळण नसलेल्या एखाद्या कोकणी माणसास समजणे कठीणच. तसेच कोकणात रूढ असलेला 'गजाली' हा शब्द, गोष्टीवेल्हाळ वैदर्भीयास समजणे कठीण. याशिवाय मराठी साहित्यात ग्रामीण आणि दलित वाङ्मयही चांगले बाळसे धरू लागले आहे. इतर जातीजमातीतही अनेक अर्थवाही शब्द व्यवहारात वापरले जातात. वास्तविक अशा सर्व शब्दांचा संग्रह तयार करणे अत्यंत निकडीचे आहे.

पण केवळ अशा शब्दकोषाने किंवा वाक्यसंप्रदाय कोशाने आपले भागणार नाही. शब्दकोषांत विवक्षित शब्दाचा अर्थ सापडेल (अथवा अनेक अर्थ सापडतील) शिवाय सामान्य वाचक व लेखकही प्रत्येक वेळी शब्दकोष उघडून पाहण्याचा कंटाळा करील. हे एक तर झालेच. पण मला मराठीतील

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शब्द परिचित आहे किंवा मला एक विशिष्ट संकल्पना एखाद्या सुटसुटीत, वेचक शब्दात मांडायची आहे. (उदा. श्री. लेले यांनी उद्धृत केलेल्या शब्दांतील 'त्रेसष्टी' हा शब्द. या शब्दावरोबरच 'छत्तीसाचा आकडा' हाही ध्यानात येतो.) तर मला शब्दकोश कसा उपयोगी पडणार ?

कित्येक शब्द कालौघात नष्ट झालेले आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत. 'घुपाटणे' या शब्दाचा नक्की अर्थ कुणास सांगता येईल ? आता खेडेगावातही पिठाच्या गिरण्या (चक्क्यां) सुरू झाल्यामुळे 'जाते' हा शब्दही साहित्यातून लवकरच जाईल.

इंग्रजी शब्द-अनेकदा चुकीच्या पद्धतीने-वापरण्याच्या सोसामुळे-किंवा मराठी भाषेच्या उपेक्षेमुळे अनेक अस्सल देशी शब्द आपण हरवून बसलो आहोत. 'Rusk' या इंग्रजी शब्दाला आपण 'संधिप्रकाश'; 'संध्यारजनी' असले शब्द वापरतो. एकदा कै. यशवंतराव चव्हाण यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात सुरवातीसच 'कडुसं पडलं होतं' हा शब्दप्रयोग वाचनात आला. वास्तविक मला हा शब्द नवीन नव्हता. (कवि गिरीश यांच्या 'भलरी' या कवितेतील 'कडुसं पडता संपल पाळी' ही काव्यपंक्ति आठवा.) पण न वापरल्यामुळे तो माझ्या स्मरणांतून निघून गेला होता. हा देशी शब्द पुनः भेटताच मला कोण आनंद झाला !

मराठीतील सर्व प्रकारचे शब्द एकत्र आणण्याची व आपणास हवा असलेला शब्द 'वेचण्याची' सोय करावयाची असेल तर एका वेगळ्या कोषाची निर्मिती होणे आवश्यक आहे. इंग्रजी भाषेत असा कोश उपलब्ध आहे. पीटर रोजेट (या नावाचे माझे उच्चारण निर्दोष असेलच असे नाही. इंग्रजी अक्षरे Peter Roget अशी आहेत.) याने Thesaurus of English Words and Phrases हा कोश रचला. तो १८५२ साली प्रसिद्ध झाला. त्याच्या आजतागायत सुधारित आवृत्या प्रसिद्ध होत आहेत. या कोशाला त्याने लिहिलेली सतरा पानांची प्रस्तावना मुळातूनच वाचावयास हवी. त्यावरून त्याच्या कल्पकतेची, व्यासंगाची, अथक परिश्रमाची व मातृभाषेवरील प्रेमाची कल्पना येते. शब्दांचे त्याने सहा विभागात वर्गीकरण केलेले आहे.

(1) Abstract Relations (2) Space (3) Material World (4) Intellect (5) Volition (6) Sentient and moral powers. या सहा विभांगात अंतर्भूत होतील असे शब्द त्याने एकत्र केले. त्या शब्दांचे समानार्थी, विरुद्धार्थी, वेगवेगळ्या अर्थच्छटा दाखविणारे शब्द, वाक्यप्रयोग गोळा केले. वरील विभागांचे त्याने उपविभाग पाडले. या उपविभागांना अनुक्रमांक दिले. या अनुक्रमांकाखाली त्याने समानार्थी व विरुद्धार्थी शब्द त्यांच्या वेगवेगळ्या छटा आमनेसामने (दुहेरी कॉलमात) छापले. असे एकूण एक हजार अनुक्रमांक (१९४८ ची आवृत्ती) आहेत. शिवाय वाचकास शब्द शोधणे सुकर व्हावे म्हणून जवळजवळ तीन ते चार पृष्ठांची शब्दसूची जोडली आहे. त्यात शब्दांची अकारविल्हे रचना केली आहे व त्यापुढे कंसांमध्ये संग्रहक्रमांक छापले आहेत, योग्य शब्दाची निवड करण्यासाठी साक्षेपी वाचक-लेखक- वक्ता यांची त्याने मोठीच सोय करून ठेवली आहे.

आपल्या प्रस्तावनेत तो म्हणतो : The communication of our thoughts by means of language, whether spoken or written, like everyother object of mental exertion, constitutes a peculiar art, which, like other arts, cannot be acquired in any perfection but by long and continued practice. Some, indeed, there are, more highly gifted than others with a facility of expression, and natutally endowed with the power of eloquence, but to none is it at all times an easy process to embody in exact and appropriate language the various trains of ideas that are passing through the mind, or to depict in their true colours and proportions the diversified and nicer shades of feeling which accompany them."


अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या या वैशिष्टयपूर्ण कोषाचे उद्दिष्ट व तो साध्या शब्दकोषाहून भिन्न कसा आहे. हे स्पष्ट करताना तो सांगतो. " The present work is intended to supply...a collection of the words it (इंग्रजी भाषा) 'contains and of the idiomaticc ombinations peculiar to it, arranged, not in alphabetic order as they are in a dictionary, but according to the *IDEAS* which they express."

हा अभिनव प्रयोग मराठी भाषेतही शक्य आहे. या कोषकारानेच पुढे नमूद केले आहे : " Nor would its utility be confined to a single language, for the principles of its construction are universally applicable to all languages, whether living or dead."

मराठीबाबत हे शक्य आहे. यात शंकाच नाही. आयुष्यभर पुरणारे हे कार्य आहे. महाराष्ट्रात विद्वानांची वाण एकेकाळी नव्हती. पण आता विश्वविद्यालयांची "बॉनसॉये" झालेल्या परिस्थितीत अशी अपेक्षा करणे कठीण आहे. असा प्रकल्प उभा करण्यास केवळ विद्वानांचेच नव्हे तर पैशाचे प्रचंड पाठबळ हवे. यासाठी केवळ शासनाकडे भिकाऱ्यासारखे तोंड वेंगाडण्यात अर्थ नाही. मराठी अस्मितेला ऊरबडवेपणापेक्षा काही अर्थ असेल तर सामान्य जनता देखील मदतीस धावेल. मात्र त्यासाठी पुष्कळ प्रचार करावा लागेल. 'साहित्य परिषदां'सारख्या प्रातिनिधिक संस्था यात पुढाकार घेतील काय ? मराठी विश्वपरिषद झाली त्या निमित्ताने अशा प्रकल्पाचा संकल्प आता तरी सोडला जावा अशी आशा व्यक्त करणे फोल होईल का ? ■

गंगा भवन ११३९ / ई साईक्स
एक्स्टेंशन कोल्हापूर ४१६००१



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी भाषा कशी लिहावी ?

: भा. व. निनावे

" खेड्यातील मराठी भाषिकांना मराठीपेक्षा हिंदीत बोलणे जास्त सोयीचे वाटते कारण त्यात व्याकरणाच्या विशेष चुका होणार नाहीत आणि आपल्या भाषेला कोणी हासणार नाही ह्याची त्यांना खात्री असते " प्रस्तुत लेखकाचे हे मत ग्राह्य मानल्यास मराठीच्या ऱ्हासाचीच बीजे धारण करणाऱ्या या समस्येचा आपण विचार करीत आहोत असे वाटते. यावर उपाय ?

संस्कृत हीच एक अशी भाषा आहे की जी जशी बोलली जाते तशीच लिहिली जाते. आणि ती प्रदेशपरत्वे बदलत नाही. इतर भाषांच्या बाबतीत असे आढळून येत नाही. बारा बारा मैलावर बोलभाषा बदलतात. मराठीचेच पहाना. महाराष्ट्रांत कोकणी, कोल्हापुरी, पुणेरी, खानदेशी वऱ्हाडी, नागपुरी अशा अनेक बोलभाषा आहेत. त्यामुळेच ज्ञानेश्वर महाराज आणि चक्रधरस्वामी यांच्या लेखनभाषा, त्यातील व्याकरण परस्पर भिन्न आढळून येते. ही गोष्ट कै. दादोबा तर्खडकर यांचे ध्यानात आली असावी, म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील बहुतांश बोलभाषांचा अभ्यास करून मराठी भाषेचे व्याकरण सिद्ध केले. त्यामुळे त्यांना 'मराठी भाषेचे पाणिनी' हे अभिधान प्राप्त झाले. त्यांचे व्याकरण त्या काळी मान्यही झाले. चिपळूणकर, टिळक, आगरकर, देशमुख ह्यांचे लिखाण तर्खडकरी व्याकरणाप्रमाणेच आहे. हरिभाऊ आपट्यांनीही आपल्या कादंबऱ्यांत ह्याच व्याकरणाप्रमाणे लेखन केले. त्यातील संवाद वा स्वगतं तेवढी बोलभाषेत लिहिली आहेत. ना. सी. फडक्यांनी मात्र लेखनपद्धतीत एक प्रकारे क्रांती केली. त्यांनी आपले सर्व लिखाण बोलभाषेत लिहिले. ही बोलभाषा त्यांनी पुणेरी वापरली. त्यानंतर अनेक मान्यवर साहित्यिकांनी त्यांचाच कित्ता गिरविला. मध्यंतरी प्रा. सोटे ह्यांनी वऱ्हाडी भाषेत काव्य रचिले. तरुण भारतात वऱ्हाडी भाषेत गोष्टी लिहिण्याची एक लाटच उसळली होती. ती आता शमल्यासारखी दिसते. गो. नी. दांनीही आपल्या काही कादंबऱ्यांत मधून मधून वऱ्हाडी भाषेचा वापर केला आहे. पण एकंदरीत वऱ्हाडी भाषेचा वापर फारच सीमित आहे. मात्र पुणेरी भाषेचा वापर आधुनिक वाङ्मयांत फार मोठ्या प्रमाणात आढळून येतो. पण त्यामुळे मोठ्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. त्याबद्दल भाषाविदांनी विचार करणे आवश्यक आहे, असे वाटते.

मुख्य समस्या आहे शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची. त्यांच्या क्रमिक पुस्तकात काही धडे तर्खडकरी व्याकरणाप्रमाणे तर काही धडे पुणेरी भाषेत आढळतात. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी कोणती भाषा व्याकरणशुद्ध समजावी ? अन् कोणत्या भाषेचा कित्ता गिरवावा ? कवितांच्या बाबतींतही हीच परिस्थिती दिसून येते. बहुतेक वृत्तबद्ध कविता तर्खडकरी व्याकरणाप्रमाणे रचिल्या जातात आणि मुक्तछंदी किंवा बेबंदी कविता पुणेरी भाषेत लिहिल्या जातात.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विद्यार्थ्यांनी कोणती भाषा योग्य वा ग्राह्य मानावी ?

फार कशाला, आपल्या एप्रिल-मे-जूनचा 'युगवाणी'चाच अंक पाहा. काही लेख तर्खंडकरांच्या व्याकरणाप्रमाणे तर काही लेख पुणेरी भाषेत. आहेत उदाहरणार्थ, प्रा. वामनराव चोरघडे यांचे लिखाण तर्खडकरी भाषेत आहे. त्यांचे "भावना" हे मुक्तछंद काव्यदेखील ह्याच भाषेत आहे. परंतु त्यांचेच कथाबीजाचे टिपण पाहा. त्यातील पहिला परिच्छेद पुणेरी भाषेत आहे नि दुसरा परिच्छेद तर्खंडकरी भाषेत आहे. श्री. मेश्राम ह्यांच्या 'खेळी' ह्या कथेत तर गंमत आहे. तींत तर्खडकरी, पुणेरी आणि वऱ्हाडी ह्या तीनही भाषांचे मिश्रण आहे.

आधीच मराठी भाषा 'त्रिलिंग' असल्यामुळे आणि लिंगप्रमाणे क्रियापदांचे रूप बदलविणे आवश्यक केल्यामुळे परभाषिकांना ती शिकणे-बोलणे अत्यंत कठीण झाले आहे. वऱ्हाड-नागपूरकडे पूर्वी द्विलिंग भाषा वापरल्या जात असे-खेड्यापाड्यांतून अजूनही अशी भाषा काही प्रमाणात वापरली जाते. स्त्री-पुरुष दोघेही "मी गावाला जातो"; "तो पुस्तक माझा आहे" असे बोलतात पण हे बोलणे अर्थातच तर्खडकरी व्याकरणाप्रमाणे बरोबर नाही. त्यामुळे खेड्यातील मराठी भाषिकांना मराठीपेक्षा हिंदीत बोलणे जास्त सोयीचे वाटते कारण त्यात व्याकरणाच्या विशेष चुका होणार नाहीत आणि आपल्या भाषेला कोणी हासणार नाही ह्याची त्यांना खात्री असते.

दि. ९ ऑक्टोबर ८९ च्या दैनिक तरुण भारतात दिल्ली निवासी एका मराठी भाषिकानेदेखील मराठी भाषेतील शुद्धलेखनाविषयी नि अनुस्वारांच्या गोंधळाविषयी आपली व्यथा मोठ्या पोटतिडकीने व्यक्त केली आहे. 'केलं, गेलं, झालं' ह्यांचा उच्चार 'केलम्' गेलम्' 'झालम्' असा का करू नये असा त्यांनी मोठा मार्मिक प्रश्न उपस्थित केला आहे.

वरील प्रकारच्या मराठी भाषा लेखन पद्धतींतील गोंधळामुळे मराठी भाषा परभाषिकांना अवगत करणे फारच दुरापास्त झाले आहे. ह्याचा विचार भाषाविदांनी करावा आणि बोलभाषा नि लेखन भाषा एकच करावी की भिन्न करावी आणि करायची असल्यास कोणत्या बाबतीत भिन्न करावी; बोलभाषा वापरायची असल्यास ती कोणती म्हणजे कोल्हापुरी-पुणेरी खानदेशी वऱ्हाडी इत्यादि बोलभाषांपैकी कोणती बोलभाषा वापरावी, त्यांचे काही व्याकरण तयार करता येईल का, इत्यादि प्रश्नांवर भाषाविदांनी विचार विनिमय करून निर्णय घ्यावेत म्हणजे विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकणे आणि नवीन साहित्यिकांना व्याकरणशुद्ध भाषेत साहित्याची निर्मिती करणे शक्य होईल अन्यथा मराठी भाषेस अवगत करणे विद्यार्थ्यांना व परभाषिकांना अत्यंत अवघड झाले आहे. ह्याचा विचार भाषाविदांनी तातडीने केला पाहिजे. बोलभाषा नि लेखनभाषा एकच असावी की भिन्न असावी, आणि भिन्न असावी असे ठरविल्यास कोणत्या बाबतीत भिन्न असावी, बोलभाषा वापरायची असल्यास ती पुणेरी, वऱ्हाडी की खानदेशी किंवा इतर कोणती, किंवा कोणतीही वापरावी, ह्याबद्दल काही नियम करता येईल का, मराठी शुद्धलेखनाचे नवीन व्याकरण सिद्ध करता येईल का इत्यादि प्रश्नावर मराठी भाषाविदांनी शीघ्रातिशीघ्र विचारविनिमय करून निर्णय घेणे इष्ट होईल असे मनोमन वाटल्यामुळेच हा लेखन प्रपंच. ■

ॲडव्होकेट / भंडारा

... युगवाणीतून व्यक्त व्हावे
शब्दांच्या पलीकडले.

... शब्दमाध्यमेतर कला,
कलाकृती आणि कलावंत
युगवाणीतून
'व्यक्त' व्हावे.

... युगवाणीस हवे आहे
संबंधित समर्थ लिखाण !

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत. या व्यतिरिक्तही इतर विषयांवर देखील.

---

१. अलौकिकतावाद, लौकिकता आणि रसव्यवस्था
२. वाङ्मयीन अनास्थेची सामाजिक-राजकीय मीमांसा
३. शासन, साहित्यिक आणि बांधिलकी
४. सफदर हाश्मी
५. पथनाट्याचे माध्यम स्वरूप
६. मराठी नियतकालिकांची अस्तंगतता
७. निखळ वाङ्मयीन नियतकालिके
८. लिटिल मॅगझीन : भूमिका, कार्य आणि भविष्य
९. विजय तेंडुलकर
१०. साहित्यातील प्रचार आणि प्रचार-साहित्यातील साहित्य
११. महेश एलकुंचवार
१२. सौ. जयश्री थत्ते–भट
१३. सत्यदेव दुबे
१४. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रातील संवाद-संकल्पना
१५. साहित्यातील संवादाचे संवादशास्त्रीय स्वरूप
१६. कलाप्रकारांचे परस्परसंबंध
१७. हुसेन
१८. हेब्बर
१९. रझा
२०. अमृता शेरगिल
२१. स्ट्रक्चरॅलिझम
२२. बिहेविअर स्कूल
२३. मराठी साहित्याचे जागतिक संदर्भातील थिटेपण आणि मोठेपण
२४. अनुवादित मराठी साहित्य
२५. मराठी कवितेची संख्यात्मकता आणि गुणवत्ता
२६. लोकशाहीचा वाङ्मयीन–कलाविषयक अभिरुचीवरील परिणाम
२७. गजल : मराठी आणि मराठी व्यतिरिक्तची
२८. सुरेश भटांची गजल
२९. ग्रंथालय चळवळीचा वाङ्मयीन–कला-विषयक अभिरुची वृद्धीवरील परिणाम : शक्यता आणि वस्तुस्थिती
३०. ग्रंथाली, ग्रंथलालसा व ग्रंथव्यवहार
३१. अॅन रॅंड
३२. वर्ड प्रोसेसर आणि भारतीय लेखक
३३. भारतीय लेखक संघटना
३४. वाङ्मयीन पारितोषिके : नकार की स्वीकार
३५. प्रस्तावना : प्रयोजन आणि आन्हिक
३६. मराठी नियतकालिकांचे धोरणहीनत्व
३७. शांतारामा
३८. उत्तरकर्तव्योन्मुखतेतील कलाव्यवहार्यता
३९. कविता : स्त्रियांची
४०. क्रांतिकाव्याची भाषा
४१. कलावंताच्या सांस्कृतिक नात्याचे निर्मितीवरील परिणामाचे स्वरूप
४२. पोस्टरी पोएट्री आणि मराठी
४३. कथेतील कथा
४४. आनंद जातेगावकरांची कथा
४५. उद्धव शेळक्यांची कादंबरी
४६. शाहीर अमरशेख
४७. अण्णाभाऊ साठे
४८. बाबूराव बागूल
४९. डॉ. आनंद यादव
५०. प्रभाकर उर्ध्वरेषे
५१. ना. के. बेहेरे
५२. अस्मितादर्श
५३. अक्षर वैदर्भी
५४. समुचित
५५. उगवाई
५६. निकाय आणि दलित साहित्याला वाहिलेल्या इतर नियतकालिकांची वस्तुस्थिती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'विसाव्या शतकातील महाराष्ट्र : १९०१–१९१४' : खंड १ ला /

डॉ. शांता कोठेकर

भारताच्या संघराज्यातील एक प्रशासकीय घटक या दृष्टीने महाराष्ट्राची संकल्पना ही अगदी अलीकडची, म्हणजे जेमतेम एकोणतीस वर्षांची असली, तरी मराठी संस्कृती रुजलेला, मराठी अस्मिता बहरलेला मराठी भाषी लोकांचा प्रदेश ह्या अर्थाने महाराष्ट्राचे अस्तित्व मध्ययुगातही आढळून येते. ही मराठी अस्मिता सांस्कृतिक क्षेत्रात ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, समर्थ आदींच्या रूपाने, तर राजकीय क्षेत्रात शिवाजीच्या रूपाने आविष्कृत झाली. अठराव्या शतकात महाराष्ट्राबाहेरील काही प्रदेशातही तिचे बीजारोपण झाले. एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात पेशवाईचा अस्त झाला आणि त्याबरोबर मराठी अस्मितेच्या राजकीय आविष्काराचा अंत झाला. परंतु त्यामुळे मराठी अस्मिता मात्र नष्ट झाली नाही. अव्वल इंग्रजी राजवटीतील बदललेल्या परिस्थितीत ती नव्या रूपाने फुलू लागली. त्यामुळे स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात महाराष्ट्रीय नेतृत्व आघाडीला राहिले. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास शब्दांकित होणे मराठी मनाला अगत्याचे वाटते. हा आजवर काहीसा दुर्लक्षित राहिलेला उपक्रम हाती घेतल्याबद्दल महाराष्ट्राचे ख्यातनाम लेखक प्रा. डॉ. य. दि. फडके आणि प्रकाशक सासवड आश्रम विश्वस्त मंडळ यांचे महाराष्ट्राने मन:पूर्वक आभारच मानायला पाहिजेत.

आजवर आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाशझोत टाकणारे लिखाण झाले नाही असे नाही. या दृष्टीने पाध्ये–टिकेकर ह्या लेखकद्वयांचा 'आजकालचा महाराष्ट्र', ग. त्र्यं. माडखोलकर यांचा 'आधुनिक महाराष्ट्राचा वारसा', ग. त्र्यं. सरदार यांचा 'महाराष्ट्र जीवन' इत्यादी काही ग्रंथ निश्चितच उद्बोधक आहेत. परंतु ह्या ग्रंथांत एक तर महाराष्ट्राचा सलग, सुसंगत, सर्वांगीण व सविस्तर इतिहास ग्रथित झालेला नाही; आणि काही ग्रंथ लेखसंग्रहाच्या स्वरूपाचे असल्यामुळे एकाच लेखकाच्या लेखणीतून उतरलेल्या लिखाणात आढळणारी आणि परिणामकारकतेच्या दृष्टीने आवश्यक असलेली विचारांची दृष्टिकोनाची सुसंगती त्यात आढळत नाही. व्हिन्सेंट स्मिथ ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश इतिहासकाराच्या मते इतिहास–लेखन परिणामकारक होण्यास त्यातून एकच दृष्टिकोन प्रतीत होणे आवश्यक असते. एकाच ग्रंथातून परस्पर विसंगत विचार व्यक्त झाल्यास सामान्य वाचक संभ्रमाच्या आवर्तात गटांगळ्या खाऊ लागतो. ह्याचे अलीकडील एक बोलके उदाहरण म्हणजे मराठ्यांचा पंचखंडात्मक इतिहास. याचा तिसरा खंड हा होय. सुदैवाने डॉ. फडके यांनी व्यापक व खोल संशोधन करून अतिशय परिश्रमपूर्वक आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचा भव्य प्रकल्प आपल्या एकट्याच्याच समर्थ शिरावर घेतला असल्यामुळे त्यात विचारांची व दृष्टिकोनाची सुसंगती राहिलेली आहे. म्हणून हा त्यांचा ग्रंथ परिणामकारक ठरतो. ह्या प्रकल्पाच्या पूर्ततेतील नानाविध अडचणींचा निर्देश लेखकाने आपल्या प्रस्तावनेत केला आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या संशोधकांना त्यांची पुरेपूर जाणीव आहे. त्या सर्व अडचणींवर मात करून त्यांनी ह्या प्रकल्पाचा श्रीगणेशा केला आणि त्यांचे हे संशोधनपूर्ण लिखाण जिज्ञासू वाचकांपर्यंत पोचविण्याची जबाबदारी सासवड आश्रम विश्वस्त मंडळाने उचलली ह्याबद्दल महाराष्ट्रीय वाचक त्या दोहोंचेही ऋणी राहतील.

प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेत लेखकाने आपल्या प्रकल्पाचा संकल्पित आराखडा आणि प्रस्तुत विषय हाताळण्याची त्यांची योजना विशद केली आहे. १९०० ते १९८० पर्यंतच्या आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाची सहा खंडात विभागणी करण्याची त्यांची योजना असून प्रस्तुत खंड हा त्याचा पहिला भाग आहे. हा प्रामुख्याने राजकीय इतिहास असला तरी तो अव्वल आंग्लाईतील नानाविध सामाजिक समस्या व आर्थिक हलाखीच्या पार्श्वभूमीवर लिहिण्याचा त्यांचा मानस निश्चितच समर्पक आहे. कारण राजकीय इतिहास

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हटला तरी तो समाजकारणाशी व अर्थकारणाशी निगडीत असतोच.

प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या दोन प्रकरणांत लेखकाने, विसाव्या शतकाच्या आरंभीचे महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक विचारप्रवाह व घटना यांचे स्पष्ट आकलन व्हावे म्हणून एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकला आहे. 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र' ह्या पहिल्या प्रकरणात, पेशवाईच्या अस्तानंतर महाराष्ट्रात पसरलेले औदासिन्य, पण त्याबरोबर नव्या ब्रिटिश राजवटीबद्दलचे काहीसे समाधान, जुनी अर्थव्यवस्था मोडून त्या जागी सुरू झालेले नवे उद्योग, भांडवलदारांचा उदय, शेतकऱ्यांची आर्थिक हलाखी व त्यातून उद्भवलेली सशस्त्र बंडे, वासुदेव बळवंतांचा सशस्त्र उठाव, पाश्चात्य शिक्षणाबरोबर होऊ लागलेले नव्या उदारमतवादी विचारांचे बीजारोपण, त्यामुळे निर्माण झालेली सामाजिक समस्यांची जाण व त्या हाताळण्यासाठी प्रस्थापित झालेल्या संघटना, ज्योतीराव, सार्वजनिक काका, न्या. रानडे यांनी चालविलेले समाज सुधारणा कार्य, यांचा आढावा घेण्यात आला आहे; तर दुसऱ्या प्रकरणात चिपळूणकर, टिळक, इत्यादींनी केलेले राजकीय प्रबोधनाचे कार्य, राष्ट्रीय सभेची स्थापना, तिच्या कार्याचे स्वरूप, रॅण्डची हत्या चाफेकर बंधूचे हौतात्म्य आणि राष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर टिळकांचा उदय इत्यादी विषयाचा म्हणजेच एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या राजकीय जागृतीचा व कार्याचा सनदशीर व सशस्त्र चळवळीचा इतिहास शब्दांकित झाला आहे. एकूण ही पहिली दोन प्रकरणे मुख्य विषयाची पार्श्वभूमी तयार करणारी आहेत.

'काँग्रेसच्या नेतृत्वाखालील स्वराज्याची चळवळ' ह्या तिसऱ्या प्रकरणापासून मूळ विषयाच्या प्रतिपादनाला सुरुवात होते. १९०१ ते १९१४ ह्या काळातील महाराष्ट्रातील काँग्रेस संघटनेच्या कार्याचा आढावा तसेच राष्ट्रीय संघटनेतील दादाभाई नौरोजी, फिरोझशहा मेहता; बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी

ग्रां थि की

नामवंत महाराष्ट्रीय नेत्यांच्या कार्याचे विवेचन आले आहे. मेहता गटाचा टिळकांच्या वरील रोष, टिळकांचा वाढता प्रभाव ह्या दोन्ही गटातील वाढता तणाव, जहाल व मवाळ गटांना सांधण्याचा दादाभाईंनी केलेला प्रयत्न, शासनाच्या बेमुर्वंतखोर प्रतिगामी धोरणामुळे जहाल गटाला मिळालेले तरुण गटांचे समर्थन व जहाल-मवाळ तणावाचे सूरत येथे काँग्रेस दुभंगण्यात झालेले पर्यवसान; त्यानंतरही काँग्रेस सांधण्यास टिळकवाद्यांनी केलेले प्रयत्न, टिळकांवरील इतिहासप्रसिद्ध खटला, त्यांना सुनावण्यात आलेल्या शिक्षेचे कामगारवर्गात उठलेले पडसाद, टिळकांच्या कारावासाच्या काळात काँग्रेसवर आलेली मरगळ आणि ना. गोखल्यांचे कार्य हा सर्व या प्रकरणात आलेला तपशील फारसा नवीन नसला तरी परिणामकारकपणे मांडला गेला आहे. विशेष लक्षणीय मुद्दा म्हणजे, सुरत काँग्रेसच्या वेळी काँग्रेसची शकले होऊ नयेत म्हणून मोतीलाल घोषांच्या सूचनेनुसार अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी झालेल्या रणधुमाळीची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेण्यास टिळकांनी दिलेली मंजूरी. हा तपशील नवा असून तो टिळकांच्या मोठेपणात भर टाकणारा आहे. काँग्रेस यावेळी फुटण्यास टिळक जबाबदार होते हा त्यांच्यावर अनेकांकडून लावण्यात येणारा आरोपही त्यामुळे धुवून निघतो.

चवथ्या 'समांतर राजकीय चळवळी' ह्या प्रकरणात भारतीय मुस्लीम समाजात यासुमारास प्रादुर्भूत झालेल्या राजकीय आकांक्षा, त्यातून जन्माला आलेली मुस्लीम लीग ही मुस्लीम राजकीय संघटना, ह्या संघटनेने अंगिकारलेला पृथक्वाद व राष्ट्रीय चळवळीपासून मुस्लीमांना दूर ठेवण्याचा ह्या संघटनेने केलेला प्रयत्न, तसेच महाराष्ट्रातील मुस्लीम मनावर ह्या विचारांचा फारसा न बसलेला पगडा ह्याचे विवेचन आले

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. त्यापेक्षाही अधिक उद्‌बोधक विवेचन लेखकाने त्याकाळातील महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या ब्राम्हणेतर चळवळीचे केले आहे. वेदोक्त प्रकरण व ताई महाराज प्रकरण, यातून छत्रपती शाहू महाराज व टिळक यांच्यात निर्माण झालेला बेबनाव, छत्रपती शाहू महाराजांच्या नेतृत्वाखालील ब्राम्हणेतर चळवळ व सत्य शोधक चळवळीचा परस्पर संबंध, ज्योतीबांच्या मूळ विचारांचा त्यांचे काही शिष्य करू लागलेला विपर्यास, त्यावर त्यांचे निकटचे सहकारी स्वामी अय्यावारू यांनी केलेले प्रहार, या सर्व विवेचनातील काही तपशील वाचकांना नवा वाटावा असा आहे. मात्र ह्या काळात महाराष्ट्रातील अब्राम्हण चळवळीच्या राजकीय आकांक्षा जागृत झालेल्या असल्या तरी ती चळवळ राजकीय चळवळ बनली नव्हती. त्यामुळे ह्या चळवळीचा राजकीय चळवळीच्या प्रकरणात झालेला अंतर्भाव काहीसा खटकतो.

ह्या ग्रंथाचे पाचवे आणि अखेरचे प्रकरण महाराष्ट्रातील सशस्त्र चळवळीचा सविस्तर परिचय करून देणारे आहे. या प्रकरणातही सामान्य वाचकांना ठाऊक नसलेला असा काही तपशील आढळतो. यावेळी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सशस्त्र प्रतिकाराची प्रेरणा देणाऱ्या गुप्त संघटना स्थापन झाल्या होत्या. त्यात 'अभिनव भारत' ही गुप्त संघटना अग्रगण्य होती. ह्या सशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीचा परिचय तपशीलात करून देत असताना लेखकाने त्या चळवळीचे अनेक पदर समर्थपणे उलगडून दाखविले आहेत. उदा. ह्या संघटनांच्या कार्यकर्त्यांना जपान, इटली, रशिया इत्यादी देशांपासून मिळालेली स्फूर्ती, टिळकांच्या जहाल गटाचा क्रांतिकारकांशी असलेला संबंध. महाराष्ट्रीय क्रांतिकारकांचा प्रांताबाहेरील व देशाबाहेरील क्रांतिकारकांशी असलेला संपर्क, त्यांना बडोदा व ग्वाल्हेरसारख्या संस्थानातून मिळणारी मदत इत्यादी. महाराष्ट्राच्या ह्या काळच्या राजकीय इतिहासातील सशस्त्र प्रतिकाराची चळवळ हे नेत्रदीपक व रोमहर्षक असलेले प्रकरण लेखकाने अतिशय संशोधनपूर्वक हाताळले आहे. मुख्य म्हणजे सनदशीर राजकीय चळवळींपासून महाराष्ट्रात अब्राम्हण बहुधा दूर राहिले असले, तरी सशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीत मात्र ब्राम्हणांच्या खांद्याला खांदा लावून अब्राम्हणही कार्य करीत होते हे लेखकाने स्पष्टपणे नमूद केले आहे.

प्रत्येक प्रकरणाच्या अखेरी दिलेली संदर्भ टीपांची यादी व ग्रंथाच्या अखेरी दिलेली साधन सूची, विषय सूची व व्यक्तिनामसूची, यामुळे प्रस्तुत ग्रंथाच्या विश्वसनीयतेत भर पडली आहे. लेखकाने केलेल्या गाढ अध्ययनाची आणि केलेल्या कठोर परिश्रमाची त्यावरून साक्ष पटते. वरील सर्व सूची पुरविल्यामुळे चिकित्सक वाचकांच्या, अभ्यासकांच्या व संशोधकांच्या दृष्टीने हा ग्रंथ मोलाचा ठरतो.

प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणातील लेखकाची काही विधाने मात्र इतिहास अभ्यासूंना खटकणारी वाटतात. उदाहरणार्थ पृष्ठ दोन वरील तिसऱ्या परिच्छेदातील, "रावबाजींच्या नाकातील बाल बनलेल्या त्रिंबकजी डेंगळ्याने बडोद्याच्या फत्तेसिंग गायकवाडांचे वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन यांच्यावर मारेकरी घातले"; हे विधान लेखकाने ह्या विषयावरील अलीकडचे संशोधनपर लिखाण ध्यानात घेतले नाही असे दर्शविते. त्रिंबकजी डेंगळे यांनी मारेकरी घातले हा त्यांच्यावर तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केलेला हेत्वारोप होता, तो त्यांना पुराव्यानिशी सिद्ध करता आला नव्हता. उलट पुण्याच्या रेसिडेंटचा या हत्येशी संबंध असण्याची शक्यता दर्शविणारा परिस्थितीजन्य पुरावा सापडतो. असे असताना प्रस्तुत लेखकाने परंपरागत दृष्टिकोण ठेऊन विधाने करणे औचित्यपूर्ण वाटत नाही. तसेच पृष्ठ तीनवरील, "कुटुंब कबीला यांना घेऊन दुसरे बाजीराव पेशवे दोन महिने पळापळ करीत होते", हे विधान देखील मराठ्यांच्या इतिहासाचे अध्ययन करणाराला खटकणारे आणि दुसऱ्या बाजीरावाविषयीच्या पूर्वग्रहदूषित विचारांचे प्रतीक वाटते. ते इतिहासकारांच्या परंपरागत धारणांवर आधारलेले आहे, ब्रिटिश इतिहासकारांनी मराठी माणसाचे नीतिधैर्य खच्ची करण्यास अशी विधाने केली व प्रारंभीच्या मराठी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतिहासकारांनी ब्रिटिश दृष्टिकोनाची री ओढली; मात्र असे करताना ब्लॅकरसारख्या ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्याने दुसऱ्या बाजीरावांच्या तिसऱ्या ब्रिटिश मराठा युद्धातील युद्धनीतीची व व डावपेचांची तोंडभरून केलेली प्रशंसा नजरेआड केली. लेखकाला जी 'पळापळ' वाटते, तो बाजीरावाच्या युद्धनीतीचा महत्वाचा डाव होता, ब्रिटिश सैन्याला हुलकावण्या देत त्याला भोसले व शिंद्यांच्या जवळ जावयाचे होते असे ब्लॅकरने आपल्या ग्रंथात स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच केवळ तत्कालीन शाहीरांच्या पोवाड्यावरून पेशवाईच्या अस्ताची महाराष्ट्रावरील प्रतिक्रिया वर्णन करताना आणि बाजीराव तमासगीरांचे व कलावंतिणींचे आश्रयदाते होते म्हणून त्यांना पेशवाई बुडल्याचे दुःख झाले असे विधान करताना, स्वराज्य गेल्याचे दुःख त्यांच्याखेरीज इतर कोणालाही झाले नाही असे लेखकाला सुचवावयाचे आहे काय ? याशिवाय पृष्ठ सातवर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आणलेल्या सुधारणांचे विवेचन करताना ह्या मन्वन्तरामागील त्यांचा स्वार्थही लेखकाने थोडा उलगडून दाखविला असता तर बरे झाले असते. तसे केले असते तर ब्रिटिश साम्राज्यवादी नीतीचा वाचकांना परिचय झाला असता आणि लोकहितवादी; न्या. रानडे यांनी पुरस्कृत केलेल्या स्वदेशी व सहकाराच्या विचारांचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले असते. त्याचप्रमाणे तिसऱ्या प्रकरणात विदर्भातील राजकीय चळवळीचा-डॉ. मुंजे, दादासाहेब खापर्डे; मा. श्री. अणे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याचा अधिक तपशील देता आला असता. त्यावेळी नागपूर, अमरावती व विशेषतः यवतमाळ ही विदर्भातील चळवळीची केंद्रस्थाने होती. तेथे सातत्याने राष्ट्रीय कार्यही चालू होते. त्याचा अगदीच ओझरता उल्लेख प्रस्तुत ग्रंथात सापडतो. तसेच प्रतिपाद्य विषयाशी अप्रत्यक्षरित्या संबंध असलेल्या काही घटनांचा तपशील टाळता येण्याजोगा व महाराष्ट्राच्या इतिहासाच्या ओघात काहीसा अनावश्यक वाटतो. उदाहरणार्थ : तिसऱ्या प्रकरणातील पृष्ठ १५१ वरील लालाजींच्या हद्दपारीचे वर्णन,पृष्ठ १३१-३२ वरील बंगालच्या फाळणीचा तपशील; चवथ्या प्रकरणातील महाराष्ट्राबाहेरील लीग कार्याचा तपशील इत्यादी. याखेरीज कॉंग्रेसच्या सनदशीर चळवळीपासून ह्या काळात अब्राम्हण दूर कां राहिले या महत्त्वाच्या प्रश्नाचे चिकित्सक विश्लेषण लेखकाने केले असते तर ते निश्चितच उद्‌बोधक ठरले असते.

मात्र प्रस्तुत ग्रंथातील ह्या काही उणीवा ग्रंथाच्या मौलिकतेला निश्चितच बाधक ठरत नाहीत. सर्व प्रकरणातून आलेला तपशील लेखकाच्या गाढ्या व्यासंगाची साक्ष देतो. ह्यापूर्वी डॉ. फडके यांनी लिहिलेल्या 'शोध सावरकरांचा'; 'लोकमान्य टिळक व क्रांतिकारक'; 'शाहू छत्रपती व लोकमान्य' इत्यादी ग्रंथांनी त्यांचा आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचे लेखन करण्याचा अधिकार सिद्ध झालेला आहे. ह्या ग्रंथाने आधुनिक महाराष्ट्राच्या सलग व संगतशीर इतिहासाची आजपर्यंतची मोठी उणीव भरून काढली आहे. डॉ. फडके यांच्या प्रकल्पातील दुसऱ्या खंडाविषयीच्या मराठी वाचकांच्या अपेक्षा ह्या पहिल्या खंडाने निश्चितच वाढविल्या आहेत; आणि त्या खंडाची ते उत्सुकतेने वाट पाहात आहेत. ■

'विसाव्या शतकातील महाराष्ट्र ।
१९०१-१९१४' खंड १ ला
श्री विद्या प्रकाशन, पुणे.
१ ली आवृत्ती जाने. १९८९
पृष्ठ संख्या-२८४.
मूल्य-रु. ९०

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सिझफायर / देवानंद गोरडे

कवी श्री. राम देशमुखांचा 'सिझफायर' हा तिसरा कवितासंग्रह. या आधीच्या 'यतिभंग' या कवितासंग्रहामधून श्री. राम देशमुख समृद्ध भावविश्वाचा चिंतनशील प्रवाह घेऊन वाचकासमोर सादर झालेले आहेत.

जन्म आणि मृत्यू या दोहोंना जोडणारा पूल म्हणजे जीवन. जीवन म्हणजे अनेकपर्यायी रस्ते, पायवाटा, प्रवाह. या जीवनातील अनुभव्‌विश्वातून साकारलेला एक कल्पलोक म्हणज 'सिझफायर'.

'सिझफायर' मधील कविता ही अधिक चिंतनशील व अनेकपदरी झालेली आहे. वेगवेगळे भावनात्मक कल या कवितेत गवसत जातात. सभोवारच्या अनेक घटना घडत असताना तात्कालिक परिस्थितीची मानसिकता वेगवेगळी असते. स्पंदनशील मनावर आरूढ झालेल्या मानसिकते मधून कविता अवतरते तीच मुळी सर्वस्पर्शी होऊन, आवर्तनामधून आवर्तने बाहेर पडावीत तशी ! एवढे मात्र निश्चित की कोणत्याही एका विचारसरणीच्या, वादाच्या बांधिलकीमचे देशमुखांच्या कवितेवर शिक्कामोर्तब करता येणार नाही. तर तिला मुक्त चिंतनाचा सोस अधिक आहे. कधीकधी तर दोन वेगवेगळया कवितांमध्ये वेगळे, विरोधाभासी मूडस्‌ तिच्यात आढळतात. कुठे ती वस्तुनिष्ठ झालेली गवसते तर कुठे आत्मनिष्ठ विचारसरणीमधून आलेल्या भिन्न भावनिक कलामुळेच कविता म्हणून आस्वाद घेताना मोकळया मनाने तिला सामोरे जावे लागते आणि आस्वादाची परिमाणं नव्याने शोधावी लागतात. व्यक्तित्वाकडून सामाजिकतेकडे तर कुठे व्यक्तित्वाकडून सामान्यीकरणाकडे, तर कुठे याउलट आधी सामान्यीकरण होऊन तिचा लोप पुन्हा व्यक्तिमत्वात असा काहीसा कवितांचा प्रवास 'सिझफायर'मधून आपणाला आढळतो.

कवी राम देशमुखांच्या कवितेला सामाजिकतेचे निश्चितच भान आहे. कर्मठ सनातनी वृत्तीवर ते कधी आसूड उगारतात. माणसांनी माणसांसाठी स्वतःचा थोरपणा अबाधित रहावा म्हणून निर्मिलेल्या जातीव्यवस्थेवरही ते बोट ठेवतात, तर कुठे शहरी सभ्यतेच्या बुरख्याआड लपलेल्या हिंस्र पशूंना ते झोडपून काढतात.

'सिझफायर' वाचताना एक खटकणारी गोष्ट प्रामाणिकपणे नमूद करावीशी वाटतेय. एखादी रागदारी संगीताची मैफील चालू असताना मध्येच कुठेतरी सूर भरकटल्यासारखा व्हावा असे काही कवितांचे झाले आहे. हलका फुलका आशय व्यक्त करणाऱ्या काही कविता 'सिझफायर'मध्ये अधूनमधून पेरल्याचे जाणवते. 'आपल्यासाठी" 'नख'; 'अनुबंध'; 'सावित्री' आणि अशाच काही कविता मैफीलीची धुंदी किरकिरी करून टाकतात. त्या वगळल्या असत्या तर ? त्याचप्रमाणे आणखी एक.

कॅस्केड हे उपनाव धारण करायचा राम देशमुखांना मोह का व्हावा ? ■

सिझफायर
लेखक : राम देशमुख

अकल्पित / शीला कोलटकर

कवी नामदेव चं. कांवळे यांच्या 'अकल्पित' ह्या काव्यसंग्रहातील कवितांना अनेक नियतकालिकातून पूर्वप्रसिद्धी मिळालेली आहे.

कवी नामदेव कांबळे आपल्या लेखणीने कित्येक कवितांमधून निसर्ग चित्रित करतात. 'वसा', 'गनीम', 'दर्या', 'गाव', 'आषाढाचे दिवस होते.' इ. कवितांतून निसर्गचित्रण येत असले, तरी त्यातून कविमनाची खिन्नताच अधिक व्यक्त होते. 'उभ्या जीवनाचे फासे' 'फितूर' झाले आहेत अशी खंत पुष्कळ वेळा कवी मांडतात.

जीवनातील 'उध्वस्त'पणात काही अंशी समाजाचाही वाटा आहे. समाजातील दांभिकपणावर कवी कित्येक कवितांतून प्रकाश टाकतात. 'भक्त', 'देव', 'आमचे आम्ही', 'विटंबना'; 'भाऊबंद', 'तहाचे निशाण' अशा सारख्या

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवितांमधून कवी आपल्या समाजातील अपप्रवृत्तींचे चित्रण करतात. समाजातील नेतृत्वावर औपरोधिक टीका करताना कवीच्या लेखणीला अधिक तीव्रता येते.

कुठेतरी कविमनात आशेचा अंकुर अजून जागा आहे याचे भान ' फकीर ' ही कविता वाचल्यावर होते.

दोन परस्पर विरोधी प्रवृत्तीचे चित्रण करून समाजातील भिन्न प्रवृतींचे दर्शन हा कवी आपल्याला घडवितो.

या कवीच्या लेखणीचे काही विशेष दिसून येतात ते स्त्रीच्या विविध दु:खावर प्रकाश टाकताना. स्त्रीची विटंबना ज्या समाजाने केली त्याचे चित्रण ' एका बापाचे मनोगत '; ' अकल्पित ', ' स्त्रीधन ', इ. कवितांतून होते. ' हिशेब ', ' पडाव ', ' निमित्त ', ' कुंकू ' अशा कवितांमधून स्त्रीच्या वेगवेगळ्या व्यथा व्यक्त झाल्या आहेत.

' क्रूस ', ' राष्ट्रपुरुष ', ' विटंबना ' या कवितेतील कल्पना वेगळ्या आहेत. ' दान '; ' वऱ्हाळी ', ' काया मातीत ' अशा बोली-भाषेतील कविताही या संग्रहात समाविष्ट आहेत.

इथल्या मातीशी कवीचे नाते आहे. तसेच कवीचा धर्म ' माणुसकीचा ' आहे. म्हणूनच ' माझी जात ' ह्या कवितेत समानतेचा उल्लेख कवी आवर्जून करतात व त्यामुळेच कवितासंग्रह वाचून झाल्यावर लक्षात राहतो तो कवीचा धर्म !

■

अकल्पित
लेखक : नामदेव चं. कांबळे
ज्ञानेश प्रकाशन
३ / नवनिर्माण सोसायटी नागपूर–२२

युगवाणीला खालील विषयांवर टिपणे हवी आहेत.

५७. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर सामाजिक आंदोलनांचे मराठी साहित्यावरील परिणाम
५८. साहित्य संमेलनांचे राजकीय लागेबांधे
५९. दलित साहित्य संमेलने
६०. जिल्हा साहित्य नाट्य–संमेलने : भूमिका व काय
६१. आदिवासींची अस्मिता आणि वाङ्मय कलाभिव्यक्ती
६२. शैलीशास्त्रीय समीक्षा आत्मनिष्ठे-कडून वस्तुनिष्ठ तपासणीकडे
६३. वि. वा. शिरवाडकर : मराठीचे ताजे ज्ञानपीठ
६४. भाषाशास्त्र : एक अपरिहार्य अध्ययन
६५. भाषाशास्त्र : अध्यापन–अध्यापनाची दशा आणि दिशा
६६. संवादशास्त्राचे अध्ययन आणि अध्यापन
६७. भाषेतील अर्थमीमांसा
६८. सौंदर्यशास्त्राचे अध्यापन
६९. कलावंत आणि सौंदर्यशास्त्र
७०. अनुवादित वाङ्मय
७१. अनुवाद आणि निर्मितीक्षमता
७२. परदेशस्त मराठी भाषिकांचे मराठी लेखन
७३. बृहन्–महाराष्ट्रातील मराठी लेखन
७४. अमराठी लेखकांचे मराठी लेखन

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यसोहळा

व

काव्य लेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबीर

विदर्भ साहित्य संघाची सांस्कृतिक समिती व युगवाणी यांचे वतीने एका द्विदिवसीय काव्यसोहळ्याचे आयोजन करण्यात यावयाचे असून या उपक्रमाचा एक भाग म्हणून काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर देखील आयोजित करण्यात यावयाचे आहे.

या द्विदिवसीय काव्यसोहळ्यात गेल्या शतकातील मराठी कवी, कवितालेखन, काव्य-समीक्षा, काव्यप्रवाह, कविताप्रकाशन, वितरण, काव्यस्वाद, कवितेचा वाचक व त्याचे अस्तित्व, कवितेचे अध्ययन–अध्यापन, कविसंमेलनांचे प्रयोजन व कवितावाचन–गायन यांचे कवितेवरील परिणाम, कवीचे व कवितेचे सामाजिक राजकीय, सांस्कृतिक नातेसंबंध, सांस्कृतिकतेच्या संदर्भातील कवितेचे स्थान, भूमिका व वास्तव, समाजातील विविध संस्थांची कवितेकडे बघण्याची दृष्टी व त्याची कारणमीमांसा, मराठी कवितेचे भारतीय व जागतिक कवितेच्या संबंधातील स्थान, यापैकी अथवा तत्सम, आनुषंगिक विषयांवरील नामवंतांचे निबंधवाचन व त्या त्या निबंधावरील नंतरची चर्चा, परिसंवाद, गटचर्चा नामवंतांची व नवोदितांची काव्यवाचने, कविसंमेलने, कवितांची पोस्टर्स, कवितासंग्रहांचे प्रदर्शन, काव्ययात्रा याचा समावेश असेल.

काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर

याच उपक्रमाचा भाग म्हणून मराठीत अमाप लिहिल्या जाणाऱ्या कवितेच्या नवलेखकास व काव्यविषयक उत्सुकता असणाऱ्यांना देखील काव्यलेखकीय व्यक्तिमत्वासंबंधीने व तसेच कवितेची भाषाशैली, काव्यलेखन, काव्यआकलन व काव्यस्वाद या संबंधाने आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करवून देणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या व तज्ञांचे मार्गदर्शन असलेल्या शिबिराचेही आयोजन करण्यात यावयाचे आहे.

या उपक्रमातील सहभाग निःशुल्क असून हा उपक्रम केवळ युगवाणीच्या त्रैवार्षिक वर्गणीदारांकरिता आयोजित करण्यात येत आहे. युगवाणीचे त्रैवार्षिक वर्गणीदार असणे एवढीच अट या सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना पूर्ण करावी लागेल. ती पूर्ण करण्यात त्यांना आनंदच वाटेल अशी खात्री आहे.

युगवाणीची वार्षिक वर्गणी ३५ रु. असून त्रैवार्षिक वर्गणी मात्र रु. ९० असेल.

या उपक्रमाकरिता त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून सहभाग नोंदविणाऱ्यांना त्यामुळे वर्गणीत **रु. १५ ची भरघोस सूट** प्राप्त होईल, आपला सहभाग नोंदवू इच्छिणाऱ्यांनी कृपया युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी विदर्भ साहित्य संघाकडे पाठवून या उपक्रमातील त्यांच्या सहभागार्थ आपले नाव व पत्ता, आवड, इतर व्यक्तिगत माहिती, प्रकाशित लेखनाची माहिती व युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी भरल्याची पावती क्र. व तारीख ही माहिती प्रबंध संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर, १२ या पत्त्यावर पाठवावी.

आपला असा सहभाग नोंदविणाऱ्यांना या उपक्रमाच्या तारखा व सविस्तर कार्यक्रम याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात यावयाचे आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वा च की य

संपादक, 'युगवाणी',
स. न. वि. वि.

दि. २० जाने. ९०

'युगवाणी'चा ऑक्टो.–नोव्हें–डिसें. ८९ चा अंक मिळाला. फार आभारी आहे. सर्वच साहित्य दर्जेदार आहे. 'आशा बगे : एक नवे अस्तित्व' हा डॉ. सिरास यांचा लेख विशेष आवडला. आपला नवा उपक्रमही लोकप्रिय होईल असा मला विश्वास वाटतो. माझ्या आपणास उदंड शुभेच्छा.

आपला
नरेश कवडी
मुंबई,

श्रीपाद भालचंद्र जोशी
स. न. वि. वि.

१ जाने. ९०

आपल्या 'युगवाणी'चा नवीन अंक मिळाला. फार आभारी आहे. अंकातील नवनवीन ज्ञान देणारे लेख, सुरेख कविता, संपादकीयातील मनोगत सारेच आवडले. धन्यवाद. मुद्रणही अप्रतिम आहे. प्रा. ऊर्ध्वरेषेंचे छायाचित्र पाहिले. त्यांच्या 'हरवलेले दिवस'ला उत्तम पारितोषिक मिळाले. पण ते आज आपल्यात नाहीत याचे दुःख होते. पुण्यास ते आल्यावर त्यांचा माझा खूप परिचय झाला होता. अस्तु बालकवींवरील कविता व काळे यांचा लेख तसेच शेवटी दिलेली कविता हे सारे उल्लेखनीय अंक पाहिल्यावर मागे 'रत्नाकर'चे अंक वाचले होते त्याची आठवण झाली. तेव्हा पुनश्च धन्यवाद. यंदाचा बालसाहित्य पुरस्कार (दिनकर लोखंडे पुरस्कार) मला मिळाला हे लिहिण्यास संतोष वाटतो.

आपला,
वि. म. कुळकर्णी
पुणे

प्रिय, श्रीपाद जोशी
स. न. वि. वि.

दि, १९–१२–१९८९

'युगवाणी'चा जुलै–ऑगस्ट–सप्टें. ८९ चा अंक मिळाला. तुम्ही या त्रैमासिकाची जबाबदारी हाती घेतल्यापासून अंक अंतर्बाह्य उत्तम निघत आहे. त्यात आशय–अभिव्यक्तीची कमालीची एकरूपता असल्याने ती एक संग्राह्य कलाकृती होत आहे. मागच्या अंकात तुम्ही वाङ्मयीन नियतकालिकांच्या भवितव्यास वाचा फोडली होती. याही अंकात याबाबतचे चौफेर विवेचन साधक–बाधक चर्चा आहे. बालकवींच्या जन्मशताब्दीची आठवण केवळ 'युगवाणी' लाच होते. त्यात तुमची चाणाक्ष कविप्रकृती तर आहेच पण त्याबरोबर डॉ. काळे यांचा अभ्यासू लेख देऊन तुम्ही एका कवीच्या सांस्कृतिक ऋणातून मुक्त झाल्याचे दिसते. वैदर्भीय रीतीप्रमाणे कै. बेहेरे आणि बालकवी तुम्ही एकाच अंकात घेऊन प्रादेशिकतेच्या सीमारेषा ओलांडल्या आहेत. तुमचे मनःपूर्वक अभिनंदन !

वाङ्मयीन नियतकालिक हे संपादक आणि लेखक यातील महत्त्वाचा दुवा असून, देवाणघेवाण हा त्याचा मुख्य व्यवहार आहे. आर्थिक बाजू समृद्ध झाल्याने नियतकालिक टिकेल, चालू राहील. परंतु त्यापेक्षा त्याची पातळी, कसदारपणा तितकाच महत्त्वाचा आहे. तुमच्या चर्चेत मला ही बाब प्रामुख्याने दुर्लक्षित झालेली वाटते. नुसते जगणे महत्त्वाचे नाही, तर त्यामागचे प्रयोजन, कार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. इथे समाजिकतेपेक्षा सांस्कृतिक, बांधिलकी महत्त्वाची आहे. किमान मराठीच्या प्रत्येक प्राध्यापकाने तरी वाङ्मयीन नियतकालिक स्वतःच्या पैशाने विकत घेतले पाहिजे, यासाठी संपादक कुठले संवाद साधतात ? ग्रामीण भागातील मराठीचा प्राध्यापक एखाद्या संपादकाचे त्यास आलेले आपुलकीचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पत्र वाचून समाधान पावतो. नव्या हुरूपाने त्याला प्रतिसाद देतो, उलट पत्राचे उत्तरच द्यायचे नाही या संपादक नीतीने सारेच मुसळ केरात जाते. अर्थात याला काही सन्माननीय अपवाद आहेत. परंतु ही वस्तुस्थिती आहे. ही नियतकालिके सूज धारण करणारी नसावीत. त्यांचे उत्तम बाळसे लक्षात घेता ती समाजाचे मानसिक आरोग्य संवर्धन करणारी असली पाहिजेत. एकदा ही खूणगाठ पक्की झाली की मग पुढचा प्रवास नियमित होतो. अलिकडे ही नियतकालिके कुठेच नियमितपणे निघत नाहीत.

आपला
मधु जामकर
परळी—वैजनाथ

स. न. वि. वि;

दि. ९–१–९०

'युगवाणी'चा जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर ८९ चा अंक मिळाला. युगवाणीतील लेखाद्वारे नवीन नवीन माहिती जरी मिळत असली तरी युगवाणीचे एकंदरीत स्वरूप पाहता एक गोष्ट वाचताना सतत जाणवत असते की, युगवाणीत प्रसिद्ध होणारे लेख व इतर माहिती ही विशेष करून मराठीचे अभ्यासक, संशोधक यांनाच फक्त उपयुक्त ठरेल अशा प्रकारची असते. सामान्य वाचकवर्गाच्या दृष्टीने युगवाणीतील लिखाण अगदी क्वचितच आढळते.

दुसरे म्हणजे मराठीतील वाङ्‌मयीन नियतकालिकांचे अस्तित्व यावर आपण प्रकाश टाकला आहे. वाङ्‌मयीन नियतकालिकांचे अस्तित्व टिकून राहण्यास आर्थिक समस्या हा एक महत्त्वाचा प्रश्न तर नक्कीच आहे. यासाठी साहित्यिक व सामान्य वाचक यांच्यातील अंतर कमी होऊन या दोन घटकात समन्वय साधण्यास वाङ्‌मयीन चळवळ लोकाभिमुख होण्यास मदत होईल आणि ज्यावेळी वाङ्‌मयीन चळवळ लोकाभिमुख होईल. त्यावेळी आर्थिक समस्येचा प्रश्न जो वाङ्‌मयीन नियतकालिकांना भेडसावत आहे तो बऱ्याच अंशी कमी होईल असा विश्वास वाटतो.

आपला
मोहन दत्तात्रय मुजुमदार
नागपूर

स. न. वि. वि,

दि. १७–१२–८९.

वि. सा. सं. ची मी अगदी प्रथम म्हणजे १९४८ पासून वर्गणीदार होते. पण पुढे काही दैवी आपत्ती आल्यापासून सर्व बंद केले. त्यात युगवाणीही सुटली नाही.

आता बरेच दिवस झाले युगवाणी चालू करावी असे मनात येत होते. त्यात सत्यकथा, अभिरुची, हंस, मौज अशी नियतकालिके एक एक बंद झालेले कानावर पडत होते. त्यात 'युगवाणी' बंद होण्याच्या मार्गावर असे कळत होते. वाईट वाटत होते. अशा मनाच्या अवस्थेत असताना एप्रिल-मे-जून ८९ / जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर ८९ असे दोन युगवाणीचे अंक त्रैमासिकाच्या रूपात समोर आले. दोन्ही मासिकातील 'संपादकीय' वाचून व सर्व अंक वाचताक्षणी 'युगवाणी'चे भवितव्य उज्ज्वल आहे. याची खात्री पटली-त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करीत आहे. खरंच आज नियतकालिकाची स्थिती गंभीर आहे. व त्यावर विचार व्हावा म्हणून आपण अनुभवी अशा ज्येष्ठांच्या व श्रेष्ठांच्या पुढे मांडून फार मोठे काम केले. त्यावरून आपण 'युगवाणी'ची धुरा सांभाळण्यास अगदी योग्य आहात असे माझ्यासारख्या वाचकाच्या लक्षात येण्यास वेळ लागणार नाही,

आर्थिक प्रश्न तर फार मोठा आहे. तरी देखील वाङ्‌मयीन नियतकालिकांची समाजाला आवश्यकता आहे यात शंका नाही. मासिकांच्या किंमती वाढल्या तरी फिरती वाचनालये वर्गणी वाढवून चालू आहेत. अर्थात वाङ्‌मयीन नियतकालिकाचे ध्येय वेगळे आहे. हे मी जाणून आहे. पण हीही मासिके ज्यांना हवी असतात त्यांना मिळत नाहीत.

'मागणी तसा पुरवठा' हे ध्येय जरी या नियतकालिकांनी ठेवले नाही तरी रूक्षपणा टाळून अभ्यासनीयांना ती उपयुक्त ठरली पाहिजे. त्याकरिता चांगल्या लेखकाच्या मुलाखती, प्रसिद्ध ग्रंथांच्या समीक्षा (ती नवी पुस्तके वाचावी वाटली पाहिजेत; मोठ्या लेखक-लेखिकांची वैशिष्टये-ज्यायोगे वाङ्‌मयीन प्रगल्भता जोपास-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ण्याचे काम होईल. कथा; तिने घेतलेली वळणे; वाङ्मयीन टिपणे, वाङ्मय विषय, नवे विचार, नवी कविता इ. इ. द्वारे संस्कृतीचे दर्शन घडविले पाहिजे. तसेच संपादक-लेखक-वाचक यामध्ये अंतर असता कामा नये.

एकेकाळी संपादकाने प्रोत्साहन देऊन लेखक वर्ग निर्माण केला व लेखकाची जबाबदारी वाचकांना आपल्याकडे ओढण्याची. अशा तऱ्हेने ही साखळी निर्मिती पाहिजे. त्या दृष्टीने आपल्या संपादकत्वाखाली निघालेले दोन्ही अंक वाचनीय नव्हे तर विचारप्रवृत्त करणारे वाटले. शेवटी पुन्हा एकदा आपले अभिनंदन करते व दिवसें–दिवस 'युगवाणी', 'युगवाणी' ठरो अशी अपेक्षा करते.

आपली
सुधा डोंगरे
भिलाई

स. न. वि. वि.

दि. १६–१–९०

युगवाणीचा जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर ८९ अंक समोरच आहे. वाचायला घेतला आहे. काही दिवसांपूर्वी तो पोस्टाने आला होता. पण त्याचा 'आस्वाद' आमच्या घराचा रखवालदार 'कुंजू'नेच आधी घेतला. 'कुंजू'ला गंधज्ञान अधिक तीव्र आहे. त्यांच्या स्वाभाविक, संवेदने, नुसार त्यानं आपल्या संपादनाखाली प्रसिद्ध झालेल्या 'युगवाणी' स्वागत केले. अंक बऱ्याच ठिकाणी जायबंदी झाला होता तरी उत्सुकतेने चाळला आणि तो पुन्हा वाचावा अशी इच्छा झाली. त्यासाठी आपण अंक उपलब्ध करून दिलात म्हणून मनःपूर्वक आभार.

आपल्या कार्यकाळात 'युगवाणी' हे लेखकांचे मुखपत्र होत आहे हे पाहून समाधान वाटते. आतापर्यंतचे अंक 'युगवाणी'च्या 'संपादकां'चे अंक असत. आणि अलिकडच्या काळात, ते तर अधिकच 'संपादकां'चे होते. आता चेहरां-मोहरा बदलतो आहे, याचा आमच्या 'कुंजू'लाही आनंद झाला. तुम्ही स्वतःहून लेखकांना लेखन मागून युगवाणीची प्रतिष्ठाच वाढवीत आहात. आतापर्यंत चळवळीतून आलेला संपादक, युगवाणीला लाभला नाही हे 'युगवाणी'चे दुर्भाग्य होते.

तुमच्या काळात 'युगवाणी'ही अधिक लेखक सन्मुख आणि वाचकप्रिय ठरो यासाठी शुभकामना!

आपल
वसंत चिचाळकर
नागपूर

अनुवादकांकरिता—

वाङ्मय अनुवाद म्हणजे खरे तर संस्कृतींचेच भाषांतर.

युगवाणीतून विभिन्न संस्कृतींची ओळख अनुवादित वाङ्मयातून होणे युगवाणीस हवे आहे.

विभिन्न भाषेतील महत्त्वाच्या लेखनाचे अनुवाद मूळ लेखकाच्या परवानगी सहित पाठवावेत. अनुवादकविषयक लिखाणही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केंद्रीय कार्यवृत्त दि. १ जाने. ९० ते ३० मार्च. १९९०

दिनांक ३०-१२-१९८९ : विदर्भ साहित्य संघ, नागपूर आणि लोहिया अध्ययन केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गडकरी सभागृहात "उचल्या" या लोकप्रिय कादंबरीचे लेखक श्री. लक्ष्मण गायकवाड यांचे "उचल्या : माझी भूमिका" या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. अध्यक्ष-स्थानी वि. सा. संघाचे उपाध्यक्ष डॉ. भा. ल. भोळे होते, डॉ. भोळे यांनी या प्रसंगी समयोचित विचार व्यक्त केले. कार्यक्रमास बराच मोठा साहित्य प्रेमींचा प्रतिसाद मिळाला.

दिनांक ४ व ५ जानेवारी १९९० : हडस हायस्कूलचा सागर गरुड व भिडे कन्या शाळेची कु. कल्याणी तेलंग यांनी अनुक्रमे अ व ब गटात पहिला क्रमांक पटकावून यंदाच्या विदर्भ साहित्य आंतर शालेय कथाकथन स्पर्धेत भरघोस यश मिळविले.

दिनांक ४ जानेवारी व ५ जानेवारी रोजी गडकरी सभागृहात या कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. श्रीकृष्ण चरित्रातील कथा व स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांच्या जीवनातील कथा हे विषय कथाकथन स्पर्धेसाठी ठेवण्यात आले होते. स्पर्धेतील अ गटातील दुसरे पारितोषिक हिंदू ज्ञानपीठ (महाल) या शाळेचा विद्यार्थी सुमंत कदवाने यांनी, तर तिसरे पारितोषिक नवभारत विद्यालय महाल शाखेचा विद्यार्थी श्रीनिवास वखरे यांनी पटकावले.

क गटातील इतर पारितोषिके मृणालिनी गर्गे (लोकांची शाळा). रोहिणी देशपांडे (हडस हायस्कूल) व मृणालिनी पागे (हडस हायस्कूल) या स्पर्धकांनी जिंकली.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. राजश्री सावदेकर व सौ. माणिक वडयाळकर यांनी काम पाहिले. सौ. कुंदा केळापुरे यांनी स्पर्धेचे संयोजन व संचालन केले.

बक्षीस समारंभ सत्यभामाबाई सगदेव यांच्या कन्या सौ. महाजन यांच्या हस्ते पार पडला.

दिनांक ११-१-१९९० : अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या लेखणीतून समाजप्रबोधनाद्वारे वैचारिक क्रांती घडवून आणणाऱ्या पत्रकारितेचा वारसा लाभला असताना, आज आधुनिक साधने उपलब्ध असतानाही केवळ रंजनवादी पत्रकारितेला अवास्तव महत्त्व दिले जात आहे तर विचारांचे अभिसरण, चालना, प्रेरणा देण्याची क्षमता क्षीण होत चालली आहे. असे परखड मत आज "प्रबोधनकारी साहित्य व पत्रकारिता" या विषयावर आयोजित परिसंवादात व्यक्त करण्यात आले.

श्री. शंकरराव किर्लोस्कर जन्मशताब्दीनिमित्त विदर्भ साहित्य संघाने गडकरी सभागृहात आयोजिलेल्या या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी श्री. मुकुंदराव किर्लोस्कर होते.

याप्रसंगी परिसंवादात डॉ. निर्मलकुमार फडकुले, डॉ. भा. ल. भोळे व भाऊ समर्थ यांनी आपले विचार व्यक्त केले. तत्पूर्वी शंकरराव किर्लोस्कर आणि महाराष्ट्रातील नामवंत व्यंगचित्रकारांच्या व्यंगचित्रांच्या प्रदर्शनाचे श्री. भाऊ समर्थ यांनी उद्घाटन केले.

सामाजिक हिताचा विचार जनमानसात रुजविण्याचे कार्य सातत्याने शंकररावांनी केले. अस्पृश्यता, स्त्री-पुरुष समानता, बुवाबाजी यासारख्या सामाजिक समस्यांसोबतच राष्ट्रीय राजकारण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावरही त्यांनी आपल्या लिखाणातून आणि व्यंगचित्रांमधून नवे विचार दिले, असे यावेळी अध्यक्ष-पदावरून बोलताना श्री. मुकुंदराव किर्लोस्कर म्हणाले.

विदर्भातल्या मनाचे अधिकृत व्यासपीठ प्रभावित करण्याचे काम ज्या किर्लोस्कराने ७० वर्षे केले त्या किर्लोस्करचे संस्थापक संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा मान साहित्य संघाला मिळाला आहे, असे श्री. राम शेवाळकर यांनी आभार मानताना सांगितले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

दिनांक १२–१–१९९० : स्त्री–पुरुष असमानता दूर होण्याच्या बाबतीत थोडासा फरक पडला आहे पण तो वरवरचा आहे. स्त्रीची आंतरिक कुचंबणा तशीच कायम आहे. तिने पुरुषनिरपेक्षच राहावे ही प्रवृत्ती बदललेली नाही. पुरुषाला गृहीत धरले तर त्याला ते आवडत नाही. पण स्त्रीने सर्व काही करावे हे गृहितच धरले जाते आणि स्त्रीचा अन्यायाप्रति राग आहे. हे विकल्प विकृती नष्ट झाली पाहिजे आणि स्त्री पुरुष भेदाभेद न करता अखिल मानवसमाज हा केंद्रबिंदू मानून त्याच्या उत्क्रमणाचा उत्कर्ष साधण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असे मौलिक विचार किर्लोस्कर मासिकाच्या संपादिका सौ. शांताबाई किर्लोस्कर यांनी व्यक्त केले आहेत.

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने आयोजित श्री. शंकरराव किर्लोस्कर जन्मशताब्दी निमित्त "स्त्री–आजची, उद्याची आणि दलित" या विषयावरील परिसंवादात अध्यक्षपदावरून त्या बोलत होत्या. प्रारंभी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, प्राचार्य राम शेवाळकर यांनी सौ. शांताबाई किर्लोस्कर यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच अन्य वक्त्यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी सौ. संध्या मराडे, सौ, ज्योती लांजेवार, सौ. सुनंदा सोनारीकर, सौ. दमयंती पांढरीपांडे, सौ. सुगंधाबाई शेंडे यांनी आपआपले विचार व्यक्त केले. सौ. सुलभा हेर्लेकर यांनी संचालन व आभार प्रदर्शन केले.

दिनांक १४–१–१९९० : विदर्भातील गुणवंतांनी स्वतःमधील न्यूनगंड पूर्णपणे काढून टाकावा आणि मोठे होण्यासाठी झेप घ्यावी; असा मित्रत्वाचा सल्ला खासदार विद्याधर गोखले यांनी वि. सा. संघाचा स्व. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर पुरस्कार प्रदान करताना दिला.

वि. सा. संघाच्या ६७ व्या वर्धापन–दिन समारंभात ते प्रमुख अतिथी होते. त्यांच्या हस्ते कै. ग. त्र्यं. माडखोलकर कादंबरी पुरस्कार प्रा. वामन पात्रीकर यांना देण्यात आला. याचवेळी नागपूर व अमरावती विद्यापीठांतून मराठीमध्ये आचार्य पदवी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार झाल्याबद्दल श्री. गोखले यांचाही वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

याप्रसंगी पुरस्कार प्राप्त लेखक प्रा. श्री. वामन पात्रीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले; वि. सा. संघाचे संस्थापक कै. अण्णासाहेब खापर्डे यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे, त्यांनाही या सभेत आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात कु. कीर्ती व कु. कल्याणी जोशी यांच्या सरस्वतीस्तवनाने व समारोप पसायदानाच्या गायनाने झाला. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिनांक १४-१-१९९० : "मुलखावेगळी माणसं" ह्या दूरदर्शन मालिकेत चमकलेले आणि भारतीय स्तरावरील विक्रमांची नोंद करणाऱ्या "लिमका बुक ऑफ रेकॉर्डस" ह्या पहिल्याच पुस्तकात नोंद झालेल्या मुंबईच्या श्री. विजय देशपांडे ह्यांच्या स्वाक्षरी-संग्रहाचे एक प्रदर्शन वि. सा. संघाने आयोजित केले होते.

वाङ्मय, रंगभूमी, चित्रपट, कला, क्रीडा व राजकारण आदी क्षेत्रातील जागतिक कीर्तीच्या शेकडो मान्यवर व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या या प्रदर्शनात होत्या. विदर्भात असे प्रदर्शन नागपूरात प्रथमच झाले. दुर्मिळ छायाचित्रे, क्रिकेट संघाची अधिकृत स्वाक्षरी पत्रके, छोटया क्रिकेट बॅटस् अशा वस्तूंवर घेतलेल्या संबंधितांच्या स्वाक्षऱ्या हे या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण होते.

गडकरी सभागृहात तीन दिवस चाललेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन खासदार श्री. विद्याधर गोखले यांच्या हस्ते झाले.

दिनांक १९-१-१९९० । सुप्रसिद्ध वैदर्भीय कवी कै. ना. के. बेहेरे यांचे हे जन्मशताब्दीचे वर्ष आहे. आज त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

२० जानेवारी १९९० । "विदर्भ साहित्य संघासारख्या संस्थांना आकाशवाणीने सर्वभाषा कवि-संमेलनासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांच्या आयोजनात सहभागी करून घेतल्यास अशा कार्यक्रमाचे आयोजनात अधिक आत्मीयता व आपुलकी निर्माण होईल" असे उद्गार प्रसिद्ध तेलुगु कवी. डॉ. मुदिगोंडा शिवप्रसाद यांनी वि. सा. संघाच्या अन्य भाषा साहित्य विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्या वतीने आयोजित स्वागत समारोहात सहभागी विविध भारतीय भाषातील कवींच्या वतीने बोलतांना काढले.

विदर्भ साहित्य संघाचा अन्य भाषा साहित्य विभाग तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी नागपूरला झालेल्या आकाशवाणीच्या वार्षिक सर्वभाषा कविसंमेलनार्थ ही मंडळी नागपुरात आलेली होती.

विविध भारतीय भाषातील सुमारे तीस प्रख्यात कवींचा या समारोहात सहभाग होता. या समारोहातील कवींची भाषावार नावे अशी

१. असमिया	श्री. अनीस-उज्-जमान	श्री. गोपी वल्लभ सहाय
२. उडिया	श्री. नृसिंह प्रसाद	श्री. मधुप पांडेय
३. उर्दू	श्री. बाकर मेहदी	-
४. कन्नड	श्री. सुब्राय चोक्काडी	श्री. गोपाल कृष्ण कौल
५. कश्मीरी	श्री. गुलाम नबी नाजिर	श्रीमती क्षमा कौल
		डॉ. सागर खादीवाला
६. तमिल	श्री. टी. आर. गुरुस्वामी	श्री. रघुराज दीक्षित
७. तेलुगु	डॉ. मुदिगोंडा शिवप्रसाद	
८. पंजाबी	श्री. संतोखसिंह धीर	श्री. रमेन्द्र जाखू
९. बंगला	श्री. सुधेन्दु मल्लिक	श्री. राधेश्याम शर्मा "प्रगल्लभ"
१०. मराठी	श्री. वामन निंबाळकर	श्री. सुरेश उपाध्याय, श्रीवर्धन कपिल

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

११. मलयालम	श्री. तिरुनल्लुर करुणाकरन	श्रीमती माधवी लता शुक्ल
१२. सिन्धी	डॉ. प्रेम प्रकाश	
१३. हिन्दी	(१) श्री सोम ठाकुर	—
	(२) डा. रामकुमार वर्मा	नर्मदेश्वर उपाध्याय

विदर्भ साहित्य संघाच्या कार्याचा परिचय व एकूणच मराठी भाषा–वाङ्मयाबद्दलचा धावता परिचय करून देऊन संघाच्या वतीने युगवाणीचे संपादक व अन्य भाषा साहित्य विभागाचे आमंत्रक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी 'युगवाणी' या नियतकालिकाचे अंक व गुलाब पुष्प सहभागींना भेट दिले. तर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे वतीने मंडळाचे सदस्य श्री. वामन निंबाळकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धपुतळ्याची प्रतिकृती भेट देऊन सहभागींचे स्वागत केले. महात्मा फुले यांच्या जन्मशताब्दीवर्षी ही भेट विशेष औचित्याची बाब होती. श्री. वामन निंबाळकर यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतीच्या कार्याबाबत सहभागींना माहिती दिली.

हिंदी कवी डॉ. सोम ठाकुर व नर्मदेश्वर उपाध्याय, असमिया कवी श्री. अनीस–उज्–जमान, तेलुगु कवी डॉ. मुदिगोंडा शिवप्रसाद, पंजाबी कवी श्री. संतोखसिंह धीर, सिन्धी कवी डॉ. प्रेम प्रकाश व मराठी कवी श्री. वामन निंबाळकर यांचे या प्रसंगी कवितावाचन झाले.

श्रीमती माधवी लता शुक्ल, डॉ. सागर खादीवाला, नर्मदेश्वर उपाध्याय, डॉ. सोम ठाकुर व डॉ. प्रेम प्रकाश यांनी देखील सहभागींच्या वतीने सद्भावना व्यक्त करणारी भाषणे केली.

"विविध भारतीय भाषातील प्रख्यात प्रातिनिधिक कवींच्या या मेळाव्याच्या स्वरूपात येथे मिनी भारताचे दर्शन घडते आहे" अशा शब्दात त्यांनी आपल्या सद्भावना व्यक्त केल्या. तर तेलुगु व मराठीच्या प्राचीन पारंपरिक नात्याचे स्मरणही डॉ. मुदिगोंडा यांनी करून दिले.

कवितावाचन सत्राचे संचलन प्रसिद्ध हिंदी कवी डॉ. मधुप पांडेय यांनी तर या मेळाव्याचे संचलन अन्य भाषा साहित्य विभागाचे सदस्य श्री. सतीश दुबे यांनी केले.

या मेळाव्याच्या आयोजनात श्री. प्रमोद पुराणिक, विलास देशपांडे तसेच श्री. विलास जोशी यांचेही सहकार्य लाभले होते.

श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मेळाव्याचा समारोप करताना देशातील या विविध भाषिक कवींच्या लेखनाचे दर्शन 'युगवाणी' मराठीला घडवील तसेच मराठीतील लेखनही या मेळाव्यातील सहभागींच्या भाषांमधून अनुवादित, प्रकाशित होण्याच्या दृष्टीने या उपक्रमाद्वारे सेतु बांधला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

दिनांक २५–१–१९९० : बालकवींच्या जन्मशताब्दीनिमित्ताने वि. सा. संघ आणि बसोली ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झालेल्या "बालकवी आणि बसोली" या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध चित्रकार भाऊ समर्थ यांच्या हस्ते झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. द. भि. कुळकर्णी होते.

बसोलीच्या ४ ते १४ वयोगटातील बालचित्रकाराच्या चित्रकारांच्या चित्रकृतीबद्दल बोलताना भाऊ समर्थ म्हणाले, "बालकवींच्या या जन्मशताब्दी वर्षात बालचित्रकारांच्या संवेदनांची दखल घेणे ही अत्यंत निकडीची बाब आहे."

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी पालक व रसिकांनी ही बालसुलभ चित्रे बालकवींच्या मनाचा आविष्कार म्हणून पहावी असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन बसोलीचे शरद खरे यांनी केले तर अकरा वर्षाच्या प्राची दीक्षितने बसोलीच्या उपक्रमाचा आढावा घेतला. वि. सा. संघाचे सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर यांनी आभार प्रदर्शन केले.

दिनांक २६–१–१९९० : विदर्भातील एक थोर स्वातंत्र्य सेनानी, साहित्यिक, राजकारणी व विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष कै. माधव श्रीहरी अणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दिनांक २६–१–१९९० : भारतीय गणराज्य दिनानिमित्त विदर्भ साहित्य संघामध्ये, सकाळी ९ वाजता कार्याध्यक्ष श्री वामन तेलंग यांचे हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी स्थानिक कार्यकारिणी. सदस्य व कार्यालयीन कर्मचारी व सेवक वर्ग उपस्थित होता.

दिनांक २९–१–१९९० : विदर्भ साहित्य संघाचे संस्थापक कविभूषण कै. ब. ग. उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांच्या जन्मशताब्दी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांचा प्रारंभ, पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख व प्रसिद्ध काव्यसमीक्षक प्रा. गं. ना. जोगळेकर यांच्या व्याख्यानाने झाला. "मराठी कविता आवर्तातून आवर्ताकडे" या विषयावर अत्यंत प्रभावी व आग्रही असे विचार श्री. जोगळेकर यांनी व्यक्त केले. आपल्या भाषणात त्यांनी केशवसुतांपासून तो आजतागायतच्या मराठी कवितेचा आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. जोगळेकर यांनी कै. खापर्डे यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण केला. कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी प्रा. जोगळेकरांचे पुष्पहार घालून स्वागत केले. प्रारंभी श्रीयुत चंद्रकांत कुळकर्णी यांनी प्रा. जोगळेकरांचा परिचय करून दिला. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांनी समारोपाचे व आभाराचे भाषण केले. कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

दिनांक ३०–१–१९९० : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि ७–२–९० : पदव्युत्तर जिमखाना पुणे विद्यापीठ व विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने धनवटे रंगमंदिरात "सत्यवानाची महागोची" व नॅशनल नेटवर्क" दोन एकांकिका सादर करण्यात आल्या. नाट्य विभागातर्फे आयोजित केलेल्या या कार्यक्रमास नागपुरातील बऱ्याच नाट्य रसिकांनी गर्दी केली होती.

दि. १०–९–९० : प्रख्यात साहित्यिक कै. प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. १३–२–९० : पुणे येथील प्रसिद्ध अभ्यासक व संशोधक श्री. श्री. र. भिडे यांचे 'महाभारतातील माताकुमारी' या विषयावर अत्यंत रोचक असे व्याख्यान झाले. माधवी, सत्यवती व कुंती यांच्या चरित्रावर त्यांनी व्याख्यानांची गुंफण केली. श्री. भिडे यांचा परिचय श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी करून दिला. समारोप आभारप्रदर्शन प्राचार्य राम शेवाळकर यांनी केले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दि. १४-२-९० : श्री ज्ञानेश्वरीच्या सप्तशताब्दिप्रित्यर्थ वि. सा. संघाने एका अत्यंत वेगळया व सुंदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महाराष्ट्राचे अत्यंत लाडके व प्रसिद्ध पार्श्वगायक व संगीतकार श्री. हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीतबद्ध केलेल्या ज्ञानेश्वराच्या रचना त्यांनी अत्यंत सुमधुर आवाजात गाऊन श्रोत्यांची मने काबीज केली. प्रत्येक रचनेच्या गायनाच्या दरम्यान प्राचार्य राम शेवाळकर यांनी अत्यंत रोचक व रसमधुर भाषेत प्रत्येक रचनेचे मर्म उलगडून दाखवले. ॐ नमोजी आद्यापासून पसायदानापर्यंत उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांची तुडुंब गर्दी होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री. हृदयनाथ मंगेशकर यांचे व त्यांचे साथीदार श्री. नारायण नायडू यांचे पुष्पहाराने स्वागत सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. नागपुरातील प्रसिद्ध संस्था 'सप्तक'चा सुद्धा या कार्यक्रमात सक्रिय सहभाग होता.

दि. २०-२-९० : महाराष्ट्रातील प्रसिद्ध पत्रकार राजकीय विचारवंत आणि 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक श्री. गोविंदराव तळवलकर यांनी वि. सा. संघास भेट दिली. सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी त्यांचे स्वागत केले. वि. सा. संघाच्या सर्व विभागांना श्री. तळवलकर यांनी भेट देऊन संघाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

दि. १३-२-९० : वि. सा. संघाचे संस्थापक कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि. २६-२-९० : प्रख्यात क्रांतिकारक व थोर राष्ट्रभक्त कै. विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. ३-३-९० : प्रख्यात इतिहास संशोधक कै. म. म. वा. वि. मिराशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. ३-३-९० : विदर्भ साहित्यसंघाच्या शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे चालविण्यात येणाऱ्या 'नवे ग्रंथ-नवे समीक्षक' या मालेत तीन नवीन ग्रंथांचे समीक्षण करण्यात आले. डॉ. यशवंत मनोहर लिखित "प्रबोधनविचार", रवींद्र शोभणे यांची कादंबरी "रक्तध्रुव" व आत्माराम कनीराम राठोड यांचे आत्मकथन "तांडा" या तीन ग्रंथांचे समीक्षण अनुक्रमे श्री. टी. के. तागडे, श्री. अनिल चिकाटे व कु. निशा शेंडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले. संचालन व आभारप्रदर्शन सौ. कुंदा केळापुरे यांनी केले.

दि. ११-२-१९९० : विदर्भ साहित्य संघातर्फे दरवर्षीनुसार घेण्यात आलेल्या कै. लक्ष्मण देवीदास जोशी आंतरशालेय लेखन स्पर्धेत भिडे कन्या शाळेने चार बक्षिसे प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त केले. या स्पर्धेत यंदा २०० रु. चा प्रथम पुरस्कार भिडे कन्या शाळेच्या कु. मयूरा नाडेकर व कु. सोनाली पारधी यांना प्राप्त झाला. दुसरे पारितोषिक भिडे कन्या शाळेची कु. सारिका तिरपुडे व जीवन शिक्षण विद्यालयाचा महेंद्र शिरसाट यांना विभागून देण्यात आले. तिसरे पारितोषिक सोमलवार हायस्कूल खामला येथील अनंत सलामे याने पटकावले. उत्तेजनार्थ दोन बक्षिसे सोमलवार हायस्कूल रामदासपेठचा रवींद्र केसकर व भिडे कन्या शाळेची कल्याणी तेलंग यांनी प्राप्त केली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'मुलांचे मासिक 'चे संस्थापक संपादक कै. बा. रा. मोडक यांच्या स्मृतिप्रित्यर्थ या वर्षी पासून ५१ रु. चे एक पारितोषिक वि. सा. संघाने पुरस्कृत केले होते. सोमलवार हायस्कूल रामदासपेठचा क्षितिश बडिये हा या विशेष पारितोषिकाचा मानकरी ठरला.

स्पर्धेचे आयोजन सौ. कुंदा केळापुरे यांनी केले. न्यू इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापक श्रीयुत बाळासाहेब गावली यांचे सहकार्य लाभले. सौ. शोभा बुचे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

दि. १९-३-९० : "आधुनिक युगाचा नवा नायक" अशा शब्दात सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. के. ज. पुरोहित (शांताराम) यांनी सुप्रसिद्ध समाजसेवी बाबा आमटे यांच्या कार्याचा गौरव केला. गडकरी सभागृहात आयोजित बाबा आमटे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त श्री वसंतराव लुले यांनी प्रकाशित केलेल्या "चर्चा" या वार्षिकांकाच्या विशेषांकाचे प्रकाशन झाले. त्या प्रसंगी के. ज. पुरोहित बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. या निमित्ताने आयोजित चर्चेत ज्येष्ठ पत्रकार श्री. मामासाहेब घुमरे, वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर प्रभृतींनी श्री. बाबा आमटे यांच्या कार्याचा विस्तृत व गौरवपूर्ण आढावा घेतला. श्री. वसंतराव लुले, प्रकृती बरी नसूनही कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. श्री. वामन तेलंग यांनी कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन केले.

दि. २०-३-९० : विदर्भ साहित्य संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे सुप्रसिद्ध कवी कै. बा. सी. मर्ढेकर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी सौ. छाया नाईक यांनी "मर्ढेकरांच्या कवितेतील वेदनेचा शोध" या विषयावरील अभ्यासपूर्ण शोधनिबंधाचे वाचन केले. मर्ढेकरांची सामाजिक वेदना वैयक्तिकतेकडून सामाजिकतेकडे संक्रांत होते असे सौ. नाईक यांनी प्रतिपादन केले. शोध निबंधाच्या वाचनानंतर संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी कै. बा. सी. मर्ढेकरांच्या काव्यातून निर्माण होणाऱ्या विविध मूलगामी प्रश्नांची चर्चा केली. कार्यक्रमाचे संचालन श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले. या कार्यक्रमास अनेक अभ्यासक व रसिक उपस्थित होते.

दि. २०-३-९० : भारतीय क्रिकेट संघाचे जुन्या पिढीतील सलामीचे फलंदाज श्री. मुश्ताक अली यांनी वि. सा. संघास भेट दिली. सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी त्यांचे स्वागत केले. मुश्ताक अली यांच्या भेटीप्रसंगी कार्यकारिणीचे स्थानिक सदस्य उपस्थित होते.

दि. २१ व २२-३-९० : वि. सा. संघाच्या श्री ज्ञानेश्वरी सप्तशताब्दीच्या निमित्ताने वर्षभर चालणाऱ्या उपक्रमांचा एक भाग म्हणून पुणे येथील प्रसिद्ध अभ्यासक व ज्ञानेश्वरीचे गाढे व्यासंगी डॉ. वि. रा. करंदीकर यांची "ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी" या विषयावर एक द्विवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. प्रारंभी डॉ. करंदीकर यांनी श्री ज्ञानदेवांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी पाहुण्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. प्रास्ताविकातून प्राचार्य शेवाळकर यांनी पाहुण्यांची यथोचित ओळख करून दिली.

ज्ञानेश्वरीने वारकरीपंथाला एक विचार व ग्रंथ दिला. सामान्य माणसाच्या मनात हिंदू धर्मा-विषयी एक नवी दिशा दिली व महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात एक क्रांती केली. असे विचार डॉ. वि. रा. करंदीकर यांनी पहिल्या व्याख्यानात व्यक्त केले दुसरे दिवशीच्या आपल्या दीड तासाच्या

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रसाळ व ओजस्वी व्याख्यानात "ज्ञानदेवाच्या आत्मानुभवातून आलेली उत्स्फूर्त प्रतिक्रिया म्हणजे ज्ञानेश्वरी" असे प्रतिपादन डॉ. वि रा. करंदीकरांनी केले.

या व्याख्यानमालेस रसिकांनी येवढा प्रचंड प्रतिसाद दिला की पहिले दिवशी गडकरी सभागृह अक्षरशः खचाखच भरले व बाहेरील पोर्चमध्ये सुद्धा गर्दी जमली होती. यास्तव दुसरे दिवशीचे व्याख्यान धनवटे रंगमंदिरात आयोजित करावे लागले. दोन्ही दिवशी कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. मराठी रंगभूमीवरील प्रख्यात गायिका-अभिनेत्री सौ. मधुवंती दांडेकर यांच्या पसायदान गायनाने व्याख्यानमालेची सांगता झाली.

दिनांक २७ मार्च १९९० : कै. वा. ना. देशपांडे स्मृती वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदचे आयोजन वाङ्मयीन नियतकालिकांच्या समस्येबाबत चर्चा करून विष्पत्ती सुचवू इच्छिणाऱ्या परिषदेने आपले प्रश्न शासनास सांगावेत, त्यासंबंधी सूचना, मार्गदर्शन करावे, महाराष्ट्र शासन त्यांची योग्य ती बूज राखून सर्वतोपरी सहकार्य करील. अशा शब्दात महाराष्ट्र राज्याचे शिक्षण राज्य मंत्री श्री. रणजितबाबु देशमुख यांनी वाङ्मयीय नियतकालिक विकास परिषदेच्या सत्कार सत्रात वयोवृद्ध ज्येष्ठ संपादक श्री. कुंडलराय मोहेकर व प्रा. या. मु. पाठक यांच्या सत्कार प्रसंगी बोलताना मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या विश्वाला आश्वासित केले.

अ. भा. मराठी साहित्य महामंडळ व विदर्भ साहित्य संघाच्या वतीने गडकरी सभागृहात आयोजित एक दिवसीय वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेत ते बोलत होते.

"सुषमा" व "विहंगम" या जुन्या काळातील दर्जेदार वाङ्मयीय नियतकालिकांचे ज्येष्ठ व वयोवृद्ध संपादक श्री, कुंडलराय मोहेकर व प्रा. या. मु. पाठक यांचा सत्कार श्री. रणजितबाबू देशमुख यांचे हस्ते या परिषदेत करून औचित्य साधण्यात आले होते. डॉ. वि. भि. कोलते यांचे हस्ते सकाळी परिषदेचे उद्घाटन झाले. परिषदेतील दिवसभर चाललेल्या विविध चर्चासत्रातून प्रथमच वाङ्मयीन नियतकालिकांच्या संदर्भातील सर्वांगीण विचार करणारी चर्चा घडविण्यात आली. युगवाणीचे पहिले संपादक कै. वा. ना. देशपांडे यांच्या स्मृतीला ही परिषद अर्पण करण्यात आली होती

प्रारंभीच या परिषदेचे संकल्पक युगवाणीचे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी या परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांनी या परिषदेच्या संबंधाने विदर्भ साहित्य संघाची असणारी व्यापक व सर्वसमावेशक संकल्पना स्पष्ट केली व उद्घाटक व निमंत्रितांचे स्वागत केले.

निबंध वाचन

वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग, अनुष्टुभचे संपादक बागले; अदितीचे संपादक श्री. प्रभाकर पुराणिक, युगवाणीचे संपादक श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी, व प्रख्यात समीक्षक डॉ. वि. स. जोग यांनी अनुक्रमे वाङ्मयीन नियतकालिकांची संकल्पना, भूमिका व कार्य त्यांची सद्यःस्थिती, त्यांच्या व्यवसायीकरणाची गरज, साहित्य संस्थांची मुखपत्रे व त्यांच्या समस्या आणि या नियतकालिकांच्या पोषणासंबंधाने शासन, जनप्रतिनिधी, वृत्तपत्रे व समाजाचे "दायित्व" या पाच चर्चासत्रातील प्रमुख निबंध सादर केले. डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. भास्कर गिरिधारी;

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. पद्माकर दादेगांवकर व प्रा. पुरुषोत्तम पाटील यांनी अनुक्रमे या सत्रांचे सूत्रसंचालन केले, विविध चर्चासत्रातही त्यांनी भाग घेतला, व आपले विचार मांडले सर्व निमंत्रित व सहभागींना परिषदेकरिता करवून घेतलेले साहित्य पुरविण्यात आलेले होते, सहभागी निमंत्रितांचे स्वागत कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी केले, उद्‌घाटन सत्राचे संचलन व आभार प्रदर्शन चिटणीस श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले, तर सत्कार समारंभाचे संचालन व आभारप्रदर्शन सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी केले.

एकमुखी मागणी

नियतकालिकांना दिल्या जाणाऱ्या अनुदानविषयक धोरणात आमूलाग्र बदल घडवून आणावा, प्रत्येक अनुदानित वाङ्मयीन नियतकालिकांचा वार्षिक उत्पादन खर्च पूर्णपणे भरून निघेल एवढे व्याज देणाऱ्या रक्कमेचा स्थायी निधी शासनाने या नियतकालिकांकरिता निर्माण करावा, तसेच विविध प्रतिष्ठानांनी या नियतकालिकांच्या उपजीविकेचा प्रश्न आपल्या कार्याचा भाग म्हणून स्वीकारावा व महाराष्ट्रात एका वेगळ्या वाङ्मयीन संस्कृतीची उभारणी व्हावी अशी एकमुखी मागणीही या परिषदेत समारोप प्रसंगी करण्यात आली.

या निमित्ताने शंभर वर्षातील वाङ्मयीन नियतकालिकांचे एक प्रदर्शनही वि. सा. संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाने आयोजित केले होते. युगवाणीच्या प्रथमांकापासून आज पावेतोचे स्वतंत्र दालनही त्यात होते. प्रा. वामनराव चोरघडे यांनी या प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. मराठीतील जवळ-जवळ सर्वच महत्त्वाच्या वाङ्मयीन नियतकालिकांच्या संपादक व संबंधितांनी या परिषदेत भाग घेतला. वर्षप्रतिपदेचा उत्सव व इतर पूर्वनियोजित कार्यामुळे अनेकांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे जमले नाही. याबद्दल पत्रे लिहून त्यांनी हळहळ व्यक्त केली व या परिषदेचे वेगळेपण, औचित्य व गरज स्पष्ट केली होती.

स्थायी परिषदेची स्थापना

सुमारे चौदा तास अखंडपणे चाललेल्या या ऐतिहासिक अशा पहिल्याच एक दिवसीय परिषदेत वाङ्मयीय नियतकालिकांच्या समस्या, संघर्ष, उपाययोजना, आवश्यक ती वाङ्मयीन संस्कृती उभारण्याचे प्रयत्न व आनुषंगिक उपाययोजना, याकरिता एका स्थायी वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषदेची स्थापना करण्याचाही संकल्प सोडण्यात आला. त्यादृष्टीने या नियोजित विकास परिषदेकरिता प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली युगवाणीचे संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी हे निमंत्रक असलेल्या व अस्मितादर्शचे डॉ. गंगाधर पानतावणे, पंचधाराचे डॉ. पद्माकर दादेगावकर, कवितारतीचे प्रा. पुरुषोत्तम पाटील, अनुष्टुभचे प्रा. प्रभाकर बागले, अक्षर-वैदर्भीचे डॉ. सुभाष सावरकर, "मायमराठीचे" प्रभाकर तेलंग, हे संपादक तर मुंबई विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. भास्कर गिरिधारी व साहित्य सुचीचे बळेल यांचा समावेश असलेल्या एका अस्थायी समितीची नियुक्ती देखील या परिषदेत करण्यात आली.

अशा समितीची पहिली सभा बडोदा येथे घेण्याचे निमंत्रणही "मायमराठी" हे नियतकालिक प्रकाशित करणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाने दिलेले आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महत्त्वपूर्ण सूचना

परिषदेत अनेक महत्त्वाच्या व दूरगामी परिणाम साधल्या जावा अशा स्वरूपाच्या सूचना करण्यात आल्या आहेत. त्यात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने ही परिषद पुढेही सातत्याने भरत रहावी या करता प्रयत्न करणे, वाङ्मयाशो प्रत्यक्ष संबंध असलेल्या जनप्रतिनिधींची एक समिती नेमून वाङ्मयीन नियतकालिकांबाबतचा आढावा घेणे, पाच वर्ष चाललेल्या नियतकालिकांना एक वर्षाचा व्यय भरून निघेल एवढ्या शासनाच्या जाहिराती पुरविल्या जाणे, कागद अनुदानरूपात प्राप्त होणे, तसेच नगरसेवक व जनप्रतिनिधींकरता असलेल्या निधीतून त्या त्या विभागातील नियतकालिकांकरिता काही अंश उपलब्ध असण्याची तरतूद करणे, यांचा समावेश आहे.

महामंडळाने वाङ्मयीन नियतकालिकांची मान्यताप्राप्त सूची तयार करून त्यातील नियतकालिके महाविद्यालयीय स्तरांवरील अभ्यासक्रमार्थ तसेच संदर्भ पत्रिका म्हणून विद्यापीठांनी अभ्यासक्रमात समाविष्ट करणे, नियतकालिकांची खरेदी करणाऱ्या संस्थांना काही प्रमाणात वाङ्मयीन नियतकालिकांची खरेदी सक्तीची करणे, वृत्तपत्र व ही नियतकालिके यांनी परस्परांची समीक्षात्मक दखल घेणे या व अशा इतर सूचनाही परिषदेत करण्यात आल्या.

परिषदेतील विविध चर्चासत्रांमध्ये डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, श्री. अशोक जोशी, प्रा, बागले, प्रा. शंकर सारडा (टिपण रूपाने), डॉ. श्रीनिवास खांदेवाले, प्रा. प्र. ब. कुळकर्णी, प्रा. विमल कीर्ती, प्रा. शा. वा. स्वान, डॉ. श्रीकांत तिडके, डॉ. सुभाष सावरकर, डॉ. मदन कुळकर्णी, डॉ. आशा सावदेकर, दिलीप देवधर, श्री. लक्ष्मणराव जोशी, डॉ. योगेंद्र मेश्राम, जो. टी. परांड, भाऊ समर्थ, सुनील शिनखेडे, दिवाकर आचार्य, विलास देशपांडे, सौ. शोभा उबगडे, अनिल बळेल, इ. मो. नारनवरे इत्यादींनी आपले विचार मांडले.

"शासनाच्या लेखी आपण नगण्य आहोत, आपली किंमत आपल्याला वाजवूनच घ्यावी लागणार आहे व त्याकरिता वाङ्मयीन नियतकालिकांचे व्यवस्थापक व संपादक यांनी त्यांच्या माध्यमाची गुणवत्ता वृद्धी करून सुबत्तेपेक्षा आपली वाङ्मयवत्ता वाढविली पाहिजे अशा शब्दात वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांनी या परिषदेचे समारोपीय भाष्य केले. त्या अगोदर परिषदेचे निरीक्षक म्हणून प्रा. सुधाकर जोशी यांनी संपूर्ण दिवसभराच्या व्यवहाराचे निरीक्षणाचा अहवाल सादर केला. परिषदेचे संचलन, संयोजन व संकल्पन श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले होते. अशा विकास परिषदेची कल्पना एप्रिल, मे, जून–८९ च्या युगवाणीच्या आपल्या पहिल्याच संपादकीयात त्यांनी मांडली होती व वाङ्मयीन नियतकालिकांच्या विश्वातून त्या कल्पनेला भरघोस प्रतिसाद व पाठिंबा लाभला होता. दूरदर्शनतर्फे परिषदेचे वृत्तप्रसारणार्थ चित्रीकरण करण्यात आले तसेच परिषदेच्या वृत्तांकनाकरिता पत्रकारांचीही उपस्थिती होती.

विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष श्री वामन तेलंग, सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर, चिटणीस श्री. प्रकाश एदलाबादकर, शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे आमंत्रक श्री. चंद्रकांत कुळकर्णी, धनवटे रंग मंदिराचे आमंत्रक श्री. योगेश बऱ्हाणपूरे, कोषाध्यक्ष श्री. अ. ल. लिमये, परीक्षा समितीच्या आमंत्रक सौ शोभा उबगडे तसेच वि. सा. संघाचे सदस्य कार्यकर्ते श्री. विलास देशपांडे व श्री. विलास जोशी यांनी या परिषदेच्या यशस्वितेकरिता अथक परिश्रम घेतलेले होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयीन नियतकालिकांच्या इतिहासातील पहिलीच घटना असलेली ही परिषद हा विदर्भ साहित्य संघाच्या वास्तुतील एक आगळा-वेगळा व संस्मरणीय उपक्रम ठरला आहे.

दि. २८-३-९० : चंद्रपूर येथील ४१ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. मो. दा. देशमुख यांचा वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात अत्यंत हृद्य सत्कार झाला. प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे, प्रा. शा. वा. स्वान, श्री. दिनकरराव देशपांडे यांची श्री. मो. दा. देशमुख यांच्या गुणगौरवपर भाषणे झाली. श्री. मो. दा. देशमुख यांचा या प्रसंगी शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. श्री. मो. दा. देशमुख यांनी उत्तरादाखल आपल्या साहित्याची प्रेरणा सत्यानुभव आहेत असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

परीक्षा समिती

दिनांक १४ व १५ ऑक्टोबर १९८९ रोजी प्रथम सत्रातील परीक्षा संपन्न झाल्या. एकूण ११ परीक्षा केंद्रांवर विविध परीक्षा घेण्यात आल्या. एकूण परीक्षार्थी संख्या ७७६ होती. परीक्षांचा निकाल ३० नोव्हेंबर ८९ रोजी घोषित करण्यात आला.

मानवता विद्यालय, बाभुळखेडा या केंद्राच्या केंद्रसंचालिका सौ. भावे यांचे नोव्हेंबर १३ रोजी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, परीक्षा समितीने शोक सभा घेऊन त्यांच्या परिवारास शोकसंदेश पाठविला.

१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयांचे मार्गदर्शनपर वर्ग ३० डिसेंबर ते २१ जानेवारी या कालावधीत प्रत्येक शनिवार व रविवार आयोजित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब नंदनपवार आणि संचालिका सौ. शोभाताई उबगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक ३, ४, ५ व ६ फेब्रुवारी, १९९० रोजी द्वितीय सत्रातील परीक्षा संपन्न झाल्या या सत्रात संपूर्ण विदर्भात एकूण १३० केंद्रावर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात आले. एकूण परीक्षार्थी संख्या १८,०९३ होती.

दिनांक १३ जानेवारी १९९० रोजी परीक्षा समितीची सभा अध्यक्षीय कक्षात संपन्न झाली. दोन्ही सत्रात शासनमान्य परीक्षा अनुक्रमे निम्नस्तर / उच्चस्तर प्रवीण आणि प्राज्ञ या परीक्षा घेण्यात आल्या.

■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. देवराव पाटील चोंढीकर स्मृती व्याख्यानमाला

पुसद

"कृष्णाचा अभ्यास करण्यासाठी मनोवैज्ञानिकांचा अभ्यास थिटा पडतो कारण कृष्ण मनाच्या पलिकडे गेलेली व्यक्ती आहे. कृष्णाचे सारे व्यक्तिमत्व राधेच्या संदर्भात उजळून निघते. राधा कृष्णाच्या आयुष्यात प्रगाढ होती गेली आहे. राधा–कृष्ण जीवात्मा–परमात्म्याचे प्रतिक आहे. राधा कृष्णात इतकी समर्पित झाली आहे की राधा म्हणजे लुगडं नेसलेला कृष्णच होय" असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक श्री. पद्माकर गोवईकर (पुणे) यांनी "कृष्ण सखा" या विषयावर कै. देवराव पाटील चोंढीकर व्याख्यानमालेचे विचारपुष्प गुंफताना केले. विदर्भ साहित्य संघ, पुसद शाखेने सुरू केलेल्या या व्याख्यानमालेचे हे तिसरे वर्ष होते. दि. २९, ३० नोव्हें. व १ डिसें. अशा तीन दिवस चालेलेल्यां या व्याख्यानमालेत श्री. पद्माकर गोवईकर यांनी कृष्णाचा कारागृहातील जन्म, कृष्णाची बासरी, मोरपिस, सावळा रंग, राधेचा कृष्ण, कृष्णाची रणनीती आदी विविध प्रतिकांतून श्रोत्यांसमोर कृष्ण उभा केला व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात आयोजिलेल्या या व्याख्यानमालेचे महनीय वक्ते श्री. गोवईकर यांचे प्रारंभ पुसदचे नगाराध्यक्ष व वि. सा. संघ पुसद शाखेचे अध्यक्ष, डॉ. एन. जी. हिराणी यांनी स्वागत केले. वि. सा. संघ सचिव उपप्राचार्य डॉ. उत्तम रुद्रवार यांनी वक्त्यांचा रोचक शैलीत परिचय करवून दिला. कार्यक्रमांचे संचालन वि. सा. संघाचे कार्यक्रम प्रमुख प्रा. मनोहर धारकर यांनी केले तर आभार प्रदर्शन वि. सा. संघाचे कोषाध्यक्ष प्रा. दिनकर गुल्हाने यांनी केले.

व्याख्यानमाला यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कै. देवराव पाटील चोंढीकर स्मारक समितीचे अध्यक्ष व माजी आमदार श्री. भाऊसाहेब माने, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. विजयराव पाटील चोंढीकर, शिवाजी शाळेचे मुख्याध्यापक श्री. घुले यांचे सहकार्य लाभले.

भंडारा

स्वलिखित कथाकथन

विदर्भ साहित्य संघाच्या भंडारा शाखेतर्फे शनिवार दि. २३–१२–८९ रोजी स्वलिखित कथाकथन आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी कु. रागिणी देव हिने तिची बक्षिसपात्र कथा "परिमार्जन" ही सादर केली. श्री. प्रदीप गादेवार यांनी वासंतिक अंकाच्या कथास्पर्धेत ५ वा क्रमांक मिळविलेली "जुम्मनचाचा" ही कथा सादर केली. तर सौ. सरोज सवंटे यांनी त्यांची पहिलीवहिली कथा सादर करून कथालेखनाच्या प्रांतातील यशस्वी पदार्पण सिद्ध केले.

वरील तीन्ही कथाकार भंडाऱ्याचेच असून तिघांच्याही कथा उत्कृष्ट होत्या. या कार्यक्रमांचे संचालन आणि आभार प्रदर्शन कार्यवाह कु. माधुरी सुतोने यांनी केले.

वि. सा. संघ भंडाराच्या वतीने कै. राम गणेश गडकरी यांच्या ७१ वा स्मृतिदिन सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात २३ जाने, ९० रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक प्रा. कृष्णा चौधरी होते. या कार्यक्रमांतर्गत गडकरी वाङ्मयाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारा परिसंवाद आयोजित करण्यात आला. प्रेमाचे शाहीर या नात्याने गडकऱ्यांच्या प्रेमकवितांचा परामर्ष प्रा. बाळासाहेब व्यवहारे यांनी घेतला तर हा प्रेमविषय फुलविण्यासाठी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गडकऱ्यांनी निसर्गदृश्यांचा उपयोग आपल्या कवितात कसा केला ह्याचे सुंदर विवेचन श्री. विठ्ठल लांजेवार यांनी केले. गडकऱ्यांच्या कवितेतील सामाजिक आशय श्री. द. ब. कापरे यांनी उलगडून दाखविला तर त्यांच्या नाटकाचा त्रोटक परिचय श्री. तेजराम भुरे यांनी करून दिला.

अध्यक्षीय समारोपात प्रा. कृष्णा चौधरी यांनी गडकऱ्यांच्या समग्र वाङ्मयावर नाटयपूर्ण प्रकाश टाकून कवी केशवसुतांच्या तुलनेत गडकऱ्यांचे वेगळेपण आणि मर्यादा स्पष्ट केल्या.

कार्यक्रमाचे संचालन कार्यवाह कु. माधुरी सुतोने तर आभारप्रदर्शन सहकार्यवाह सौ. कल्पना पनके यांनी केले.

ब्रम्हपूरी

दिनांक २३-१-९० ला " गडकरी स्मृति दिनानिमित्त " स्थानिक वि. सा. संघाने " कवी संमेलन " आयोजित केले होते. संमेलनाचे अध्यक्षस्थान शाखाध्यक्ष श्री. गो. न. शिनखेडे यांनी भूषविले होते. प्रास्ताविक प्रा. सतीश शिनखेडे यांनी केले. स्थानिक लोकमान्य टिळक वाचनालयाच्या सभागृहात झालेल्या कवीसंमेलनात, प्रा. बांडे, प्रा. शिनखेडे, प्रा. हूर्णे, पाचभावे, चव्हाण, सोरते, जोशी, तसेच कु. वंजारी व कु. बावणे यांनी काव्यवाचन केले संमेलनाचे संचालन श्री. संजय देव यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. भा. व्यं. कात्यायन यांनी केलें.

स्व. श्री. धनंजय नाकाडे स्मृति चित्रकला स्पर्धा

दिनांक २८-१-९० ला लोकमान्य टिळक विद्यालय स्थानिक वि. सा. संघाच्या विद्यमाने स्व. श्री. धनंजय नाकाडे स्मृति चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत वरोडा, चिमूर आणि गडचिरोली तसेच स्थानिक कलावंतांनी भाग घेतला होता. स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे.

बांबु पेटींग-प्रथम-श्री. संजय भैसारे, चिमुर रु. २०९
द्वितीय-श्री. सुभाष डोंगरवार, ब्रम्हपूरी रु. १०१

महाविद्यालयीन गट-प्रथम-श्री. एस. के. डोंगरवार
द्वितीय-दिनानाथ नागपूरे

माध्यमिक गट-प्रथम-अनिरुद्ध गुरनुले
द्वितीय-कृष्णा कैलाश दहीकर

पूर्वमाध्यमिक गट-प्रथम-कु. अश्विनी खंडारे
द्वितीय-अभिजित घोडे

ब्रम्हपूरी, विदर्भ साहित्य संघातर्फे दिनांक १२ ते १५ फेब्रुवारी ९० या काळात स्व. मणिलाल जिवाणी स्मृति एकांकिका स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी एकूण २५ संस्थानी प्रवेश नक्की केला. होता. नागपूर, आरमोरी, भिवापूर, उमरेड, भद्रावती, नवेगाव पांडव आणि ब्रम्हपूरीच्या संस्थांनी एकूण १९ एकांकिका सादर केल्या. स्पर्धेचे परीक्षक, श्री. निलकांत कुलसंगे, श्री. विवेक जोशी व कु. कल्पना मांढरे ह्या होत्या. स्पर्धेचे उद्‌घाटन श्री. भगवानजी भाई निवाणी यांच्या हस्ते शाखाध्यक्ष श्री. गो. न. शिनखेडे यांच्या उपस्थितीत झाले तर पुरस्कार वितरण श्री. निलकांत कुलसंगे ह्यांच्या हस्ते पार पडला. परीक्षकांनी निकाल पुढील प्रमाणे दिला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अ गट

निर्मीती–प्रथम–" नाटयायन " नागपूर–" राज " रु. ४०१ व फिरती ढाल.

द्वितीय–विभागून–" अभिनय " नागपूर–" नाटक " आणि जनसेवा प्रा. शाळा नागपूर "टॅंट्याची वरात " रु. ३०१, प्रोत्साहरे पर–न. प. सांस्कृतिक मंडळ उमरेड " व्यथा " प्रमाणपत्र, दिग्दर्शन–प्रथम जॉनी मेश्राम (टॅंट्याची वरात) रु. ५१–व फिरती ढाल

द्वितीय–मिलींद नांदेडकर (राज) रु. ३१

अभिनय–प्रथम कु. दिपाली लातूरकर स. ३१ (राज–ती)

द्वितीय–चंद्रशेखर यासटवार रु. २१ (एक होता औरंगजेब) मुमताज,

–रमेश काळे (नाटक–वृद्ध)

गट " ब "

निर्मीती–प्रथम–" अभिनय " नागपूर (तेजस्विनी) रु. १५१ व फिरती ढाल

द्वितीय–विधाता शिक्षण संस्था, नागपूर रु. १२१ रोख (आशीर्वाद)

प्रोत्साहनपर–राष्ट्रीय विद्यालय भिवापूर–प्रमाणपत्र (चांडाळ चौकडी)

दिग्दर्शन–प्रथम कु. सुनिता हिर्लेकर (तेजस्विनी) रु. ५१ व फिरती ढाल

द्वितीय–किशोर बांगडकर (आर्शीवाद)

अभिनय–प्रथम–मनिष पाग्रीकर रु. ३१ द्वितीय–पु. (आशीर्वाद–राजू)

श्रद्धा पेशवे (तेजस्विनी–झाशीची राणी)

कु. मिनल तुंबडे (तेजस्विनी–सावित्री)

नाटय लेखनाचा–स्व. सौ. ललिता केवले पुरस्कार रु. ५१ श्री. जॉनी मेश्राम (टॅंट्यांची वरात) यांना देण्यात आला.

चोहट्टा बाजार

शाखाध्यक्ष श्री. ज. पां. खोडके यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६–१–९० ला थोर शिक्षणतज्ज्ञ श्री, वसंत माटे यांच्या हस्ते अभिनंदन व पुरस्कार समारंभ संपन्न झाला, या प्रसंगी. श्री माटे यांनी पालक, शिक्षक व विद्यार्थी यापैकी कुणाचीही शिक्षणात श्रद्धा नसल्याचे सोदाहरण पटवून दिले. मम्मी (ममीज), डॅडी–डॅड (डेंड) ने संस्कृती हनन केले आहे असे ते म्हणाले.

आरंभी श्री. माटे मांनी सरस्वतीपूजन केले. सौ. गोकर्णाताई आढे यांनी शाखेचा अहवाल सादर केला. कु. जयश्री राठी, विनोद वुंदे, सुरेश वहिले या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना स्टील डबे पुरस्कार म्हणून देण्यात आले. कु. नंदाताई कंझरकर हिला शाखेमार्फत आयोजित केलेल्या स्व. दुर्गाबाई इंजनकार काव्य स्पर्धेतील प्रथम पुरस्कार श्री. माटे यांच्या हस्ते देण्यात आला.

विविध क्षेत्रातील उत्तम कामगिरीबद्दल सर्वश्री शेख, वानकर, वाघमारे, रविंद्र इंजनकर, वसंत भटकर, श्रीधर पाचघरे, गंगाधर गिरी (ज्ञानदीप) यांचे गुलाब–पुष्प देऊन अभिनंदन केले. शाखेची वाटचाल यावर श्री एस. जी. बुटे यांनी विचार मांडले,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुख्याध्यापक कडू, ठाकरे, रमेश शेठ, संजय खोडके, आढे, डॉ. सोळंके, करनाणी, सपकाळ, म्हैसने, डॉ. दातकर, प्रा. भालेराव, बन्सी पाटील यांनी मोलाचे सहकार्य दिले.

यापूर्वी डॉ. य. क. चिखलेकर यांनी संस्थेस भेट देऊन शाखेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

लाखनी :

विदर्भ साहित्य संघ, शाखा लाखनीच्या वतीने दि. २६–१–९० रोजी गणराज्य दिनाप्रीत्यर्थ राष्ट्रभक्तीपर गीतगायन स्पर्धा घेण्यात आल्यात.

अध्यक्ष–कर्मयोगी श्री. नत्थूजी तरोणे, माजी उपाध्यक्ष, जि. प. भंडारा विद्यार्थ्यांत राष्ट्रभक्ती उभी करण्याच्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक करून यावेळच्या पारितोषिकाची रक्कम त्यांनी स्वतःहून शाखेला दिली.

यशस्वी स्पर्धक :

गट १ ला : वर्ग ५ ते ७

प्रथम– ज्ञानेश प्रभूनाथ पारधी – स. वि. लाखनी.

द्वितीय– कु. रमा बुंदेले – वरीष्ठ प्रा. शा. सोमलवाडा.

तृतीय– कु. सुषमा सूर्यनारायण भारद्वाज– रा. ल. कन्या शाळा, लाखनी.

गट २ रा– वर्ग ८ ते १०

प्रथम– (१) कु. जोत्स्ना विश्वनाथ कोचे – जि. प. वि. मुरमाडी, तुपेकर

(२) कु. शर्मिला डोमाजी जांभुळकर जि. प. वि. मुरमाडी, तुपेकर

द्वितीय– (१) कु. कल्पना धनराज गिऱ्हेपुंजे – राणी ल. कन्या शाळा लाखनी.

(२) कु. नागेश्री सूर्यनारायण भारद्वाज राणी ल. कन्या शाळा लाखनी.

तृतीय– (१) विनोद रोमन देशपांडे, जि. प. वि. मुरमाडी, तुपकर

गट ३ रा– वर्ग ११ ते इतर

प्रथम (१) कु. कविता तुळशीरामजी किरपात, जि. प. क. वि. पोहरा

(२) कु. गणेश प्रभूनाथ पारधी, समर्थ क. म. वि. लाखनी

दिनांक २७–१–९० शालीनी कथन स्पर्धा

अध्ययक्ष सुप्रसिद्ध पत्रकार– श्री. वामनराव तेलंग, कार्याध्यक्ष वि. सा. संघ, नागपूर यांनी, पाठ केलेली कथा स्वतःच्या शब्दात सादर करून प्रेक्षकांच्या मनावर बिंबविण्याची कला हस्तगत करण्याचा हितोपदेश विद्यार्थ्यांना केला.

यशस्वी स्पर्धक :

गट १ ला – वर्ग ५ ते १०

प्रथम– (१) कु. कल्पना तुळशीराम किरपात, जि. प. वि. पोहरा,

द्वितीय– (१) सुषमा सुर्यनारायण भारद्वाज, रा. ल. वि. लाखनी

तृतीय– (१) कु. ज्योती प्रभुनाथ पारधी, रा. ल. वि. लाखनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गट २ रा वर्ग ११ ते इतर

प्रथम– (१) गिरधर तानबाजी शिगनजुडे, जि. प. क. म. वि. मुरमाडी

द्वितीय– (१) भूपेश प्रभूनाथ पारधी, स. क. म. वि. लाखनी

तृतीय– (१) दिलीपकुमार तातोबा गजभिये, जि. प. गांधी, क. म. वि. लाखनी

वि. सा. संघाच्या लाखणी शाखेतर्फे भंडारा जिल्ह्यातील जुन्या व नव्या कवींचे कविसंमेलन गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर दि. २७ एप्रिल १९९० रोजी विवेकानंद सभागृह लाखणी येथे आयोजित केले होते. याप्रसंगी हिंगणघाट येथील प्रसिद्ध कवि श्री. ज्ञानेश्वर चौधरी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. निमंत्रित कवि म्हणून प्रा. कृष्णा चौधरी (रामटेक), तीर्थानंद कापगते, ताराचंद चव्हाण (नागपूर), हरीहर पेन्दे (हिंगणघाट), गोविंद ठेंगडी (मौदा) याचप्रमाणे भंडारा जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागातील जवळ जवळ ३० ते ४० नवोदित कवींनी यात भाग घेतला. कार्यक्रमास बराच मोठा रसिकवर्ग उपस्थित होता.

उमरखेड :

(१) उमरखेड येथील प्रसिद्ध स्वातंत्र्य संग्राम सैनिक, यवतमाळ जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार आणि वि. सा. संघाचे माजी उपाध्यक्ष कै. बाबासाहेब एकबोटे यांच्या तृतीय पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांना वि. सा. संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २४ फेब्रु. ९० रोजी येथील ठाकरे विद्यालयात आयोजित पुण्यस्मरण समारंभात श्रद्धांजली वाहण्यात आली.

(२) संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशताब्दीच्या निमित्ताने आणि या विभागातील नामवंत कीर्तनकार ह. भ. प. कै. गोविंदराव तथा दत्तोपंत देशमुख (कोल्हे) यांच्या तृतीय स्मृती दिनानिमित्त येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. प्रा. डॉ. दिलीप डबीर यांच्या सुश्राव्य कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला होता. पुसदचे ह. भ. प. प्रा. न. चि. आप्पामाजंने आणि श्री. संजय कोरटकर यांनी त्यांना साथ दिली होती.

श्रोत्यांच्या उत्स्फुर्त गर्दीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

धामणगाव रेल्वे :

(१) महाराष्ट्रस्तरीय कथाकाव्य स्पर्धा :

ह्यावर्षी प्रथमच ह्या शाखेच्या वतीने वृत्तपत्रात निवेदन देऊन महाराष्ट्रातील नवोदित साहित्यिकांकडून कथा आणि कविता स्पर्धेकरिता प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या.

प्राप्त कथा आणि कवितांचे परीक्षण डॉ. सिंधुताई मांडवकर, डॉ. प्रकाश जोशी आणि प्रा. नरेशचंद्र काठोळे (सर्व अमरावती) ह्यांनी केले.

पारितोषिक विजेते : कविता

प्रथम (रु. १०१) – श्री. शिवाजी गावडे, ठाणे मुंबई

द्वितीय (रु. ७१) – श्री. प्रदीप गुजराथी, मनमाड

तृतीय (५१) – श्री. मुबारक शेख, सोलापूर.

उत्तेजनार्थ – (१) श्री. नरेंद्र पाटील, घणसोठी जि. ठाणे

(२) श्री. विजय दळवी अकोला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथा :

प्रथम (रु. १०१) – प्रा. यशवंत माळी, देशिंग, जि. सांगली.

द्वितीय (रु. ७१) – कु. भाग्यश्री विद्वांस, नागपूर

तृतीय (रु. ५१) – श्री. सुभेदार सुर्वे, मुंबई.

उत्तेजनार्थ – (१) श्रीमती शीला राजपूत, पातूर
(२) श्रीमती मंजितरी दुसे, पुणे.

यशस्वी स्पर्धकांना बक्षीस आणि प्रमाणपत्रे पाठविण्यात आलीत.

प्रस्तुत कथा–काव्य स्पर्धेची काम वि. सा. सं. शाखेचे कार्यक्रम प्रमुख डॉ. आनंद सुभेदार, प्रा. शरद पुसदकर, आणि प्रा. सुखदेव ढाणके ह्यांनी परिश्रमपूर्वक पार पडली.

(२) मासिक 'पुस्तकपरिचय व साहित्य सहवास' बैठकीच्या कार्यक्रमाअंतर्गत काही कार्यक्रम संपन्न झालेत.

परिचय कर्ता	पुस्तकाचे नांव
(१) प्रा. बा. द. महात्मे	– "मेड इन इंडिया" लेखक पुरुषोत्तम बोरकर
(२) प्रा. शिरीष पाटील	– "धर्म" एकांकिका वाचन, लेखक श्रीनिवास भणगे
(३) श्रीमती गीताताई वाघमारे	– "दि सेव्हन्थ सिक्रेट" इरव्हींग वॅलेस.

वि. सा. संघ धामणगांवच्या वतीने सभेमध्ये प्रा. यशवंत मनोहर यांची महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला. तसेच श्री. बाबासाहेब म्हात्रे (सभासद, वि. सा. सं.) यांच्या अमरावती जिल्हा भूविकास बँक, अध्यक्षपदी नियुक्ती बद्दल सत्कारकरण्यात आला.

(३) शोकप्रस्ताव :

धामणगावचे दानशूर सामाजिक कार्यकर्ते श्री. शुभकरणजी सराफ ह्यांच्या दुःखद निधनाबद्दल धामणगांव येथील नाटयचळवळीचे प्रवर्तक कला साहित्याचे रसिक, सामाजिक कार्यकर्ते प्रा. श्रीखंडे ह्यांच्या अचानक दुर्दैवी मृत्युबद्दल शोकसभा घेण्यात आली.

आजीव सदस्य

१ जानेवारी १९९० ते ३१ मार्च १९९० या कालावधीत मान्य झालेले आजीव सदस्य—

(१) श्री. अनंत वासुदेव व्यवहारे, नागपूर (२) श्री. प्रमोद चितामण साठये, नागपूर (३) श्री. शरदचंद्र नारायणराव बुचे, नागपूर (४) श्री. लोकचंद अनंतरामजी किरणापुरे, साकोली (५) श्री. प्रभाकर राजाराम देशपांडे, अकोला (६) श्री. रमेश दसरूजी बारई, राजुरा.

सरचिटणीस

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ